तुमची आर्थिक क्रांती

अधीनते सामर्थ्य

गॅरी किसी

तुमची आर्थिक क्रांती

अधीनते सामर्थ्य

गॅरी किसी

Your Financial Revolution, The Power of Allegiance, Marathi
Copyright © 2022 by Gary Keesee

Originally published in English
Copyright © 2015 by Gary Keesee
ISBN: 978–0–9729035–9–2

Gary Keesee Ministries,
P.O. Box 779, New Albany,
OH 43054, USA

GaryKeesee.com

This book is a FREE GIFT from Gary Keesee Ministries and is NOT FOR SALE

तुमची आर्थिक क्रांति: आधीनते सामर्थ, मराठी
Copyright © 2022 द्वारा गैरी किसी

मूलतः इंग्रजी मध्ये प्रकाशित
Copyright © 2015 द्वारा गैरी किसी
ISBN: 978–0–9729035–9–2

गैरी किसी मिनिस्ट्रीज़,
P.O. Box 779, न्यू अल्बेनी,
OH 43054, USA

GaryKeesee.com

हे पुस्तक गैरी किसी मिनिस्ट्रीज़ कडून बक्षिस आहे आणि विक्री साठी नाही

विषय सूची

प्रस्तावना 07

परिचय. 09

अध्याय 1: राज्य 23

अध्याय 2: निळे धुके. 65

अध्याय 3: हे प्रभू, दया कर!. 73

अध्याय 4: विशालकाय मासा 103

अध्याय 5: ती कोणाची निवड होती? 115

अध्याय 6: परमेश्वराचा आशीर्वाद. 155

अध्याय 7: द्वार 175

अध्याय 8: आधीनतेचे सामर्थ्य 185

अध्याय 9: तुम्ही त्यांना खायला द्या! 195

अध्याय 10: गोळा करा, पण घाम गाळू नका!. 211

अध्याय 11: चालण्यापेक्षा उडणे सोपे आहे! 219

प्रस्तावना

देव ड्रेन्डाला आणि मला काही वर्षांपासून ज्या प्रवासावर घेऊन गेला त्या बद्दल मला लिहायचा आहे. आमचे जीवन खूप बदलले आहे! येशूने बायबलमध्ये केलेले सर्व चमत्कार आपल्या स्वतःच्या डोळ्यांसमोर वर्षानुवर्षे घडताना आम्ही पाहिले आहेत: मेलेले उठवले गेले; पक्षाघाती लोक उठतात, चालतात आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा कामावर जातात; असंख्य लोक बरे झाले; आणि शेकडो हजारो लोकांसाठी वित्त पुनर्संचयित केले गेले. परंतु आम्ही पाहिलेले सर्वात मोठे चमत्कार आमच्या स्वतःच्या कुटुंबात आणि आमच्या वैयक्तिक जीवनात घडले.

माझे ध्येय तुम्हाला एका प्रवासावर घेऊन जाणे आहे, शोधाचा एक प्रवास जो मला आशा आहे की तुमचे जीवन माझ्याप्रमाणेच बदलेल. ही कथा एका पुस्तकात सांगता येत नाही. हे पुस्तकांच्या मालिकेतील पहिले पुस्तक आहे जे तुम्हाला तुमच्या स्वतःच्या वैयक्तिक आर्थिक क्रांतीकडे नेईल आणि देवाच्या राज्याची रहस्ये उघड करेल ज्याने माझे जीवन बदलले. माझ्यासाठी, हा एक रोमांचक प्रवास आहे आणि कधीही संपणार नाही. आपण सर्व शिकत राहू! राज्याचे ज्ञान अक्षय आहे.

मी देवाचा खूप आभारी आहे. त्याची दया दररोज नवीन आहे, आणि तो धीर देणारा आणि क्षमाशील आहे, आपल्याला तारणाच्या मार्गावर नेतो. माझी अद्भुत पत्नी ड्रेंडाचा उल्लेख केल्याशिवाय मी तुम्हाला या प्रवासात नेऊ शकत नाही. देवाप्रती तिचे हृदय आणि तिचे माझ्यावरील प्रेम आणि संयम यामुळेच मला माझ्या दुर्बलतेचा सामना करण्याची आणि मला अत्यंत आवश्यक असलेल्या उत्तरांसाठी देवाचा शोध घेण्याचे धैर्य मिळाले. मी मोठ्या आनंदाने हे तुमच्याबरोबर सामायिक करत आहे:

आपली आर्थिक क्रांती

निष्ठेचे सामर्थ्य

परिचय

तू माझ्या जिवाला शांतीपासून दूर ठेवले आहेस; समृद्धीला मी पारखा झालो आहे.

-विलापगीत 3:17

काहीतरी चुकीचे आहे, खूप चुकीचे आहे हे जाणून मला जाग आली! मी उठल्याबरोबर माझ्या मनात प्रचंड भीती पसरली. मला माझी जीभ जाणवत नव्हती. माझे हात, पाय आणि चेहऱ्याची बाजू सुन्न झाली होती. मी ड्रेन्डाला उठवले आणि माझा संपूर्ण चेहरा आणि जीभ कामच करत नाही हे तिला सांगण्याची सांगण्याची धडपड करू लागलो. तेव्हा माझ्या लक्षात आले की माझे हृदय धडधडत आहे आणि मी तिला माझी परिस्थिती सांगितल्याने जे कष्ट झाले त्यामुळे माझा श्वासोच्छ्वास कठीण झाला होता. ती उठली आणि लगेच माझ्यासाठी प्रार्थना करू लागली. हळूहळू, विचित्र आणि भीतीदायक भावना थोड्याशा कमी झाल्या. ड्रेन्डा म्हणाली मी काहीतरी खायला घेऊन येते म्हणून मी अंथरुणावर पडलो. मी गोंधळून गेलो होतो आणि प्रार्थना करत असतांना मनात ही भीती वाटत होती कि हे माझ्या शरीराला काय होत आहे. माझ्यावर भीतीच्या लाटा उसळतील; माझ्या मनावर हल्ला करेल अशी भीती मला माझ्या आयुष्यात पूर्वी कधीही वाटली नव्हती.

मी ज्या कर्जाखाली जगलो आणि पैशाची सतत गरज यामुळे भीती माझ्या दैनंदिन जीवनाचा एक सामान्य भाग बनून गेला होता. माझ्या बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे मी गेल्या काही वर्षांपासून प्रचंड तणावाखाली होतो. मी कमिशन वर काम करत होतो आणि त्या मध्ये खूप काही कमाई होत नव्हती. आम्ही 1800 च्या दशकातील एक लहान फार्महाऊस

भाड्याने घेतले होते, बांधल्या पासून कधीही त्याची डागडुजी केली नव्हती अशी त्याची स्थिती होती. मी इथे थोडी अतिशयोक्ती करत आहे असे मला वाटते, पण घराची स्थिती खरेच चांगली नव्हती. खिडकीच्या चौकटींमध्ये अंतर होते तिथे रोपटे वाढून आमच्या दिवाणखान्यात येत होती. खिडक्यांचे काचेचे तावदाने तुटले होते आणि आम्ही ते पुठ्ठा आणि डक्ट टेपने बंद केले होते. तोडके मोडके असले तरी ड्रेन्डाला ते घर राहण्या लायक बनवण्यात यश आले. पण तिच्या अप्रतिम कौशल्याने प्रयत्न करूनही घरात अनेक गंभीर समस्या होत्या ज्या आम्हची झाकून ठेवू शकत नव्हतो.

आमच्याकडे जे काही होते ते ह्याच स्थितीत होते - तुटलेले! आमच्या दोन्ही गाड्या जुन्या होत्या, 200,000 मैलांवर चाललेल्या, आणि त्यांना सुरु करणे फारच कठीण होते. आमची दोन मुलं नर्सिंग होमने टाकून दिलेल्या गाद्यांवर झोपत असत, त्यांच्या बेडरूममध्ये असलेले कार्पेट रस्त्याच्या कडेला कचराकुंडीत सापडले होते. सामान गिरवी ठेऊन पैसे घेणे ही जीवन जगण्याची पद्धत होऊन गेली होती आणि जो कोणी आमची मदत करू शकतो असे वाटत असे त्या प्रत्येकाकडून आम्ही कर्ज घेतले होते. आम्ही एक दिवस पुरेल एवढेच कमवून अन्न विकत घेऊन जगत होतो, रोज काहीतरी विकण्यासाठी शोधत होतो, जगण्याचा मार्ग शोधत होतो आणि उद्या सर्व काही चांगले होईल या आशेवर जगत होतो.

माझे दहा क्रेडिट कार्ड काही महिन्यांपूर्वीच रद्द करण्यात आली होती आणि माझ्यावर तीन फायनान्स कंपनीचे कर्ज होते, जे 28 टक्के दराने आकारले जात होते. माझ्या कारची देयके (होय, माझ्या जुन्या कार्सची अजूनही देणी होती) 120 दिवस उशीर झाला होता आणि त्या परत ताब्यात घेण्याच्या मार्गावर होत्या. माझे प्रत्येक बिल उशिरा भरल्या जात होते. माझ्या विरुद्ध खटले आणि धारणाधिकार दाखल करण्यात आले होते आणि दररोज सकाळी माझी झोप फोन च्या आवाजानेच उघडत असे. माझ्याकडे IRS चे देखील देणे होते आणि त्यांनी कर मागणी साठी माझ्यावर धारणाधिकार दाखल केला होता. ड्रेंडा आणि माझ्यावर आमच्या पालकांचे $26,000 चे कर्ज झाले होते, आणि ते आम्हाला मदत करून थकले होते. आमचा रेफ्रिजरेटर क्वचितच सामानाने भरलेला असायचा. वीज कंपनीकडून आमची वीज

सतत बंद करण्याची धमकी दिली जात होती, कधीकधी दर महिन्याला ह्या धमक्या मिळत होत्या. आणि मी माझ्या मानसिकतेच्या टोकाला पोहोचलो होतो.

आता तणावाचा माझ्या शरीरावर परिणाम होत होता हे मला समजत नव्हते. अनेक डॉक्टरांकडे गेल्यानंतर, त्यांनी सांगितले की मला पॅनीक अटॅक होत आहेत आणि मला अँटीडिप्रेसेंट्स द्यायला सुरुवात केली. दुर्दैवाने, हे पॅनीक अटॅक चालूच राहिले आणि त्यांचे प्रमाण इतके वाढले की मला माझे घर सोडण्याची भीती वाटू लागली. भीतीच्या या धुक्याच्या दिवसांत, मी उत्तरे शोधत असताना, माझ्या लक्षात येऊ लागले की साखर, स्टार्च किंवा कॅफिन असलेले काही खाद्यपदार्थ खाल्ल्या मुळे मला जास्तच पॅनिक अटॅक येतात. त्यामुळे मला आता अन्न खायला भीती वाटू लागली होती आणि मी खाण्याच्या प्रत्येक पदार्था बद्दल जागरूक राहू लागलो. माझे जीवन इतके गुलाम बनले की मी आता काम करू शकत नव्हतो, त्या मुळे आर्थिक परिस्थिती आणखीच बिकट झाली.

माझ्या पत्नीला वाटले की ती आता तिचा नवरा गमावणार आहे, आणि मी बरे झाल्यानंतर तिने मला सांगितले की आमच्या मुलांची काळजी घेण्यासाठी काय करावे लागेल याचे तिने अक्षरशः नियोजन केले होते. मी कशाशी लढत होतो याचा मला अनुभव किंवा ज्ञान नसल्यामुळे मी उत्तरांसाठी देवाचा धावा केला. माझ्या शरीरात जो त्रास होता त्याची डॉक्टर मोठं मोठी नावं सांगायची, ते म्हणायचे की माझे आजार असाध्य आहे आणि मी कायमचे औषधांवर राहीन. इतर डॉक्टरांनी सांगितले की मी मधुमेह होण्याच्या काठावर आहे, आणि त्यांचे म्हणणे होते कि माझ्या वयोमानाप्रमाणे माझे आजार देखील वाढणार आणि मी त्यांच्या साठी एक चांगला केस स्टडी म्हणून उपयोगात येऊ शकत होतो.

मी ख्रिस्ती असूनही, मला आध्यात्मिक युद्धाचा किंवा शत्रूविरुद्ध कसे उभे राहायचे याचा अनुभव नव्हता. खरं तर, या क्षणी मला हे समजले नाही की मी दुष्ट आत्म्याशी लढत आहे. मला वाटले की मला फक्त माझ्या भौतिक शरीरात समस्या आहे आणि मला बरे करण्यासाठी देवाला विनंती करत होतो. एक ख्रिस्ती म्हणून, मला माहित होते की देव माझे उत्तर आहे, परंतु त्या वेळी असे वाटले की देव खूप दूर आहे. माझ्या स्थितीसाठी डॉक्टरांनी मला वेगवेगळ्या नावांनी निदान दिले, सर्व मानसिक समस्यांशी संबंधित आणि फक्त औषधां द्वारे उपचार

करता येण्याजोगे. मी आधी म्हटल्याप्रमाणे, कोणताही इलाज नव्हता, फक्त उपचारांनी मला माझ्या मानसिक स्थितीचा सामना करण्यास मदत केली. परंतु, त्या औषधांचे माझ्यावर दुष्परिणाम होत होते आणि त्यांचा काहीही उपयोग झाला नाही. खरं तर, मला असे वाटते त्या मुळे आणखी काही लक्षणं दिसू लागली. त्या मुळे मला असे वाटले की मी धुक्यात जगत आहे, भीतीदायक विचार सतत त्रास देत होते आणि त्या विचारांवर मला नियंत्रण नव्हते. माझ्याकडे उत्तरे नव्हती आणि कशानेही माझी मदत होत नव्हती. हे काही आठवडे चालले, आणि लक्षणे आणि भीतीने माझ्या आयुष्याचा ताबा घेतल्याने माझी निराशा वाढत गेली.

पण एका रात्री, मी देवाकडे उत्तरे शोधत असताना मला एक मोठे यश मिळाले. मला माझ्या स्वातंत्र्याची एक प्रमुख गुरुकिल्ली सापडली. मी माझ्या चर्चमध्ये बुधवारी रात्रीच्या उपासनेसाठी गेलो. स्तुती आणि उपासने दरम्यान, मला खूप भयंकर असा पॅनीक अटॅक आला. काय करावं तेच कळत नव्हतं. मी हताश होतो, आणि मला प्रार्थनेची गरज आहे हे मला माहीत होते, म्हणून मी पुढे वेदीकडे गेलो. मी उपासनेत पूर्णपणे व्यत्यय आणत होतो तरी मला त्याची पर्वा नव्हती. ते खूप मोठे चर्च होते आणि पाद्री मला वैयक्तिकरित्या ओळखत नव्हते, परंतु स्तुती आणि उपासना करणाऱ्या टीममधील एक जण मला ओळखत होता. मी बेसावधपणे प्लॅटफॉर्मकडे रेंगाळत जात असताना, सर्व काही थांबले आणि सर्वांच्या नजरा माझ्याकडे वळल्या. सुरक्षा अधिकारी मला रोखण्यासाठी समोरच्या दिशेने जातांना पाहून मला ओळखत असलेल्या कर्मचारी सदस्याने त्वरित हस्तक्षेप केला.

त्याने माझी परिस्थिती पास्टरला सांगितल्यावर, मला दिसले कि पास्टर थोडे निवळले आहेत. ते माझ्याकडे आले आणि त्यांनी माझ्यासाठी प्रार्थना केली. माझा मित्र पास्टरला सांगत होता की मी आजारी आहे. पास्टर ने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाले, “त्याच्यात अशक्तपणाचा आत्मा आहे.” त्याबरोबर त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि त्या आत्म्याला निघून जाण्याची आज्ञा केली. त्या क्षणी, एक अविश्वसनीय गोष्ट घडली - मी मोकळा झालो. काही महिन्यांत प्रथमच मला सामान्य वाटले, कोणतेही त्रासदायक विचार नाहीत, भीती नाही, फक्त एक खोल शांतता. मी आभारी होतो असे म्हणणे हे कमी होईल.

मी उत्तेजित आहे असे म्हटले तर मला नेमके कसे वाटले ते स्पष्ट करणे कठीण होते. मला चक्कर आल्यासारखे वाटले, पिसासारखे हलके आणि आनंदाने भरलेले.

चर्च नंतर, ड्रेंडा आणि मी काही मित्रांसह पिझ्झा हटमध्ये आनंद साजरा करण्यासाठी गेलो. मी पिझ्झा खात असताना, मला आठवते की रेडिओवर एक गाणे वाजत होते, आणि अचानक, मला वाटले की भीतीची तीच वेदनादायक भावना माझ्यावर घोंगडीसारखी आली आहे - ती परत आली. पुन्हा, त्या वेळी मला समजले की तो आत्मा आहे. पास्टर म्हणाले होते की हा अशक्तपणाचा आत्मा होता, परंतु मला याचा अर्थ काय आहे हे माहित नव्हते आणि मी थोडा गोंधळलो होतो. मला वाटले की मी उपासनेचा वेळी बरा झालो आहे, परंतु वरवर पाहता मी तसे नव्हते. दुसऱ्या दिवशी मी पुन्हा पॅनीक अटॅक चा सामना करत होतो, पण आदल्या रात्री चर्चमध्ये काय घडले होते याचा विचार करणे मी थांबवले नाही. जेव्हा पास्टरने माझ्यासाठी प्रार्थना केली होती, तेव्हा त्यांनी माझ्या बरे होण्या साठी प्रार्थना केली नव्हती. त्यांनी एका आत्म्यावर अधिकार स्थापित केला होता. माझ्या प्रकृतीकडे पाहून माझ्या पाळकाला असे वाटले होते की कदाचित माझ्या मध्ये रोगा ऐवजी आत्मा असावा. (पुन्हा, तुम्ही पाहू शकता की हे सर्व लक्षात न येण्याइतका मी ख्रिस्तामध्ये किती अपरिपक्व होतो.) त्या वेळी, मला आत्मिक युद्धाबद्दल फारच कमी माहिती होती, परंतु मला माहित होते की दुष्टात्मा वास्तविक आहेत. मी तसे एक पाहिले होते.

माझ्या किशोरवयात, मी माझ्या पालकांच्या मालकीच्या दोन पिझ्झा दुकानांपैकी एका मध्ये व्यवस्थापक म्हणून काम करत होतो. एका रात्री, एक माणूस आला त्याने मला सांगितले की तो जवळच्याच स्थानिय मेथोडिस्ट चर्चमध्ये संजीवनाच्या सभा करत आहे. त्यांनी मला त्या ठिकाणी येण्याचे निमंत्रण दिले. मला आमंत्रण देऊन जाण्या पूर्वी त्याने एक वाक्य म्हटले, “येशूने बायबलमध्ये ज्या गोष्टी केल्या होत्या त्याच गोष्टी तो अजूनही करत आहे”. आणि, त्या वाक्या कडे माझे लक्ष वेधले गेले. मी चर्चमध्ये वाढलो होतो. मी पाचव्या इयत्तेत असतांना व्हेकेशन बायबल स्कूल मध्ये मी माझे हृदय परमेश्वराला दिले होते. पण मी इतक्या वर्षात माझे लक्ष वेधून घेईल किंवा मला खात्री होईल कि इथे देवाचे सामर्थ्य आहे असे, किंवा देवाच्या सामर्थ्याने कधीच कोणाला बरे झालेले पाहिले नाही. त्यामुळे शालेय जीवनात माझे

जीवन परमेश्वरापासून दूर गेले. त्या वेळी प्रत्येक वर्षी, मी चर्चमध्ये जाण्याचा नवीन निश्चय करत असे, परंतु माझा तो निर्णय टिकून राहत नव्हता, पण हा माणूस वेगळा वाटत होता. येशू अजूनही त्याच गोष्टी करत आहे ज्या त्याने बायबलमध्ये केल्या होत्या? तो कशाबद्दल बोलत आहे हे पाहण्यात मला रस होता. माझे बरेच कर्मचारी त्या चर्चला जात असत, आणि त्यांनी मला त्या ठिकाणी येण्यासाठी प्रोत्साहन दिले, म्हणून मी जाण्याचा निर्णय घेतला.

पहिल्या रात्री जेंव्हा मी उपासनेला गेलो, तेंव्हा मला देवाची उपस्थिती अशा प्रकारे जाणवली जी मी यापूर्वी कधीही अनुभवली नव्हती. असे वाटले की जणू काही मी देवाचे अस्तित्व प्रत्यक्ष अनुभवत आहे; ते मूर्त होते. त्या माणसाने दिलेला संदेश शक्तिशाली होता आणि जेव्हा त्याने विचारले की या ठिकाणी आज कोणी येशूला आपले जीवन अर्पण करू इच्छित आहे किंवा पुन्हा समर्पित करू इच्छित आहे का, तेव्हा मी माझा हात वर केला. व्वा! काय अद्भुत रात्र होती ती. मी खूप उत्साहित होतो. देव किती महान आहे हे मला सर्वांना सांगायचे होते.

त्या दिवसांत इंटरनेट नव्हते, सीडी किंवा कॅसेट टेप्स नव्हते आणि आमच्या टीव्हीवर तीन चॅनेल होते. आमचं गाव तसं छोटंच होतं, त्यामुळे संध्याकाळी विरंगुळा म्हणून करण्यासाठी फारसं काही नव्हतं. त्यामुळे किशोरवयीन मुले सहसा रात्री उशिरापर्यंत मनोरंजनासाठी पिझ्झाच्या दुकानाभोवती एकत्र येत असत. आम्ही शुक्रवार आणि शनिवारी रात्री, आमचे दुकान सहसा पहाटे 1:00 वाजता बंद करत होतो, त्या दिवशी आमची पार्किंगची जागा किशोरवयीन मुलांनी भरलेली असायची. अनेक वेळा मला त्यांना घालवून लावावे लागत असे, कारण त्यांच्या मुळे माझ्या ग्राहकांना पार्क करण्यासाठी जागा शोधणे कठीण होत होते. अनेकदा पोलिसांना हस्तक्षेप करून त्यांची मारामारी थांबवून त्यांना घरी पाठवावे लागले. पण आता मला एक कल्पना आली. त्या किशोरांना येशूबद्दल ऐकण्याची गरज होती. म्हणून मी बाहेर गेलो आणि त्यांना सांगितले की जर त्यांच्यापैकी कोणाला थांबायचे असेल तर आम्ही पिझ्झा शॉप बंद केल्यानंतर मी बायबल अभ्यास वर्ग घेणार आहे. लक्षात ठेवा, ही सकाळची 1:30 ची वेळ असेल, कारण आम्हाला सकाळी 1:00 ते 1:30 पर्यंत स्वछता करणे आणि दुकान बंद करणे आवश्यक होते. त्यांच्यापैकी कोणी येईल की नाही याची मला खात्री

नव्हती, पण आश्चर्य म्हणजे, त्यापैकी काही जण बायबल स्टडी साठी आले, आणि माझे काही कर्मचारी देखील शामिल झाले. मी पहिल्या रात्री मीटिंग घेतली, तिथल्या एका किशोरवयीन मुलाने सांगितले की त्याला ख्रिस्ताची सेवा करायची आहे आणि त्याने मला विचारले कि त्याने त्या साठी काय करावे. आता, याने माझ्यासाठी एक अनोखी समस्या निर्माण केली कारण मी अद्याप ह्या विषयावर विचार केला नव्हता. लक्षात ठेवा, मला मुळात बायबलबद्दल काहीच माहीत नव्हते, पण मी एक शास्त्रवचन वाचले होते ज्या मुळे मला माझ्या समस्येचे उत्तर मिळाले होते.

जो कोणी परमेश्वराच्या नावाने त्याचा धावा करील तो तरेल.'

-प्रेषितांची कृत्ये 2:21

मला ते फार सोपे वाटले, म्हणून मी तेच करायचे ठरवले. तो प्रश्न घेऊन हा किशोर माझ्याकडे आला तेव्हा बाकीचे सर्वजण निघून गेले होते, म्हणून मी त्याला खुर्चीवर बसून येशूचे नाव उच्चारण्यास सांगितले. मला वाटले की ही एक साधी गोष्ट आहे, परंतु मी जवळजवळ दोन मिनिटे तिथे बसलो, आणि तो काहीच बोलला नाही. त्यामुळे त्याने माझे ऐकले नाही असे समजून मी पुन्हा त्याला येशूचे नाव उच्चारण्यास सांगितले. पण अजून काहीच नाही. तेव्हा माझ्या लक्षात आले की तो थरथर कापत होता. मला त्याच्या कडे पाहून हे लक्षात आलं की त्याला ते नाव तोंडातून काढायला त्रास होत आहे. अचानक, धरण फुटल्यासारखे, त्याने येशूचे नाव उच्चारले आणि त्याच्या चेहऱ्यावर शांतता पसरली. हा प्रयत्न सफल झाला! त्यामुळे प्रत्येक वेळी जेव्हा कोणीतरी म्हटले कि त्यांना त्यांचे हृदय परमेश्वराला द्यायचे आहे तेंव्हा मी त्यांना हेच करायला लावायचो. मी त्यांना खुर्चीत बसवून येशूचे नाव उच्चारण्यास सांगत असे. काही अपवाद वगळता, अनेक जण लगेच नाव उच्चारू शकत नव्हते. ते थरथरायला लागत, आणि मग, ते खूप प्रयत्न केल्या नंतर अचानक येशूचे नाव उच्चारू शकत होते, आणि त्या नंतर त्यांना एकदम शांतीचा अनुभव होत असे.

एके दिवशी मी मागच्या खोलीत कणिक मिक्स करत असताना मागच्या दारावर ठोठावल्याचा आवाज आला. जेव्हा मी दार उघडले, तेव्हा दारावर उभ्या असलेल्या दोन

किशोरांना मी ओळखले कारण मी त्यांच्याशी ख्रिस्ताविषयी आधी बोललो होतो. मी त्यांना आत बोलावले आणि त्यांच्यापैकी एकाने सांगितले की त्याला त्याचे हृदय देवाला द्यायचे आहे. म्हणून मी त्याला खुर्चीत बसवले; आणि, नेहमीप्रमाणे, तो थरथरू लागला आणि शेवटी येशूचे नाव उच्चारले. जेव्हा मी वर पाहिले तेव्हा तो दुसरा किशोर माझ्यापासून दूर मागे सरकला होता आणि खोलीमध्ये एका कोपऱ्यात दबून उभा होता आणि पिंजऱ्यात अडकलेल्या प्राण्यासारखा दिसत होता. तो माझ्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत होता आणि भिंतीत घुसण्याचा प्रयत्न करत होता. हे खूप विचित्र होते आणि हे काय होत आहे हे मला देखील समजत नव्हते.

मी तिथे उभा राहून त्याच्याकडे बघत असतांना अचानक माझ्या मनात विचार आला, "हा दुष्टात्मा तर नाही ना?" मला तर दुष्टात्म्या संबंधी काही अनुभव नव्हता, पण मी बायबलमध्ये त्यांच्याबद्दल वाचले होते. त्याची विचित्र स्थिती पाहून मी, तो दुष्टात्माच असावा ह्या व्यतिरिक्त इतर कोणताही विचार करू शकत नव्हतो. म्हणून मी म्हणालो, "येशू, हा दुष्टात्मा आहे का?" झटपट, बुरखा मागे खेचल्याप्रमाणे, मला या मुलाच्या बाजूला एक दुष्टात्मा लटकलेला दिसला. तो दुष्टात्मा सुमारे तीन फूट उंच होता, आणि तो पाय ओढून या माणसाला चिकटून होता. लोक मला नेहमी विचारतात, "तो कसा दिसत होता?" तो माकडासारखा दिसत होता पण थोडा वेगळा होता. तो माकडासारखा केसाळ होत, त्याचे माकडासारखे लांब हात होते, परंतु चमकदार, डोळे लाल होते आणि ते विकृत होते. ज्या क्षणी मी ते डोळे पाहिले, मी खरोखरच मोठ्याने किंचाळलो. त्या डोळ्यांत भयंकर तिरस्कार होता आणि मला तो सोसवत नव्हता. मी त्या डोळ्यांमध्ये जे पाहिले त्याचे वर्णन करायचे झाले तर आपण म्हणू तो एक द्रवा सारखा द्वेष होता, झिरपणारा द्वेष जो जवळजवळ मूर्त होता. मला एका सेकंदात कळले की हे जे काही आहे त्याला माझ्याबद्दल तिरस्कार तर आहेच पण माझ्यावर खूप रागही आहे.

आता काय? हे सर्व पाहून आता काय करावे हेच कळत नव्हते. पण मला वाटले की जर येशूच्या नावाने आपल्याला राज्यात प्रवेश मिळाला आहे तर त्या सोबत या दुष्ट आत्म्यावर मला अधिकार देखील मिळाला असणार, म्हणून मी मोठ्याने म्हणालो, "येशूच्या नावाने."

झटकन बुरखा बंद झाला. तुम्हाला जुने ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही आठवत असतील, तर टीव्ही बंद केल्यावर, तुम्ही जे पहात होते त्याची एक धूसर छाया पडद्यावर उमटलेली दिसत असे. तर, हे जे काही होते ते अगदी तसेच दिसत होते. मला ते दिसत नव्हतं, पण मला त्याची अंधुक होणारी सावली दिसत होती. बुरखा बंद होताच, किशोरवयीन मुलगा अचानक इमारतीच्या बाहेर पळत सुटला.

तर, होय, मला माहित होते की दुष्टात्मे खरे आहेत. मला असे म्हणायचे आहे की एकदा मला समजले की माझी समस्या दुष्टात्मा आहे, मी ती हाताळली आणि त्या क्षणापासून स्वतंत्र होऊन चालू लागलो . पण ते लगेच झाले नाही. इतकी वर्षे चर्चमध्ये राहिल्यानंतर, मी ख्रिस्तामध्ये कोण आहे हे जाणून घेण्यासाठी आणि शत्रूविरूद्ध माझे कायदेशीर अधिकार कसे लागू करावे हे शिकण्यासाठी मी खरोखर वेळ दिला नाही हे दुःखदायक आहे. पण आता मला जाणवले किंवा निदान अशी शंका आली आहे की माझा संघर्ष एखाद्या आत्म्याशी आहे, तेव्हा मला प्रोत्साहन मिळाले की मी त्याचा पराभव कसा करायचा हे शिकू शकेन. मला हे माहित होते कि दुष्ट आत्म्याने माझ्या अधिकाराला प्रतिसाद द्यायला पाहिजे, पण तसे झाले नाही म्हणून मी गोंधळलो होतो. काही दिवसांनंतर, मला आणखी एक सकारात्मक अनुभव आला ज्याने प्रमाणित केले की माझी समस्या खरोखरच दुष्ट आत्मा आहे.

मी माझ्या बेडरूममध्ये आत्म्याने प्रार्थना करत होतो आणि मी प्रार्थनेसाठी पुरेसा वेळ घालवण्याचा निर्धार केला होता ह्या साठी कि काय चालले आहे याचे उत्तर मला मिळू शकेल. त्या प्रार्थना सत्रादरम्यान, मला अचानक जाणवले कि माझी सुटका झाली आहे, आणि मी पुन्हा मुक्त झालो, अगदी ज्या प्रमाणे पास्टर ने माझ्यासाठी प्रार्थना केली होती. तो आत्मा परत येण्यापूर्वी मी त्या रात्री सुमारे दोन तास स्वतंत्र होतो, पण आता मला खात्री होती की तो दुष्ट आत्मा होता कारण त्याने प्रार्थनेला प्रतिसाद दिला होता. मी पुन्हा प्रार्थना करण्याचा प्रयत्न केला पण काहीही झाले नाही. म्हणून मी आत्मिक युद्धाविषयी मला जे काही वाचता येईल ते वाचायला सुरुवात केली आणि मी ख्रिस्तामध्ये कोण आहे याची तालीम करण्यात वेळ घालवला. पण तरीही ते जे काही होते ते सुटत नव्हते. मी प्रार्थना करत असताना फक्त एकदाच माझ्या स्वतःच्या अधिकाराला आत्मा प्रतिसाद देत असल्याचे मला दिसले. मी

गोंधळून गेलो आणि परमेश्वराला काय करावे असे कळकळीने विचारू लागलो. मी पूर्णपणे मुक्त होऊ शकलो नसलो तरी, मला आणखी पॅनीक अटॅक येत नव्हते आणि सर्व अर्धांगवायू निघून गेला होता. त्यामुळे काही मोठे विजय मिळायला सुरुवात झाली होती. मी अजूनही त्रासदायक विचार आणि नैराश्याशी लढत होतो, तरीही मला आत्मविश्वास होता की मी मजबूत होत आहे. ख्रिस्तामध्ये असलेल्या आपल्या अधिकाराबद्दल बायबलमध्ये काय सांगितले आहे याचे पुनरावलोकन करण्यात मी दररोज वेळ घालवू लागलो.

एक दिवस दुपारी मी माझ्या ऑफिसमध्ये काम करत असतांना मला परिचित असलेल्या भीतीच्या भयंकर भावनांशी लढत होतो. मी प्रार्थना करण्याचा प्रयत्न केला आणि भीतीच्या आत्म्याला निघून जाण्याची आज्ञा केली परंतु नेहमीप्रमाणे त्याचा काहीही परिणाम झाला नाही. अचानक, मला परमेश्वराचा आवाज ऐकू आला. त्याने मला, त्या आत्म्याला मोठ्याने आणि अधिकाराने निघून जाण्यास सांगावे असे म्हटले. त्यानंतर त्याने मला असे काहीतरी सांगितले ज्यामुळे माझा आत्मिक अधिकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. तो म्हणाला, त्या आत्म्याला सोडण्याची आज्ञा देत असतांना आपल्या भावनांकडे लक्ष देऊ नको, आणि , जे दिसेल किंवा अनुभवाला येईल त्यावर नाही परंतु देवाच्या वचनावर स्थिर राहा. मी माझ्या ऑफिसमध्ये काम करत होतो, त्यामुळे मी उठून उभा राहून त्या सैतानाला मोठ्याने ओरडून जाण्याची आज्ञा देऊ शकत नव्हतो, कारण माझे कर्मचारीही तिथे होते. म्हणून मी उठलो आणि प्रसाधनगृहात गेलो आणि मोठ्याने म्हणालो, “येशूच्या नावाने, मी तुला बांधतो, हे भयभीत आत्म्या. तू जे करत आहेस ते बेकायदेशीर आहे आणि मी तुला येशूच्या नावाने आत्ताच निघून जाण्याची आज्ञा देतो.” पण काही झाले नाही, मला काही बदल जाणवला नाही. पण मला प्रभूने जे सांगितले होते ते आठवले, “तुझ्या भावनांकडे लक्ष देऊ नको.” म्हणून परमेश्वराने मला या आत्म्यावर जो अधिकार दिला आहे त्याबद्दल मी त्याचे आभार मानले आणि मी मुक्त झाल्याबद्दल देवाची स्तुती करू लागलो. मी माझ्या कार्यालयात जाऊन परत कामाला लागलो. मी तिथे माझ्या डेस्कवर बसलो असताना, मला काहीही बदल जाणवत नसला तरी, प्रत्येक वेळी जेव्हा भीती माझ्या मनावर हल्ला करत होती तेव्हा मी मुक्त झालो आहे याबद्दल परमेश्वराचे आभार मनात राहिलो. मी एका क्लायंटच्या फाईलवर

काम करत असताना, अचानक मला जाणवले की देवाचे अस्तित्व माझ्यावर आले आहे आणि मला दिसले की एक काळा, चपळ ढग मला सोडून गेला आणि माझ्या ऑफिसच्या छतावरून पटकन अदृश्य झाला.

मी स्वतंत्र झालो होतो!

भीतीचा तो सैतानी आत्मा निघून गेला आणि जर तो परत आला तर मला त्याचा सामना कसा करायचा हे माहित होते. मी खूप उत्साहित होतो! मी ड्रेन्डाला कॉल केला आणि तिला नुकतेच घडलेल्या गोष्टीबद्दल सांगितले. ती म्हणाली मी लगेच तिकडे येत आहे, आणि आम्ही त्या दिवशी एका चायनीज रेस्टॉरंटमध्ये (माझ्या आवडत्या) जेवण करून आनंद साजरा केला. त्या दिवसानंतर मला त्या भीतीच्या आत्म्या विरुद्ध मला सतत स्थिर उभे राहावे लागणार होते, कारण दुष्ट आत्मे लवकर हार मानत नाहीत. आणि सैतान निघून गेला असला तरी माझ्या आयुष्यात आर्थिक स्थिती सुधारली नव्हती. त्यामुळे माझ्या आर्थिक बाबतीत भीत सतत माझ्या मनात आपले स्थान बळकट करण्याचा प्रयत्न करत होती, आणि मला ह्या परिस्थितीत कसे वागावे आणि मन शांत कसे ठेवावे हे शिकावे लागले.

मला माझ्या जीवनात इतरही अनेक युद्ध मला करावे लागत होते आणि त्यामधून शिकावे लागत होते, देवाच्या राज्याविषयी अनेक आत्मिक धडे अजून शिकायचे होते, परंतु ही कथा सांगण्याचे कारण म्हणजे व्यक्तीवर आर्थिक तणावाचा परिणाम कसा होतो आणि त्या मुळे व्यक्तीच्या जीवनात भीती आपले स्थान निर्माण करून त्यांचे जीवन कसे त्रासदायक करून सोडते हे मला समजले आहे.

मला तुम्हाला निश्चित पणे सांगायचे आहे कि मी स्वतः ह्या अनुभवातून गेलो आहे.

त्यामुळे आज तुम्ही कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीचा सामना करत असाल, तरी लक्षात ठेवा, आशा आहे. मला माझ्या आयुष्यात देवाच्या राज्याबद्दल आधीच निश्चितपणे माहित असते तर किती बरे झाले असते असे मला वाटते. ही फार दुःखाची गोष्ट आहे कि ड्रेन्डा आणि मला आवश्यकता नसतांना ते नऊ वर्ष आर्थिक अनागोंदीत जगावे लागले!

दुर्दैवाने, आमच्या आर्थिक गोंधळात आम्ही रडारवरून खाली पडलो नाही; आम्ही रडारवरच होतो. आम्ही असेच जगत होतो. जिवंत राहण्या साठी भीक मागण्याची ती नऊ

वर्षे, अपमानास्पद घटना आणि वाईट परिस्थितीच्या आठवणी. ह्या घटना मी लगेच विसरेन. माझी पत्नी आशीर्वादित असो! त्या वर्षांत तिने खूप काही सहन केले. म्हणूनच आज मी जमेल तेव्हा तिला आशीर्वाद देण्याचा प्रयत्न करतो.

भयाच्या त्या सैतानी आत्म्याचा सामना कसा करायचा हे जसे परमेश्वराने मला शिकविले, तसेच त्याने मला आत्मिक दृष्टीकोनातून माझ्या आर्थिक परिस्थितीला कसे सामोरे जावे हे शिकवायला सुरुवात केली. देवाने ड्रेन्डा आणि मला जे शिकवले आणि त्याने आम्हाला आमच्या आर्थिक बाबतीत जे दाखवले ते जीवन इतके बदलणारे आणि इतके नाट्यमय होते की आम्ही आमचे उर्वरित आयुष्य लोकांना त्याच तत्वांचे अनुकरण करण्यास मदत करण्याचा निश्चय केला आहे.

ड्रेन्डा आणि मी संपूर्णपणे विखरलेल्या अवस्थेतून आमच्या कारसाठी रोख पैसे देणे, आमचे स्वप्नातील कर्जमुक्त घर बांधणे, अनेक कंपन्या सुरू करणे आणि जगातील प्रत्येक टाईम झोनमध्ये आमचे "फिक्सिंग द मनी थिंग" हे दैनिक टीव्ही प्रसारण सुरू करणे येथपर्यंत पोहचलो. अनेक कुटुंबांना जीवन कसे जगावे हे जाणून घेण्यात मदत करण्यासाठी आणि महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी ड्रेंडा ने ABC फॅमिली नेटवर्कवर, ड्रेंडा टीव्ही साप्ताहिक प्रसारण सुरू केले. आम्हाला वाटले की देव आम्हाला फेथ लाइफ चर्च सुरू करण्यास पाचारण करत आहे, ह्या चर्च द्वारे आता आम्ही हजारो लोकांना दर आठवड्याला देवाच्या राज्याबद्दल शिकवतो. आम्ही जे करतो ते करण्यासाठी आता वर्षाला लाखो डॉलर्स चा खर्च येतो, हे लेखन करण्याच्या वेळेपर्यंत फक्त टीव्ही प्रसारण करण्यासाठी महिन्याला $200,000 पेक्षा जास्त खर्च येत आहे. यापैकी काहीही, अर्थातच, या पुस्तकांच्या मालिके द्वारे आम्ही तुम्हाला जे शिकवू इच्छितो ते देवाने आम्हाला शिकवले नसते तर हे शक्य झाले नसते. तुम्ही या पुस्तकाकडे आर्थिक विषयावरील आणखी एक पुस्तक म्हणून पाहू नये अशी माझी इच्छा आहे. तुम्ही बजेट कस तयार कराव यावरील हे आणखी एक पुस्तक नाही, अशा पुस्तकाची देखील आवश्यकता आहे, परंतु ते हे पुस्तक नाही. हे त्याच जुन्या, "पुरेसे उत्पन्न नाही" म्हणून आम्हाला कशात कटौती करायला हवी, याची पुनर्रचना नाही.

नाही, हे एका क्रांतीबद्दलचे पुस्तक आहे, अंधाराच्या साम्राज्याविरुद्धचे बंड आणि दारिद्र्याला कंठस्नान घालणारे आहे. भ्रष्ट सरकार मुळे येणारे तणाव दूर करून एक नवीन जीवन मार्ग स्वीकारण्याचे हे पुस्तक आहे. मला मिळालेले उत्तर काही सामान्य आर्थिक सल्ला नव्हते. मला असे आढळले की मला संपूर्ण आर्थिक दुरुस्तीची आवश्यकता आहे:

एक आर्थिक क्रांती!

अध्याय 1

राज्य

मी तुम्हाला प्रस्तावनेत सांगितल की माझे आयुष्य भयाने कसे ग्रासले होते. म्हणून मला विश्वास आहे की मी आपला हा प्रवास या एका विधानासह सुरू करणे महत्त्वाचे आहे जे तुम्हाला खरोखर समजून घेणे आवश्यक आहे: भीतीने जगणे शिकू नका! भीतीमुळे सर्व प्रकारच्या आसुरी प्रभाव, गोंधळ आणि नैराश्याचे दरवाजे उघडतात, जसे आपण माझ्या आयुष्यात घडताना पाहिले आहे आणि लाखो लोकांच्या जीवनात घडते आहे. माझा विश्वास आहे की आर्थिक आघात हा लोकांच्या जीवनातील भीतीचे मोठे दार उघडणारा असा आहे. मी माझ्या आर्थिक नियोजन फर्मद्वारे 34 वर्षांपासून लोकांना त्यांच्या आर्थिक बाबतीत वैयक्तिकरित्या मदत करत आहे आणि मला आढळून आले की आयुष्यात आर्थिक समस्या असलेल्या किंवा त्यांच्याशी लढा देणारा मी एकमेव व्यक्ती नव्हतो.

किंबहुना, माझ्या संशोधनाच्या आधारे, मला असे आढळून आले की 23 टक्के अमेरिकन लोकसंख्या त्यांच्या कर्जाची किमान देयके देखील भरत नाहीत आणि हळूहळू आर्थिक विस्मृतीत जात आहेत. आणि हा देशाचा एक चतुर्थांश भाग आहे! सत्तेचाळीस दशलक्ष, लोकसंख्येचा एक षष्ठांश, फूड स्टॅम्पवर जगत आहेत, आणि दहापैकी आठ कुटुंबे पगारावरच जीवन जगत आहेत. आपल्या देशावर असलेल्या 18 ट्रिलियन डॉलर्सचे जे कर्ज आहे आणि हे कर्ज ते कधीही परत करू शकणार नाही त्याबद्दल तर मी बोलणार देखील नाही. मी 120 ट्रिलियन डॉलर्सच्या त्या आर्थिक जबाबदाऱ्यांचा मी उल्लेख करणार नाही ज्यासाठी आपल्या देशाने कोणत्याही निधीची यंत्रणा नसतांना स्वतःला बांधून घेतले आहे. आपण गंभीर आर्थिक समस्या असलेल्या राष्ट्रामध्ये राहतो! मला माझ्या आयुष्यात जे आढळले ते

असे आहे की निराकरण न झालेल्या आर्थिक समस्या आणि आर्थिक ताणतणावामुळे भीतीने जगणे हा जीवनाचा एक मार्ग बनून जातो.

पण उत्तरे आहेत! आपण मुक्त होऊ शकता! या विषयावर बायबल स्पष्ट आहे: येशू गरीबांना सुवार्ता सांगण्यासाठी आला होता!

> *प्रभू परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे; कारण दीनांना शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे.*
>
> — यशया 61:1

गरीब माणसासाठी चांगली बातमी काय आहे? हीच की तो मुक्त होऊ शकतो! हे कसे घडू शकते, याची आज तुम्हाला कल्पना नसेल. माझ्या आयुष्यात एके काळी मला पूर्णपणे असहाय्य वाटले. माझ्याकडे फक्त $100 आहेत आणि मला कुणाचे देणे नाही हा विचार माझ्या गिणतीतच नव्हता, तो जर इतका भयानक आणि दुःखदायक नसता तर त्या विचारानेच मला हसू आले असते. त्या नऊ वर्षांच्या काळातील जगण्यासाठी होणाऱ्या धडपडीचा माझ्यावर भयंकर असा भावनात्मक प्रभाव झाला. आर्थिक ताणतणाव आपल्या सर्व चांगल्या गोष्टी हिरावून घेतो. मी जेव्हा त्या वर्षातील घरगुती चित्रपट पाहतो तेव्हा मला खूप लाज वाटते. त्या विडिओ मध्ये तुम्ही मला माझ्या कारमधून बाहेर पडताना आणि दिवसभर ऑफिस मध्ये काम करून घरी आल्या नंतर माझी मौल्यवान मुलं मला भेटण्यासाठी धावत माझ्याकडे येतांना आणि माझे पाय धरून “बाबा, बाबा” असे म्हणून ओरडतांना तुम्ही पाहू शकता. व्हिडिओमध्ये तुम्ही हे देखील पाहू शकता कि मी त्यांना उत्तरही देत नव्हतो किंवा त्यांच्याकडे पाहतही नव्हतो. मी इतका तणावात होतो आणि निराश झालो होतो की मला काय महत्त्वाचे आहे याची जाणीवही नव्हती.

प्रभू परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे; कारण दीनांना शुभवृत्त सांगण्वास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे.

— यशया 61:1

माझ्या मनातील विचार मला परत एकदा पोहण्याच्या वर्गात शिकलेल्या गोष्टीची आठवण करून देते. जर कोणी बुडत असेल आणि मदतीसाठी ओरडत असेल, तर तुम्ही त्यांच्या मदतीसाठी बाहेर पडल्यास काळजी घ्या. का? कारण ते स्वतःचा बचाव करण्याच्या विचाराने इतके ग्रासलेले आहेत की उद्देश्य नसतांना देखील ते तुम्हाला खाली ओढतील. माझे देखील असेच होते, जीवनाबद्दल अनभिज्ञ असलेल्या झोम्बीसारखा, भावना नसलेल्या व्यक्ती सारखा चालतफिरत होतो. नवरा म्हणून मी माझ्या कर्त्यव्या मध्ये चुकलो होतो. वडील माझ्या कर्त्यव्या मध्ये चुकलो होतो. प्रदाता म्हणून माझ्या कर्त्यव्या मध्ये चुकलो होतो. माझे आयुष्य त्याच भावनाविहीन, दूरदृष्टी नसलेल्या आणि जीवनाच्या उदासीनतेच नित्यक्रम होऊन गेले होते.

कोलंबस, ओहायो, त्या दिवसात गृहनिर्माण तेजीत होते. सर्वत्र घरांच्या किमती वर जात होत्या, आणि त्यामुळेच आमच्या शहराने सलग अनेक वर्षे घरांची परेड आयोजित केली होती. जर तुम्हाला ते काय आहे हे माहित नसेल तर मी समजावून सांगतो. घरांची परेड म्हणजे विशेष वैशिष्ट्य असलेल्या घरांचा समूह, अशी घरे जी भिन्न बांधकाम व्यावसायिक त्यांच्या अद्वितीय शैली आणि क्षमता तसेच सर्व नवीन उपकरणे आणि फिनिश दाखवण्यासाठी तयार करतात. त्या परिसरातील प्रत्येकासाठी, ही एक मोठी गोष्ट होती आणि हजारो लोकांनी याचा आनंद घेतला. पण मला घरांच्या ह्या परेडची भीती वाटत होती. आम्ही अत्यंत गरिबीत जगत होतो, त्यामुळे ड्रेंडाने जाऊन ही घरे बघावीत अशी माझी अजिबात इच्छा नव्हती. माझ्या आर्थिक अपयशाबद्दल मला आधीच वाईट वाटत होते; आणि तिला आणखी त्या परिस्थितीचा पुनर्भास होऊ नये असे मला आवर्जून वाटत होते. मला आता कळते की याकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन मूर्खपणाचा होता, परंतु त्या वेळी ते माझे मत होते. मला माहित होते की ती जर तिथे गेली तर तिला देखील एक घर हवेसे वाटेल. म्हणून दर वर्षी, मी “नाही!” म्हणत राहिलो, पण शेवटी, एका वर्षी मी हार मानली आणि ठरवले की आपण त्या परेडला जाऊ या.

ती घरे, आपण कल्पना करू शकता, अत्यंत वैभवशाली होती. त्या घरांपुढे आमचे 1800 च्या दशकातील छोटे फार्महाऊस जे अगदी मोडकळीस आले होते ते आणखीच तुच्छ

वाटू लागले. पहिली काही घरे पाहून आम्ही पुढे चालत आल्यानंतर फुटपाथवरून चालू लागलो, आणि अचानक मला जाणवलं की ड्रेंडा माझ्या सोबत चालत नाहीये. ती कुठे आहे हे पाहण्यासाठी मी मागे वळून पाहिले आणि आम्ही नुकतेच निघालो होतो त्या घरासमोर ती उभी होती, तिला तिथे उभी असलेले पाहून मला वाईट वाटले. तिच्या चेहऱ्यावरून अश्रू वाहत होते. मी परत तिच्याकडे गेलो आणि मूर्खासारखं एक प्रश्न विचारला, "काय झालं?" जणू काही मला त्या प्रश्नाचं उत्तरच माहीत नव्हतं. तिने फक्त माझ्याकडे पाहिले आणि विचारले, "मला घर कधी मिळेल"? माझे मन चक्रावले, "घर? यासारखे? ही सर्व $500,000 ते $700,000 ची घरे आहेत." मी तर अजूनही जुन्या फार्महाऊस चे $300 मासिक भाडे कसे चुकते करता येईल हे शोधण्याचा प्रयत्न करत होतो. मला माहित आहे की हे दुःखदायक आहे, परंतु मला या सर्वां मधून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नव्हता आणि मी माझ्या सुंदर, मौल्यवान पत्नीला कोणतीही आशा दिली नाही. भीती आणि अपयश माझे मन आणि दृष्टीकोन विस्कटत होते. हा मी नव्हतो; माझ्या आनंदाचे, माझ्या आनंदाचे काय झाले? मी समोर फक्त आर्थिक ताण होता त्या पलीकडे मी काहीच पाहू शकत नव्हतो.

सकाळचे 2:00 किंवा 3:00 वाजले होते आणि मला झोप येत नव्हती. वेदना माझ्या जबड्यातून आणि चेहऱ्यातून सुया टोचल्या सारख्या निघत होत्या आणि मला ह्या पीडेपासून आरामाची नितांत गरज होती. छत्तीस तासांपूर्वी संसर्ग थांबवण्यासाठी माझे रूट कॅनाल झाले होते, त्या संसर्गा मुळे माझा चेहरा फुग्यासारखा फुगला होता. वेदना आणि अस्वस्थता असहनीय होते. वेदना थांबविण्या साठी मी दर चार तासांनी टायलेनॉल घेत होतो, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. मी माझ्या दिवाणखान्यात बसलो होतो, झोप काही केल्या येत नव्हती, म्हणून मी आणखी एक डोस घेऊ लागलो, इतक्यात माझी नजर टायलेनॉल बॉक्सकडे गेली आणि मी त्यावर लिहिलेल्या सूचना वाचू लागलो. टायलेनॉल कसे घ्यायचे हे मला माहीत नव्हते म्हणून नाही, पण अगदीच कंटाळवाणे वाटत होते म्हणून, जसे आपण सकाळी सीरियल खाताना त्या सीरियलच्या डब्या वर लिहिलेली माहिती उगाचच वाचतो. आपल्याला त्यात खरोखर स्वारस्य आहे म्हणून नाही तर तो डब्बा समोर आहे म्हणून उगाचच वाचतो. होय, होय, दर 4 तासांनी 2 गोळ्या, पण आणखी काय लिहिले होते? 24

तासांच्या कालावधीत 10 पेक्षा जास्त गोळ्या घेऊ नये? एखाद्या व्यक्तीने दर 4 तासांनी गोळ्या घेतल्यास किती गोळ्या खाल्ल्या जातील याची संख्या मी मनात पटकन जोडली, जसे मी गेल्या 2 दिवसांत केले होते—दिवसातून 12 गोळ्या, किमान डोसपेक्षा 2 गोळ्या जास्त. अचानक, माझ्या पोटात गोळा उठला, आणि मी भीतीने ग्रस्त झालो.

नऊ वर्षे पोट हातावर घेऊन जगणे, पती म्हणून अयशस्वी होणे, वडील म्हणून अयशस्वी होणे आणि प्रदाता म्हणून अयशस्वी होणे यामुळे मी मुळातच भावनात्मकते मध्ये कमकुवत झालो होतो. डॉक्टरांनी मला ह्यामधून बाहेर येण्यास मदत करण्यासाठी अँटीडिप्रेसेंट्स वर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण काहीही मदत झाली नाही. त्या रात्री दातांच्या दुखण्या मुळे मी नुसता बसून होतो, दोन दिवसांपासून मी अजिबात झोपलो नव्हतो, आणि वेदना इतकी तीव्र होती की मला झोप येणे शक्यच नव्हते. आता टायलेनॉल च्या बॉक्स वरील माहिती वाचून, मला जाणवले की आता टायलेनॉल च्या संभाव्य प्रमाणा बाहेर डोस घेतल्या मुळे माझ्या आधीच्या समस्यां मध्ये आणखी एक भर पडली आहे. टायलेनॉल च्या ओव्हरडोसने माझ्यावर काय परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती, परंतु मला खात्री होती की ही एक साधारण गोळी आहे, कारण कोणीही ती दुकानात जाऊन सहजपणे खरेदी करू शकत होता. मला असे वाटले की त्यांना नियमाच्या चाकोरीत राहण्या साठी बॉक्सवर अशा चेतावणी द्याव्या लागतात. हे माझ्या कल्पने बाहेरचे होते की फक्त 2 गोळ्या जास्त घेतल्याने एक मोठी समस्या उद्भवू शकते. पण भीतीच्या भावनेने माझ्या मनाला वेठीस धरले, आणि मला “असे झाले तर काय” या विचारांनी गर्भगळीत केले. म्हणून मन शांत करण्यासाठी, मी विष नियंत्रण केंद्राला फोन करावा असे मला वाटले. मला खात्री होती की ते फक्त म्हणतील की ही काही मोठी गोष्ट नाही.

फोन च्या दुसऱ्या बाजूवरील बाईने उत्तर दिले तेव्हा ती व्यावसायिक वाटली. तिने मला विचारले मी तुमची काय मदत करू शकते, आणि मी तिला समजावून सांगितले की मी गेल्या 36-तासांच्या कालावधीत दर 4 तासांनी टायलेनॉल गोळ्या घेतल्या आहेत, अशा प्रकारे मी दिवसातून 10 ऐवजी 12 गोळ्या घेतल्या आहेत. मी तिला सांगितले की मी किमान पेक्षा फक्त दोनच गोळ्या जास्त घेतल्याआहेत. आणि त्याचा काही गंभीर परिणाम तर होणार नाही हे

जाणून घेण्यासाठी मी फोन केला आहे. फोन च्या दुसऱ्या बाजूला अगदी पूर्ण शांतता होती, आणि मला कंप्युटर वर काहीतरी टाईप करण्याचा आवाज ऐकू येत होता. त्या नंतर फोनवर मला हे शब्द ऐकू आले, "सर, आजपर्यंत आमच्याकडे अशाप्रकारे जास्त डोस घेऊन आलेला व्यक्ती जिवंत राहिला नाही." मी तिचे बोलणे बरोबर ऐकले का? नक्कीच नाही! म्हणून मी तिला पुन्हा समजावून सांगितले की 24 तासांच्या कालावधीत मी फक्त 2 गोळ्या जास्त घेतल्या आहेत आणि हे असे दोनच दिवस केले आहे.

या वेळी तिने कठोर स्वरात उत्तर दिले, "सर, मी म्हटल्याप्रमाणे, आमच्याकडे असा डोस घेणारे कोणीही जिवंत राहिले नाही. तुम्ही आत्ताच्या आत्ता इमर्जन्सी मध्ये आलंच पाहिजे!" काय घडले ते मी तिला पुन्हा समजावून सांगण्याचा प्रयत्न करू लागलो, कारण मला अजूनही वाटत होते की तिला माझे म्हणणे समजलेले नाही, तिने मला मधेच थांबवले आणि म्हणाली, "एकतर तुम्ही स्वत:हून दवाखान्यात जा नाहीतर मी तुमच्या साठी रुग्णवाहिका पाठवीत आहे." मला धक्काच बसला! "मी स्वतः गाडी चालवून दवाखान्यात जातो," मी गडबडूनच बोललो. "तुम्ही कोणत्या हॉस्पिटलमध्ये जात आहात?" तिने विचारले. मी कुठे जाणार आहे हे तिला सांगितले आणि तिने फोन ठेवला.

मी स्तब्धपणे तिथेच उभा राहिलो. त्या दिवशी सकाळी 9:00 वाजता माझी खूप महत्त्वाची मीटिंग होती. आणि आता पहाटेचे सुमारे 3:30 वाजले होते. मी कसेतरी करून पायऱ्या चढून बेडरूममध्ये गेलो आणि ड्रेंडाला उठवले,आणि तिला घडलेला प्रकार सांगितला. तिने माझ्याकडे निराशेच्या दयनीय नजरेने पाहिले. तिचा नवरा नाटक करत होता आणि आता काही महिन्यांपासून जरा विचित्रच वागत होता, आणि सर्वकाही सांभाळण्याचा तिला कंटाळा आला होता, आणि आता हे? "गॅरी, फक्त दोन गोळ्या जास्त घेतल्या आहेत. नक्कीच, त्याने तुम्ही मारणार नाही हे तुम्हाला चांगले माहित आहे. त्यांना परत फोन करा," ती म्हणाली. पण भीती अतार्किक आणि पीडादायक आहे. "ती महिला म्हणाली की ह्या मुळे कदाचित माझा मृत्यू होईल; मला दवाखान्यात जाणे अगदी निकडीचे आहे." मी बेडरूममधून बाहेर जाण्यासाठी वळलो तेव्हा माझ्या पत्नीच्या डोळ्यात "तुम्ही गंमत करत आहात" असे भाव मला दिसले.

मी दवाखान्यात पोहोचलो तेव्हा पांढऱ्या कोटातली दोन माणसे आपत्कालीन प्रवेशद्वाराच्या बाहेर माझी वाट पाहत उभी होती. मी वर आल्यावर ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, “तुम्ही गॅरी कीसी आहात का?” त्यांनी मला तातडीने उपचार कक्षात नेले. तिथून जाताना मला दिसले की इमर्जन्सी रूमच्या ब्लॅकबोर्डवर माझे नाव आधीच लिहिलेले आहे. त्यात म्हटले होते, “गॅरी कीसी - ओव्हरडोज.” माझा त्यावर विश्वासच बसत नव्हता. लांबलचक गोष्ट थोडक्यात सांगायची म्हणजे मी तिथे पोहचल्या नंतर त्यांनी माझ्या रक्ताचा नमुना घेतला, आणि मग डॉक्टर माझ्याकडे आत आले आणि म्हणाले, “तुम्ही इथे का आलात? तुमच्या रक्तातील टायलेनॉलची पातळी डोकेदुखी बरी होण्याइतकी देखील नाही. जेव्हा मी त्यांना माझी विष नियंत्रण विभागासोबत झालेले बोलणे सांगितले तेव्हा ते हसायला लागले. मला ते अजिबात गमतीचे वाटले नाही, आणि माझ्याकडे जेव्हा मेलमध्ये $2,000 चे बिल आले तेव्हा तर ते आणखीच मजेदार वाटले नाही. सैतानाने पुन्हा एकदा माझ्या विरुद्ध कट रचला आणि माझ्यापासून हिरावून घेतले.

मी देवाचे राज्य प्राप्त करण्यापूर्वी माझे जीवन कसे होते हे तुम्हाला जाणून घेण्यास मदत करण्यासाठी संपूर्ण माहिती सह या कथा तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करत आहे. होय, मी ख्रिस्ती होतो. होय, मी दशमांश देत होतो. होय, मी माझ्या चर्चमध्ये काही काळ उपासनेचे नेतृत्व केले. होय, मी देवावर प्रेम केले. पण काहीतरी चुकलं होतं, कुठेतरी भयंकर चुक होत होती! मी तुम्हाला सांगितले की देवाने मला भीतीच्या आत्म्याशी कसे लढायचे हे शिकवले आणि मी अँटीडिप्रेसेंट्स आणि पॅनीक अटॅक पासून कसा मुक्त झालो. पण मी अद्याप त्या परिस्थितीतून मुक्त झालो नव्हतो ज्यामुळे सर्वात प्रथम माझ्या मध्ये भीतीउत्पन्न झाली आणि माझे त्या भीतीशी द्वंद्व सुरु झाले, ती म्हणजे माझी निराशाजनक आर्थिक परिस्थिती! माझ्यावर दररोज पैशांची तजवीज करणे आणि सर्व बिल भरण्याचा प्रचंड दबाव होता, तसेच माझे दहा पेक्षा जास्त क्रेडिट कार्ड रद्द झाले होते, माझ्यावर तीन फायनान्स कंपनीची कर्ज होते, आय आर एस चे कर्ज होते , नातेवाईकांचे कर्ज, आणि अनेक खटले आणि धारणाधिकार होते.

मी म्हटल्याप्रमाणे, आमचे जीवन आर्थिक गोंधळाने व्याप्त होते. ताणतणाव आणि मानसिक अशांतता हीच माझी जीवनपद्धती बनून गेली होती. ख्रिस्ती असूनही, आम्ही आर्थिकदृष्ट्या मरत होतो आणि एक एक करून माझे क्रेडिट कार्ड रद्द केली जात होती. धारणाधिकार दाखल केले गेले, क्रेडिट रद्द केले गेले आणि कर्जदार सतत फोन करत होते. आम्ही आर्थिक दुर्दशेच्या कळसावर पोहचलो होतो, आणि आमच्या व्यवसायातून फारसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे, आम्हाला अन्न विकत घेणे देखील परवडत नव्हते. माझे कुटुंब उबदार राहण्यासाठी बैठकी मध्ये लाकडाच्या चुली भोवतीच घुटमळत राहायचे, कारण आम्हाला इंधन तेल परवडत नव्हते. आमच्या मुलां साठी मॅकडोनाल्ड्स मधील हैप्पी मील तरी मिळावे म्हणून पुरेसे पैसे मिळतील या आशेने आम्ही खुर्च्या आणि पलंग यांच्या खाचेत सुट्टी नाणी शोधत असायचो.

माझा देव आपल्या संपत्त्यनुरुप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील.

-फिलिप्पैकरांस पत्र 4:19

कर्जदारांनी कॉल केल्यावर मी त्यांना टाळण्यात आणि वाटी लावण्यात पटाईत झालो होतो, परंतु एके दिवशी माझ्या एका कर्जदाराने कर्ज गोळा करण्यासाठी वकीलाची नियुक्ती केली. या माणसाने कॉल केला आणि त्याचे तसे काही व्यक्तिमत्त्व नव्हते. पण तो एवढेच म्हणाला, “मला तीन दिवसांत पैसे हवे आहेत नाहीतर मी माझ्या क्लायंटच्या वतीने तुमच्याविरुद्ध खटला दाखल करणार आहे.” माझी सहनशक्ती संपली. माझ्याकडे काहीही पर्याय नव्हता, उधार मागण्यासाठी आता एकही व्यक्ती उरला नव्हता, मी माझ्या सर्व मित्रांकडून आधीच उधार मागितले होते, आणि आता ह्या क्षणाला मला कळून चुकले की सर्व काही संपले आहे, काही मार्ग उरला नाही. मी रेंगाळतच माझ्या बेडरूममध्ये गेलो आणि माझ्या पलंगावर पडलो आणि देवाचा धावा केला. लगेचच, मी परमेश्वराचा आवाज ऐकला. मी अनेकदा ऐकलेले एक शास्त्रवचन माझ्या मनात घोळू लागले.

माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील.

-फिलिप्पैकरांस पत्र 4:19

मी परमेश्वराला म्हणालो की मला ते शास्त्रवचन माहित आहे पण माझ्या गरजा पूर्ण होत नाहीत! त्याने माझ्या प्रश्नाचे उत्तर लगेच दिले, “हो, पण ती माझी चूक नाही. माझे राज्य कसे चालते हे जाणून घेण्याचा तू कधीही प्रयत्न केला नाही. खरं तर, माझ्या बहुतेक मंडळ्या आजही असेच वागतात जसे जुन्या करारात इस्रायली वागत होते - गुलाम म्हणून जगतात. ते कर्जबाजारी आणि आर्थिक गुलामगिरीचे जीवन जगतात. मला माझे लोक स्वतंत्र झालेले हवे आहेत.”

मी झटकन खाली धावत गेलो आणि ड्रेंडाला पकडले आणि परमेश्वराने मला जे सांगितले ते तिला सांगितले. मी देवाची इच्छा कधीही जाणून घेतली नाही आणि त्याचे राज्य कसे कार्य करते हे जाणून घेण्याचा कधीही प्रयत्न केला नाही याबद्दल मी तिच्याकडे पश्चात्ताप केला. खरे तर, त्या वेळी, देवाचे राज्य कसे चालते हे जाणून घेण्याचा तुम्ही प्रयत्न केला नाही असे जे देव म्हणाला त्याचा अर्थ काय होता हे आम्हाला खरोखरच माहीत नव्हते. आम्ही तर नियमितपणे चर्चला जायचो, आम्ही आमच्या मिळकतीचा बहुतेक वेळा दशांश देत होतो आणि आम्ही देवावर प्रेम करत होतो. आम्हाला वाटले की आम्ही देवाच्या राज्याच्या विचारसरणीचे आहोत. समस्या, जी मला लवकरच समजणार होती ती ही कि, मी स्वर्गाच्या वाटेवर तर होतो, परंतु माझ्या जीवनात स्वर्गाचे सामर्थ्य आणि अधिकार कसा आणावा आणि त्यांचा माझ्या नैसर्गिक परिस्थितीवर कसा परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. म्हणून आम्ही बायबलचा अभ्यास करू लागलो आणि देव आमच्याशी बोलू लागला आणि त्याने राज्य हे जे म्हटले होते त्याचा काय अर्थ आहे हे शिकण्यास मदत केली. आम्ही जे शिकलो ते धक्कादायक होते! अंधाऱ्या खोलीत प्रकाश आल्या सारखं होतं. आमच्या आयुष्यात प्रथमच, आम्हाला आमच्या आर्थिक जीवनाविषयी उत्तरे सापडली!

देवा, तुला राज्य म्हणजे काय नेमके म्हणायचे आहे?

जेव्हा देवाने मला सांगितले की त्याचे राज्य कसे कार्य करते हे मी कधीच शिकलो नाही, तेंव्हा, थोडक्यात सांगायचे तर, मी गोंधळलो होतो. राज्य? ड्रेन्डा आणि मला काहीच कल्पना नव्हती. आम्ही प्रार्थना केली आणि देवाला त्याचा अर्थ काय आहे ते आम्हाला शिकवण्याची विनंती केली: “प्रभु, राज्य म्हणजे नेमके काय आहे ते आम्हाला शिकव!” तर

आता, मला पहिली गोष्ट शिकायची होती की राज्य म्हणजे काय. मला वाटते की आम्ही जे लोकशाही आणि स्वतंत्र विचारसरणी मध्ये रहरणारे अमेरिकन त्या आमच्या पाश्चात्य मनाला ही संकल्पना समजणे कठीण आहे. देवाचे राज्य लोकशाही नाही; हे एक राजा असलेले राज्य आहे. राजाचा अधिकार राज्यामधून विविध विभाग आणि त्या अधिकाराखाली काम करणाऱ्या लोकांद्वारे प्रत्यायोजित अधिकारासह कार्य करते. लोकांचा जमाव असणे म्हणजे राज्य नाही. तुमच्या जमावात लाखो लोक असू शकतात पण ते राज्य होणार नाही. राज्य म्हणजे कायद्याने किंवा सरकारद्वारे एकत्र ठेवलेल्या लोकांचा समूह. शब्दकोषातील राज्याची व्याख्या अशी आहे: "राज्य: एक राज्य किंवा सरकार ज्याचा राजा किंवा राणी प्रमुख आहे."

ख्रिसमसच्या वेळी येशूचे पृथ्वीवर बालक रूपाने येणे आपण साजरे करत असलो तरी, तो त्याच्यासोबत संपूर्ण शासन किंवा सत्ता घेऊन येत होता हे समजण्यात आपल्याला सहसा समजतच नाही. बायबल यशया 9:6-7 मध्ये या सरकारबद्दल सांगते:

> *कारण आमच्यासाठी बाळ जन्मला आहे, आम्हांला पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला "अद्भुत, मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती" म्हणतील. त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार; तो दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील. सेनाधीश परमेश्वराचा आवेश हे सिद्धीस नेईल.*

येशू हा या सत्ते चा प्रमुख आहे आणि जेव्हा आपण येशूला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारतो तेव्हा आपण या सत्तेचा भाग बनतो; आपण नागरिक बनतो. आपण केवळ नागरिकच बनत नाही तर देवाचे पुत्र आणि कन्या म्हणून देवाच्या स्वतःच्या घराचा अंश बनतो.

> *परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला—त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा ह्यांपासून झाला नाही; तर देवापासून झाला.*
>
> —योहान 1:12-13

तर ह्यावरून तुम्ही आतापासून परके व उपरे नाहीत; पण पवित्र जनांच्या बरोबरीचे नागरिक व देवाच्या घरचे आहात;

—इफिसकरांस पत्र 2:19

देवाच्या घरातील सदस्य या नात्याने, आपण त्याच्या कुटुंबाचा भाग बनतो आणि अशा प्रकारे देवाच्या मालकीच्या प्रत्येक गोष्टीचे मालक किंवा हिस्सा बनतो. पण आपण त्याच्या महान सत्तेचे सरकारचे देखील नागरिक बनतो. ह्या वरून हे स्पष्ट होते की आपल्याला त्याच्या सरकारमध्ये कायदेशीर अधिकार आहेत आणि त्याचे लाभ मिळू शकतात. मी कशाबद्दल बोलत आहे हे अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, मी युनायटेड स्टेट्समधील नैसर्गिक नागरिक असणे काय आहे हे आधी तुम्हाला सांगतो. युनायटेड स्टेट्सचे नागरिक म्हणून, तुम्हाला कायदेशीर अधिकार आहेत. तुमचे कायदेशीर अधिकार आमच्या संविधानात आणि आमच्या सरकारमध्ये मंजूर झालेल्या कायद्यांमध्ये लिहिलेले आहेत. हे कायदे आणि फायदे अगदी प्रत्येक नागरिकाला प्राप्त होतात, मग ते कोणीही असो. ते अधिकार आपल्या भावनांवर किंवा आपण किती हुशार आहोत यावर आधारित नाहीत. नाही, ते कायद्याने स्थापित केले आहेत, अमेरिकेला आपले घर म्हणणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी कायदेशीररित्या उपलब्ध आहेत. हे शक्य आहे की एखाद्या नागरिकाला त्यांचे कायदेशीर अधिकार काय आहेत हेच माहित नसेल, परंतु असे असले तरी, ते फक्त युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेचे नागरिक असल्याने त्यांच्याकडे आहेत.

आता येथे विचार करण्यासारखे काही आहे, आणि मला आशा आहे की यामुळे देवाबद्दलचा तुमचा संपूर्ण दृष्टिकोन बदलेल आणि आपल्याला देवाकडून कसे प्राप्त होते ह्या बद्दलचा दृष्टिकोन देखील बदलेल. येथे युनायटेड स्टेट्समध्ये जर आम्हाला असे आढळून आले की एखादी गोष्ट किंवा कोणीतरी आमचे कायदेशीर अधिकार आमच्याकडून काढून घेण्याचा प्रयत्न करत आहे किंवा आमच्यावर अन्याय करत आहे, तर आम्हाला (न्याय म्हणजे कायद्याची अंमलबजावणी किंवा प्रशासनिक सहकार्य) कायदेशीर प्रक्रियेने न्याय मिळू शकतो. आम्ही न्यायालयात जातो, आणि न्यायाधीश आम्ही कसे दिसतो किंवा आम्ही किती

श्रीमंत किंवा गरीब आहोत याकडे लक्ष देत नाही. तो कायदा पाहतो. त्याने प्रत्येक वेळी फक्त कायद्याच्या आधारावर शासन करायचे असते. हे आमच्या सुरक्षे साठी आहे: कि आम्हाला जे कायदेशीर अधिकार दिलेले आहेत आणि युनायटेड स्टेट्समध्ये आमचे सरकार न्याय प्रक्रियेद्वारे आमचे कायदेशीर अधिकार लागू केले जातात किंवा नाही ह्या कडे लक्ष देते. हे लक्षात घेऊन, यशया 9 कडे आपण जवळून पाहू, कारण त्या मध्ये येशू पृथ्वीवर घेऊन येत असलेल्या या नवीन सत्ते बद्दल सांगत आहे.

> *तो (येशू) दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील.*
>
> —यशया 9:7b

हे शास्त्र वचन सांगते की देवाचे राज्य न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर केले जाते. प्रशासन म्हणजे तुमच्या कायदेशीर अधिकारांची अंमलबजावणी किंवा अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया. तुमचे कायदेशीर हक्क म्हणजे ज्याला देव धार्मिकता म्हणतो किंवा तो म्हणतो जे योग्य आहे ते, अर्थात त्याचा कायदा. देवाने सांगितल्या प्रमाणे, त्याच्या राज्यात जे योग्य आहे आणि राज्याचे नागरिक म्हणून कायदेशीरपणे जे तुमचे आहे ते तुम्हाला निश्चितपणे मिळावे म्हणून, देवाने तुम्हाला न्याय आणि त्याच्या प्रक्रिये पर्यंत पोहच आणि हमी दिली आहे कि त्याने जे वचन दिले आहे ते तुम्हाला मिळेल. देवाने त्याची इच्छा त्याच्या वचनाद्वारे, बायबलद्वारे आपल्याला कळवली आहे, त्यामुळे आपल्याला त्याच्या राज्यात आपले हक्क कळतील. ही चांगली बातमी आहे! देवाने तुम्हाला जे वचन दिले आहे त्याच्याशी संबंधित तुम्ही बायबलमध्ये वाचलेले सर्व काही त्याच्या राज्याचे नागरिक म्हणून कायदेशीररित्या तुमचे आहे!

दुसरे करिंथ 1:20 स्पष्टपणे सांगते की प्रत्येक वचन - प्रत्येक वचन - “होय” आणि “आमेन” आहे. हे आधीच ठरले आहे; ते आधीच कायदेशीररित्या तुमचे आहे.

देवाची वचने कितीही असोत, त्याच्या ठायी होय हे आहे; म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्या द्वारे आमेन म्हणतो.

— 2 करिंथ 1:20

देवाच्या राज्याचा पाया हा न्याय आणि धार्मिकता आहे - तो डगमगू शकत नाही. म्हणून त्या विषयी अशा प्रकारे विचार करा: "जर मला देवाच्या राज्याचा कायदा (त्याची इच्छा) माहित असेल आणि मला न्याय मिळण्याची, कायदा जे म्हणते त्याप्रमाणे अंमलबजावणीची प्रक्रिया होऊ शकते याची हमी देत असेल, तर मला खात्री आहे आणि मी घाबरत नाही.

त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.

—1 योहान 5:14-15

जेव्हा हे वचन म्हणते की तो आपले ऐकतो, तेव्हा ते आपल्याला मोठ्याने ऐकण्याबद्दल बोलत नाही जसे ध्वनी लहरींद्वारे आपले शब्द ऐकल्या सारखे नाही; तो आपली केस हातात घेण्याबद्दल बोलत आहे. न्याय मिळेलच याची खात्री करण्यासाठी केस ऐकणाऱ्या न्यायाधीशाबद्दल विचार करा. प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल याची खात्री करण्यासाठी न्यायालय आणि न्यायाधीश आहेत. न्यायाधीशाचा निर्णय हा त्याच्या भावनांवर आधारित नसून प्रत्येक नागरिकासाठी जे कायदे लागू होतात आणि ज्यावर त्याची अध्यक्षता त्या कायद्यावर आधारित असतो. न्याय (कायद्याची अंमलबजावणी) लेखी कायद्यानुसार दिला जात आहे याची खात्री करण्यासाठी न्यायाधीश नियुक्त असतात. देवाच्या बाबतीत, येशू आणि त्याच्या राज्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला न्याय (त्याच्या इच्छेची अंमलबजावणी) सुनिश्चित करण्यासाठी त्याचे सिंहासन (अधिकाराचे स्थान) आणि त्याचे सामर्थ्य आहे.

राज्ये कायद्याने चालतात आणि कायदे बदलत नाहीत.

कृपया ते विधान अतिशय हळूवारपणे पुन्हा वाचा आणि त्या मुळे देवाविषयीचा तुमचा सध्याच्या दृष्टिकोन बदलून जाऊ द्या. बहुतेक लोकांना असे वाटते की देव त्याचे निर्णय प्रत्येक व्यक्तीच्या परिस्थिती अनुसार घेतो, परंतु ते खरे नाही. तो अशा राज्याचा राजा आहे ज्यामध्ये कायदे बदलत नाहीत. तो त्याच्या कायद्याच्या बाहेर निर्णय घेत नाही आणि घेणारही नाही. अशा प्रकारे आपण विचारण्याआधीच त्याचे उत्तर काय आहे हे आपल्याला कळू शकते आणि आपण खात्री बाळगू शकतो कि, त्याच्या नियमा प्रमाणे आपल्याला मिळणारच कारण कायद्याची अंलबजावणी करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे.

ड्रेन्डा आणि मी देवाच्या राज्यामधील आमच्या कायदेशीर अधिकारांबद्दल जाणून घेऊ लागलो, तेव्हा देव आणि बायबलबद्दलचा आमचा विचार नाटकीयरित्या बदलला. आमच्या नवीन समजुतीचा परिणाम म्हणजे आमचे जीवन बदलले. यापुढे भीक मागणे नाही. आणखी विनवणी नाही. देवाने जे सांगितले ते आम्हाला त्याच्या राज्याचे नागरिक या नात्याने कायदेशीररित्या आधीच दिले गेले आहे हे आम्ही शिकलो. जे कायदेशीररित्या आमचे आहे त्यावर कायदेशीररित्या दावा कसा करायचा आणि पृथ्वीच्या क्षेत्रात ते कसे मोकळे करायचे हे आम्हाला शिकणे आवश्यक आहे. आपण चेक कसा कॅश करतो या बद्दल विचार करा. तुमच्या खात्यात तुमच्याकडे भरपूर पैसे असले तरी, एक कायदेशीर प्रक्रिया आहे ज्याद्वारे तुम्ही पैशावर दावा करता आणि चेक देऊन रोख रक्कम घेता. कोणत्याही कायदेशीर व्यवस्थेमध्ये एक प्रक्रिया असते ज्याद्वारे आपण एखाद्या गोष्टीवर जरी ती आमच्या मालकीची असली तरीही कायदेशीर दावा करतो.

> *ज्याने तुम्हाआम्हांला आपल्या गौरवासाठी व सात्त्विकते-साठी पाचारण केले त्याच्या ओळखीच्या द्वारे, त्याच्या ईश्वरी सामर्थ्याने,जीवनास व सुभक्तीस आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आपल्याला दिल्या आहेत*
>
> — 2 पेत्र 1:3

ते एक राज्य आहे! जे देवाच्या राज्याचे नागरिक आहेत त्यांना देवाच्या राज्याचे नागरिक असलेल्या इतर सर्वांसारखेच समान अधिकार आहेत. आपण हा मुद्दा समजून घेणे महत्त्वाचे आहे: राज्ये कायद्याने चालतात आणि कायदे बदलत नाहीत. हे महत्त्वाचे का आहे? हे महत्त्वाचे

आहे कारण याचा अर्थ असा आहे की जर देवाचे राज्य न बदलणाऱ्या कायद्यांवर आधारित कार्य करते किंवा चालते, तर त्या राज्यामध्ये व्यक्तींचा आदर नाही. त्याऐवजी, राज्यातील प्रत्येकाला इतरांच्या प्रमाणेच त्यांच्या वतीने राज्याच्या कायद्याचा आनंद घेण्याचा समान अधिकार आहे.

ह्याच ठिकाणी चर्चच्या जगतात गोष्टी थोड्या गोंधळून गेल्या आहेत असे दिसते. बहुतेक ख्रिस्ती लोकांना असे वाटते की एखाद्याच्या जीवनात देवाला काय करायचे आहे हे तो अनिश्चितपणे ठरवतो. दुसऱ्या शब्दांत, त्यांना वाटते की देव एका व्यक्तीला निवडून आशीर्वाद देतो आणि दुसऱ्याला तो आशीर्वाद न देण्याचे ठरवितो. त्यांना असे वाटते की देव त्यांच्या जीवनात अशा गोष्टी घडू दोतो ज्यावर त्यांचे नियंत्रण नसते. त्यांना वाटते की तो एका व्यक्तीला बरे करतो आणि दुसऱ्याला नाही. बहुतेक ख्रिस्ती लोक मदती साठी देवाकडे याचना करतात पण खरे तर त्याने त्यांना मदत करण्या साठी आवश्यक ते सर्व काही आधीच केले आहे. त्याने त्यांना आपले राज्य, संपूर्ण राज्य दिले आहे!

जेव्हा देव माझ्याशी माझ्या आर्थिक परिस्थितीबद्दल आणि मला त्याच्या राज्याबद्दल अधिक जाणून घेण्याची आवश्यकता आहे ह्या विषयी बोलू लागला, तेव्हा त्याने मला हे शास्त्रवचन दिले.

"अहो दीनांनो, तुम्ही धन्य; कारण देवाचे राज्य तुमचे आहे.

— लूक 6:20b

देव मला सांगत होता की माझ्या आर्थिक परिस्थितीसाठी माझे उत्तर त्याचे राज्य आहे आणि येशूने जसे केले तसे पृथ्वीच्या क्षेत्रात राज्याचे नियम कसे वापरायचे हे जाणून घेण्याद्वारे, तुम्ही त्यात भर घालू शकता. मी कबूल करतो की मला सुरुवातीला या सर्वांचा अर्थ काय आहे याची कल्पना नव्हती. पण देवाने मला जे सांगितले त्याविषयी मी विचार करत असतांना मला जाणवले की राज्ये खरे तर कायद्याने चालतात. विशिष्ट कायद्याचे कार्य आणि परिणाम प्रत्येक वेळी त्याच प्रकारे कार्य करण्यासाठी ओळखले जाऊ शकतात आणि मोजले जाऊ शकतात कारण कायदे बदलत नाहीत. अध्यात्मिक दृष्टीकोनातून मी याचा कधीच

विचार केला नव्हता. तथापि, जर हे असेच असेल आणि देवाचे राज्य प्रत्यक्षात अशाच प्रकारे चालत असेल, तर मला माहित आहे की मी ते कायदे शिकू शकेन, ते लागू करू शकेन आणि माझ्या आयुष्यात कार्यरत असलेल्या त्या कायद्यांचा मला फायदा होईल.

या पृथ्वीवर राज्य करणारे कायदे बदलत नाहीत हे मला समजले. खरं तर, त्यांचे स्थिर आणि न बदलणारे कार्य एखाद्याला चंद्रावर पाठवण्यास किंवा विमान उड्डाण करण्यास कारणीभूत ठरू शकते. पण बहुतेक ख्रिस्ती लोक हे समजून घेऊन देवाकडे जात नाहीत. त्याऐवजी, जेव्हा त्यांना कशाची गरज असते तेव्हा ते भीक मागतात आणि रडतात, त्यांना कशाची गरज आहे हे देवाला पटवून देण्याचा प्रयत्न करतात जणू देवाला त्यांची काळजी घेण्याचा निर्णय त्यांच्या म्हणण्या प्रमाणे करायचाच आहे.

उदाहरणार्थ, जर मला एखाद्या चर्चच्या परिषदेत प्रचार करायचा असेल, तर त्या चर्चचे सर्व लोक त्या कार्यक्रमासाठी लाईट उघडले जावेत अशी प्रार्थना करू लागतील का? ते उपास करून देवाला अशी विनवणी करतीलका, "देवा, तुला माहीत आहे की ही सभा किती महत्त्वाची आहे आणि आम्हाला त्या सभे दरम्यान लाईट उघडण्याची गरज आहे," असे ते रडत आणि आक्रोश करत प्रार्थना करतील का? मला नाही वाटत ते असे करतील. खरं तर, मला शंका आहे की त्या बैठकीचे नियोजन करताना लाईट चालू करण्या बद्दल कोणतीही चिंता त्यांच्या मनात प्रवेश देखील करेल. जर ते परिषदेच्या त्या रात्री आले आणि लाईट उघडलेले नसतील, तर ते वीज कंपनीला फोन करून लाईट उघडण्याची विनंती करतील, असे वाटते का? नाही. जर त्यांनी तसे केले तर मला खात्री आहे की वीज कंपनीचा कर्मचारी क्षणभर बोलणाऱ्याचे ऐकेल, नंतर आपल्या सहकर्मीकडे वळेल आणि म्हणेल, "हा कुणीतरी खुळा माणूस आहे." नंतर तो फोनवरील व्यक्तीला म्हणेल, "बाई, वीज चालू आहे; समस्या तुमच्या कडेच आहे."

जेव्हा मी माझ्या कॉन्फरन्समध्ये ही बाब लोकांना सांगतो तेव्हा सगळे हसतात. तुम्हाला माहीत आहे का? कारण त्यांना माहीत आहे की वीज कंपनीला कॉल करणे, मोठ्या रडक्या आवाजात, लाईट ऑन करायला सांगणे मूर्खपणाचे आहे; जवळ जवळ सर्वांनाच नक्की काय करावे हे माहित असते. ते फक्त स्विच चालू करतील. हे इतके सोपे आहे! कोणत्याही प्रकारे

भावनात्मक होऊन रडणे नाही, ताण नाही; ते फक्त स्विच चालू करतील. तुम्हाला हे जाणून घ्यायचे आहे का की ते लाईट ऑन नाही म्हणून ते ताण का घेत नाहीत? कारण लाईट ऑन होतीलच हि त्यांची अपेक्षा आहे. विजेचे काम कसे चालते हे त्यांना ठाऊक असल्यामुळे लाईट ऑन होतीलच अशी त्यांची अपेक्षा असते. त्यांना वीज नियंत्रित करणारे कायदे समजतात आणि त्यांना माहित आहे की कायदा कधीही बदलत नाही.

परंतु जर तुम्ही 1,000 वर्षे मागे गेलात आणि एखाद्याला सांगितले की तुम्ही संपूर्ण शहर लहान काचेच्या बल्बने प्रकाशमान करणार आहात, तर त्यांना वाटले असते की तुम्ही मूर्ख आहात. आणि जर तुम्ही शहराचा एक लहान भाग काचेच्या बल्बने प्रकाशित केला असता तर ते म्हणाले असते की हा एक चमत्कार आहे. जे काही लोक स्पष्ट करू शकत नाहीत, त्याला ते चमत्कार म्हणतात. पण तो काही चमत्कार नव्हता; हा फक्त वीज कार्याचा नियम होता अगदी ज्याप्रमाणे वीज कशी कार्य करते हे शिकण्यासाठी वेळ घेणाऱ्या लोकांसाठी तो नियम किंवा प्रक्रिया आहे.

वीज कशी कार्य करते हे आपण नुकतेच शिकलो आहे, किंवा तुम्ही असे म्हणू शकता की वीज नियंत्रित करणाऱ्या कायद्यांविषयी आपण आपले विचार नवीन केले आहेत. म्हणून आम्ही ते कार्य करेल अशी अपेक्षा करतो आणि जेव्हा ते कार्य करते तेव्हा आपण आश्चर्यचकित होत नाही. किंबहुना ते अयशस्वी झाले आहे असे दिलसे तर आपल्याला आश्चर्य वाटते. वीज नियंत्रित करणारे कायदे समजून घेऊन आणि ते लिहून ठेवल्यास, आपण जगभरात विजेचे अनेक दिवे बनवू शकतो. कसे? हे कायदे कसे कार्य करतात हे इतरांना शिकवून आणि त्यांना विजेच्या त्या दिव्यांचा लाभ घेण्यास मदत करून आपण ते करू शकतो. हे सर्व वीज नियंत्रित करणाऱ्या कायद्यांच्या आकलनामुळे शक्य झाले आहे. तीच गोष्ट अध्यात्मिक नियमांची आहे. जर आपल्याला ते समजले नाही, तर त्यांच्या फायद्याचा आनंद घेण्याची किंवा गरज असताना त्यांची नक्कल करण्याची क्षमता आपल्या कडे नसते.

विमान उडतांना पाहिल्यावर 'व्वा, चमत्कार झाला' असे आपण म्हणत नाही. नाही, विमानाने उड्डाण करावे अशी आपली अपेक्षा आहे कारण, विमान कसे उडते आणि ते का उडते हे आपल्याला समजते. आणि पुन्हा, जर आपण 1,000 वर्षे मागे गेलो आणि नवीन

डबल-डेक एअरबस 380 जेटपैकी एक ट्री टॉप लेव्हलवरून उड्डाण केले तर लोक काय म्हणतील? ते म्हणतील हा एक चमत्कार आहे! मला माहित आहे की 380 खूपच प्रभावी आहे, त्याचे वजन 1.2 दशलक्ष पौंड आहे, ते 800 पेक्षा जास्त लोकांना 570 मैल प्रति तास वेगाने 9,000 मैलांपर्यंत घेऊन जाऊ शकते. हे इतके विलक्षण आहे की ते तुम्हाला एक चमत्कार आहे असे वाटेल. पण तसे नाही. आपण 380 विमान तयार करणाऱ्या अभियंत्यांना विचारू शकतो की ते कसे उडते आणि ते आपल्याला भौतिकशास्त्राचे प्रत्येक नियम सांगतील जे ते विमान उड्डाण करण्यासाठी वापरतात आणि ते आपल्याला त्याच्या प्रत्येक स्क्रू आणि वापरल्या जाणाऱ्या इतर पार्टस बद्दल सांगू शकतात. विमान बनविणारे अभियंते त्या विमानाच्या पहिल्या उड्डाणाच्या वेळी धावपट्टीवर उभे राहून असे म्हणत नव्हते, "व्वा, ते पहा; माझा विश्वासच बसत नाही की ती वस्तू खरोखर उडते आहे." पुन्हा, आपल्याला विश्वास आहे कि आपण विमानात बसून प्रवास करू शकतो, कारण आपल्याला माहित आहे की त्याची उडण्याची क्षमता भौतिक नियमांवर आधारित आहे आणि ते नियम बदलत नाहीत. जोपर्यंत आपण त्या कायद्यांच्या, नियमांच्या मापदंडात आणि चाकोरीत राहू तोपर्यंत ते विमान उडत राहील. हे लक्षात ठेवा: कायदे बदलत नाहीत!

कायदा सुसंगत नसेल तर आपण कधीही विमानात बसणार नाही. जर आपण एअरलाइनचे तिकीट विकत घेतले आणि आपल्या सीट च्या पिढीला भागावर असे काहीतरी लिहिले असेल कि, "या विमानातील प्रवास तुमच्या स्वतःच्या जोखमीवर करा कारण उड्डाणाचा नियम तुरळकपणे कार्य करतो. एक दिवस कायदा चालतो आणि दुसऱ्या दिवशी तो चालत नाही. केंव्हा काय होईल कोणालाही निश्चितपणे माहित नाही - भाग्यशाली वाटते? तुमचे उड्डाण उत्तम होवो." तर आपण त्या विमानात बसणारच नाही. तुम्ही विमानाच्या तुमच्या खुर्चीमधून खाली तरंगणार आहात अशी भीती तुम्हाला वाटली ती शेवटची वेळ कोणती होती? कधीच नाही? का नाही? कारण तुम्हाला माहीत आहे की गुरुत्वाकर्षणाचा नियम कधीच बदलत नाही.

मी नमूद केलेल्या या गोष्टी म्हणजे देवाने निर्माण केलेल्या पृथ्वीवरील भौतिक नियम आहेत. पण तुम्ही कल्पना करू शकता का? त्याच्या राज्याचे आत्मिक नियम ह्याच प्रकारे

कार्य करतात - ते बदलत नाहीत! देवाने त्याच्या राज्याबद्दल माझ्याशी बोलण्याआधी, पृथ्वीचे भौतिक नियम कसे कार्य करतात याबद्दल मी खूप चांगला अभ्यास केला होता, परंतु मला वाटले की देवाचे राज्य वेगळे आहे. मला वाटले की देवाला जे पाहिजे ते तो त्याला हवे तेंव्हा करतो. पण मला कळले की ते खरे नव्हते. जेव्हा मी पाहिले की देवाच्या आत्मिक राज्याचे नियम बदलत नाहीत आणि ते शिकले, समजले आणि लागू केले जाऊ शकतात, तेव्हा मला समजले की येशू "देवाचे राज्य असेच आहे" असे का म्हणतो. त्यानंतर तो राज्याची तुलना नैसर्गिक क्षेत्रातील एखाद्या गोष्टीशी करतो जेणेकरून लोकांना ते कसे कार्य करते हे समजू शकेल. अचानक माझ्या मनातला दिवा विझल्यासारखा झाला. माझ्या मनात असा विचार आला, "जर देवाने आपल्याला राज्य दिले आहे, आणि ते दिलेलेच आहे, आणि हे राज्य न बदलणाऱ्या कायद्यांद्वारे, नियमांप्रमाणे चालते, तर मी ते कायदे शिकू शकेन आणि ते माझ्या जीवनात लागू करू शकेन."

> *हे लहान कळपा, भिऊ नकोस; कारण तुम्हांला ते राज्य द्यावे हे तुमच्या पित्याला बरे वाटले आहे.*
>
> — लूक 12:32

त्या दिवशी मी अध्यात्मिक शास्त्रज्ञ झालो! मी पवित्र शास्त्र पूर्णपणे वेगळ्या प्रकाशात पाहिले. बायबल वाचल्या नंतर मी प्रश्न विचारू लागलो: "ते मासे संख्येने का वाढले? ती व्यक्ती का बरी झाली? ती भाकरी का वाढत गेली?" आणि असेच अनेक प्रश्न. जेव्हा मी त्या पद्धतीने बायबल वाचू लागलो, तेव्हा मी देवाला त्या परिस्थिती मध्ये कार्य करणारे कायदे दाखवण्यास सांगितले—व्वा!

ज्या दिवशी वकिलाचा फोन आला त्या दिवशी जेव्हा प्रभु माझ्याशी बोलला आणि त्याने मला सांगितले की माझी समस्या ही आहे कि त्याचे राज्य कसे कार्य करते हे शिकण्यासाठी मी कधीही वेळ काढला नाही, तेव्हा जसे कि मी आधी सांगितले आहे, मी ताबडतोब खाली गेलो आणि माझ्या पत्नीकडे प्रभूचा शोध न केल्या बद्दल आणि त्यामुळे घरातील सर्वांना आर्थिक तणाव आणि बिकट परिस्थिती मध्ये नेण्या बद्दल क्षमा मागितली. पण आपल्या

उत्तरांसाठी राज्यावर भरवसा ठेवण्याचा नेमका अर्थ काय हे आम्हाला माहीत नव्हते. आम्ही चर्चमध्ये तर जातच होतो, स्वर्गाच्या मार्गावर होतो आणि आम्ही देवावर प्रेम करत होतो. त्या वेळी देवाने "राज्य" हे जे म्हटले त्याचा नेमका काय अर्थ आहे याची आम्हाला कल्पना नव्हती. आमच्या समोर फार मोठी समस्या होती, वकीलाने सांगितल्या प्रमाणे आम्हाला पैशांची तजवीज करायची होती आणि त्या साठी आमच्या कडे केवळ तीनच दिवसांचा वेळ होता, आणि जर आम्ही पैशांची तजवीज करून ते चुकते करण्या साठी तीन दिवसांत पुढे आलो नाही तर आमच्यावर खटला ठोकण्यात येणार होता.

तर, ही एक चांगली चाचणी होती. पैशाच्या समस्येचा हा माझा पहिला अनुभव होता आणि मला परमेश्वराने "राज्य" चा अर्थ काय आहे हे दाखवावे अशी माझी इच्छा होती. तर काय झाले ते मी तुम्हाला सांगतो. लक्षात ठेवा, वकिलाने सांगितले कि पैशांची तजवीज करून त्याला देण्यासाठी माझ्याकडे केवळ तीन दिवस आहेत, आणि माझ्या कडे एकही पैसे नव्हता! त्या निराशेमुळेच मी माझ्या बेडरूममध्ये जाऊन परमेश्वराचा धावा करू लागलो होतो; मी अडचणीत होतो! आणि त्याच वेळेस तो मला म्हणाला होता कि देवाचे राज्य हेच माझे उत्तर आहे; आणि, मला माहित नव्हते की त्याचा अर्थ काय आहे, परंतु मी निश्चितपणे त्या बद्दल शिकण्यास तयार होतो.

दोन दिवसांनंतर, संध्याकाळी, मी एका क्लायंटला त्यांच्या जीवन विम्याबद्दल भेटायला निघालो होतो. तसे, त्या दिवसांत मी माझी गाडी नेहमी माझ्या क्लायंटच्या घरापासून दूर कोपऱ्या वरच पार्क करत असे, घरासमोर कधीही पार्क करत नव्हतो. मी चालवत असलेल्या मिनीव्हॅनमध्ये थोडा त्रास होता. गाडी सुरु केली कि, तेंव्हा संपूर्ण रस्ता पांढऱ्या धुराने भरून जायचा, आणि हा थोडा तितका धूर नसायचा. मला नेहमी वाटायचे की जर मी माझी गाडी क्लायंटच्या ड्राईव्हवेमध्ये पार्क केली आणि बाहेर पडतांना, ड्राईव्हवे धुराने भरला तर त्याचा माझ्या कामामध्ये फायदा होण्या ऐवजी वाईट परिणाम होईल. मी त्यांना विम्या मध्ये शेकडो हजार डॉलर्सची गुंतवणूक करण्यास सांगित होतो आणि माझ्या गाडीची अशी अवस्था पाहून माझ्या व्यवसायावर परिणाम होईल असे मला वाटत होते. ते म्हणाले असते जर मी एवढा

मोठा आर्थिक व्यवस्थापक आहे, तर माझ्या कडे अशी बेकार आणि बिनकामाची गाडी का आहे? ही रात्र देखील काही वेगळी नव्हती.

मी माझ्या क्लायंटच्या घरातून बाहेर पडलो, आणि पाहतो तर काय ते देखील माझ्या सोबत बाहेर पडले, आता ते माझ्या सोबत कार पर्यंत येतील कि काय असा विचार करून मला भीती वाटू लागली. ते तसे काही मुद्दामहून करत नव्हते, एवढेच कि ते माझ्या सोबत बोलत बोलत चालत होते. पण मी गाडी सुरु करत असतांना ते देखील तिथेच उभे असणार ह्याची मला काळजी होती. मी माझ्या गाडीत बसलो तरीही ते माझ्या सोबत बोलतच राहिले. मला वाटले कि थोडा वेळ बोलून ते मला गुड नाईट म्हणून निघून जातील आणि ते पूर्णपणे आपल्या घरात गेल्या नंतर मी गाडी सुरु कारेन, पण तसे काही झाले नाही. शेवटी, त्यांनी गुड नाईट म्हटले, पण ते माझ्या गाडीपासून थोडे दूर होऊन तिथेच उभे राहिले. मला माहित होते कि मला आता काही मार्ग उरला नाही. मी व्हॅन सुरू केली,आणि आशा करत होतो कि ह्या वेळी तो पांढरा धूर निघणार नाही, पण माझी ती इच्छा पूर्ण होणारी नव्हती. क्षणार्धात, हवा धुराने भरली होती ज्यामुळे डोळ्यां मध्ये जळजळ होत होती.

त्या माणसाने मला लगेच गाडी बंद करण्याचा इशारा केला. तो परत माझ्या कडे खिडकीजवळ आला आणि मला गाडीचे बोनेट उघडायला सांगितले. त्यानंतर त्याने मला सांगितले की तो ऑटो मेकॅनिक म्हणून देखील पार्टटाइम काम करतो आणि त्याला गाडीमध्ये काय बिघाड आहे ते तपासायचे आहे. एक मिनिटानंतर तो परत माझ्याकडे आला आणि म्हणाला, “मला शंका होती त्याप्रमाणेच; तुमच्या गाडीचे हेड गॅस्केट उडाले आहे. व्हॅन घरी आता घरी घेऊन जा आणि ताबडतोब दुरुस्त करून घ्या.” मी त्याचे आभार मानले, आणि तेथून निघालो पण त्याने गाडीत काय बिघाड आहे हे जरी मला सांगितले तरी, त्याचा काय उपयोग होता. व्हॅन दुरुस्त करण्यासाठी माझ्याकडे तर पैसेच नव्हते.

माझे ऑफिस माझ्या क्लायंटच्या घरापासून फक्त सहा मैलांच्या अंतरावर होते आणि मी माझ्या ऑफिसकडे परत जात असताना नेहमीची नैराश्याची ती चादर माझ्यावर पसरू लागली. पण गाडी चालवत असतांना मला प्रभूने मला काय सांगितले होते ते आठवले आणि मी त्याच्याशी माझ्या व्हॅनबद्दल बोलू लागलो. “प्रभु,” मी म्हणालो, “ही व्हॅन ठीक करण्यासाठी

माझ्याकडे पैसे नाहीत. खरेतर मला अजूनही व्हॅनचे पैसे फेडायचे आहेत आणि ही व्हॅन मी अशा खच्ची गेलेल्या अवस्थेत विकू देखील शकत नाही. काय करावे मला काहीच कळत नाही. कदाचित ही व्हॅन पेटली आणि जळून गेली तर बरे होईल. अशा प्रकारे विमा कंपनी ह्या व्हॅनवर असलेले कर्जाचे पैसे फेडून देईल आणि माझी सुटका होईल."

मी ऑफिसपासून सुमारे तीन मैल अंतरावर होतो, आणि मला एक गाडीच्या बोनेट वर एक बुडबुडा दिसला जो पूर्वी माझ्या लक्षात आला नव्हता. ते काय आहे हे मी अजून पाहण्याचा प्रयत्न करतच होतो, इतक्यात तो बबल मोठा आणि मोठा होत गेला, मी गाडी माझ्या ऑफिसच्या पार्किंगमध्ये कसे तरी घेऊन गेलो, आणि एवढ्यात तो फुगा फुटला आणि ज्वाळांचा कल्लोळ उठला. मला धक्का बसला होता; व्हॅनचा पुढचा संपूर्ण भाग आता सहा फूट उंच ज्वाळांनी वेढला होता. मी त्वरीत ऑफिसच्या इमारतीत गेलो आणि अग्निशमन विभागाला फोन केला. दुसऱ्या दिवशी, विमा कंपनीने व्हॅनची एकूण किंमत काढली, आणि त्यांनी मला एक चेक दिला, ज्यामधून मी तीन दिवस आधी ज्या वकिलाने फोन केला होता त्याला त्याची पूर्ण रक्कम दिली, आणि आमच्याकडे तरीही भरपयर पैसे उरले होते. ड्रेंडा आणि मी आश्चर्यचकित झालो. काय आणि कसा विचार करायचा ते कळत नव्हते. आम्हाला माहित होते की देव आमच्यासाठी काम करत आहे आणि काहीतरी बदल होत आहे. पण देवाच्या राज्याप्रती आमचे समर्पण वेगळ्या प्रकारे पारखले जाणार होते ज्या द्वारे येणाऱ्या पुढील वर्षांसाठी आमचा मार्ग निश्चित होणार होता.

त्या क्षणी, आम्ही स्वत:ला हे सिद्ध केले होते की देवाची व्यवस्था कार्य करत आहे, आणि आम्ही त्या क्षणापासून पुढे शिकत राहण्वासाठी आणि देवाच्या राज्य प्रणालीचा वापर करण्वास वचनबद्ध झालो.

व्हॅन जळून खाक झाल्यानंतर, आम्ही अर्थातच उत्साही होतो, परंतु आम्हाला अचानक लक्षात आले की आता आमच्या कडे गाडी नाही. आता व्हॅनचे पैसे तर भरले गेले आणि क्रेडिट कार्ड ॲटर्नीचे देखील पैसे चुकते तरी, नवीन व्हॅन घेण्यासाठी आमच्याकडे पैसे उरले नव्हते. आमची व्हॅन जाळून गेली हे ऐकून, माझ्या वडिलांनी फोन केला आणि म्हणाले की

ते आम्हाला नवीन व्हॅन घेण्यासाठी मदत करू इच्छित आहेत. ही बातमी ऐकताच आम्ही उत्साहित झालो. म्हणून माझे वडील आणि मी स्थानिय कार डीलरशिपवर गेलो आणि मला आणि ड्रेंडाला आवडत असलेली गाडी आम्हाला तिथे मिळाली. माझ्या वडिलांनी सांगितले की ते आम्हाला ती गाडी खरेदीसाठी $5,000 देतील, आणि ती गाडी सुमारे $17,000 ची होती. म्हणजेच आम्हाला $12,000 ची तजवीज करावी लागणार होती. मी अनिच्छेने लोन साठी अर्ज भरला आणि माझ्या वडिलांनी त्यासाठी सह-स्वाक्षरी केली. आणि कर्ज मिळणार किंवा नाही हे मला दुसऱ्या दिवशी सकाळी कळणार होते.

त्या रात्री आम्ही झोपू शकलो नाही. आम्ही ते कर्ज घेऊ शकत नाही हे आम्हाला माहीत होते. परमेश्वराने मला गाडीशिवायच काम करण्यास सांगितले होते. पण गाडी नसल्यामुळे माझ्यावर नाईलाजास्तव होकार देण्याचे दडपण होते. संपूर्ण रात्र ह्या विचारांमुळे भयानक होती, म्हणून सकाळी उठल्या नंतर ड्रेन्डा आणि मी ह्या बाबीवर सहमत झालो की आम्ही ते कर्ज स्वीकारणार नाही. मी माझ्या वडिलांना फोन केला आणि त्यांनी आमच्या साठी जी मदत करण्याची इच्छा दाखविली त्या बद्दल त्यांचे आभार मानले, पण त्यांना सांगितले की आम्ही त्या कार साठी कर्ज घेऊ शकणार नाही. त्यानंतर मी डीलरशिपला फोन केला आणि त्यांना देखील तेच सांगितले. त्या दिवशी सकाळी आमचे कर्ज मंजूर झाले होते आणि आम्ही व्हॅन घेऊन घरी जाऊ शकणार होतो, त्यामुळे त्यांचीही निराशा झाली. देव आमची व्हॅन मिळण्या साठी कशी मदत करणार आहे याबद्दल काहीही कल्पना नव्हती तरी आमच्या मनात पूर्ण शांती होती.

व्हॅन जाळण्याच्या एक महिना अगोदर तिला कळले होते कि एक व्यक्ती तीन खोल्या भरून फर्निचर विकत आहे, आणि तिने त्याला फोन करून सांगितले कि ती ते विकत घेऊ इच्छिते, परंतु नंतर ती त्याच्या सोबत संपर्क करू शकली नाही. व्हॅन जळून काही दिवस झाले तेंव्हा त्या व्यक्तीचा फोन आला, आणि त्या तीन खोल्या भरून जे फर्निचर होते ते तो ड्रेंडा ला $1,000 पेक्षाही कमी किमतीत विकायला तयार झाला. ड्रेंडा ने ते फर्निचर तिच्या वतीने विकण्या साठी एका ऑक्शन कंपनी सोबत करार केला, आणि तिला मिळणाऱ्या कमिशन मध्ये रोकड पैशां ऐवजी त्यांनी तिला त्यांच्या कडे असलेली जुनी परंतु चांगल्या

स्थितीत असलेली कार देण्याची मागणी केली. आणि ह्या करारामुळे आम्हाला एक चांगली स्टेशन वॅगन मिळाली ज्या साठी आम्हाला काही पैसे देण्याची गरज नव्हती. क्रेडिट कार्ड चे पैसे चुकते झाले होते, आणि जुन्या व्हॅनचे कर्ज भरले गेले होते.

व्वा! तर देवाच्या राज्याचे कार्य अशा प्रकारे चालते. त्या क्षणी, आम्ही स्वतःला सिद्ध केले होते की देवाची व्यवस्था कार्य करत आहे, आणि आम्ही त्या क्षणापासून पुढे शिकत राहण्यासाठी आणि देवाच्या राज्य प्रणालीचा वापर करण्यास वचनबद्ध झालो. तुम्ही विचाराल, "आम्ही कोणत्या तत्त्वाचा वापर केला?" सर्वात मोठी गोष्ट म्हणजे कर्जावर विश्वास न ठेवणे परंतु आपली गरज देवापुढे ठेऊन त्याला मागणे आणि त्याची कापणी कशी करायच अर्थात ते कसे प्राप्त करायचे हे त्याला आपल्याला दाखवू देणे.

व्हॅनच्या ह्या घटनेने मला प्रोत्साहित केले आणि काही महिन्यांपूर्वी घडलेल्या आणखी एका घटनेने आम्हाला बळकट केले, परंतु त्या वेळी, देव मला काय दाखवत आहे हे मला समजले नाही. देवाच्या राज्याचे तत्त्व या अर्थाने बिंदू अजून माझ्या मनात क्रमवार जोडले गेले नव्हते.

मला हरणांची शिकार करायला आवडते पण अनेक वर्षां पासून मला त्यात यश येत नव्हते, मी रिकाम्या हाताने परत येत होतो. मी बाहेर जायचो, थंडीत बसून शिकार हाती लागण्याची वाट पाहायचो पण यश मात्र मिळत नव्हते. मला फक्त शिकारीची आवड होती असे नाही; माझ्याकडे लेकरं होती आणि त्यांना अन्नाची गरज होती, त्यामुळे मी शिकार करून त्यांना अन्न देऊ शकणार होतो. फार पूर्वी मला काही यश मिळाले होते, अनेक वर्षां पासून शिकार करण्याच्या काळात एकही शिकार करून घरी हरणाचे मांस आणू शकलो नव्हतो. एके दिवशी मी हरणाच्या शिकारीच्या आगामी हंगामाचा विचार करत असताना मला परमेश्वराचा आवाज ऐकू आला. तो म्हणाला, "या वर्षी तुला हरणाची शिकार कशी मिळू शकते हे तू मला दाखवू देशील का?" ते ऐकून मी आश्चर्यचकित झालो. "या वर्षी तुला हरणाची शिकार कशी मिळू शकते हे मला दाखवू दे?" याचा अर्थ काय? त्या शब्दांबद्दल प्रार्थना करताना, त्या हरणाची अचूकपने शिकार करण्यासाठी मी आर्थिक बीज पेरावे किंवा दान द्यावे असे मला फार प्रकर्षाने वाटू लागले. मला असे वाटले की प्रभु मला म्हणत आहे की मी माझ्या

हरणासाठी पेरणी केली तेव्हा, मार्क 11:24 नुसार, मला ते मिळण्यापूर्वीच मला ते मिळाले आहे असा मी दृढ विश्वास ठेवावा:

> *म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थनेत जे काही मागाल ते तुम्हाला मिळाले आहेअसा विश्वास ठेवा आणि ते तुमचेच होईल.*

जरी मी ख्रिस्ती ह्या नात्याने माझ्या चर्चमध्ये नेहमीच दान देत होतो, सर्व बाबतीत सहकार्य करत होतो तरी, निश्चित पणे निर्धाराने दान देणे आणि जेव्हा मी प्रार्थना करतो तेव्हा मला प्राप्त झाले आहे यावर विश्वास ठेवने हे माझ्या साठी नवीन होते. मी चेक घेतला आणि चेकवरील मेमो भागात लिहिले, "माझ्या 1987 च्या हरणासाठी." मी त्यावर हात ठेवून प्रार्थना केली आणि ज्या सेवकाई बद्दल मला खात्री आणि विश्वास होता त्यांना पोष्टाने पाठवला आणि घोषणा केली की मी चेक पाठविल्या प्रमाणे मला माझे हरण मिळाले आहे. त्यावेळी मी टुलसा, ओक्लाहोमा, शहरात राहत होतो आणि त्या ठिकाणी शिकार करण्यासाठी कोठेच जागा नव्हती, परंतु माझ्या चर्चमधील एका मित्राने मला थँक्सगिव्हिंगसाठी शहराबाहेर त्याच्या आजीच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले. शेताच्या आजूबाजूला काही हरणे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे माझे कुटुंब थँक्सगिव्हिंग च्या दिवशी सकाळी जेवणाचा आणि एकमेकांच्या संगतीचा आनंद घेण्यासाठी आणि माझ्या हरणाची शिकार करण्या साठी गेलो.

माझ्या मित्राला कळत नव्हते कि शिकार करायला मला कुठे पाठवावे, पण तिथे एक कुरण होते आणि त्याच्या सभोवती जंगल होते, त्याने मला कुरणात जाऊन तिथे असलेल्या एका मोठ्या झाडाजवळ बसण्यास सांगितले. आता, मी तुम्ही हे चित्र समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. मी अशा गवताच्या कुरणात बसलो होतो ज्याची कापणी केलेली होती आणि त्याच्या मध्यभागी एक मोठे झाड होते. मी त्या झाडाला पाठ टेकून बसलो आणि माझ्यापासून कदाचित 130 यार्डांवर असलेल्या जंगलाकडे मी पाहत होतो. आज जेंव्हा मी वळून त्या परिस्थिती ची आठवण करतो, तेंव्हा ती शिकार करण्यासाठी फार पूरक स्थिती नव्हती हे तुम्हाला देखील समजले असेल.

सकाळी सुमारे 30 किंवा 40 मिनिटे, माझ्या नकळत, एक हरिण माझ्या मागच्या बाजूने शेतातून माझ्या समोरच्या जंगलाकडे धावत होते. झाड माझ्या आणि हरणाच्या मध्ये होते, त्यामुळे हरणाला मी दिसलो नाही आणि मला ते दिसले नाही. मी तिथे आहे हे न दिसल्या मुळे जंगलाकडे धावत असतांना ते सरळ त्या झाडाकडे धावले. हरिण त्या झाडाजवळ येताच त्याने माझा गंध पकडला आणि मी कुठे आहे हा शोध घेण्यासाठी तो थांबला. हरणाने त्या झाडाच्या आजूबाजूला पाहिले आणि फक्त पाच यार्ड अंतरावरून आम्ही दोघांनी एकाच वेळी एकमेकांना पाहिले. आता मला हे माहित नाही की आम्हा दोघां पैकी कोण अधिक आश्चर्यचकित झाले, परंतु त्या हरणाने उंच उडी मारण्यात वेळ वाया घालवला नाही. जोरात ओरडत तो पूर्ण वेगाने जंगलाकडे धावू लागला. मी अजूनही तिथेच बसलो होतो, हरण आता पूर्ण वेगाने पळत होता आणि माझ्यापासून दूर जात होता, मी रायफल उचलून त्याला माझ्या कक्षेमध्ये असेपर्यंत मारण्याचा प्रयत्न करत होतो.

आता, त्या पूर्ण वेगाने धावणाऱ्या व्हाईटटेल हरणावर ऑफहँड शॉट मारण्याचा प्रयत्न करणे सोपे नव्हते. खरं सांगू, मी याआधी कधीही धावत्या हरणावर गोळी झाडली नव्हती. मला आठवतं की मी त्या हरणाला माझ्या कक्षेत ठेवू शकलो नाही कारण हरीण हवेत उंच उडी मारत धावत होते, जसे व्हाईटटेल हरण पूर्ण बोअर चालवतांना करतात. पण जेव्हा मी ट्रिगर खेचला तेव्हा ते हरण पडले आणि पुन्हा हलले नाही. मला धक्का बसला! हे सगळं एका सेकंदात घडलं होतं. हा शॉट 110 यार्डवर मारला होता.

रायफलच्या आवाजाने माझा मित्र बाहेर आला आणि त्याने हरण तिथे पडलेले पाहून माझे अभिनंदन केले. माझे हरण कसे प्राप्त करावे याबद्दल परमेश्वर माझ्याशी काय बोलला होता ते मी माझ्या मित्राला आतापर्यंत सांगितले नव्हते, परंतु आता मी त्याच्याकडे पाहिले आणि म्हणालो, “ह्या हरणाची शिकार माझ्या शिकार करण्याच्या क्षमतेमुळे झाली आहे असे मला वाटत नाही.” मग मी माझ्या शिकारीच्या कोटातून कागदाचा तुकडा काढला, ज्यावर मी तो चेक मेल केल्याची तारीख लिहिली होती. त्या वर एवढेच लिहिले होते, “मला विश्वास आहे की मला माझे 1987 चे हरीण, येशूच्या नावाने मिळाले आहे.” मी प्रार्थना केल्याची तारीख आणि वेळ देखील तिथे लिहिलेली होती. मी माझ्या मित्राला तो कागद दाखवला आणि मग त्याला परमेश्वराने मला काय करायला सांगितले होते ते सांगू लागलो.

या प्रसंगाने माझे लक्ष वेधून घेतले. मला माहीत आहे की हे सर्व देवाकडून झाले होते. पण काही कारणास्तव, मला हे समजले नाही कि मी देवाच्या राज्याच्या कायद्याचा वापर करत आहे. वास्तविक, "राज्य" ह्या शब्दाचा मी अजून विचार देखील केला नव्हता. ते हरण मिळवणे आश्चर्यकारक होते, परंतु असेच पुन्हा होईल का? राज्य कायद्याच्या संकल्पनेशिवाय, मला कळणार नव्हते की हरीण कसे आणि कोणत्या कायद्यांमुळे तिथे अचानक आले. म्हणून मी असा विश्वास केला कि हे देवाच्या हस्तक्षेपामुळे झाले आहे, आणि पुढच्या वर्षी हरणाच्या शिकारीच्या हंगामात त्याची पुन्हा चाचणी घेण्याचा विचार केला. पण शिकारीचा हंगाम येण्यापूर्वीच माझी व्हॅन जळून खाक झाली. व्हॅन जाळून खाक झाल्यानंतर पूर्ण पैशांची भरपाई होऊन मला स्टेशन वॅगन मिळाली, तेव्हा माझे पूर्ण लक्ष देवावर केंद्रित होते. आता शिकारीच्या पुढच्या हंगामात शिकार करून हरण आणण्यासाठी मी खूप उत्सुक होतो. मला माझ्या सिद्धांताची चाचणी घ्यायची होती आणि देवाच्या राज्याबद्दल अधिक जाणून घ्यायचे होते. हरणाच्या शिकारीचा हंगाम फार दूर नव्हता!

मी 1987 च्या शरद ऋतूमध्ये ओक्लाहोमामध्ये पहिले हरण शूट केले. पण 1988 च्या जुलैमध्ये आम्ही ओहायोला गेलो जिथे मी लहानाचा मोठा झालो होतो. मी तिथे वाढलो असलो तरी तिथून निघून आता 12 वर्षे झाली होती. मी तिथे लहानाचा मोठा होत असतांना, मला ओहायो हरणाचे शिकार करण्यात कधी यश मिळाले नव्हते. मी अनेकवेळा प्रयत्न केले तरी, मला कधीच एकही शॉट लागला नाही. आता आम्ही ओहायोमध्ये आलो आणि टाउनहाऊस मध्ये भाड्याने जागा घेतली आणि थोडे स्थिरस्थावर झालो, तेव्हा मला कळले की शिकार नेमकी कुठे करावी हे तर मला माहितच नाही. लहानपणी मी माझ्या वडिलांच्या घरापासून रस्त्याच्या पलीकडे असलेल्या एका खाडीपाशी सशांची शिकार केली होती. मी वाढत असताना अनेक वर्षे ट्रॅप लाइन चालवली, परंतु एकदाही हरण पहिले नाही किंवा त्या परिसरात हरिण असल्याचे कोणतेही चिन्ह पाहिले नाही. एके दिवशी मी कॉलेजमध्ये असताना माझ्या भावाने फार उत्साहाने फोन केला. तो म्हणाला त्याने माझ्या वडिलांच्या घराजवळच्या खाडीच्या कडेला एक हरीण दिसलं होतं. आम्हा दोघांनाही फारच आश्चर्य झाले.

त्या संभाषणाची आठवण करून, मी ठरवले की मी हरणाच्या शिकारीच्या हंगामाच्या सुरुवातीच्या दिवशी त्या खाडीच्या तळाशी जाईन. मी माझ्या भावाला फोन केला आणि खाडीवर कुठे जायचे याबद्दल काही सल्ला विचारला. त्याला तिथे परत येऊन थोडीच वर्षे झाली होती तरी, त्याला एक मोठे मॅपलचे झाड आठवले जे खाडीच्या सीमेवर जंगलाच्या बाजूला होते आणि त्याला वाटले की ते एक चांगले ठिकाण आहे. माझ्या लहानपणीच्या दिवसां मध्ये मी त्या खाडीच्या भागामध्ये सगळी कडे फिरत असायचो, मला त्या खाडीतील प्रत्येक वळण माहित होते आणि तो मला नेमका कुठे जायला सांगत आहे हे मला नक्की माहीत होते.

ओक्लाहोमामध्ये एक वर्षापूर्वी प्रभुने आम्हाला जे दाखवले होते त्याची ड्रेन्डा आणि मी पुनरावृत्ति केली - एक बी पेरा अथात दान द्या, ते एका कागदावर लिहा आणि मार्क 11:24 नुसार प्रार्थना करत असतांना आपल्याला ते प्राप्त झाले आहे यावर विश्वास ठेवा. त्या वेळी, ओहायोमध्ये एकावेळी एका लिंगाच्या दोन-हरणांची शिकार करण्याची मर्यादा होती, परंतु आम्हाला वाटले की आम्ही एका हरणासाठी पेरणी करू अर्थात दान देऊ आणि नंतर दुसऱ्या हरणाची देखील शिकार करण्या बद्दल विचार करू. ड्रेन्डा आणि मी हरणासाठी एक बी पेरले, अर्थात आपले दान दिले आणि विश्वास ठेवला की जेव्हा आम्ही प्रार्थना केली तेव्हा आम्हाला ते मिळाले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हरणाची शिकार करण्याचा हंगाम ज्या दिवशी सुरु झाला त्या दिवशी सकाळी 40 मिनिटांत मला एक नाही तर दोन हरणे मिळाली. व्वा, आम्हाला जाणवले कि निश्चितपणे काहीतरी घडत आहे!

एका महिन्यानंतर, मला एका व्यवसायाच्या कल्पनेबद्दल स्वप्न पडले. मी विमा व्यवसायातून मिळवलेले सर्व आर्थिक ज्ञान या व्यवसायात समाविष्ट होते, परंतु स्वप्नात त्याचा एक वेगळा उद्देश होता. मला ते पूर्णपणे समजले नाही, परंतु मला खात्री होती की देव मला माझा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास आणि आठ वर्षांपासून ज्या फर्म मध्ये मी काम करत होतो ती सोडण्यासाठी माझे मार्गदर्शन करत आहे. या स्वप्नाच्या वेळी, मी अजूनही जीवन विमा आणि सिक्युरिटीज मध्ये सेल्स विभागात काम करत होतो.

ज्या आठवड्यात मला स्वप्न पडले होते, त्या आठवड्यात मी विम्याबद्दल बोलण्यासाठी एका कुटुंबाकडे गेलो होतो, आणि जरी आम्ही जीवन विम्याबद्दल बोललो, तरी मला माहित होते की जीवन विमा घेणे ही त्यांची खरी गरज किंवा समस्या नाही. ते त्यांच्या मासिक बजेटमध्ये आणि कर्जात गुरफटलेले होते. माझ्या क्लायंटसाठी माझ्या सामान्य नियोजनाचा एक भाग म्हणजे त्यांच्या कडून त्यांच्या आर्थिक स्थिती बद्दल माहिती एका फॉर्मवर भरून घेणे. यामुळे त्यांना किती जीवन विम्याची गरज आहे हे मला समजू शकनार होते. त्या रात्री मी या कुटुंबा विषयी फार अस्वस्थ होतो. मला त्यांना मदत करायची होती, पण कसे ते मला कळत नव्हते. मी त्यांची डेटाशीट घेऊन बसलो आणि काही पर्याय निघतो का ते पाहू लागलो. मी माझ्या आर्थिक कॅल्क्युलेटरच्या मदतीने काम करत असताना, मी जीवन विम्याच्या दृष्टीकोनातून न पाहता त्यांच्या मासिक बजेटमध्ये मी काही आर्थिक मदत करू शकतो का ते पाहू लागलो. काही गोष्टींची पुनर्रचना करून आणि कॅल्क्युलेटरवर गोळाबेरीज करून, मला हे पाहून आश्चर्य वाटले की हे कुटुंब 7 वर्षांपेक्षा कमी कालावधीत कर्जमुक्त होऊ शकते, त्या साठी त्यांना एकही वस्तू गहाण ठेवावी लागणार नव्हती किंवा आपला कमाईचे क्षेत्र बदलण्याची गरज नव्हती.

मला हे पाहून आश्चर्य वाटले की हे कुटुंब 7 वर्षांपेक्षा कमी कालावधीत कर्जमुक्त होऊ शकते, त्या साठी त्यांना एकही वस्तू गहाण ठेवावी लागणार नव्हती किंवा आपल्या कमाईचे क्षेत्र बदलण्वाची गरज नव्हती.

या घटनेच्या वेळी, मी 8 वर्षांपासून आर्थिक क्षेत्रात होतो आणि हे शक्य आहे असे कोणी म्हटलेले मी कधीही ऐकले नव्हते. मी ह्या केसचा पुन्हा आणि पुन्हा अभ्यास केला, आणि मला एकच उत्तर मिळाले: 6.2 वर्षे आणि ते कर्जमुक्त होतील. त्यानंतर मी माझ्या फाईल ड्रॉवर मधून इतर क्लायंटच्या डेटा शीट काढल्या. मी तीच गणना केली आणि तेच उत्तर आले: 7 वर्षाच्या आत ते कर्जमुक्त होतील. अगदी खरे सांगायचे तर, मला या डेटाने आश्चर्याचा धक्का बसला.

मला वाटले की माझे क्लायंट हे पाहून प्रोत्साहित होतील, म्हणून मी एक छान सादरीकरण टाईप करण्याचे ठरवले आणि त्यांच्या जीवन विमा गरजांबद्दल त्यांना भेटल्यावर

मला जे आढळले ते सादर करण्याचा निर्णय घेतला. मला या कुटुंबासाठी खूप वाईट वाटले. मला माहित आहे की आर्थिक ताणामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर कसा परिणाम होतो आणि त्यांना कळावे ही हताश होण्या इतकी वाईट परिस्थिती नाही, अशी माझी इच्छा होती. म्हणून मी माझे थोडेसे टाईप केलेले सादरीकरण माझ्या क्लायंटला दाखवले आणि मी त्यांना ते समजावून सांगत होतो तेंव्हा ते नुसते थक्क होऊन ऐकत होते. ते किती लवकर कर्जमुक्त होऊ शकतात हे मी त्यांना दाखवल्यानंतर, पती तर रडू लागला आणि आनंदाने उद्या मारून माझे आभार मानू लागला. हे अगदी टीव्हीवर आपण एखाद्या कुटुंबाला लॉटरी किंवा गेम शोमध्ये भव्य बक्षीस जिंकल्यावर आनंद करतांना पाहतो अगदी तसेच होते. मी त्यांना जे सांगत होतो त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. हा खरोखरच त्यांच्यासाठी, आणि माझ्यासाठीही देखील भारावून टाकणारा अनुभव होता.

मी त्या संध्याकाळी जे घडले त्या बद्दल विचार करत असतांना, त्या क्लायंटच्या मालमत्तेची आणि संख्यांची फक्त पुनर्रचना करून मी त्यांना 7 वर्षांपेक्षा कमी कालावधीत ते कर्जमुक्त कसे होऊ शकतात हे दाखवू शकलो हे माझ्या डोक्यातून जात नव्हते. मी ह्याचा प्रभाव आणि त्यातून त्यांना किती मोठी अशा मिळाली हे पहिले. “7 वर्षांच्या कालावधीत कर्जमुक्त होणे” या परिस्थिती मध्ये किती क्लायंट आहेत हे तपासण्यासाठी मी माझ्या क्लायंटच्या फाईल्स परत तपासू लागलो आणि त्यांच्यापैकी 85 टक्के लोक अशा परिस्थिती मध्ये होते हे पाहून मला आश्चर्य वाटले. पण लोकांना त्यांची ही परिस्थिती कोण सांगत होते? त्या रात्रीनंतर माझ्या ह्या क्लायंटसोबत आणि माझ्या इतर अनेक जुन्या क्लायंटच्या फाईल्सवर काम केल्यानंतर, मला समजले की मी माझ्या ह्या योजनेद्वारे लोकांना कर्जातून कसे बाहेर पडायचे हे दाखवणारा व्यवसाय सुरू करू शकतो.

आता, ह्या वेळेस मी स्वतः माझ्या कर्जातून मुक्त झालो नव्हतो, पण आर्थिक तणावात असलेल्या लोकांबद्दल मला निश्चितच सहानुभूती होती आणि केवळ जीवन विमा विकण्यापेक्षा हे काम मला बरेच आकर्षक वाटले. मी माझ्या सर्व विमा क्लायंटना ते कसे कर्जमुक्त होऊ शकतात ह्या विषयीचे माहिती असलेले प्रिंटआउट दाखवायला सुरुवात केली आणि ते सर्व आश्चर्याने थक्क झाले, त्या मध्ये एकही अपवाद नव्हता.

एक बिझनेस मॉडेल कसे तयार करावे हे मला समजत नव्हते, त्या मध्ये मला काही समस्या येत होत्या. प्रथम हाताने गणना करणे आणि नंतर ते सादरीकरण करण्या साठी टाईप करणे, त्यासाठी फार वेळ लागत असे. दुसरे, हे करून मी पैसे कसे कमवू शकेन? अखेरीस, मी एका कम्प्युटर सॉफ्टवेअर डिझायनरशी करार केला आणि त्याच्या कडून एक प्रोग्राम तयार करून घेतला, त्याचा उपयोग मी हे काम अधिक वेगाने करण्या साठी करू शकत होतो. माझी दुसरी समस्या ही होती कि, मला माहित होते की ह्या लोकांकडे मला देण्या साठी सुरुवातीला पैसे नसतांना, कर्जातून बाहेर पडण्या साठी मी त्यांच्या कडून पैसे घेऊ शकत नव्हतो. मी याबद्दल प्रार्थना करू लागलो.

एके दिवशी माझ्या मनात बऱ्याच कल्पना आल्या. मला खरोखर वाटले की देवाने मला माझी कंपनी कशी चालवायची, लोकांकडून पैसे न घेता मदत करणे, आणि तरीही स्वतःसाठी पैसे कसे कमवायचे याची कल्पना दिली आहे. माझ्या प्लॅनमध्ये, मी गमावलेले पैसे, क्लायंटकडे आधीपासून असलेले पैसे, पण त्याला ते दिसत नाहीत ह्या कडे लक्ष द्यायला सुरवात केली. उदाहरणार्थ, मी ऑटो, घर, जीवन आणि आरोग्य विमा दरांची तुलना करून त्या मधून बचत कशी होऊ शकते हे शोधण्याचा प्रयत्न केला. पुनर्वित्त घेण्यात काही फायदा आहे की नाही हे पाहण्यासाठी मी तारण दरांची तुलना करत असे. मी अशा अनेक गोष्टी तपासून पाहत असे, जरी मी संशोधन करत असलेल्या व्यवसायाचे प्रत्येक क्षेत्र मी वैयक्तिकरित्या कधी हाताळले नव्हते. माझ्या क्लायंटच्या घरी जाऊन, मी त्यांना बचत दाखवत असे, आणि नंतर माझ्या कल्पना अंमलात आणू शकणारी कंपनी शोधण्यासाठी किंवा मी त्यांच्यासाठी शोधलेल्या कमी खर्चिक कंपनी पेक्षा कमी खर्चात काम करून देणारा प्रतिनिधी शोधण्यासाठी त्यांना स्वतःहून जाऊन शोधण्यास सांगत असे. अचानक, माझ्या लक्षात आले की या क्लायंटला त्या कंपन्यां कडे पाठवल्या मुळे मला रेफरल फी मिळू शकते.

थोडक्यात, मी माझ्या क्लायंटला त्यांच्या कंपनी आणि उत्पादना साठी विकण्याचे सर्व काम आधीच केले होते. त्यांना फक्त त्यांच्या कडून साइन अप करून घ्यायचे होते. म्हणून माझ्या क्लायंटना सुचविण्या साठी मी विक्रेते, प्रतिनिधी आणि व्यावसायिकांशी संपर्क साधू लागलो आणि त्यांना मी काय करत आहे ते सांगितले आणि त्यांना विचारले की हे काम

रेफरल फीस देण्याच्या योग्यतेचे आहे का. ते सर्व म्हणाले “हो.” म्हणून मी ते काम करायला सुरुवात केली. मी माझी जुनी कंपनी सोडली आणि लोकांना कर्जातून बाहेर काढण्यासाठी माझी स्वतःची कंपनी सुरू केली. आमचा हा व्यवसाय वाढू लागला आणि ह्या व्यवसायातून, ड्रेन्डा आणि माझ्यासाठी अडीच वर्षांत कर्जातून बाहेर पडण्यासाठी पुरेसे पैसे तयार झाले! आम्ही खूप उत्साही होतो! (तुम्हाला देखील ही योजना विनामूल्य तयार करून घ्यायची असेल तर 1-800-815-0818 वर कॉल करा. आम्ही आज 28 वर्षांनंतरही ते करत आहोत!)

प्रत्येक दिवस हा एक नवीन दिवस होता कारण देव त्याचे राज्य कसे चालते हे आम्हाला अधिकाधिक दाखवत गेला. मी दुसऱ्या क्लायंटला भेटायला गेलो असतांना, देव माझ्याशी लोकांना कामावर घेण्याबद्दल आणि माझा छोटासा व्यवसाय पूर्णपणे व्यवसाय बनवण्याबद्दल बोलला. मी आमच्याबरोबर काम करण्यासाठी लोकांना नियुक्त केले आणि आमचा व्यवसाय अधिकाधिक आणि मोठ्या स्तरावर वाढू लागला. मी तुम्हाला प्रस्तावनेत सांगितले की आम्ही आमच्या कारसाठी रोख पैसे कसे देऊ शकलो आणि आम्ही आमचे स्वप्नातील घर कसे बांधले. मी कामावर घेतलेल्या नवीन लोकांना मी मासिक व्यवसाय मीटिंग्समध्ये, देवाच्या राज्याबद्दल सांगत असे आणि लोक देवाच्या राज्याबद्दल अधिक ऐकण्यासाठी आणि ते त्यांच्या स्वतःच्या जीवनात कसे लागू करायचे हे जाणून घेण्यासाठी इतकेच केवळ नव्हे तर, व्यवसायाची संधी शोधण्या साठी माझ्या कंपनीकडे आकर्षित झाले.

देव मला दाखवत असलेले धडे आश्चर्यकारक होते आणि अर्थातच, यापैकी बरेच धडे मी दरवर्षी शिकार करत असताना शिकलो होतो. मी शिकार करताना पाहिल्या त्या कथा अगदी थक्क करणाऱ्या होत्या. मी त्यांना माझ्या डोळ्यांसमोर उलगडताना पाहिल्याशिवाय त्यांच्यावर विश्वास ठेवला नसता. प्रत्येक कथेने मला राज्याबद्दल काहीतरी नवीन शिकवले जे मी यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. मला वाटले की त्यापैकी काही मी या पुस्तकात तुमच्याबरोबर शेअर करेन, परंतु तुम्हाला माझ्या शिकारीच्या कथा खरोखर वाचायच्या असतील तर तुम्ही माझ्या वेबसाइटवरून फेथ हंट या पुस्तकाची प्रत मिळवू शकता.

देवाच्या राज्याबद्दलच्या नवीन ज्ञानाचा वापर करून हरणाची शिकार करण्याचा शोध लागल्याच्या काही वर्षांनी ही घटना घडली. मी तुम्हाला आधीच सांगितल्या प्रमाणे, देवाने

मला माझ्या हरणासाठी पैशाची पेरणी कशी करायची आणि प्रार्थना केल्यावर ते मिळालेच आहे असा विश्वास ठेवण्यास कसे शिकवले - आणि दरवर्षी 30 ते 45 मिनिटांत माझे हरण मला प्राप्त होत होते. आता 28 वर्षांपासून हे दरवर्षी होत आले आहे. असो, या एका विशेष वर्षी मी नेहमीप्रमाणे बाहेर पडलो, आणि मला पूर्ण विश्वास होता कि हरीण मिळणारच. त्यानुसार, काही मिनिटांतच, मला एक हरिण माझ्यापासून काही अंतरावर, 200 यार्ड अंतरावर असलेल्या माझ्या शेजाऱ्यांच्या अंगणात शिरतांना दिसले. मला माहित होते की एकदा ते हरिण जंगलात गेले की ते निघून जाईल परत येणार नाही, पण तरीही मला माहित होते की ते माझे हरीण आहे. धनुष्याने शिकार करणे, ग्रंट कॉल वापरणे किंवा हरणाला आपल्याकडे कसे आकर्षित करायचे याबद्दल मला काहीही माहित नव्हते तेंव्हाची ही गोष्ट आहे. मला माहित होते की हे हरीण माझा हंगाम आहे, परंतु ते हरीण माझ्या शेजाऱ्यांच्या घरासमोरील झाडांमध्ये जात असतांना मी असहायपणे पाहत होतो. आणि अचानक मी माझ्या आत्म्यात ऐकले, “हरणाला तुझ्याकडे यायला सांग.” “काय? हरणाला माझ्याकडे यायला सांगायचे; याचा अर्थ काय?” मला नक्की काय करायचे ते माहित नव्हते, म्हणून मी मोठ्याने म्हणालो, पण हरणाला ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात नाही, “हरीण, मी तुला थांबण्याची आज्ञा देतो, मागे वळ आणि माझ्या झाडाखाली येऊन उभा राहा.” मी धनुष्याने शिकार करत होतो म्हणून माझ्या बोलण्यामध्ये झाडाखाली उभे राहण्याचा तो शेवटचा भाग मी जोडला कारण मला हरण खरोखर जवळ हवे होते. मला वाटले की जर विश्वासाने ते हरीण माझ्याकडे येणार आहे, तर मी ते माझ्या झाडाखाली आणू शकतो जिथे मी त्याला अगदी सहजपणे शॉट मारू शकतो.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जेव्हा मी ते शब्द बोललो, तेव्हा ते हरण झटपट थांबले, मागे वळले आणि थेट माझ्या झाडाकडे जाऊ लागले. मला धक्काच बसला कारण ते हरिण 200 यार्ड ओलांडून थेट माझ्या झाडाखाली आले आणि हो, फक्त 12 फूट उंच असलेल्या माझ्या ट्री स्टँडखाली उभा राहिला. माझ्याकडे कॅमो ऑन नव्हता, सुगंध सोडण्याची पद्धत नव्हती, ग्रंट कॉल्स नव्हते, फक्त मी आणि देव, तरीही ते हरण आता थेट माझ्या खाली उभे होते. मला नाही वाटत की कुणीही तो शॉट चुकवला असता. मी खूप आनंदाने ते हरिण घरी नेले, पण मी जे पाहिले ते माझ्या वचारांमधून जाऊ शकत नव्हते. मी बोललो आणि आज्ञा केली म्हणून ते हरीण खरंच माझ्याकडे आले का? तसे अगदी असेच झाले ऐसे वाटते.

आम्ही ओहायोमध्ये भाड्याने घेतलेले शेत 89 एकर होते आणि ते काही जंगल, खाडीचा काही भाग आणि मोकळे मैदान असे होते. हिवाळ्याच्या महिन्यांत, आणि विशेषतः जर जमिनीवर बर्फ असेल, तर आम्हाला सश्याच्या शिकारीला जायला आवडायचे. ओहायोमध्ये रिंग-नेकच्या तितरांचा हंगाम होता सश्यांचा आणि तितरांचा शिकारीचा हंगाम सोबतच चालत असत, परंतु आम्हाला आमच्या शेतात क्वचितच तीतर पाहायला मिळत असत.

या विशिष्ट दिवशी, आम्ही सशाच्या शिकारीसाठी बाहेर पडलो आणि खाडीच्या बाजूने शिकार करत असतांना एक कोंबडा तीतर फडफडला. मी पटकन वाकलो आणि गोळी झाडली. मी ज्या क्षणी ट्रिगर खेचला त्याच वेळेस मला समजले कि मी त्या पक्ष्याचे फक्त पंख कापले आहेत. तीतर खाली पडला; परंतु, ज्या क्षणी तो जमिनीवर आदळला, त्या क्षणी तो पक्षी धावत सुटला. एक तीतर ताशी 35 मैल वेगाने धावू शकतो आणि हे सिद्ध करण्यासाठी तो आपली पराकाष्ठा करत होता. जमिनीवर नवीन बर्फवृष्टी झाली होती, आणि खुल्या कुरणात पक्षी थोड्याशा चढाईच्या दिशेने धावत होता, त्यामुळे पक्षी पळून जाताना त्याची प्रत्येक हालचाल मी सहज पाहू शकत होतो.

पक्षी निघून जाईल या विचाराने मी काही क्षण असहाय्यतेने तिथे उभा राहिलो, पण माझ्या आत्म्यात अचानक प्रेरणा उत्पन्न हुई. जेव्हा मी त्या हरणाला थांबून माझ्या मार्गावर येण्याची आज्ञा दिली तेव्हा काय झाले हे मला माहित होते. मला असे वाटले की मी आता ते करून पहावे, म्हणून मी मोठ्याने ओरडलो, “तीतर, येशूच्या नावाने, थांब!” क्षणार्धात, मला पक्षी पुढे आणि वरच्या बाजूला दिसेनासे झाले. मला संपूर्ण शेत स्पष्ट दिसत होते आणि मी ओरडलो त्याच क्षणी तीतर थांबला होता. माझा मुलगा टिम माझ्यासोबत होता आणि तो म्हणाला, “बाबा, तुम्ही ओरडल्यावर काही क्षणातच तीतर थांबला.” पण ते कुठे होते? टिम आणि मी त्याच्या मागून शेतात गेलो आणि तिथे तो बर्फावर बसला होता. त्याचे डोके जवळजवळ अर्धवट बर्फात गाडले गेले होते, परंतु त्याचे संपूर्ण शरीर बर्फाच्या वरील भागावर होते. ते थोडंसं गवताच्या मागे होतं, त्यामुळे आम्हाला ते दिसू शकले नव्हते. तो पक्षी मेला होता का? मी तो पक्षी उचलला, त्याने लगेच पंख फडफडायला आणि कर्कशपणे ओरडायला सुरवात केली. पक्षी अगदी जिवंत होता! जेव्हा आम्ही पक्ष्याचे परीक्षण केले तेव्हा मला दिसले

की शिकारी मध्ये त्याचा उजवा पंख केवळ काही प्रमाणात कापला गेला होता. टिम आणि मी आश्चर्याने एकमेकांकडे पाहिले. आम्ही नुकतेच जे पाहिले त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, अगदी कुणीही नाही.

मी आधी सांगितल्याप्रमाणे, ओहायोमध्ये कोणत्याही लिंगाच्या दोन-हरणांची शिकार करण्याची मर्यादा होती, परंतु मी वर्षातून फक्त एकाच हरणासाठी पैशांची पेरणी करू शकत होतो. ओहायो राज्यात हरण आणि हरिणी ची संख्या कमी करण्याचा प्रयत्नांवर लक्ष केंद्रित केले जात होते. म्हणून मी एक हरण आणि हरिणी साठी माझे पैशांचे बी पेरले आणि घड्याळाच्या काट्याप्रमाणे, हरण सुरुवातीच्या 30 ते 40 मिनिटातच बाहेर येत असे; आणि नंतर लगेच थोड्या वेळाने, हरिणी येत असे. एक दिवस मी विचार केला, “एक मिनिट थांब; मी माझे पैशांचे बी पेरले तेव्हा मी जे लिहून ठेवले त्या क्रमाने हरीण येत आहेत.” ते खरे असू शकते का? मी क्रम उलट केला तर काय होईल? सहसा मी हरण आणि हरिणी साठी पेरणी करत असे, आणि ते त्या क्रमाप्रमाणेच बाहेर येत असत. यावेळी, मी हरण आणि हरिणी ऐवजी एक हरिणी आणि एक हरण या क्रमाने पैशांचे बी पेरले, अर्थात माझे दान दिले; आणि पुन्हा हरणं आली, पण यावेळी आधी हरिणी आली आणि नंतर हरिण आले. मी काही वर्षे हे असेच बदलत राहिलो, माझ्या सिद्धांताची चाचणी केली आणि प्रत्येक वेळी ते सिद्धांता प्रमाणेच झाले. या गोष्टी अशा प्रकारे होत असतांना पाहिल्यावर, मी देवाच्या राज्याबद्दल आश्चर्याने निशब्द झालो आणि ही जाणीव झाली कि मला त्याबद्दल किती कमी माहिती होती. एक गोष्ट नक्की होती की, परमेश्वर मला दाखवत होता की माझे जीवन कसे चालले आहे या संदर्भात माझी जी कल्पना होती त्यापेक्षा मला अधिक अधिकार आहे.

एक विशेष नोंद, सध्या 2015 हरणाच्या शिकारीचा हंगाम आहे. मी चार-पॉइंट किंवा त्याहून मोठे हरण, एक वर्षाची हरणी आणि एक वर्षाचे बटण बक या साठी माझे पैशांचे बी पेरले. घड्याळाच्या काट्याप्रमाणे सिक्स पॉईंट थेट माझ्या झाडाकडे आले; त्यानंतर, मी एक वर्षाची हरणी मिळाली, ती एकटीची माझ्या झाडाकडे आली. मला माहित होते की पुढच्या वेळी बटण बक दिसेल. मला माहित आहे की हे वेडेपणाचे वाटते; परंतु जे घडत होते तेच केवळ मी तुम्हाला सांगत आहे.

पण एका हरणाच्या शिकारीमुळे हे सर्व इतके स्पष्ट झाले की त्याने मला जणूकाही घाबरवून सोडले. मी माझे बी फोर- पॉईंट किंवा त्यापेक्षा मोठ्या हरणासाठी पेरले होते आणि नंतर बटन बकसाठी देखील पेरले होते (बटन बक हरिणी म्हणून गणला जातो कारण त्याची शिंगे फर खाली असतात आणि फक्त लहान बटणे असल्या सारखे दिसतात). मी नेहमीप्रमाणे शिकारीसाठी बाहेर गेलो आणि धनुष्याने शिकार करण्याच्या हंगामात केवळ 15 मिनिटांत माझे आठ-पॉइंट हरण मला मिळाले. पुढच्या वेळी जेंव्हा मी शिकार करण्यासाठी बाहेर गेलो तेंव्हा मला नक्की बटन बक मिळेल याची खात्री होती.

दोन आठवड्यांनंतर मी पुन्हा शिकारीसाठी बाहेर गेलो, आणि मी ट्री स्टैंड वर बसलो असतांना मला माझ्यापासून सुमारे 300 यार्डांवर कुरणातून एक छान आठ-पॉइंटर येताना दिसले. तो थेट माझ्या झाडाकडे येत होते. तो त्याच्या मार्गावरून न डगमगता थेट त्या शेतातून माझ्या झाडाखाली आला आणि सुमारे 20 सेकंद तिथे उभा राहिला. मग तो मागे वळला आणि तो कुरण ओलांडून ज्या मार्गाने आले होते अगदी त्याच मार्गाने परत जाऊ लागले. लक्षात ठेवा, ओहायोमध्ये फक्त एक हरण मारणे कायदेशीर होते आणि मी आधीच आठ पॉइंटर ची शिकार केली होती, म्हणून मला तिथे बसून त्याला परत जातांना पहावे लागले आणि शूट करता आले नाही. मी आता पूर्ण गोंधळून गेलो होतो. ही पहिलीच वेळ होती जेव्हा मी शिकारीला गेलो आणि एक जे हरण माझ्या जवळ आले ते मी बी पेरल्या प्रमाणे अर्थात ज्या हरणासाठी मी दान दिले होते त्या प्रमाणे नव्हते. ते हरण ज्या पद्धतीने वागले, त्या शेतातून सरळ येऊन थेट माझ्या झाडाखाली उभा राहिला, मग तो कुरण ओलांडून त्याच वाटेने परत गेला ते अगदी विचित्र होते. हे हरण काहीतरी कामावर नेलेल्या प्रमाणे वागत होते. मी सकाळची वाट पाहिली, पण बटन बक दिसले नाही.

त्या रात्री माझ्या ऑफिसमध्ये असतांना ह्या घटने मुळे मी अस्वस्थ झालो होतो. काहीतरी चुकलं होतं; बटन बक यायला पाहिजे होते. आणि त्याऐवजी ते आठ पॉइंटर का दिसले? मी तिथे बसून आत्म्याने प्रार्थना करू लागलो, जे घडले ते काय होते हे मला समजविण्याची मी देवाला केली. मी त्याचा आवाज मला ऐकला, “तू काय दान दिलेस ते बघ.” माझे दान बघू? मी कशासाठी दान दिले होते ते मला माहीत होते. माझी बँक माझ्या चेकच्या प्रती बनवते,

म्हणून मी माझे स्टेटमेंट काढले आणि मी माझ्या हरणासाठी दान करतांना लिहिलेला चेक पाहिला. मला वाटले की मी माझे दान दोन हरणांसाठी दिले होते, एक चार-पॉइंट किंवा त्या पेक्षा मोठा आणि दुसरा एक बटन बक, जो मी आधी म्हटल्याप्रमाणे हरणी म्हणून समजल्या जातो. पण माझ्या चेक वर अशा प्रकारे लिहिले होते, "दोन हरण, चार पॉइंट किंवा मोठा, एक बटन बक." खरे तर मला म्हणायचे होते, दोन हरणं, एक चार पॉइंट किंवा मोठे आणि एक बटन बक , पण असे लिहिले नव्हते. त्यात म्हटले होते, "दोन हरणं फोर पॉईंट किंवा मोठे आणि एक बटन बक." तर हे किती हरणं झाली? तीन, आणि दुसरा चार पॉइंट किंवा ता पेक्षा मोठा म्हणजे अगदी पहिल्यासारखाच मोठा होता. ते पाहून मी थक्क होऊन बसलो. तो आठ पॉईंटर त्याच्या कामगिरीवर होता. राज्याच्या कायद्यामुळे तो तिथे आलेला होता. मी उडी मारली आणि ओरडून घरामध्ये सगळीकडे पळू लागलो. व्वा!!!!

त्याच बरोबर मी जे पाहिले त्याने मी घाबरून गेलो. जे मी नुकतेच पाहिलेअगदी त्या यानुसारच अचूक आणि निश्चितपणे देवाचे राज्य चालते, तर मला अधिक सावधगिरी बाळगण्याची गरज होती. मी अनवधानाने अशा गोष्टी केल्या होत्या त्या घडामोडी घडवून याव्यात अशी माझी इच्छा नव्हती, तरीही त्या घडल्या कारण मी त्यांना आत्मिक नियमानुसार मोकळे केले होते. मला आता जाणवले की माझ्या सारखेच अनेक लोक अशा बाबीचा अनुभवत होते, त्यांना त्या घडाव्यात असे खरोखर वाटत नव्हते, परंतु तरीही ते स्वतःच ते घडण्यास कारण ठरले होते. लक्षात ठेवा, त्याच्या शब्दांनी, येशूने अंजिराच्या झाडाचा वध केला आणि दुसऱ्या एका वेळी लाजरला कबरेतून बाहेर बोलावले. दोन्ही घटनांमध्ये समान कायद्याचा वेगवेगळ्या कारणांसाठी वापर केला. पुढच्या वेळी जेव्हा मी शिकार करायला गेलो तेव्हा मी बी पेरल्याप्रमाणेच अर्थात माझे दान ज्या कामासाठी दिले होते त्याप्रमाणे तो बटन बक दिसला.

घटनांच्या या संपूर्ण मालिकेने मला आश्चर्यचकित केले आणि देवाच्या राज्याबद्दलच्या माझ्या दृष्टिकोनावर त्याचा जबरदस्त प्रभाव पडला. मनामध्ये कोणताही गोंधळ किंवा संकोच न राहता मला आता कळले की, देवाचे राज्य खरोखरच विशेष आहे. तरीही आपण त्याबद्दल आश्चर्यचकित व्हावे का? पृथ्वीवरील प्रत्येक भौतिक नियम हा विशिष्ट आहे. मला

असे वाटते की आत्मिक कायदे भौतिक नियमांप्रमाणेच आत्मिकतेने अस्तित्वात असलेल्या बाबीं अनुसार कार्य करतात हे मला कधीच कळले नाही. माझ्याकडे जे असायला हवे होते ते माझ्याकडे नव्हते. पण आता मला माहित आहे की राज्य विशेष आहे, अतिशय विशेष आहे.

ठीक आहे, तुम्ही म्हणालात, म्हणून मी शिकारीची आणखी एक गोष्ट तुम्हाला सांगतो. (शिकार करताना मी शिकलेले हे धडे मला खूप आवडतात, त्यामुळे तुम्हाला माझ्यासोबत हे सहन करावे लागेल.) देवाचे राज्य किती विशिष्ट पद्धतीने चालणारे आहे हे मी पाहिल्यामुळे मी आणखी विशिष्ट प्रयोग करण्याचे ठरवले. या वर्षी, मी सात पॉईंट हरणासाठी पैसे पेरण्याचे अर्थात आपले दान सेवकाई साठी देण्याचे ठरवले. सहसा, हरणाच्या प्रत्येक बाजूला समान बिंदू असतात. चार पॉईंटर मध्ये प्रत्येक बाजूला दोन बिंदू असतात; आठ पॉईंटर मध्ये प्रत्येक बाजूला चार बिंदू असतात. परंतु अनेक वेळा, काही हरणाचे काही कारणांमुळे एकही शिंग नसते आणि त्यांच्या प्रत्येक बाजूला वेगवेगळ्या प्रमाणात बिंदू असतात. परंतु, मी म्हटल्याप्रमाणे, साधारणपणे, त्यांच्या प्रत्येक बाजूला समान संख्येचे बिंदू असतात.

मला माझा विश्वास सामान्य नहीं परन्तु एका विशिष्ट गोष्टीसाठी मुक्त करायचा होता, कारण मी एक प्रयोग करण्याचा प्रयत्न करत होतो. तुम्ही जितके अधिक विशिष्ट आहात तितके जास्त वेळ तुम्हाला प्रतीक्षा करावी लागेल आणि ती पूर्ण करण्यासाठी पवित्र आत्म्याकडून अधिक अचूक सूचना मिळतील हे मी आधीच शिकलो आहे. त्यामुळे धनुष्याने शिकार करण्याच्या हंगामाच्या सुरुवातीच्या दिवशी, शिकारीसाठी बाहेर जायचे नाही हे मला माहित होते; ते हरण तिथे नव्हते हे मला माहीत होतं. खरं तर, मी संपूर्ण ऑक्टोबरपर्यंत वाट पाहिली आणि मला माझ्या आत्म्या मध्ये हे कळले कि, “नाही, ते हरण अद्याप येथे नाही.” हे निराशाजनक होते; वसंत ऋतूतील झाडांचे बदलणारे रंग, ते जंगल, ह्या वातावरणात मला खरोखर बाहेर जाऊन शिकार करण्याची इच्छा होती. पण तरीही मी वाट पाहिली.

आणि ते घडलं. एका रात्री जॉर्जियाहून भेटायला आलेल्या माझ्या पत्नीच्या आई-वडिलांशी मी लिव्हिंग रूममध्ये बसलो होतो, तेव्हा मला ते ऐकू आले. उद्याची सकाळ शिकारीचा दिवस होता. सात पॉईंटर तेथे असणार होता! मी कुटुंबातील सर्वांना सांगितले की मला माझी शिकार उद्या मिळणार आहेत. मी खूप उत्तेजित होऊन उठलो आणि अंधार

संपण्या पूर्वी बाहेर पडलो. माझ्या जंगलाच्या सीमेवरून समोर दिसणारा दहा एकर दलदलीचा प्रदेश होता, झाडाच्या स्टँडवर मी माझ्या क्रॉसबोसह बसलो होते आणि तिथून शिकार करणार होतो. शिकारीसाठी ही फारच उत्तम जागा होती. तुम्ही बाहेर बसले असतांना बदके उडत आत येतात; कस्तुरी, आणि मिंक देखील जंगलाच्या कडेला फिरतांना दिसतात. दलदलीच्या सीमेवर अनेक खुरटी झुडपं होती, आणि तो हरणांना विसावण्या साठी सर्वात उत्तम जागा आहे. मी माझ्या झाडाच्या स्टँडवर बसून राहिलो, काहीही झाले नाही. मी 45 मिनिटे वाट पाहिली, नंतर एक तास, पण काहीही झाले नाही.

मनामध्ये कोणताही गोंधळ किंवा संकोच न राहता मला आता कळले की, देवाचे राज्य खरोखरच विशेष आहे.

मी माझ्या घराच्या अंगणात कारचे दरवाजे उघडताना आणि बंद होत असल्याचे ऐकले आणि मला समजले की ड्रेंडाचे आई वडील जॉर्जियाला परत जायला निघाले आहेत. ते जाण्यापूर्वी मी त्यांच्यासोबत नाश्ता करण्याचे वचन दिले होते आणि मी स्वयंपाकी होतो. माझी मूळ योजना सकाळी लवकर हरणाची शिकार करणे आणि त्या नंतर नाश्त्यासाठी घरी परतणे ही होती. पण हरण तर अजून आले नव्हते, आणि मी अनिच्छेनेच झाडाच्या स्टँडमधून खाली उतरलो आणि घराकडे निघालो. माझ्या जागेवरील अनुभवावरून मला माहीत होते की हरीण सकाळ नंतर दलदलीच्या भागात येते, कारण मी आधी सांगितल्या प्रमाणे हरणांच्या विसाव्या साठी ते सर्वात उत्तम क्षेत्रांपैकी एक होते. तर, मला माहित होते की हरण कोणत्याही क्षणी तिथे येईल, परंतु मी आता आणखी जास्त वेळ त्या ठिकाणी थांबू शकत नव्हतो. मला दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा बाहेर यावे लागणार होते.

मी घरातल्या सगळ्यांना अभिवादन केले आणि नाश्ता तयार करायला सुरुवात केली. आमच्या घरी नेहमी मीच नाश्ता बनवतो आणि माझ्या आठवणी प्रमाणे अनेक वर्षां पासून हे असेच होत आले आहे. गव्हाच्या वॅफल्सची माझी स्वतःची खास रेसिपी आहे त्या रेसेपी ने वॅफल्स अप्रतिम बनतात, हे तर माझे स्वतःचे म्हणणे आहे. मेनूमध्ये अंडी, सॉसेज आणि चीज चे तुकडे असतात, परंतु माझा नाश्ता खूप छान बनवणारा मुख्य पदार्थ म्हणजे वास्तविक मॅपल सिरप आहे. ओहायो हा मॅपल सिरपचे राज्य आहे आणि माझ्या आसपासचे

लोक मॅपल सिरप बनवतात आणि विकतात. मी माझ्या घरात कोणतेही नकली मॅपल सिरप आणू देत नाही, फक्त असली सिरप आणल्या जाते. तर मी नाश्ता बनवायला सुरुवात केली आणि आमच्या स्वयंपाकघराच्या खिडकीतुन समोर जंगल आणि दलदलीचा भाग दिसतो. अचानक, मला एक हरिण शेत ओलांडून दलदलीकडे जाताना दिसले. मी ओरडतो, "माझे हरण आले आहे!" मी घरतील लोकांना स्वयंपाकाचा ताबा घेण्यास सांगितले कारण मला त्या हरणाच्या मागे जायचे होते!

भूतकाळात हरीण शेत ओलांडताना पाहून ते नेमके कोठे जात आहे हे पूर्वी पहिलेल्या अनुभवावरून मला माहीत होते; आणि तिथे जाण्यासाठी ते थेट माझ्या स्टँडच्या खालून जाईल हे निश्चित होते. मला वाटले की जर मी माझ्या स्टँडवर मागच्या बाजूने बसू शकलो आणि ते हरण तिथे येण्यापूर्वी स्टँडवर चढू शकलो तर मला शॉट मिळू शकेल. हरण येण्यापूर्वी इथून बाहेर पडणे आणि झाडावर चढणे कठीण होईल त्यामुळे मला आत्ताच निघावे लागणार होते! बाहेर जातांना धनुष्य उचलून मी दाराबाहेर पळालो. मी मैदानावरून पळत सुटलो आणि मग जमेल तितक्या शांतपणे स्टँडवर गेलो आणि हळूच वर चढलो. आतापर्यंत सर्व व्यवस्थित झाले होते, पण मला हरण येण्याचे कोणतेही चिन्ह दिसले नाही.

मी स्टँडवर चढलो आणि बसलो अणि मला दिसले की दलदलीतून हरिण थेट मी बसलेल्या स्टँडकडे येत आहे. हरिण ज्या हरिणी च्या मागे जात होते केवळ तिच्याच कडे त्याचे लक्ष होते आणि त्याला मी दिसलो नाही किंवा माझा वासही आला नाही. ती हरिणी दलदलीच्या भागाकडे जाण्यासाठी माझ्या स्टँडच्या खाली आली आणि हरण देखील त्याच वाटेने येत होते. ह्या पेक्षा उत्तम बाब माझ्या साठी आणखी काहीच नव्हती. आता 25 यार्डांवर असलेल्या हरणावर, मी माझ्या क्रॉसबोने काळजीपूर्वक लक्ष्य साधले आणि बाण सोडला. मी बाण काढता क्षणीच मला जाणवले कि बाण सुटला आहे. जे होईल ते बघत बसण्याशिवाय आणखी काही इलाज नव्हता; घरातून बाहेर पडून मैदानातून धावत हरण येण्यापूर्वी इथपर्यंत पोहचण्यात माझा श्वास चढला होता.

बाणाची गती खूपच कमी पडल्याचे पाहून मी निराश झालो आणि मला माहित होते की बाण सोडतांना मी महत्वाच्या बाबीं कडे लक्ष दिले नव्हते. बाण लागल्यावर, हरण दलदलीच्या

भागाकडे असलेल्या दाट झुडपांमध्ये उड्या मारत गेले आणि हळू हळू नजरेआड झाले. मी आधीच्या शिकारींमध्ये जे निरीक्षण केले होते ते असे की धनुष्याने, कधीकधी हरणांना मारल्यावर काय होते ते कळत नाही. बऱ्याच वेळा, जर त्यांनी तुम्हाला पाहिले नाही किंवा तुमचा वास घेतला नाही तर ते निघून जातील. मला हे देखील माहित होते की सहसा जखमी झालेले हरिण झुडपांमध्ये झोपते आणि सहसा फार दूर जात नाही. या हरणाने मला पाहिले नसल्यामुळे ते देखील असेच करत होते. मी अगदी शांतपणे झाडाच्या स्टॅंडमधून खाली उतरलो आणि हरण घाबरू नये म्हणून खबरदारी घेऊन, मी ज्या वाटेने आलो होतो त्याच वाटेने, लांबच्या वाटेने घराकडे निघालो.

मी घरी आल्यावर सगळे मला विचारू लागले की काय झाले आणि मला हरण मिळाले का? जे काही घडले ते मी सर्वांना सांगितले आणि माझ्या मुलांना माझ्या सोबत येऊन झुडपांमधून हरणाचा पाठलाग करण्यास मदत करण्यास सांगितले, कारण मला वाटले कि ते हरण त्या झुडपांमध्ये असेल तर मी त्याच्यावर एक गोळी घालून शिकार पूर्ण करील. आम्ही झाडीझुडपांचा परिसर घेरला आणि हळूहळू त्यातून मार्ग काढून पुढे जाऊ लागलो. अचानक, मी पाहिले की माझा एक मुलगा हरणाच्या फार जवळ गेल्यामुळे त्या हरणाने उडी मारली, आणि ते उंच झाडीं मधून झेप घेत पुढे जाऊ लागले. ते माझ्या समोर 70 यार्ड च्या दुरीवर होते आणि माझ्या उजव्या बाजूने डावीकडे जाण्याचा प्रयत्न करत होते.

अचानक, हरणाने माझा दुसरा मुलगा जो शेताच्या काठावर होता त्याला पाहिले. ज्याच्या मुळे मी गडबडून उडी मारली तो हा नव्हे हे त्याला कळले, परंतु कोणत्या मार्गाने धावणे सुरक्षित आहे हे त्याला कळत नव्हते, त्यामुळे आपल्यासमोर असलेल्या पर्यायांचे त्वरित मूल्यांकन करण्यासाठी तो थांबला. मला माहित होते कि त्याला गोळी घालण्याची माझ्या कडे हीच एक संधी आहे. त्याने मला अजून पाहिले नव्हते. तो आता माझ्यासमोर 70 यार्डांवर माझ्या मुलाकडे पाहत उभा होता. त्या अंतरावर असलेल्या हरणाला मारण्यासाठी क्रॉसबोमध्ये भरपूर ऊर्जा असते, परंतु बाण 70 यार्डांवर काही इंच किंवा काही फूट देखील आधीच पडण्याची देखील शक्यता असते. मी या आधी त्या अंतरावर धनुष्य कधीच मारला नव्हता आणि हे प्रति सेकंद 400 फूट पेक्षा जास्त वेगाने बाण सोडू शकणारे नवीन 185-पाऊंड ड्रॉ क्रॉसबो नव्हते. त्याची अचूकता सुमारे 35 किंवा 40 यार्डांपर्यंत मर्यादित होती.

हरण रुंद बाजूस असल्याने आणि स्थिर उभे असल्याने, मी शॉट घेण्याचे ठरवले. मी धनुष्य उचलले, एक अंदाज धरून हरणावर लक्ष केंद्रित केले आणि बाण सोडला. मी बाण हरणाच्या दिशेने उडताना पाहिला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाण हरणाच्या मानेवर लागला. हरणाच्या मानेत बाण अर्ध्या पर्यंत रुतला होता (सर्व तपशील देत आहे त्या बद्दल क्षमस्व), बाण आता हरणाच्या दोन्ही बाजूंनी दिसत होता. हरण झाडे आणि झुडपांच्या आत घुसल्याने ते कुठे गेले ते मला दिसले नाही. मी हळू हळू त्या झाड-झुडपांच्या दिशेने जाऊ लागलो जिथे हरण गायब झाले होते. ते तिथेच होते! बाणाने काम केले होते आणि मला माझे हरण मिळाले होते.

माझा मुलगा टिम माझ्या जवळ आला, मला इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा यावेळी हरणाचे शिंग किमती आहेत हे बघायचे होते. मला ते मोजण्याची संधीच मिळाली नव्हती, परंतु आम्ही त्यांची मोजणी केली तेव्हा सातच शिंग आहेत असे दिसले. हरणाला जवळून पाहिल्यावर आम्हाला दिसले की ते हरण खरतर आठ पॉईंटर होते पण त्यातील एक शिंग तुटले होते, ज्यामुळे तो सात पॉइंटर बनला होता. टिम आणि मी विस्मय करत तिथे उभे राहिलो आणि परमेश्वराची स्तुती केली. देवाचे राज्य खरोखर आश्चर्यकारक होते! टिम आणि मी तिथे उभे असतांना आम्हाला हे देखील जाणवले कि, “आमच्यावर कोण विश्वास ठेवेल? देवाचे राज्य अशा प्रकारे कार्य करते हे कोणाला माहीत आहे का?”

मला वाटतं तुम्हाला मुद्दा कळला आहे. देवाचे राज्य हे निश्चत केलेल्या अगदी विशिष्ट कायद्यांद्वारे चालते आणि प्रत्येक वेळी ते त्याच कायद्यांप्रमाणे कार्य करेल ह्या वर आपण निर्भर राहू शकतो. हे कायदे पैशासह कोणत्याही गोष्टीसाठी काम करतील हे लक्षात आल्यावर सुरुवातीला खूप रोमांचक वाटले. मी हे कायदे शिकू शकतो. मी एक आत्मिक शास्त्रज्ञ होईन आणि हे राज्य कसे चालते ते मी समजेन. देव मला मदत करेल.

अध्याय 2

निळे धुके

जेव्हा ड्रेन्डा ने आणि मी आमच्या जीवनात देवाच्या राज्याचे कार्य पाहण्यास सुरुवात केली, तेव्हा आम्ही पूर्णपणे कर्जमुक्त झालो आणि आम्ही जे शिकलो ते सर्वांना सांगण्याची आमची आमची इच्छा होती. आम्ही आमचे चर्च लाँच केले आणि मी माझा व्यवसाय चालवत राहिलो आणि जे ऐकायला तयार होते त्यांना आम्ही जे शिकलो ते लागलो. पण माझ्या आत्म्यात मला जाणवले कि आणखी काहीतरी वेगळ आहे; ते नेमकं काय आहे माहित नव्हतं, पण मला एवढं माहीत होत की देव मला लोकांना त्याच्या राज्याबद्दल सांगण्यासाठी मार्गदर्शन करत होता.

2005 च्या दरम्यान मला आर्थिक क्रांती परिषद घेण्या संबंधात माझ्या आत्म्यात प्रेरणा झाली, ही परिषद पाच दिवसांसाठी आयोजित करण्याची इच्छा होती, त्यामध्ये देवाच्या राज्यासंबंधी जे काही मी शिकलो ते सिद्धांत आणि तत्व लोकांना व्यवस्थित समजावून सांगण्यासाठी मला भरपूर वेळ मिळेल असे मला वाटले. मी लहानपणापासून मेथॉडिस्ट चर्च मध्ये जात राहिलो आणि त्या ठिकाणी एक आठवड्याच्या संजीवनाच्या सभा होत असत. मी माझ्या आत्म्यात या प्रकारच्या मॉडेलची योजना करण्याचा विचार केला, पाच सत्र जिथे आर्थिक क्षेत्रात देवाने मला शिकवलेल्या संकल्पना आणि तत्त्वांद्वारे लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी वेळ मिळेल. या वेळेपर्यंत, मी ही तत्त्वे पद्धतशीर स्वरूपात एकत्र ठेवली नव्हती. पण माझ्या आत्म्यात मी आर्थिक विषयावर पाच सत्रांची बैठक आयोजित करत आहे असे दर्शन पाहत होतो.

मी याबद्दल प्रार्थना करत असतांना अचानक माझी भेट लॅरी सोबत झाली, ह्या माझ्या मित्राला मी फार दिवसांपासून भेटलो नव्हतो. त्याने मला सांगितले कि ते अल्बेनियामध्ये एक कॉन्फरन्सबद्दल आयोजित करत आहेत, आणि त्यांनी मला त्यात बोलण्यासाठी आमंत्रित केले. लॅरी जवळजवळ 12 वर्षे अल्बेनियामध्ये मिशन फील्डवर होता आणि त्या देशात तो फार प्रभावीपणे सेवा करत होता. इतक्या दूरचा प्रवास करण्याचा विचार माझ्यासाठी थोडा नवीन होता. मी कधीही इतका जास्त आणि दूरचा प्रवास केला नव्हता आणि अल्बेनियाला तर कधीही गेलो नव्हतो आणि खरे तर अल्बेनिया कुठे आहे हे देखील माहित नव्हते. लॅरीने मला प्रोत्साहन दिले आणि सांगितले की तो देशव्यापी मीटिंग करत आहे ज्यामध्ये अनेक देशाचे पास्टर तेथे असतील आणि त्याला वाटले की देवाच्या राज्याच्या आर्थिक बाबतीत माझी अंतर्दृष्टी लोकांसाठी उपयुक्त ठरेल. लॅरी म्हणाला की परिषदेत मला शिक्षण देण्यासाठी दोन किंवा तीन सत्र देण्यात येतील. मला शिक्षण देण्या साठी पाच सत्रे मिळाली नसली तरी, जितकी सत्र मला मिळाली होती त्यामध्येच या विषयावर शिकवण्यासाठी मी उत्सुक होतो. म्हणून मी लॅरीला म्हणालो मला यायला आवडेल.

जेव्हा मी अल्बेनियामध्ये विमानातून उतरलो तेव्हा लॅरीने आश्चर्यकारक माहिती देऊन माझे स्वागत केले. “गॅरी,” तो म्हणाला, “माझ्या एका स्पीकरने शेवटच्या क्षणी आपले येणे रद्द केले आणि आता तुम्ही ह्या सम्मेलनात पाच सत्रे घेणार आहात”. मला जाणवले कि माझे हृदय उडी मारत आहे. हेच ते! मला माहित होते की ही पूर्णपणे देवाची योजना होती आणि मी माझ्या आत्म्यात जे पाहिले होते ते कसे घडून आले हाये ते आता मला पाहायला मिळाले. माझ्याकडे माझ्या नोट्स होत्या पण त्या पाच सत्रांसाठी नव्हत्या. म्हणून मी दररोज शिकवत असे, नंतर परत आपल्या खोलीत जाऊन आत्म्याने प्रार्थना करत असे आणि पुढील सत्रासाठी नोट्स लिहीत असे. प्रत्येक सत्रात, देवाचा अभिषेक अविश्वसनीय होता.

पुढे जाण्यापूर्वी, मला तुम्हाला हे सांगायचे आहे की मी जेंव्हा अल्बेनिया ला गेलो होतो तेंव्हा हा अत्यंत गरीब देश होता. महिन्याला सरासरी वेतन सुमारे $500 होते आणि लाचखोरी हा लोकांसाठी जीवनाचा एक मार्ग होता. मी लोकांना आर्थिक क्षेत्राविषयी शिकवण्याचा विचार करत असताना, मला खात्री नव्हती कि ते ह्या शिक्षणाचा कश्या प्रकारे स्वीकार करतील.

मला माहित आहे की देवाचे वचन कोणासाठीही आपले कार्य करते, परंतु माझ्यासाठी हा एक नवीन अनुभव होता. मी पहिल्या सत्रात शिकवत असताना, मला सुरुवातीला एक भिंत उभी असलेली जाणवत होती. दुस-या सत्रापर्यंत, मला जाणवले कि लोकांमध्ये आत्मिक भूक उत्पन्न होत आहे आणि त्यांनी देवाच्या राज्याची सुवार्ता ऐकली तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर विश्वास वाढलेला मला दिसत होता. दररोज मी लोकांना शिकवत असताना ते अधिकाधिक आनंदी होत गेले आणि मला दिसून येत होते की ते देवाच्या राज्याबद्दल उत्साहित होते.

शेवटच्या सत्राच्या आदल्या दिवशी संध्याकाळी, प्रभु माझ्याशी बोलला की मी स्थानिय चर्चसाठी दणार्पण घ्यावे. हे करावे किंवा नाही, आणि ते कसे करावे ह्या बद्दल माझ्या मनात दुविधा होती, कारण पहिली गोष्ट म्हणजे हे मी आयोजित केलेले सम्मेलन नव्हते; आणि दुसरे म्हणजे, लोक कसे प्रतिसाद देतील याची मला खात्री नव्हती. स्थानीय पाळकांनी सम्मेलनात यावे म्हणून लॅरी आणि मी त्यांची राहण्याची व्यवस्था आणि येण्या जाण्या च्या प्रवासासाठी बराच पैसे खर्च केला होता. मी लॅरीशी याबद्दल बोललो आणि त्याने मला म्हटले तुम्हाला जे वाटते त्या प्रमाणे करा आणि हे दणार्पण घ्या.

म्हणून शेवटच्या सत्रात मी परिषदेसाठी दानअर्पण घेतले, आणि अभिषेक इतका प्रभावशाली होता की मला उभे राहणे कठीण होते. खोलीतील प्रत्येकजण नाचत होता आणि ओरडत होता कारण त्यांनी त्यांचे पैसे अर्पण करण्यासाठी वेदीवर आणले होते. लोक पैसे टाकत असताना ज्या लोकांच्या हातात दानपात्र होते ते आनंदाने रडत होते आणि त्यांना उभे राहणे देखील कठीण जात होते. मी याआधी असे दृश्य कधीही पाहिले नव्हते, निदान दान अर्पण घेताना तरी नाही. आता जेव्हा मी लोकांना नाचताना आणि दान अर्पण करत असतांना आनंदाने ओरडताना पाहिले, तेव्हा मी अभिषेकाने आणि इतकं मौल्यवान बीज देणाऱ्यांचा प्रामाणिक विश्वास पाहून भारावून गेलो.

त्या उपासना सभे मध्ये, लॅरीने जे पाहिले होते ते पाहून तो फारच प्रभावित झाला. संध्याकाळच्या सभे मध्ये घेतलेल्या दणार्पणाने भरलेल्या दोन पिशव्या घेऊन आम्ही लॅरीच्या अपार्टमेंटमध्ये परत आलो आणि लॅरी ते दान पाहून आश्चर्यचकित झाला. लॅरीने मला सांगितले की सामान्यतः जेंव्हा आम्ही दान घेतो तेंव्हा एकच पिशवी अर्धवट भरलेली

असते. लॅरीच्या छोट्या अपार्टमेंटमध्ये जात असतांना रस्त्यावर खूप गर्दी होती आम्ही दान असलेल्या पिशव्या कुणाला दिसणार नाहीत अशा व्यवस्थित ठेवल्या आणि शक्य तितक्या लवकर तिथून जाण्याचा प्रयत्न केला.

जेव्हा आम्ही लॅरीच्या अपार्टमेंटमध्ये पोहोचलो तेव्हा आम्ही त्याच्या दिवाणखान्यात बसलो आणि पैसे मोजण्यासाठी ऑफरिंग बॅग उघडल्या. लॅरीने बॅगमधील सर्व पैसे टेबलवर टाकले तेव्हा असे काही घडले की त्याचे शब्दात वर्णन करणे आजपर्यंत माझ्या साठी कठीण आहे. खोलीत अचानक, एक हलके निळसर धुके भरले आणि देवाच्या उपस्थितीने आम्ही भरून गेलो. ती जागा अभिषेकाने भरलेली होती आणि आम्ही तिथे बसून होतो. मी उपदेश करत असताना किंवा लोकांसाठी प्रार्थना करत असताना जो अभिषेक अनुभवत होतो त्या पेक्षा हा अभिषेक अगदीच वेगळा होता. ह्या अभिषेकामधे देवाची उपस्थिती होती. तो अभिषेक पवित्र होता आणि मला असे वाटले की मी स्वतः देवाच्या सान्निध्यात आहे. आम्ही त्या खोलीत बसलेले असतांना खोलीत खोलीत धुके अधिक दृढ होत गेले. आम्हाला त्या ठिकाणी बसून आनंदाने रडण्या शिवाय आणखी काही सुचत नव्हते. मग मी पाहिले, जे पैसे टेबलावर होते त्याच्या ढिगाऱ्याच्या मध्यभागी, कुणाची तरी लग्नाची अंगठी होती. त्या रात्री कदाचित कुणाकडे तरी पैसे नसावेत आणि त्याच्या जवळ जी सर्वात मौल्यवान अशी एकच वस्तू होती तीच दानपात्रात दिली हे पाहून मला आश्चर्य वाटले. त्या क्षणी परमेश्वर माझ्याशी बोलला आणि म्हणाला:

> *"मैं तुम्हें कई देशों में उन सिद्धांतों को सिखाने के लिए बुला रहा हूं जो मैंने तुम्हें परमेश्वर के राज्य और वित्त के बारे में सिखाया है। आज रात यह अंगूठी बड़ी श्रद्धा के साथ अर्पित की गई है। लेकिन मैं चाहता हूं कि आप इसे ले कर इस रात की याद के रूप में अपने सामने रखें। यह भी ध्यान रखें कि जैसे विवाह अनुबंध आपके बीच समझौते को व्यक्त करता है, वैसे ही आप मेरे लोगों को मेरे प्रावधान के समझौते की घोषणा करने जा रहे हैं। और यह भी याद रखना कि मैं तुम्हें जहां भी भेजूंगा, उस स्थान का सारा खर्चा तुम्हें दे दूंगा।"*

मी रात्रभर झोपू शकलो नाही. मी त्या रात्री लॅरीच्या अपार्टमेंटमध्ये थांबलो होतो आणि त्याठिकाणी अजूनही अभिषेक भासत होता. घरी परत जातांना जातांना संपूर्ण अटलांटिक महासागर ओलांडून जावे लागले आणि त्या संपूर्ण वेळ मला झोप आली नाही. संपूर्ण 8 तासांच्या फ्लाइटमध्ये मी फक्त खिडकीबाहेर पाहत होतो आणि रडत होतो. त्या रात्री प्रभू माझ्याशी बोलला आणि त्या नंतर मी 46 तास झोपू शकलो नाही. त्या रात्रीनंतर अनेक महिने पर्यंत, जेव्हा जेव्हा मी या घटनेचा विचार करत असे तेव्हा मला तीच उपस्थिती जाणवायची आणि रडू लागत असे.

अल्बेनियाहून घरी आल्यावर देवाच्या राज्याचा हा संदेश मला जमेल तिथे पोहोचवण्याची तीव्र इच्छा मला जाणवली. त्याचे हे शिक्षण लोकांप्रत पोहचवण्याची तीव्र इच्छा माझ्या अंतःकरणात होती, आणि पाच सत्रांमध्ये दिलेले तेच शिक्षण पुन्हा देण्याची आणि त्या सम्मेलनात घडलेली गोष्ट पुन्हा घडते की नाही हे पाहण्यासाठी मी उत्सुक होतो. मला जास्त वेळ थांबावे लागले नाही. अमेरिकेतील युटामधील एका पास्टर ने त्याच पाच सत्रातील शिक्षण देण्या साठी मला आमंत्रित केले होते. त्यांनी लॅरीकडून ऐकले होते की हे शिक्षण जीवन परिवर्तन करणारे आहे आणि मी त्यांच्याकडे हे शिक्षण देण्यासाठी जावे ही त्यांची इच्छा होती. ते एका छोट्या भारतीय चर्चचे पास्टर होते आणि ती फार गरीब मंडळी होती. त्यांना आर्थिक मदतीची गरज होती आणि जर लॅरीने त्यांना जे सांगितले ते खरे असेल तर मी मदत करू शकेन असे त्याला वाटत होते.

म्हणून मी विमानाने त्या ठिकाणी गेलो आणि रविवारी सकाळी, रविवारी रात्री ते बुधवारी रात्री पर्यंत सभा घेतल्या. अल्बेनियाप्रमाणेच तेथे पाच सत्रे झाली आणि ह्या ठिकाणी देखील मला तोच प्रतिसाद मिळाला. संमेलनाच्या शेवटच्या रात्री लोकांना फार प्रभावशाली अभिषेक मिळाला, ते आनंदाने ओरडून नाचू लागले आणि आणि त्यांनी आपले दान अर्पण केले. मला यावेळी निळे धुके दिसले नाही, परंतु पाचही सत्रांमध्ये मला फार प्रभावी अभिषेक जाणवला. शेवटच्या सत्रानंतर, मी पाहिले की केवळ 17 जोडप्यांनी जे दान दिले होते ते इतके जास्त होते कि मला आश्चर्याचा धक्का बसला, लॅरी आणि मला अल्बेनिया मध्ये जसे आश्चर्य वाटले

होते त्याच प्रकारचे हे होते. मी ते दान एका कुलुपबंद बॅगेत ठेवले आणि त्या संबंधात पुढील कार्यवाही करण्या साठी माझ्या ऑफिस मध्ये घेऊन गेलो.

त्यादिवशी सकाळी मला माझ्या ऑफिसमधून फोन आला. माझा सेक्रेटरी फोनवर होता, आणि माला जाणवले की काहीतरी चालू आहे. तिचा आवाज थरथरत होता आणि ती रडत असल्याचा भास होत होता. तिचे पहिले शब्द होते, "पास्टर, तुम्ही जे पैसे घेऊन आलात त्याबद्दल काहीतरी विशेष घडले आहे." "तुला काय म्हणायचे आहे, ट्रेसी?" मी विचारले. त्यानंतर तिने मला सांगितले की तिने पैसे मोजून ते बँकेत जमा करावेत म्हणून बॅग उघडली, परंतु तिने ती बॅग उघडताच,ऑफिसमध्ये तिच्यावर जोरदार अभिषेक आला आणि ती जमिनीवर पडली. हा गोंधळ ऐकून माझी दुसरी सेक्रेटरी त्या ठिकाणी धावत आली आणि तिला देखील तो अभिषेक झाला आणि ती थरथर कापू लागली. ट्रेसी म्हणाली, "उटाहमध्ये ह्या पैशां संबंधात काय घडले होते?" मी तिला म्हणालो की मला काही माहित नाही.

काही आठवड्यांनंतर, मी हीच तत्त्वे ओहायोच्या दक्षिणेकडील एका छोट्या चर्चमध्ये शिकवत होतो. या चर्चमध्ये, आम्ही पहिली चार सत्रे डीव्हीडीद्वारे पाठवली होती, आणि त्यांनी ती माझ्या तिथे पोहचण्या आधी चार आठवडे पाहिली होती. मी रविवारी रात्री पाच सत्रे पूर्ण करण्यासाठी तिथे गेलो. आमच्यावर पुनः अभिषेक येणार होता. त्या रात्री जेव्हा मी दान अर्पण स्वीकारले तेव्हा मला इतर सभांमध्ये दिसला तोच प्रतिसाद पहायला मिळाला. लोक दान देण्या साठी खूप उत्सुक होते. दान अर्पण स्वीकारण्या साठी, चर्चने लोकांना त्यांच्या भेटवस्तू अर्पण करण्यासाठी एक टोपली समोर ठेवली होती. यावेळी, पुन्हा ते निळे धुके दृष्टीस आले. लोक दान अर्पण करत असतांना टोपलीभोवती सुमारे पाच फूट व्यासाचा एक प्रकाश वर्तुळ दिसून येत होते. अभिषेक इतका

परंतु येशूने केवळ स्वर्गात प्रवेश करण्वाच्या आपल्या हक्कासाठी मोबदला दिला नहीं, तर त्याने देवाचे पुत्र अणि कन्या म्हणून जगणे आणि पृथ्वीच्या क्षेत्रात देवाच्या राज्याचे फायदे उपभोगणे देखील शक्य केले.

जोरदार होता की मीटिंगनंतर मला कारपर्यंत पोहचण्या साठी लोकांना माझी मदत करावी लागली कारण मला स्वतःहून चालता येत नव्हते.

या गोष्टी घडत असतांना, मला खरोखर काय चालले आहे हे कळत नव्हते आणि मी ते इतर कोठेही घडल्याचे देखील ऐकले नव्हते. मी कॉन्फरन्स करत राहिलो आणि खूप प्रभावी अभिषेक होत राहिला. आणि हो, ते निळे धुके काही परिषदांमध्ये पुन्हा दिसले. पण मला सगळ्यात जास्त गोंधळात टाकणारा भाग म्हणजे अभिषेक पैशावर होत होता. कॉन्फरन्सनंतर, माझ्या कर्मचाऱ्यांना अर्पण मोजणे कठीण जात होते. तुम्हाला आठवते का की अल्बेनियामधील त्या अपार्टमेंटमध्ये अभिषेक आला होता जेव्हा लॅरीने टेबलवर दानअर्पणाचे पैसे टाकले होते? या दान अर्पणात दिलेल्या पैशाला जर तुम्ही उचलला तर तुम्हाला लगेच अभिषेक वाटेल आणि थरथरायला सुरुवात होत असे. मला माहित आहे की हे वेडेपणाचे वाटेल, परंतु हेच मी आतापर्यंत पाहत आलो आहे.

एक अध्यात्मिक शास्त्रज्ञ या नात्याने हे सर्व जे घडत होते त्या मुले आश्चर्य वाटत होते आणि मी देवाला याबद्दल विचारले. तो माझ्याशी बोलला आणि मला सांगितले की हा प्रभावशाली अभिषेक दान अर्पणा वरच का दिसत होता. त्याने मला सांगितले की बहुतेक लोक कर्तव्य किंवा परंपरा पूर्ण करण्या साठी दान देतात. काहीजण नियमांचे पालन करण्यासाठी देतात, परंतु जेव्हा ते देतात तेव्हा ते खरोखर विश्वासात नसतात. पुष्कळ लोक देतात कारण त्यांना वाटते की त्यांनी न दिल्यास देव त्यांच्यावर रागावेल. काही जण जणू काही त्यांना बिल भरायचे आहे असे देतात. देवाने मला सांगितले की जेव्हा मी त्याच्या राज्याचे तत्व शिकवतो आणि राज्याची प्रकट न झालेली आर्थिक तत्त्वे प्रकट करतो तेव्हा लोकांची अंतःकरणे विश्वासाने तयार होतात. मग जेव्हा ते देतात तेव्हा ते खरोखर विश्वासात असतात आणि त्यांच्याशी राज्याचे नाते असते आणि अशा प्रकारे अभिषेक त्यांच्या पर्यंत वाहत जातो.

2005 मध्ये अल्बेनियाच्या त्या ट्रिपपासून माझे आयुष्य खूप बदलले आहे. देवाच्या राज्याची सुवार्ता लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या माझ्या इच्छेने ड्रेन्डा आणि मला ही सुवार्ता राष्ट्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी टीव्ही च्या मध्यमाचा उपयोग करण्यासाठी प्रेरित केले. खरंच,

अनेक वर्षापूर्वी ज्या राज्याबद्दल आम्हाला माहिती झाली होती, त्या राज्याबद्दल इतरांना सांगण्यासाठी आता आम्ही वर्षाला लाखो रुपये खर्च करत आहोत. पण कदाचित तुम्ही ह्या राज्याची सुवार्ता अजून ऐकली नसेल. आम्ही देखील असेच होतो - विश्वासणारे स्वर्गाच्या राज्याच्या मार्गावर होते परंतु त्यांना पृथ्वीवर हे राज्य कसे मुक्त करावे हे माहित नव्हते. परंतु, येशूने केवळ स्वर्गात जाण्याच्या आपल्या हक्कासाठी रदबदली दिली नाही तर त्याने देवाचे पुत्र किंवा कन्या म्हणून जगणे आणि आपल्यासाठी पृथ्वीच्या क्षेत्रात देवाच्या राज्याचे फायदे उपभोगणे देखील शक्य केले. पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, सुवार्तेची आनंदाची बातमी लाखो लोकांपर्यंत पोहोचवायची आहे आणि त्यासाठी पैशांची आवश्यकता असते. लोक आपल्या कडे पहात आहेत. म्हणून आपलं आयुष्य वेगळं दिसायला पाहिजे!

अल्बेनियामध्ये मी काय शिकवले ज्यामुळे तो अभिषेक सुरु झाला? देवाने मला राष्ट्रांना उपदेश करण्यास सांगितले ते काय होते? होय, हाच या पुस्तकाचा उद्देश आहे, आणि मला विश्वास आहे की जसे माझे जीवन बदलले तसे ते तुमचे जीवन देखील बदलून टाकेल.

अध्याय 3

हे प्रभू, दया कर!

जेरीने माझ्या ऑफिसमधे फोन करून विचारले कि मी त्याच्या भागातच आहे तर माझ्या कडे येऊन माझ्या सोबत जेवण करू शकेल का. मी त्याच्या जवळच्या शहरातील एका टेलिव्हिजन स्टेशनवर मुलाखत देत होतो आणि माझे शिक्षण आणि टीव्ही प्रसारणाद्वारे त्याचे जीवन कसे बदलले ते त्याला मला सांगायचे होते. मी जेरीला याआधी भेटलो नव्हतो पण एक-दोनदा त्याच्याशी फोनवर बोललो होतो. मी म्हणालो, "नक्कीच." आम्हाला तसेही दुपारचे जेवण करायचेच होते, आणि मला वाटले, मी इथे आहेच तर त्याची जीवन परिवर्तनाची गोष्ट ऐकायला मला आवडेल.

दुपारच्या जेवणाच्या वेळी मी जेरी आणि त्याच्या मुलाला भेटलो आणि जेरी मला त्याची कहाणी सांगू लागला. जेरी हा एक पाळक होता ज्याने 30 वर्षे पाळकीय सेवा केली होती, परंतु स्ट्रोकमुळे तो काम करण्याच्या अवस्थेत नव्हता, त्यामुळे त्याला सेवा सोडावी लागली. पक्षाघातानंतर त्याचे जीवन अस्तव्यस्त झाले. तो काम करण्यास असमर्थ असल्याने, ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाले आणि कर्ज न फेडल्या मुळे त्यांचे घर निलामी साठी काढण्यात आले, बिल भरणे आणि अन्न खरेदी करणे हे देखील एक आव्हानच होते. जेरीने म्हणाला की परिस्थिती इतकी बिकट झाली की तो एक दिवस एका हातात पूर्ण लोड केलेली .45 आणि दुसऱ्या हातात बायबल घेऊन बसला आणि स्वतःचा जीव घेण्याचा विचार करू लागला.

या निराशेमध्येच जेरीने आमचे टीव्ही प्रसारण पाहिले आणि माझ्या काही साहित्याची ऑर्डर दिली. त्याने पुढे सांगितले की जेव्हा त्याला प्रथम साहित्य मिळाले तेव्हा त्याला मूलभूत बिले आणि अन्न भरण्यासाठी सुमारे $2,000 ची गरज होती. त्याच्या अंतःकरणात

विश्वास जागृत होईपर्यंत त्याने पुन्हा पुन्हा साहित्य ऐकले. त्याला आवश्यक असलेल्या $2,000 साठी त्याने देवावर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मला मिळालेल्या पहिल्या हरणासाठी ड्रेन्डा आणि मी जे केले तेच त्याने केले. त्याने त्या $2,000 साठी आपले बी पेरले, अर्थात आपले आर्थिक दान दिले. मार्क 11:24 नुसार त्याला ज्या तारखेला पैसे मिळणार आहेत असा विश्वास होता ती तारीख आणि वेळ एका कागदावर लिहून ठेवली आणि चेक आमच्या सेवकाईला पाठवला.

मी बऱ्याच दिवसांपासून जेरी सोबत बोललो नव्हतो त्यामुळे मला माहित नव्हते कि हे सर्व झाले आहे. ते म्हणाले की दीड आठवड्यात एक माणूस त्यांच्या घरी आला आणि म्हणाला कि त्याला जेरीसोबत बोलायचे आहे. जेरी त्या माणसाला ओळखत होता, परंतु तो म्हणाला की ते एकमेकांसोबत बऱ्याच दिवसांपासून बोलले नव्हते. त्यांचे कधीतरी थोडेफार बोलणे होत होते, पण खूप काही बोलणे नव्हते. मग तो माणूस म्हणाला की तो जेरीला $2,000 चा चेक द्यायला आला आहे. त्याने स्पष्ट केले की दीड आठवड्यापूर्वी अमुक दिवशी आणि अमुक वेळी, पवित्र आत्म्याने त्याला जेरीला $2,000 देण्यासाठी प्रेरित केले होते.

जेरी तिथेच स्तब्ध उभा राहिला. त्याने पटकन आपली पर्स काढली, त्यातून तो पेपर बाहेर काढला, त्या माणसाने जेरीला $2,000 देण्या साठी प्रेरणा झाल्याची जी तारीख आणि वेळ सांगितली, तीच तारीख आणि वेळ जेरीच्या त्या कागदावर देखील नमूद होती. हा योगायोग नव्हता हे जेरीला माहीत होते; त्याला माहीत होते की हा देवाच्या राज्याला, विशेषतः राज्याच्या नियमांचा थेट प्रतिसाद आहे.

त्याने आपली कथा पुढे चालू ठेवली आणि मला सांगितले की त्याला सात मुले आहेत, एक 16 वर्षांचा मुलगा (जो सध्या त्याच्या सोबत होता) वगळता सर्व विवाहित आहेत, त्याच्या वडिलांना अशा भयानक परिस्थिती मधून जातांना पाहून तो देवापासून दूर गेला होता. हामुलगा देवावर खूप रागावला होता कारण त्याच्या वडिलांनी 30 वर्षे विश्वासूपणे देवाची सेवा केली होती आणि त्याला वाटले की आता देवाने त्यांना सोडून दिले आहे.

जेरीला आपल्या मुलाला पुन्हा देवाच्या सान्निध्यात आणण्याचा मार्ग शोधायचा होता आणि त्याला एक कल्पना सुचली. मी माझ्या साहित्यात हरणाच्या शिकारीबद्दल खूप बोलतो

आणि देवाने मला विश्वासाने शिकार करायला कसे शिकवले ते सांगतो. त्याच्या मुलाला हरणाची शिकार करणे फार आवड होते, म्हणून जेरीने आपल्या मुलाला देवाच्या राज्याच्या मार्गाने त्याचे हरीण कसे मिळवायचे ते समजावून सांगितले. मुलाने याबद्दल विचार केला आणि शेवटी तस्से करण्या साठी सहमत झाला, मग त्याने आणि जेरीने त्यांचा विश्वास मुक्त केला, जसा जेरीने त्याच्या $2,000 साठी केला होता अगदी तसाच. ह्या मुलाला आठ मिनिटांत एक छान हरीण मिळाले. जेरी आणि त्याचा मुलगा हरणाला कसाईच्या दुकानात घेऊन जात असताना, जेरीच्या कार मधील सीडी प्लेयरमध्ये माझी सीडी लावलेली होती. जेरी हरणाला दुकानात घेऊन जाऊ लागला, तेंव्हा मुलाने म्हटले की त्याला कारमध्ये थांबायचे आहे आणि थोडा वेळ ती सी डी ऐकायची आहे. जेरी परत आल्यावर त्याचा मुलगा म्हणाला, “डॅड, मला वाटतं इतक्या वर्षां पासून आपण बऱ्याच गोष्टींना चुकलो आहोत. मला माहीत आहे की हरीण देवाच्या राज्याचा परिणाम होता.”

त्यानंतर त्याच्या मुलाने आपले जीवन परमेश्वराला पुनः समर्पित केले आणि आपल्या वडिलांना सांगितले की जर देव $2,000 आणि हरण देऊ शकतो तर तो घराचे कर्ज फेडून मुक्त होण्यासाठी आवश्यक $17,000 ची देखील तरतूद करू शकतो. ह्याच वेळेस माझी जेरी सोबत पहिल्यांदा ओळख झाली. मला आठवते कि जेरीने आपले घर कर्जमुक्त होण्यासाठी विश्वासाने जे दान पाठवले होते त्या सोबत एक पत्र देखील होते. ते पत्र लहान होते परंतु त्यात त्यांना काय हवे आहे ते अगदी स्पष्ट लिहिले होते. बाकी कशाचाही उल्लेख नव्हता, फक्त एवढाच उल्लेख होता कि त्यांना घर कर्जमुक्त करण्यासाठी पैशांची गरज होती. मी त्या त्या पत्रावर हात ठेवून त्यांच्या ह्या विनंतीशी सहमत होऊन मी प्रार्थना केलेली देखील मला आठवते. मी ती प्रार्थना केल्याचा अचूक क्षण आणि वेळ देखील मला आठवते.

या वेळेस देखील, जेरीने मला सांगितले की सुमारे दोन आठवड्यांनी दुसरा एक माणूस आमच्या दारावर आला. ह्या व्यक्तीला देखील जेरी आधीपासून ओळखत होता. त्या व्यक्तीने सांगितले की, त्याने निलामी च्या यादी मध्ये एक घर विक्रीसाठी असलेले पाहिले, आणि जेरीला विचारले की ते घर फोरक्लोजर करून कर्जमुक्त करण्यासाठी किती पैशांची गरज आहे. जेरीने त्याला $17,000 पेक्षा जास्त रक्कम सांगितली. त्या माणसाने त्या संपूर्ण रकमेचा

चेक लिहिला आणि निघून गेला. जेरी चेककडे पाहतच राहिला. हे सांगत असतांना, जेरी रेस्टॉरंटमध्ये माझ्यासमोर टेबलावर बसून रडत होता आणि लोकांना देवाच्या राज्याबद्दल शिकवल्याबद्दल माझे आभार मानत होता. जेरी म्हणाला की त्याला ह्या गोष्टी बद्दल खूप आनंद आहे की त्याच्या सर्व मुलांनी ह्या घटनेमध्ये देवाचा हात कार्य करतांना पाहिला आणि यामुळे त्याला त्यांना देवाच्या राज्याबद्दल सांगण्याची संधी मिळाली. मला असे झालेले फार आवडते! ही देवाच्या राज्याची वास्तविकता आहे, आणि मी ते लोकांसोबत शेअर करू शकलो आणि आता त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटना ऐकू शकतो म्हणून मी खूप धन्य आहे. ह्या कडे लक्ष द्या, जेरीला कुणाच्या तरी दयेची गरज नव्हती. त्याला उत्तरांची गरज होती आणि ती उत्तरे त्याला देवाच्या राज्यात सापडली.

आता, मला वाटते की मला येथे जेरीच्या ह्या कहानी मधे आणखी काही भर घालण्याची गरज आहे. लोक जेरीच्या दारात आले आणि त्याला पैसे दिले असे प्रथमदर्शनी दिसत असले तरी, तुम्हाला असे वाटू नये कि तुम्ही आरामात बसून कोक पीत असतांना तुम्हाला आवश्यक असलेली आर्थिक मदत अचानक तुमच्यापुढे येईल अशी चुकीची कल्पना तुम्हाला येऊ नये असे मला वाटते. नाही, तुम्हाला आवश्यक असलेली मदत प्राप्त करण्यात तुमची भूमिका महत्वाची आहे. जेरीच्या बाबतीत, जेरीने 30 वर्षे पाळकीय सेवा केली होती. त्याने या लोकांमध्ये बराच काळ सेवेचे बी पेरले होते. आणि दुसरे म्हणजे स्ट्रोकमुळे जेरीला त्याचे घर सोडता आले नाही. जेरीने जिथे पेरले होते तिथून कापणी केली, त्याच्या चर्चमधील लोकांकडून त्याला ही मदत मिळाली ज्यांच्या मध्ये त्याने इतकी वर्षे सेवेचे बी पेरले होते.

"मी तुम्हांला खचीत सांगतो की, जर तुमच्यामध्ये मोहरीच्या दाण्वाएवढा विश्वास असला तर ह्या डोंगराला 'इकडून तिकडे सरक' असे तुम्ही म्हटल्यास तो सरकेल; तुम्हांला काहीच असाध्य होणार नाही.

— मत्ती 17:20

मला तुम्हाला हे देखील सांगायचे आहे की जेरी स्ट्रोकमधून पूर्णपणे बरा झाला आणि ज्या दिवशी मी त्याला जेवणासाठी बोलावले तेव्हा मी पाहिले कि त्याने 70 पौंडांपेक्षा जास्त

वजन कमी केले होते. देवाची स्तुती असो, त्याला देवाचे राज्य काय आहे ते पूर्णपणे समजले. तुम्ही म्हणाल, "ठीक आहे, जेरी एक पाळक होता; त्यामुळे निश्चितच, त्याला राज्याविषयी सर्व काही माहीत होते. खरे पाहता नाही, आणि मी जे पाहत आलो आहे त्यावरून मला दिसून येते अशा प्रकारे देवाच्या राज्याबद्दल माहित नसणारा तो एकटाच व्यक्ती नाही. दुर्दैवाने, बऱ्याच चर्च मधील बऱ्याच लोकांना देवाचे राज्य कसे टॅप करायचे आणि त्यांची उत्तरे कशी मिळवायची हे माहित नाही. मत्तयकृत शुभवर्तमाना मधील एक गोष्ट हे स्पष्ट करते की अनेक जण कशा प्रकारे विचार करतात.

नंतर ते लोकसमुदायाजवळ आल्यावर एक मनुष्य त्याच्याकडे येऊन त्याच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, "प्रभूजी, माझ्या मुलावर दया करा; कारण तो फेफरेकरी असून त्याचे फार हाल होतात; तो वारंवार विस्तवात पडतो व वारंवार पाण्यात पडतो. मी त्याला आपल्या शिष्यांकडे आणले, परंतु त्यांना त्याला बरे करता आले नाही."

तेव्हा येशूने उत्तर दिले, "अरेरे, हे विश्वासहीन व कुटिल पिढी! मी कोठवर तुमच्याबरोबर राहावे? कोठवर तुमचे सोसावे? त्याला येथे माझ्याजवळ आणा." नंतर येशूने भुताला दटावले, तेव्हा ते त्याच्यातून निघून गेले आणि त्याच घटकेपासून मुलगा बरा झाला.

नंतर शिष्य एकान्ती येशूजवळ येऊन म्हणाले, "आम्हांला ते का काढता आले नाही?"तो त्यांना म्हणाला, "तुमच्या अल्पविश्वासामुळे; कारण मी तुम्हांला खचीत सांगतो की, जर तुमच्यामध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला तर ह्या डोंगराला 'इकडून तिकडे सरक' असे तुम्ही म्हटल्यास तो सरकेल; तुम्हांला काहीच असाध्य होणार नाही.

— मत्तय 17:14-20

या घटनेत आपल्याला एक माणूस दिसतो जो हताश आहे; त्याचा मुलगा दुष्ट आत्म्याने ग्रासित आहे, जवळजवळ मृत्यूच्या टप्प्यापर्यंत पोहचला आहे. येशूच्या सेवाकार्याबद्दल आणि

येशूकडे दुष्टात्मे घालविण्याचे सामर्थ्य आहे हे ऐकून, येशू आपल्या मुलाला बरे करेल ह्या आशेने त्याने आपल्या मुलाला येशूकडे घेऊन जाण्याची योजना आखली. तथापि, जेव्हा तो तेथे पोहोचला तेव्हा त्याला कळले की येशू तेथे नव्हता परंतु तो आपल्या तीन शिष्यां सोबत प्रार्थना करण्यासाठी डोंगरावर गेला होता. तेथे असलेले इतर शिष्य म्हणाले, काही हरकत नाही; येशूने आम्हाला त्याच्या नावाने दुष्टात्मे घालविण्याचा अधिकार दिला आहे आणि आम्ही तुझ्या मुलाची काळजी घेऊ शकतो. त्यांनी या तरुणासाठी प्रार्थना केली परंतु त्याच्या मधून दुष्टात्मा निघून गेला नाही. त्यांनी प्रयत्न केले तरी दुष्टात्म्याने त्या मुलाला सोडले नाही. त्या मुलाचे वडील निराश झाले आणि येशूच्या मागे चालणार जमाव त्या मुळे गोंधळून गेला.

पण त्याच क्षणी, येशू आणि तीन शिष्य डोंगरावरून खाली येऊन घटनास्थळी आले. येशूने, गोंधळ पाहून, काय चालले आहे ते विचारले. मुलाच्या वडिलांनी सांगितले की त्याने मुलाला शिष्यांकडे त्याच्या मधील दुष्टात्मा घालविण्या साठीआणले होते, परंतु ते त्याच्या मधून दुष्टात्मा काढू शकले नाहीत. त्या नंतर त्या मुलाच्या पित्याने अनेक लोकांप्रमाणे संकटाच्या समयी, जेंव्हा इतर कुठेही उत्तर मिळत नाही तेंव्हा जे करायला पाहिजे होते तेच केले. तो येशूकडे दयेसाठी आरोळी मारून याचना केली. तुम्ही हताश असताना दयेची भीक मागणे चांगले वाटत असले तरी, ते या माणसाचे उत्तर नव्हते आणि ते तुमचेही नाही. त्या पित्याची इच्छा होती कि, येशूला त्याच्या परिस्थितीबद्दल सहानुभूती वाटावी, म्हणून तो दुष्टात्मा त्याच्या मुलाला कसा त्रास देतो, त्याला आगीत फेकतो, आणि त्याला मारण्याचा प्रयत्न करतो हे येशूला सांगतो. येशू त्या माणसाचे बोलणे मधेच थांबवतो. त्या माणसाचा मुलगा ज्या यातना सहन करत होता त्याबद्दल त्याला अधिक ऐकण्याची गरज नव्हती. निराश होऊन येशू मोठ्याने ओरडून म्हणतो,अरेरे, हे विश्वासहीन व कुटिल पिढी! मी कोठवर तुमच्याबरोबर राहावे? कोठवर तुमचे सोसावे? त्याला येथे माझ्याजवळ आणा." आपल्या एका वाक्यात, येशू हे पूर्णपणे स्पष्ट करतो कि दुष्टात्मा का बाहेर आला नाही.

परंतु, येशूने जे म्हटले त्याचा अर्थ जाणून घेण्याआधी, आपण ज्या मूलभूत तत्वावर विश्वास ठेवतो त्याची पुष्टी करणे आवश्यक आहे, अणि ते म्हणजे देव खोटे बोलत नाही आणि बोलू शकत शकत नाही. तो जे काही म्हणतो ते खरे आहे. हे स्पष्ट झाल्या नंतर, "दुष्टआत्मा

बाहेर पडणार आहेत!" या विधानाने आपण परिस्थितीचे आकलन करू शकतो. जर दुष्टआत्मा बाहेर निघाले नाही तर काहीतरी चुकीचे आहे, आणि त्या मधे चूक देवाची नाही तर आपली आहे. हे लक्षात ठेवा, देवा कडून प्राप्त करणे हे नेहमी आपल्यावरच अवलंबून असते. दुष्टात्म्याने त्या मुलाला न सोडण्याचे कारण येशू स्पष्टपणे सांगतो—कुटीलता आणि अविश्वास. आपण थोड्याच वेळात ह्या दोन कारणांबद्दल स्पष्टीकरण पाहणार आहोत. पण आपल्या चर्चेच्या या टप्प्यावर, मला ह्या घटनेतील वडील आणि मुलावर लक्ष केंद्रित करायचे आहे.

पिता साहजिकच आपल्या मुलासाठी हताश होता. जेव्हा शिष्यांनी त्याच्यासाठी प्रार्थना केली तेव्हा काहीही घडले नाही आणि आता काहीही आशा उरली नाही असे दिसत होते. खात्रीशीर उत्तर नव्हते. ज्या ठिकाणी मदत मिळण्याची आशा होती तिथून काही निष्पन्न निघाले नव्हते. फक्त एकच गोष्ट करायची राहिली होती आणि ती म्हणजे दयेची भीक मागणे. "दयेची भीक मागणे" या वाक्यांशाचा अर्थ असा आहे की कोणाकडे तरी मदत करण्याचा अधिकार किंवा सामर्थ्य आहे परंतु त्याने ते न करणे निवडले आहे. अशा परिस्थिती, येशूला त्या मुलाच्या भयंकर यातना आणि दुःखाबद्दल सविस्तर सांगून त्याची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करणे एवढेच बाकी होते.

ठीक आहे, येथे बोलण्यासारखे बरेच काही आहे, राज्या सम्बन्धी अनेक मुद्दे आणि ते कसे कार्य करते. तुम्हाला माहित असाव्यात अशा सर्वच काही गोष्टीं विषयी मी ह्या ठिकाणी चर्चा करू इच्छित नाही, परंतु मी त्यांचा उल्लेख अवश्य करेन, आणि आपण नंतर येथे कार्यरत असलेल्या कायद्यांचा अभ्यास करू.

राज्याच्या कायद्याची मूलभूत माहिती मिळविण्यासाठी, आपण हा प्राथमिक आणि मूलभूत मुद्दा समजून घेतला पाहिजे: देवाने आदामाला पृथ्वीवर पूर्ण अधिकार दिलेला आहे. त्याला त्यावर राज्य करण्याचा अधिकार दिला होता.

> *मग देव बोलला, "आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशू, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांवर ते सत्ता चालवतील."*
>
> — उत्पत्ती 1:26

मला वाटते की इब्री 2:7-9 हे अगदी स्पष्ट करते:

> *तू त्याला देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले आहेस; तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस; तू सर्वकाही त्याच्या अधीन — त्याच्या पायांखाली — ठेवले आहेस." 'सर्वकाही त्याच्या अधीन ठेवले आहेस,'म्हणजे त्याच्या अधीन ठेवलेले नाही असे काही राहू दिले नाहीस.*

किमान आत्ता पुरते, हे समजून घ्या की देव पृथ्वीच्या क्षेत्रात (पुरुषांच्या राज्यात) त्याच्या अधिकाराचा वापर करू शकत नाही जोपर्यंत येथे कायदेशीर अधिकार क्षेत्र असलेला पुरुष किंवा स्त्री स्वर्गाचा अधिकार मुक्त करत नाही.

म्हणूनच येशूने आपल्या शिष्यांना मत्तय 18:18 मध्ये सांगितले:

> *मी तुम्हांला खचीत सांगतो, जे काही तुम्ही पृथ्वीवर बांधाल ते स्वर्गात बांधले जाईल आणि जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल.*

पुन्हा, स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कोणतेही अधिकार क्षेत्र नाही जोपर्यंत पुरुष किंवा स्त्री द्वारे ते येथे पृथ्वीवर मोकळे केले जात नाही. म्हणूनच येशू येथे म्हणत आहे की जर एखादा पुरुष किंवा स्त्री येथे स्वर्गाचा अधिकार मोकळा करेल, तर स्वर्ग त्याचे समर्थन करेल. जर आपण ते करत नाही तर, स्वर्ग देखील ते करू शकत नाही. जर हा विचार तुम्हाला विचित्र वाटत असेल तर कृपया इथेच थांबू नका. या विषयावर मी नंतर विस्तृतपणे चर्चा करणार आहोत. पण आत्तासाठी हेच सत्य दुष्टात्म्याने मुलाला सोडले नाही ह्याचे कारण आहे ह्याचा स्वीकार करा - तसे होणे आवश्यक नव्हते! ते तिथे राहण्याच्या कायदेशीर अधिकारात कार्यरत होते. पुन्हा लक्ष द्या, येशूने म्हटले की दुष्टात्मा मुलाला सोडून न जाण्याचे कारण म्हणजे विश्वासाचा अभाव किंवा अधिकारक्षेत्राचा अभाव आहे. आदामाने

पण हे तू नाहीस मित्रा; तुम्हाला राज्यात न्याय मिळू शकतो. तुमच्या समस्यांची उत्तरे आहेत.

मूलत: त्याच्या बंडखोरीद्वारे देवाला बाहेर काढले तेव्हा देवाने माणसांच्या बाबतीत त्याचे अधिकार क्षेत्र गमावले. येथेच सैतानाला मानवजातीवरही आपले अधिकार प्राप्त होतात.

> *मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखवली; आणि त्याला म्हटले, "ह्यांच्यावरचा सर्व अधिकार व ह्यांचे वैभव मी तुला देईन, कारण हे मला सोपवून दिले आहे व माझ्या मनास येईल त्याला मी हे देतो. म्हणून तू मला नमन करशील तर हे सर्व तुझे होईल."*
>
> — लूक 4:5-7

परिणामी, देवाने पृथ्वीच्या क्षेत्रात त्याची कायदेशीरता गमावली कारण त्याने तिचे पालन करणारा माणूस गमावला—आदाम. पुन्हा, मी म्हटल्याप्रमाणे या विशिष्ट कायद्यांबद्दल मी नंतर अधिक सखोल स्पष्टीकरण देईन, परंतु हि घटना तुमच्यापुढे ठेवण्याचे माझे मुख्य कारण म्हणजे पित्याची वृत्ती आणि निराशा कशीही आहे आणि तो दयेची भीक मागण्यासाठी कसा झुकतो हे दर्शवणे. कृपया खालील काही वाक्ये अतिशय काळजीपूर्वक वाचा.

गरजू व्यक्तीला न्याय देण्या साठी अणि त्याच्या समस्येचे निस्तरण करण्या साठी आणि कोणताही अधिकार किंवा कायदा आणि यंत्रणा नसेल, तर दयेची भीक मागणे हाच उपाय उरतो. हीच बाब मी दुसऱ्या प्रकारे स्पष्ट करून सांगतो. एखाद्या व्यक्तीला एखाद्या समस्येवर कोणताही कायदेशीर उपाय नसेल आणि न्याय मिळेल अशा प्रक्रियेत प्रवेश नसेल तर उत्तरांची खात्री नसते. भीक मागणे एवढाच एक उपाय त्याच्या कडे असतो.

पण हे तू नाहीस मित्रा; तुम्हाला राज्यात न्याय मिळू शकतो. तुमच्या समस्यांची उत्तरे आहेत. लक्षात ठेवा, देवाचे राज्य हे एक सरकार आहे आणि ते निःपक्षपाती असलेल्या कायद्यांद्वारे कार्य करते आणि त्या राज्याच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या कोणत्याही नागरिकांसाठी उपलब्ध आहे. मी या पुस्तकात आधी म्हटल्याप्रमाणे, देवाचे राज्य न्यायावर (कायदेशीर प्रक्रिया जी देवाचा कायदा जे बरोबर आहे ते अंमलात आणण्यासाठी त्याच्या अधिकारात प्रवेश करते) आणि धार्मिकतेवर बांधलेले आहे. दुष्टात्मा बाहेर न येण्याचे एक

कारण होते आणि ते देवाची दुर्बलता किंवा त्याची इच्छा बदलली म्हणून नाही. येशू आपल्याला दाखवून देतो की तो किती लवकर शिष्यांना फटकारतो आणि नंतर दुष्टात्म्याला घालवतो.

बहुतेक ख्रिस्ती लोकांना, देवाच्या राज्याचे प्रात्यक्षिक दिसून येत नाही म्हणून, आपला सिद्धांत बदलून ते म्हणतात, "सर्व दुष्टात्मे बाहेर पडत नाहीत". त्यांना माहित आहे की देवाकडे सर्व सामर्थ्य आहे, म्हणून ते असे गृहीत धरतात की देव पृथ्वीवर जे काही करू इच्छितो ते तो करू शकतो, म्हणून जर दुष्टात्मा बाहेर आला नाही, तर त्याचा अर्थ हा कि देवानेच हा निर्णय घेतला आहे कि त्याने बाहेर येऊ नये. माझ्या मित्रा, हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. येशूने म्हटले की त्यांच्या कुटील विचारसरणी आणि अविश्वासामुळे या प्रकरणात स्वर्गाच्या अधिकारक्षेत्राला बंदिस्त केले आहे. मला ते थोड्या सोप्या शब्दात सांगू द्या. दुष्टात्मा बाहेर न येण्याचे कारण कायद्याशी संबंधित समस्या होती - पूर्णविराम. दुष्टात्मा बाहेर पडू शकत नव्हता कारण त्या परिस्थितीत कार्य करण्यासाठी कोणीही स्वर्गीय अधिकार आणि कायदेशीर अधिकारक्षेत्र आणले नाही. "पण, गॅरी, ते दुष्ट आत्म्याला घालवून टाकण्याचा प्रयत्न करत होते." होय, पण मी म्हटल्याप्रमाणे, कायदेशीररित्या, त्याने बाहेर पडलेच पाहिजे असे काही नव्हते. का? पुन्हा सांगतो, त्या दुष्ट आत्म्याला बाहेर घालविण्या साठी स्वर्गाला अधिकार नव्हता.

मनुष्याला पृथ्वीच्या क्षेत्रावर कायदेशीरपणा असल्यामुळे, देवाचे सरकार आणि त्याचा अधिकार तोपर्यंत पृथ्वीवर आपले कार्य करू शकत नाही जोपर्यंत पृथ्वीवर अधिकार असलेले पुरुष किंवा स्त्री, स्वर्गाच्या म्हणण्वावर पूर्ण विश्वास ठेवत नाहीत, तोपर्यंत तो अधिकार येथे मोकळा केला जात नाही.

मी नुकतेच जे बोललो ते मी पुन्हा व्यवस्थितपणे सांगतो. त्यांची विचारसरणी कुटील होती, एखाद्या समस्येबद्दल देव जे म्हणतो त्याच्या विरुद्ध जाऊन जे योग्य नाही त्याला चांगले किंवा स्वीकार्य आहे असे म्हणणे ही कुटील विचारसरणी आहे. अविश्वास देखील एक प्रमुख समस्या होती कारण पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्गाने आपल्या अधिकाराची अमलबजावणी करण्यासाठी विश्वासाची आवश्यकता होती. हे अशा प्रकारे कार्य करते ह्या विषयी शिष्यांना विश्वास नव्हता, दुष्टआत्मा बाहेर येईलच याची त्यांना पूर्ण खात्री नव्हती. ते घाबरले.

मनुष्याला पृथ्वीच्या क्षेत्रावर कायदेशीर अधिकार असल्याने, देवाची सत्ता आणि त्याचा अधिकार पृथ्वीवर तो पर्यन्त कार्य करू शकत नाही जो पर्यंत पृथ्वीच्या क्षेत्रावर अधिकार असलेले स्त्री किंवा पुरुष स्वर्ग जे म्हणते त्यावर विश्वास ठेवत नाही,आणि त्या अधिकाराला पृथ्वीवर मुक्त करत नाही. तसे, स्वर्ग जे म्हणते ते सत्य आणि योग्य आहे ह्याची आपल्या अंतःकरणाला पूर्णपणे खात्री पटवून देणे याला विश्वास म्हणतात, आणि त्या घटनेच्या दिवशी कोणाचाही अशा प्रकारचा विश्वास नव्हता. ते दोगल्या मनाचे आणि अविश्वासाने भरलेले होते, अशा प्रकारे या परिस्थितीत स्वर्गाचे अधिकार क्षेत्र खंडित केले गेले होते. पण येशूला विश्वास होता आणि त्याला माहीत होते की हा दुष्टात्मा बाहेर येणारच आहे! येशूने परिस्थिती आपल्या हातात घेतली आणि तो दुष्टात्मा निघून गेला. "पण, गॅरी, जेव्हा येशूने दटावले तेव्हा दुष्टात्मा निघून गेला त्याचे कारण म्हणजे तो येशू होता." खरंच? येशू जेंव्हा त्याच्या गावी, जिथे तो लहानाचा मोठा झाला त्या ठिकाणी सेवा करत असताना काय झाले ते मार्क 6:5 मध्ये पाहू या.

त्याने थोड्याच रोग्यांवर हात ठेवून त्यांना बरे केले, ह्याशिवाय दुसरे कोणतेही महत्कृत्य त्याला तेथे करता आले नाही.

येशूला बरे करण्याचे सामर्थ्य होते हे तुम्हाला मान्य करावे लागेल, बरोबर? मग या ठिकाणी त्याला जे काही करण्याची इच्छा होती ते तो का करू शकला नाही, याचे उत्तर तुम्ही दिलेच पाहिजे. त्या ठिकाणी गरज होती, पण त्याला कार्य करण्यात काहीतरी अडथळा उत्पन्न होत होता. त्याचे उत्तर तो वचन 6 मध्ये देतो, "त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले." विश्वास (स्वर्गाशी सहमत होऊन) पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्गाला कायदेशीरपणाचा अधिकार देतो. उदाहरणार्थ, तुमचे तारण कसे झाले आणि तुम्ही ख्रिस्ताकडे कसे आले हे तुम्ही ह्या उदाहरणा वरुन सहजपणे समजू शकता.

कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.

-रोमकरांस पत्र 10:10

तुम्ही तुमच्या अंतःकरणात विश्वास ठेवता (आकाश काय म्हणते यावर), आणि ते योग्य आहे. ती एक कायदेशीर संज्ञा आहे, ज्याचा अर्थ कायद्याचे लागूकरण करणे आणि त्यावरून हे सूचित होते की स्वर्गाला आता पृथ्वीच्या क्षेत्रात कायद्याने कार्य करण्याचा अधिकार आहे. या तत्त्वाकडे साध्या आणि सरळ दृष्टीकोनातून पहिले तर, आपण हे लक्षात ठेवूया की आदामाला येथे पृथ्वीवर कायदेशीर वर्चस्व देण्यात आले होते आणि मनुष्याला अजूनही ते स्थान आहे. ह्या मध्ये अध्यात्मिकरित्या राज्य करण्याच्या मनुष्याची क्षमता, जी तो बागेमध्ये सैतानाकडे गमावून बसला त्या विषयी गोंधळात पडू नये. देव आता पृथ्वीच्या क्षेत्रात मनुष्याला असलेल्या कायदेशीर अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. अशाप्रकारे, देवाला अशा स्त्री किंवा पुरुषाला शोधणे आवश्यक होते जो स्वर्गाशी सहमत होऊन पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीररित्या प्रवेश करू शकेल आणि कार्य करू शकेल.

रोमकरांस पत्र 10:10 मध्ये, तुमच्या लक्षात येईल की पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्गाचा अधिकार आणि सामर्थ्य मोकळे करण्या पूर्वी दोन गोष्टी घडल्या पाहिजेत. पहिल्या बाबीचा मी आधीच उल्लेख केला आहे: आपण पूर्णपणे खात्री बाळगून स्वर्ग जे म्हणते त्याच्याशी आपल्या अंतःकरणात सहमत असले पाहिजे; याला विश्वास म्हणतात. दुसरे, आपण हे समजून घेतले पाहिजे की केवळ विश्वास ठेवल्याने स्वर्ग येथे पृथ्वीवर मोकळा होणार नाही. हे ऐकून आश्चर्य वाटले ना? मी तुम्हाला समजावून सांगतो. लाइटच्या स्विचचा विचार करा. पॉवर चालू आहे, परंतु लाईट चालू करण्यासाठी तुम्हाला स्विच ऑन करणे आवश्यक आहे. जेव्हा आपण आपल्या अंतःकरणात स्वर्गा काय म्हणते त्यावर विश्वास ठेवतो, त्यामुळे स्वर्गाशी संबंध कायदेशीर किंवा न्याय्य होऊन जातो. पण मग आपल्याला तो अधिकार इथे मोकळा करावा लागेल. वरील उदाहरणाप्रमाणे, आपल्याला स्विच ऑन करणे आवश्यक आहे. आपण जेंव्हा असे करतो तेंव्हा देवाच्या राज्याचा अधिकार आहे ही कबुली देतो आणि त्या प्रमाणे कार्य करतो.

हे राज्य, जसे येशूने शिकवले आणि दर्शविले, ते शिष्यांसाठी पूर्णपणे नविन होते. अनेक वेळा, आपण पाहतो कि शिष्यांना जे काही दिसत होते त्या मुळे ते गोंधळून जात होते. हे मागील शास्त्रवचनात आपण वाचले आहे, माझा असा विश्वास आहे की दुष्टात्म्याच्या अस्तित्वामुळे, किंवा त्यांच्या प्रकट होण्या मुळे शिष्य घाबरले होते आणि ते दुटप्पी झाले होते, अशा प्रकारे

त्यांचा विश्वास शून्य झाला. मी असे गृहीत धरत आहे की जेव्हा ते या दुष्टात्म्याला घालवायला गेले तेव्हा ते प्रकट झाले, बहुधा त्याने त्या मुलाला खाली फेकले आणि आपल्या अस्तित्वाचे मोठे प्रदर्शन केले. यामुळे भीती निर्माण झाली असावी. मी इथे फक्त अंदाज लावत आहे, पण एका गोष्टीची मला खात्री आहे, त्या ठिकाणी असे काहीतरी घडले ज्यामुळे त्यांची अंतःकरणे स्वर्गाशी असलेल्या करारापासून विभक्त झाली आणि त्यांच्यामध्ये अविश्वास निर्माण झाला.

दुसरीकडे, अशा परिस्थितीबद्दल स्वर्गाने जे सांगितले त्याबद्दल येशूला पूर्ण खात्री होती आणि त्याने दुष्ट आत्म्याला निघून जाण्याचा आदेश दिला. म्हणून आपण पाहू शकतो की, दुष्टआत्मा बाहेर न येण्याची समस्या पृथ्वीच्या क्षेत्रात होती, स्वर्गाच्या क्षेत्रात नाही.

पृथ्वीच्या क्षेत्रा मधे देवाचे राज्य कसे कार्य करते ह्याचे उत्तम उदाहरण देण्या साठी जर मला एकच शास्त्रभाग निवडायचा असेल तर मी मार्क 11:22–24 हा शास्त्रभाग निवडेन. पार्श्वभूमी तयार करण्यासाठी, आपल्याला काही शास्त्र वचनांचा आधार घ्यावा लागेल आणि आपण पाहतो की येशू अंजिराच्या झाडाशी बोलला आणि ते मरण पावले. झाडावर फळ न दिसल्यामुळे, येशू ने त्या झाडाला शाप दिला. दुसऱ्या दिवशी शिष्य पुन्हा त्याच झाडा जवळून जात असतांना त्यांना आढळले की ते झाड मृत झाले आहे. पेत्र ते पाहून फारच आश्चर्यचकित झाला आणि अजून तो त्या आश्चर्याच्या स्थितीत असतांना येशूला त्याबद्दल विचारतो.

म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल.

— मार्क 11:24

येशूने त्यांना उत्तर दिले, "देवावर विश्वास ठेवा. मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला 'तू उपटून समुद्रात टाकला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईलम्हणून मी तुम्हांला सांगतो, प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल.

— मार्क 11:22-24

जे घडले ते पाहून पेत्र आश्चर्यचकित झाला होता याकडे लक्ष द्या. हे कसे घडले? येशू फक्त झाडाशी बोलला होता. तरीही झाडाने काही शंका न बाळगता येशूच्या शब्दांना प्रतिसाद दिला आणि झाड मरून गेले. येशू नंतर पेत्राला "सत्य" सांगतो, अर्थात देवाच्या राज्याचा नियम सांगतो. येशू ह्या ठिकाणी जे स्पष्टीकरण देतो त्या वरून पृथ्वीच्या क्षेत्रात देवाचे राज्य कसे संवाद साधते हे आपल्याला अगदी सहजपणे समजण्यास मदत होते. या उदाहरणात आपण ज्या कायद्याबद्दल बोलत आहोत तोच कायदा कार्यरत असल्याचे आपल्याला दिसते; पृथ्वीवरील एक पुरुष किंवा स्त्री, स्वर्ग काय म्हणतो याबद्दल पूर्णपणे खात्री बाळगतो (आता न्यायी ठरलेले) आणि त्यानंतर स्वर्गाचा अधिकार शब्दाने बोलतो किंवा मोकळा करतो. अर्थात, या घटनेतील व्यक्ती, स्वतः येशू आहे, परंतु येशूने त्याच्या शिष्यांना स्पष्टीकरण देताना हे अगदी स्पष्ट केले आहे की त्याने नुकतेच जे केले ते "कोणीही" करू शकतो.

मला खात्री आहे की तुम्ही ह्या बाबतीत सहमत व्हाल की, जर लोकांना हे खरोखर माहित असेल आणि येशू त्यांना शिकवत असलेला कायदा त्यांना नीटपणे समजला असेल तर त्याचा त्यांच्या जीवनावर नाट्यमय परिणाम होईल. मी माझ्या स्वतःच्या कुटुंबाच्या जीवनात देवाच्या राज्याचा प्रभाव पाहिला, परंतु देवाच्या राज्याचा परिणाम इतर कुटुंबांवर होत आहे हे पाहणे देखील आश्चर्यकारक होते कारण आम्ही जे शिकलो ते त्यांना शिकवले. माझ्या चर्च मध्ये हा कायदा कशा प्रकारे प्रदर्शित झाला त्या संबंधी एक घटना मी ह्या ठिकाणी तुम्हाला सांगतो. पुष्कळ वेळेस देवाचे राज्य आणि ते कसे कार्य करते ह्याचे ज्ञान असणे अगदी जीवन आणि मृत्यू मध्ये जितके अंतर असते तसेच ह्या ठिकाणी असते. आणि ह्या घटनेत देखील असेच झालेले आहे.

जेनिफर माझ्या चर्चमध्ये येऊ लागली आणि विश्वास आणि देवाचे राज्य याबद्दल ऐकू लागली. ती तिच्या दुस-या मुलाच्या वेळी गरोदर असताना देवाच्या राज्यामध्ये तिचे अधिकार आणि हक्क याबद्दल जाणून घेण्यासाठी ती फारच उत्साहित होती आणि तिला आपल्या ह्या मुलाला घरी जन्म देण्याची इच्छा होती. त्यामुळे ती बाळाच्या जन्माविषयी देवाच्या वचनात काय म्हटले आहे आणि तिच्या मुलाला लागू होणारी देवाच्या राज्याची अभिवचने यांचा अभ्यास करू लागली. तिला खात्री होती की ती निरोगी अवस्थेत मुलाला घरी जन्म घेऊ

शकते. तिने एका सुईणीला ह्या साठी नियुक्त केले, आणि आमच्या चर्चमधील एका महिलेचे काही बाळंतपण घरीच झाले होते तिला तिने प्रसूतीदरम्यानच्या बाबीं संबंधी माहिती आणि प्रशिक्षण देण्याची विनंती केली.

तिच्या प्रसूतीपूर्वीच्या काळात, ती जेंव्हा प्रत्येक आराधना सभेत येत होती तेंव्हा फक्त राज्याची तत्त्वे आणि सिद्धांत आत्मसात करत होती. ह्या संकल्पना जेनिफरसाठी नवीन होत्या, आणि देवाच्या राज्यात खरी उत्तरे मिळतात ह्या विषयी शिकणे तिला आवडत होते. दुर्दैवाने, या काळात, तिच्या पतीला रविवारी काम करावे लागत होते आणि तो तिच्याबरोबर चर्चला जाऊ शकत नव्हता. आणि मग, शेवटी बाळाच्या जन्माची वेळ आली. दाई आणि प्रशिक्षकाला घरी बोलावण्यात आले.

सकाळी साधारण 2:00 किंवा 3:00 वजले असतील, माझ्या पलंगाच्या बाजूला असलेला फोन वाजला. फोन वर माला, जेनिफरच्या प्रशिक्षकाचे ओरडणे ऐकू आले, “पास्टर, कृपया प्रार्थना करा; बाळ मृत जन्माला आले आहे!” या बातमीने मला धक्काच बसला. प्रसूती प्रशिक्षकाने सांगितले की बाळ नुकतेच रूग्णवाहिकेतून हॉस्पिटलकडे पाठविण्यात आले आहे. तिने मला सांगितले की, खरं तर, वैद्यकीय पथक बाळाला घेण्यासाठी आले तेंव्हा त्यांनी बाळाला मृत घोषित केले होते.

ड्रेन्डा आणि मी लगेच उठलो आणि कपडे घातले. मी आत्म्याने प्रार्थना करू लागलो, आणि मी काय करावे हे देवापासून ऐकण्याचा प्रयत्न करू लागलो. मला माहित होते की या घटनेने सैतानाला आमच्या चर्चची निंदा करायची आहे, न्यूज पेपर वर लिहिलेला ठळक अक्षरातील मथळा मला माझ्या डोळ्या समोर दिसू लागला, “कल्ट चर्चने घरीच प्रसव करण्यास दिलेल्या प्रोत्साहना मुळे नवजात शिशु चा मृत्यु.” मूल कुठे जन्माला यावे, घरी किंवा दवाखान्यात या मुद्द्यावर आम्ही खरोखरच भूमिका घेतली नव्हती, परंतु अनेक स्त्रिया घरीच जन्म देण्याचा अधिक प्रमाणात निर्णय घेतात; ते खरे होते. ड्रेन्डा आणि मी आत्म्याने प्रार्थना करत राहिलो कारण आम्ही हॉस्पिटल मध्ये जाण्यासाठी गाडी चालवत होतो, हॉस्पिटल 20 मिनिटांच्या अंतरावर होते. जवळजवळ अर्ध्या वाटेवर, मला अचानक देवाचा आत्मा माझ्यावर आल्याचे जाणवले आणि मला कळून चुकले की बाळ अगदी ठीक होईल.

त्याच क्षणी, माझी पत्नी माझ्याकडे वळली आणि म्हणाली की प्रभुने तिला नुकतेच सांगितले आहे की बाळ ठीक होईल.

परमेश्वराने माझ्या पत्नीला आणि मला काय सांगितले होते ते मला माहीत होते, म्हणून मी इमर्जेन्सी रूम मधे गेलो तेव्हा माला काय पाहावयास मिळणार आहे ह्या विषयी उत्सुक होतो. इमर्जेन्सी रूम मध्ये, मी पहिले कि सुमारे सात किंवा आठ परिचारिका घोळका करून उभ्या होत्या आणि त्यांच्या समोर पूर्णपणे सामान्य, गुलाबी, रडणारे बाळ दिसत होते. मी त्यांच्या चेहऱ्याकडे बारकाईने पहिले. सहसा बाळाला हातात धरल्यावर कुणाच्याही चेहऱ्यावर हसू आणि आनंद दिसून येतो. पण ह्या ठिकाणी कुणाच्याही चेहऱ्यावर अशा प्रकारचे कोणतेही भाव नव्हते. त्याऐवजी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आश्चर्याचा धक्का बसल्याचे भाव दिसत होते.

ज्या महिलेने आम्हाला फोन केला होता तिला आम्ही भेटलो. तिने आम्हाला पुन्हा एकदा सांगितले की बाळ जिथे जन्मले त्या घरी जे हॉस्पिटल पासून 20 मिनिटांच्या अंतरावर होते तिथे बाळाला जन्मानंतर मृत घोषित करण्यात आले होते. जेव्हा बाळ हॉस्पिटल मध्ये पोहचले तेव्हा हॉस्पिटलने देखील बाळाला मृत घोषित केले होते, परंतु ते अचानक जागे झाले. देवाची स्तुती असो! पवित्र आत्म्याने आम्हाला सांगितल्याप्रमाणे ड्रेन्डा आणि मी बाळाला जिवंत आणि स्वस्थ पाहून रोमांचित झालो.

ह्या दरम्यान, एका वेगळ्या रुग्णवाहिकेने बाळाची आई जेनिफरला दवाखान्यात प्रसूती वॉर्डमध्ये नेण्यात आले होते. तिला तिच्या बाळाच्या स्थितीबद्दल काहीही सांगण्यात आले नव्हते. माझी पत्नी, ड्रेंडा, ती कशी आहे हे पाहण्या साठी प्रसूती मजल्यावर गेली. जेनिफर एका खोलीत विश्रांती घेत होती ड्रेन्डा तिला म्हणाली, “जेनिफर, तुझे बाळ ठीक आहे आणि ती खूप सुंदर आहे.” जेनिफरच्या शेजारी उभ्या असलेल्या नर्सने आश्चर्याने ड्रेंडा कडे वळून आणि हळूवारपणे म्हटले, “नाही, ते बाळ बॉडी बॅगमध्ये आहे!” माझ्या पत्नीने नर्सला तिची चूक खूप स्पष्टपणे समजावून सांगितली. आज, देवाच्या गौरवासाठी, ती मुलगी जिचे नाव हेली ठेवण्यात आले होते ती एक सुंदर तरुणी आहे तिच्या मेंदूला कोणतीही हानी पोहचली नाही किंवा तिला कोणत्याही प्रकारची आरोग्य समस्या उद्भवली नाही. देवाचे राज्य आत्मिक कायद्यावर आधारित आहे ह्याची जाणीव असल्या मुळे, मला माहित होते की हा परिणाम

योगायोगाने झालेला नाही. म्हणून मी आत्मिक शास्त्रज्ञ (ख्रिस्ती विज्ञान नाही, परंतु देवाचे राज्य कसे कार्य करते याचा अभ्यास करणारी व्यक्ती) म्हणून मला नेमके काय झाले हे शोधायचे होते.

मला माहित आहे की रुग्णवाहिका घरी आल्या नंतर त्यांनी बेबी हेलीला अधिकृतपणे "आगमनावर मृत" घोषित केले होते. मला हे देखील माहित होते की रुग्णालयात पोहोचल्यावर देखील बाळाला मृत घोषित केले गेले होते. मग काय झालं? मी तिथे असलेल्या प्रसूती प्रशिक्षकाशी बोललो, आणि मी तिला म्हटले कि नेमके काय घडले त्याबद्दल मला सविस्तरपणे सांगा. मी प्रत्येक कडी जोडण्याचा प्रयत्न करत होतो. ती म्हणाली की बाळाचा जन्म होईपर्यंत सर्व काही ठीक झाले होते. पण नंतर ती जीवंत असण्याचे काहीही चिन्ह दिसत नव्हते आणि तिचा रंग गडद निळा होता. सुईणीने बाळाला जिवंत करण्याचा प्रयत्न केला पण शक्य झाले नाही. प्रशिक्षक पुढे म्हणाली की जेनिफरच्या कुटुंबातील बरेच लोक त्या ठिकाणी होते आणि हे सर्व पाहून ते घाबरू लागले. पण जेनिफरने धीरगंभीरपणे त्यांना शांत राहण्यास सांगितले आणि मग तिने तिच्या नवऱ्याच्या चेहऱ्यावर बोट ठेवत म्हटले, "तुम्ही एक शब्दही बोलू नका—हे बाळ बरे होईल!"

मी प्रशिक्षकाचे बोलने तिथेच थांबवले आणि तिला विचारले की जेनिफरने तिच्या पतीला जे सांगितले ते ती मला पुन्हा सांगू शकते का? तिने नुकतीच सांगितलेली गोष्ट तिने मला पुन्हा सांगितली, जेनिफरने तिचे बोट तिच्या पतीच्या चेहऱ्यावर ठेवले आणि म्हणाली, "तुम्ही एक शब्द बोलू नका - हे बाळ ठीक होईल!" व्वा! अगदी हेच ते होते! हाच तो क्षण होता, हीच ती घोषणा होती ज्याने बेबी हेलीचे प्राण वाचवले. मी एक गुप्तहेर असल्या सारखे मला वाटू लागले ज्याने नुकतीच एक मोठी केस सोडवली होती! मला आनंद झाला. ते खूप सोपे होते, तरीही खूप गहन होते. त्या परिस्थितीत जेनिफरने फक्त आत्मिक नियम लागू केला होता आणि त्यामुळे तिच्या बाळाचे प्राण वाचले होते! मी नुकतेच जे शिकलो होतो त्यावर चिंतन केल्याने सर्व काही समजून आले.

जेनिफरला रुग्णालयातून सोडताच ती रुग्णवाहिकेच्या कर्मचाऱ्यांकडे गेली आणि त्या रात्री रुग्णालयात जात असताना त्यांनी बाळासाठी काय केले ते विचारले. त्यांनी भेदरलेल्या चेहऱ्याने तिच्याकडे पाहिले.

"काही नाही," त्यांच्यापैकी एकाने शेवटी धैर्य करून म्हटले.

"तुला काय म्हणायचे आहे, काहीच नाही?" जेनिफरने विचारले, "तुम्ही सीपीआर केले का?"

"नाही," ते म्हणाले.

"तुम्ही बाळाला वाचवण्यासाठी काही केल का?"

"नाही," ते पुन्हा म्हणाले.

त्यांनी तिला सांगितले की बाळ मरण पावले होते आणि त्यांना ते पुनः जिवंत होण्याची काहीच आशा नव्हती. परंतु, जेव्हा ते हॉस्पिटलमध्ये आले तेव्हा बाळ "जागे" झाले! त्या रुग्णवाहिके च्या कर्मचाऱ्यांना हॉस्पिटल आणि फायर हाऊसकडून वर्षातील सर्वात उत्तम कार्य केल्या बद्दल प्रशंसा मिळाली, एका अत्यंत कठीण परिस्थितीत उत्तम कार्य केल्या बद्दल वार्षिक पुरस्कार मिळाला. मात्र त्यांनी हे मान्य केले कि त्यांनी परिस्थिती सुधारण्या साठी खरेच काही केले नव्हते.

आम्ही अलीकडेच आमच्या टेलिव्हिजन कार्यक्रमा मधे हेली अणि तिची आई, जेनिफरची कहाणी प्रसारित केली; आणि आम्ही सर्वांनी, आनंद अश्रूंनी, देवाच्या राज्या बद्दल आनंद व्यक्त करून जयोत्सव केला. राज्याचा आत्मिक कायदा आणि अधिकार ह्या मध्ये कसे कार्य करावे हे माहित असलेली व्यक्ती त्या ठिकाणी उपस्थित होती त्या बद्दल आम्ही देवाचे गौरव केले व हर्षोल्लास केला.

या कथेत आपण पाहतो कि जेनिफर, स्वर्ग काय म्हणते ते पूर्णपणे पटवून घेते आणि नंतर तिच्या स्वतःच्या शब्दांनी त्या अधिकाराला त्या परिस्थितीत मुक्त करते. नियम कार्य करतो!

माझ्या चर्चमधील आणखी एका कुटुंबाला देवाच्या राज्याच्या याच कायद्याचा पुढील प्रमाणे अनुभव आला. एक दिवस दोन बहिणींनी आपल्या कुटुंबासह एकत्र जेवण करण्याचा निर्णय घेतला, हे सोपे काम नव्हते, कारण ह्या दोघींची मिळून 12 किंवा 13 मुले होती. आणि मग, ते दुपारचे जेवण करत असतांना त्यांच्या लक्षात आले की चार वर्षांचा जोएल बेपत्ता आहे. त्यांनी घरभर पाहिले पण तो सापडला नाही. त्यामुळे तो लपला असावा असे

त्यांना वाटले, पण त्यांनी पुन्हा शोध घेतला तरीही त्यांना तो सापडला नाही. जोएल ची आई टीनाच्या मनात अचानक एक भयानक विचार आला. घरामागील अंगणात असलेल्या भूमिगत तलावात तर नसेल ना तो? ती 13 वर्षांची तिची भाची, कोर्टनी, ला सोबत घेऊन मागच्या दाराने पळत सुटली. टीना ने जोएल ला पूल च्या तळाशी पडलेले पाहिले, तो काहीच हालचाल करत नव्हता आणि ते दृश्य पाहून ती फारच घाबरून गेली, भीतीने गर्भगळीत झाली. तो तिथे किती वेळ होता हे कोणालाच माहीत नव्हते. टीनाने ओरडून म्हटले 911 वर फोन करा आणि तिने स्वतः जोएलला बाहेर काढण्या पूल मधे उडी मारली. तो श्वास घेत नव्हता, अगदीच निष्क्रिय होता.

आमच्या मुलांच्या सेवकाईच्या विभागात वाढलेली 13 वर्षांची ही मुलगी तिच्या मावशीला म्हणाली, “नाही, टीना मावशी, आम्हाला 911 वर कॉल करण्याची गरज नाही; आम्हाला येथे अधिकार आहे. आपल्याला प्रार्थना करण्याची गरज आहे. ” म्हणून त्या दोघी प्रार्थना करू लागल्या, परंतु तरीही काहीही झाले नाही. टीना पुन्हा ओरडली, “911 वर कॉल करा!” त्यानंतर कोर्टनी तिच्या मावशीला म्हणाली, “टीना मावशी, आपल्याला त्याच्यावर जीवन बोलण्याची गरज आहे.” तेव्हा कोर्टनी म्हणाली, “जोएल, येशूच्या नावाने, जागा हो!” अचानक जोएल गुदमरला, पाणी थुंकले, तो शुद्धिवर आला आणि पूर्णपणे सामान्य झाला.

जेव्हा मी या घटने बद्दल विचार करतो तेव्हा मला नेहमी आश्चर्य वाटते, मला ह्याचे आश्चर्य वाटत नाही कि मुलगा बरा झाला, परंतु 13 वर्षांच्या मुलीने जे केले आणि त्या क्षणी त्या कठीण परिस्थिती मध्ये तिची विचारशीलता किंवा क्षणीच विचार करण्याची क्षमता पाहून मला आश्चर्य वाटते. जीवन आणि मृत्यूच्या संघर्षाच्या त्या परिस्थितीत, ती घाबरून न जाता काय करणे आवश्यक आहे याचे मूल्यांकन करण्यास सक्षम होती. कोर्टनीने हे सिद्ध केले की राज्य कसे चालते हे जाणून घेणे एखाद्या छान प्रवचनापेक्षा अधिक महत्वाचे आहे; ते जीवन आणि मृत्यू मधील अंतर आहे!

पुन्हा, राज्याचा कायदा कसा चालतो ते पहा. सुरुवातीला कोर्टनीने सांगितले की त्यांना प्रार्थना करणे आवश्यक आहे, जे त्यांनी केले, परंतु काहीही झाले नाही. कारण जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण देवाचा अधिकार आणि शक्ती मुक्त करत नाही. पण आपण दिशा

मिळण्यासाठी प्रार्थना करतो. त्यांची त्या क्षणी नेमकी तीच गरज होती. त्यानंतर तुम्हाला या घटनेत लक्षात येईल की कोर्टनी ने नंतर म्हटले की त्यांना त्याच्यावर जीवन बोलण्याची गरज आहे. त्यांनी तसे केल्यावर, तो पूर्णपणे बरा झाला आणि आजही तो जिवंत आहे. ह्या ठिकाणी आपण पुन्हा, एक असे अंतःकरण पाहतो जे स्वर्ग जे सांगते त्या वर पूर्णपणे विश्वास ठेवते, परंतु तरीही विश्वास असलेल्या पुरुष किंवा स्त्रीद्वारे पृथ्वीच्या क्षेत्रात तो अधिकार मुक्त केल्या शिवाय काहीही होत नाही.

मी तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगतो, जी आमच्या कुटुंबातीलच आहे. ड्रेंडाचा भाऊ कँडीला, त्याच्या पत्नीला, त्यांच्या पाचव्या मुलाच्या जन्मासाठी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला होता. कँडी ला प्रसव वेदना होत होत्या आणि मी व ड्रेंडा आमच्या कुटुंबात आणखी एक भर पडणार म्हणून उत्सुकतेने दवाखान्यात गेलो होतो. आम्हाला वाटले की आम्ही तिथे पोहोचण्याच्या खूप आधीच बाळाचा जन्म झाला असणार. पण तिथे पोहचल्यावर आम्हाला कळले की, काही कारणास्तव बाळाचा जन्म आम्ही पोहचलो तेंव्हा नुकताच झाला होता. आम्ही प्रसूती वॉर्डमध्ये जात होतो, तेंव्हा पहिले कि ते बेबी हॉलंडला नर्सरीमध्ये घेऊन जात होते. तुम्हाला कदाचित माहित असेल की, रुग्णालयातील प्रसूती वॉर्डमधील नर्सरीमध्ये सर्व खिडक्याच असतात, त्यामुळे नवजात बालकांना आत आणल्यावर तुम्ही त्यांना पाहू शकता.

जेव्हा त्यांनी लहान हॉलंडला आत आणले, तेव्हा मला लगेच लक्षात आले की ती अगदीच पांढरी दिसत होती. जॉनीच्या सर्व मुलांचे केस पांढरे अणि ब्लॉन्ड आहेत; म्हणून सुरुवातीला, मला वाटले की जन्माच्या वेळी त्याच्या मुलांचा रंग असा पांढरा असणे सामान्य आहे. पण तरीही मला ते बरोबर दिसत नव्हते. काहीतरी योग्य नाही असे वाटत होते. अचानक सर्व डॉक्टर इकडे तिकडे धावू लागले. मी नर्सरीमध्ये काय होत आहे ते पाहू नये म्हणून परिचारिकांनी पटकन पडदे ओढले आणि मला माहित होते की ते चांगले लक्षण नाही. पडदा जरी खेचला गेला तरी पडद्याच्या मधे थोडी जागा होती त्या मधून आत जे काही होत होते ते मी पाहू शकत होतो. परिचारिकांनी उपकरणे बाहेर काढण्यास सुरुवात केली आणि डॉक्टर हॉलंडवर सीपीआर

लक्षात ठेवा की राज्याचे कायदे प्रत्येक वेळी, प्रत्येका साठी कार्य करतात!

करू लागले. मी नर्सरीच्या दुसऱ्या दारापाशी गेलो, तिथे डॉक्टर काय बोलत आहेत ते मला स्पष्टपणे ऐकू येत होते. ते म्हणत होते कि, बाळाच्या हृदयाचे ठोके नाहीत आणि बाळाचे हृदय पूर्ववत कार्य करण्यास तयार करणे त्यांना कठीण जात आहे, त्यांचे हे बोलणे ऐकून मला धक्का बसला. जसजसे मी त्यांचे बोलणे ऐकत होतो, तसतसे मला बाळाच्या हृदयाच्या मॉनिटरचे ठोके वारंवार ऐकू येत होते. मला त्या मॉनिटरची एक धडधड ऐकू येई आणि मग 15 किंवा 20 सेकंद निघून गेल्या नंतर मला पुन्हा ती धडधड ऐकू येई. हॉलंडच्या हृदयाचे ठोके बंद होते!

डॉक्टर खोलीतून बाहेर आले आणि जॉनीकडे गेले, "परिस्थिति बरोबर नाही, जॉनी; मला क्षमा करा, पण आम्ही अजूनही प्रयत्न करत आहोत." आम्हाला नर्सरीमध्ये जाण्याची परवानगी नव्हती, म्हणून ड्रेंडा आणि जॉनी यांनी नर्सरीच्या एका दारावर हात ठेवले आणि मी नर्सरीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या दारावर हात ठेवला. आम्ही प्रार्थना करू लागलो आणि घोषित करू लागलो की हॉलंड जगेल आणि मरणार नाही आणि ती बरी होईल. आम्ही येशूच्या नावाने त्या हृदयाला धडकण्याची आज्ञा दिली.

जॉनीसोबत थोड्या वेळापूर्वी जे डॉक्टर बोलत होते ते अचानक मोठ्या घाईत नर्सरीतून बाहेर आले. ते एकही शब्द न बोलता आमच्या जवळून पुढे धावत गेले. काही मिनिटांत, ते पुन्हा एका नर्स सोबत घाईघाईने परत आले, ती नर्स मोठ्या आवाजात ओरडून म्हणत होती, "डॉक्टर, आपण असे करू शकत नाही. ती प्रक्रिया करण्यासाठी आपले हे रुग्णालय अधिकृत नाही. मी तुम्हाला ते रक्त घेऊ देऊ शकत नाही." डॉक्टर काही न बोलता नर्सरी मधे गेले त्यांनी तिच्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यांनी एक मॅन्युअल घेतले, आणि मला दिसत होते की ती प्रक्रिया कशी करायची याचा ते काळजीपूर्वक अभ्यास करत होते. दोन पडद्याच्या मधील भागातून मी पाहिले कि ते डॉक्टर उठले आणि बाळामध्ये एक लांब ट्यूब घालू लागले. मला आता कळले की ते बाळाला रक्त देत आहेत.

अचानक मला हृदयाचे ठोके सुरू झाल्याचा आवाज आला. त्याचा वेग वाढला आणि नवजात बाळाच्या सामान्य जलद हृदयाचा ठोका सुरु झाला. डॉक्टर एका मिनिटात बाहेर आले आणि म्हणाले, "तेथे देवदूत होते; देवाने मला या बाळासाठी मदत केली!" आम्हाला

स्पष्ट दिसत होते की तो हादरला होता. नंतर आम्हाला कळले की ते डॉक्टर तर ड्युटीवर नव्हते आणि कँडीच्या प्रसूती मधे त्यांचा काही सहभाग नव्हता. हा सगळा प्रकार घडला त्या वेळी ते दुसऱ्या एका रुग्णाची तपासणी करण्यासाठी हॉस्पिटलमधे आले होते. मी सांगू शकतो की जे घडले ते पाहून डॉक्टर अजूनही आश्चर्यचकित होते कारण त्यांनी आम्हाला सांगितले की 36 मिनिटांपर्यंत हॉलंडच्या हृदयाचा ठोका नव्हता!

आज हॉलंड एक सुंदर सामान्य चार वर्षांची मुलगी आहे. माझा विश्वास आहे की राज्याच्या कायद्याबद्दलची आमची जी समज होती त्यामुळेच त्या परिस्थितीत उत्तरे मिळाली. मला अजूनही आठवतं, त्या नर्सरीच्या दारावर हात ठेऊन मी स्वतःशी विचार करत होतो, "आम्ही ड्रेंडाच्या लहान भाचीवर अंत्यसंस्कार करणार नाही! निदान ह्या परिस्थितीत तर मुळीच नाही!"

मी नुकत्याच कथन केलेल्या प्रत्येक घटने मध्ये देवाच्या राज्याचा कसा प्रभाव पडला यावर आपण सध्या विचार करणे थांबवत असताना, मी तुमच्या हे लक्षात आणून देऊ इच्छितो की देवाच्या राज्याचे कायदे प्रत्येक वेळी, कोणासाठीही कार्य करतात! मी या पुस्तकाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, पृथ्वीवरील नैसर्गिक नियम प्रत्येक वेळी समान परिणामांसह कार्य करतात. ते निःपक्षपाती आहेत आणि जो कोणी ते नियम शिकणे आणि लागू करण्याकडे लक्ष देऊन वेळ देईल त्यांच्यासाठी ते कार्य करतील. वीज यूएसएमध्ये आफ्रिकेप्रमाणेच कार्य करते; त्यांच्या कार्य करण्या मधे काही अंतर पडत नाही.

मी बायबलमधील प्रत्येक कथा वेगळ्या विचारसरणीने वाचू लागलो, देवाच्या राज्याचा आणखी एक नियम उघड करणारे संकेत शोधत गेलो. मी स्वतःला एक अध्यात्मिक शास्त्रज्ञ होण्यासाठी वचनबद्ध केले आहे जेणेकरून मी बऱ्याचदा वाचलेल्या बायबलच्या कथांमध्ये त्या गोष्टी का घडल्या हे मला शिकता येईल. 1 योहान मधील हा शास्त्रभाग अनेक लोकांना मजेदार आणि विचित्र वाटतो. मला माहित आहे की आपण ते आधी वाचले आहे, परंतु आपण ते पुन्हा वाचू या कारण त्यामध्ये सत्य पुन्हा प्रतिपादित होते जे आपले उत्तर आहे.

> *त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो,(आपले कार्य आपल्या हातात घेतो) हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या*

मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.

— 1 योहान 5:14-15

मला हा शास्त्रभाग आवडतो कारण तो कायद्याबद्दल बोलतो आणि कायदा आपल्याला न्याय मिळवून देण्याचा आत्मविश्वास देतो. हा आपला आत्मविश्वास आहे - जर आपण देवाच्या इच्छेनुसार (कायदा, ज्याला देव योग्य म्हणतो) काहीही विचारले तर तो आपले ऐकतो. पुन्हा, "आपले ऐकतो" ही संज्ञा देवाला ऐकू येणारे शब्द ह्या बद्दल बोलत नाही, जरी हे सत्य आहे कि तो आपण बोलत असलेले शब्द ऐकतो. पण ह्या ठिकाणी, देव आपले प्रकरण आपल्या हाती घेत असल्या बद्दल बोलल्या जात आहे. जर तुम्ही एखाद्या न्यायाधीशाचा विचार कराल जो खटला चालवतो आणि कायद्यानुसार निर्णय घेतो, त्याच्या स्वतःच्या भावनांनुसार नाही (आणि हे असेच असले पाहिजे) तर तुम्हाला ह्या शास्त्रभागाचा अर्थ समजेल. तो आपले ऐकतो-तो आपले प्रकरण हाती घेतो किंवा ते ऐकतो, आणि कायदेशीररित्या जे आपले आहे, त्या बद्दल न्याय मिळेल याची आपण खात्री बाळगू शकतो.

माझ्या मित्रा, मला खरंच वाटतं की तुम्ही थोडे थांबून ते पुन्हा हळूहळू वाचायला हवं. तुम्ही नुकतेच वाचलेले खरे असेल आणि ते खरे आहेच, तर तुमचे जीवन आनंदाने उफाळून येईल! जे लोक या ज्ञानाशिवाय प्रार्थना करतात त्यांचा आत्मविश्वास नसतो; ते प्रार्थना करतांना फक्त बडबड करतात. येशूने मत्तय 6:7-13 मध्ये याबद्दल सांगितले आहे.

तुम्ही प्रार्थना करता तेव्हा परराष्ट्रीयांसारखी व्यर्थ बडबड करू नका; आपण पुष्कळ बोललो म्हणजे आपले मागणे मान्य होईल असे त्यांना वाटते.

— मत्तय 6:7

"बडबड" या शब्दाचा अर्थ शब्द किंवा ध्वनींचा अर्थहीन गोंधळ उच्चारणे असा होतो. बहुतेक लोक अशी प्रार्थना करतात. त्यांना त्यांच्या न्यायाच्या अधिकाराची किंवा देवाने त्यांना त्याच्या राज्यात कायदेशीररित्या काय दिले आहे याची कल्पनाच नसते. तुमच्याकडे

आधीपासून असलेल्या एखाद्या गोष्टीबद्दल तुम्हाला भीक मागण्याची किंवा रडण्याची गरज नाही!

समजा एक पोलीस अधिकारी रस्त्यावर उभा आहे आणि एका ट्रकला थांबायला सांगत आहे, आणि तो रडून त्या ट्रकला थांबवण्याची विनंती करू लागतो . "कृपया, ट्रक, थांबा. माझ्यावर दया करा. प्लीज, प्लीज, थांबा." युनायटेड स्टेट्स आणि त्याच्या कायदेशीर व्यवस्थेचा हा सर्वात दयनीय आणि लज्जास्पद अपमान असेल. नाही, तो पोलीस अधिकारी स्थिर उभा राहून त्या ट्रकला थांबण्यास स्पष्टपणे सांगणार आणि तो ट्रक देशाच्या कायद्यानुसार आणि देशाच्या सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अधिकाऱ्याच्या पदा अनुसार दिलेल्या आदेशा मुळे थांबतो.

देवाकडे भीक मागणाऱ्या लोकांना देशाच्या कायद्याची किंवा त्यांच्या पदाची कल्पना नसते. ट्रक थांबवण्याची भीक मागणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने देशाचा अपमान करण्याचे कारण म्हणजे तो कायदा आणि अधिकार नसलेल्या राष्ट्राचे चित्रण करतो. अशा प्रकारच्या राष्ट्रात तुमच्याकडे फक्त अराजकता असेल. जेव्हा ख्रिस्ती व्यक्ति भीक मागते आणि भीक मागतच राहते, तेव्हा ते देवाचे राज्य कमकुवत असल्याचे, आणि त्या राज्याकडून उत्तर मिळू शकत नाही असे दर्शवितात. हे लोकांना देवाच्या इच्छेबद्दल किंवा त्यांना मदत करण्याच्या त्याच्या क्षमतेबद्दल शंका घेण्यास कारणीभूत ठरते, खऱ्या अर्थाने, ते जे मागत आहेत त्यावर त्यांचा आधीच हक्क आहे. भीक मागण्याच्या या विचित्र प्रकाराबद्दल येशू आपल्याला स्पष्ट उत्तर देतो—"थांबा!"

> *तुम्ही प्रार्थना करता तेव्हा परराष्ट्रीयांसारखी व्यर्थ बडबड करू नका; आपण पुष्कळ बोललो म्हणजे आपले मागणे मान्य होईल असे त्यांना वाटते. तुम्ही त्यांच्यासारखे होऊ नका, कारण तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता, तुम्ही त्याच्याकडे मागण्यापूर्वीच जाणून आहे. प्रभूने शिकवलेली प्रार्थना ह्यास्तव तुम्ही ह्या प्रकारे प्रार्थना करा :*

'हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानले जावो. तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.आमची रोजची भाकर आज आम्हांला दे; आणि जसे आम्ही आपल्या ऋण्यांसऋण सोडले आहे, तशी तू आमची ऋणे आम्हांला सोड; आणि आम्हांला परीक्षेत आणू नकोस;तर आम्हांला वाइटापासून सोडव.

-मत्तय 6:7-13

लक्षात ठेवा, या वचनात येशू आपल्याला प्रार्थना कशी करावी हे शिकवत आहे. दुर्दैवाने, बऱ्याच लोकांच्या घरात ही वचने एका सुंदर फ्रेम मध्ये भिंतीवर टांगलेली असतात पण त्यांना या वचनांचा अर्थ समजत नाही. ह्या शास्त्रभागाला प्रभूची प्रार्थना म्हणतात, परंतु तो आपल्या शिष्यांना त्या विशिष्ट शब्दांनी प्रार्थना कशी करावी हे शिकवत होता. आपण आपल्या चर्च मध्ये करतो त्याप्रमाणे तो त्यांच्या कडून अक्षरशः प्रार्थना करून घेत नव्हता. हे शब्द केवळ पाठांतर करण्यासाठी स्मृती वचने नव्हेत तर प्रार्थना कशी करावी आणि परिणाम कसे मिळवावेत यावरील सूचना पुस्तिका आहेत.

"तुझे राज्य येवो, तुझी इच्छा जशी स्वर्गात तशी पृथ्वीवरही पूर्ण होवो," ही प्रार्थना कशी करावी याविषयीची एक सूचना आहे. आपण प्रार्थना करायची आहे, स्वर्गातील देवाची इच्छा पृथ्वीच्या क्षेत्रात आणि आपल्या परिस्थितीत आणून. मग तुमचे उत्तर काय आहे? देव जे म्हणतो ते तुमचे आहे यावर विश्वास ठेवा आणि स्वर्गाच्या राज्यात तुमच्या अधिकाराचा वापर करून स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात आणा आणि तुम्हाला ज्याची गरज आहे आणि तुमच्या सभोवतालच्या लोकांच्या गरजा पूर्ण करा.

म्हणून क्षणभर थांबा आणि यावर विचार करा. तुमची प्रार्थना परिणामकारक आहे आणि संपूर्ण स्वर्ग तिच्या पाठीशी आहे हे जर तुम्हाला कोणतीही शंका मनात न ठेवता समजत असेल, तर तुम्ही प्रार्थना करता तेव्हा तुमचा आत्मविश्वास वाढेल का? होय!!! स्वर्गातील नागरिक म्हणून तुमचे कायदेशीर अधिकार नेमके काय आहेत हे जाणून घेतल्याने, तुम्हाला आधीच काय मुक्तपणे दिले गेले आहे हे जाणून घेणे आणि प्राप्त करण्याची प्रक्रिया समजून

घेणे आणि त्या कायद्यांचा लाभ घेत, तुम्ही जगण्याच्या संपूर्ण नवीन मार्गाने चालू शकता- राजमार्गावरून चालू शकता. घाबरून काय होणार? अनिश्चित राहून काय होईल? ते ज्ञान तुमच्या भविष्याबद्दल आत्मविश्वास आणि वादळाच्या वेळी आत्मविश्वास कसा निर्माण करेल? जेव्हा आम्ही हे शोधायला सुरुवात केली तेव्हा ड्रेन्डा आणि माझ्यावर राज्याचा हा प्रभाव होता. आम्ही जे पाहिले ते पाहून आम्ही अनेकदा थक्क झालो. नाही, मला ते पुन्हा सांगू द्या. आम्ही सतत आश्चर्यचकित आणि विस्मित होत गेलो! त्याहीपेक्षा, देवाने चर्चला पृथ्वीच्या क्षेत्रात आणि त्या सरकारच्या वतीने कार्य करण्यासाठी दिलेला अधिकार पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो.

> *कारण ख्रिस्त येशूमधील जीवनाच्या आत्म्याचा जो नियम, त्याने तुला पाप व मरण ह्यांच्या नियमापासून मुक्त केले आहे.*
>
> — रोमकारांस पत्र 8:2

आपल्याला "पाप आणि मृत्यूच्या नियमातून" मुक्त करण्यात आले आहे आणि आपल्याला राज्य देण्यात आले आहे आणि "जीवनाच्या आत्म्याच्या नियमात" प्रवेश मिळाला आहे हा शोध लागणे आम्हाला भावनाविवश करणारे होते. आणि आम्हाला त्याहूनही अधिक भावनाविवश करणारे म्हणजे, तो कायदा आपच्या जीवनात राज्याचे नीतिमत्त्व निर्माण करतो हे पाहणे होते.

देवाच्या राज्याने मला शारीरिकदृष्ट्या, तसेच भावनात्मक दृष्ट्या एका नवीन आशेने बरे होण्याची आणि अँटीडिप्रेससपासून मुक्त होण्याचे सामर्थ्य दिले. मला गरिबी आणि त्या 1800 च्या दशकातील मोडकळीस आलेल्या फार्महाउस चे $300 दरमहा भाडे देण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून बाहेर काढले आणि सुंदर अशा 59 एकर जमिनीवर 7,700 स्क्वेअर फुट चे घर बांधण्यास आणि ते देखील कर्जबाजारी न होता, अगदी पूर्ण रक्कम भरून बांधण्यास मदत केली. माझ्या पत्नीलाही मी आता आणखीणच जास्त आवडू लागलो! दररोज काहीतरी बिघाड न होणाऱ्या अगदी उत्तम प्रतीच्या कार मधून प्रवास करणे आमच्या साठी अमूल्य होते. सुवार्ता प्रसारासाठी शेकडो हजारो डॉलर्स देण्यास सक्षम असणे हा काही

वर्षांपूर्वी आमच्या साठी अगदीच अशक्य विचार होता. जीवन, राज्याचा प्रकाश, अंधाराला गिळून टाकत होता; आणि देवाने उत्पत्तिच्या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे त्याने आपल्या पूर्ण निर्मितीकडे पाहिले, आणि म्हटले "ते चांगले आहे!" तसेच मी सुद्धा आश्चर्यचकित होऊन स्तब्ध झालो आणि म्हणालो, "हे चांगले आहे, खरोखर खूप चांगले आहे."

ड्रेन्डा आणि मी इतके उत्साही होतो की देवाच्या राज्याबद्दल जो कोणी ऐकण्यास तयार असेल त्या प्रत्येकाला आम्ही त्याच्या राज्याबद्दल आणि आमच्या जीवनात देवाच्या राज्यामुळे काय घडले ते सांगत असू. आमच्या चर्चमधील लोकांना ते पटत होते आणि त्यांच्या जीवनात देखील आमच्यासारखेच परिणाम दिसून येत होते आणि त्या लोकांपैकी एक म्हणजे आमची स्वतःची 12 वर्षांची मुलगी होती. तिने देवाला खूप काही करतांना पाहिले होते आणि राज्याचे अतुलनीय नियम आमच्या जीवनात कार्य करत असल्याचे तिने वेळोवेळी पाहिले होते. मला माहित होते की ती ह्या नियमांचे निरीक्षण करत होती आणि त्या पासून शिकत होती, परंतु एका घटनेने मला स्पष्टपणे दिसून आले की ती खरोखर किती प्रमाणात शिकत आहे.

एके दिवशी मी रात्री तिला गुड नाईट म्हणायला तिच्या बेडरूममध्ये गेलो आणि मला त्या ठिकाणी काहीतरी वेगळेच असल्याचे जाणवले. तिच्या भिंतीवर पोमेरेनियन कुत्र्याचे चित्र होते. कोणत्याही आई वडिलांना आता हे कळून चुकले आहे कि, असे चित्र आपल्या लेकरांच्या बेडरूम मध्ये दिसले कि हे निश्चित चिन्ह आहे की त्यांच्या कडे कुत्र्याची मागणी केली जाणार आहे. मला घरामध्ये राहणार आणखी एक कुत्रा नको होता, म्हणून मी ह्या चिन्हाकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतला. कर्स्टनची बहीण पॉलीकडे आधीच एक इनडोअर कुत्रा होता आणि तो कुत्रा तिच्याच बेडरूम मध्ये राहत होता, त्यामुळे पॉलीचा कुत्रा, पॉली आणि कर्स्टनसोबत नेहमीच होता.

मी कर्स्टनला हळूवारपणे म्हणालो की माला तिचे चित्र फार आवडले पण अत मला घरात आणखी एक कुत्रा खरेच नको आहे. मी तिला म्हणालो कि जर तिला कुत्रा पाळायचा असेल तर तिने तिच्या बहिणीच्या डचशंडला स्वतःचा कुत्रा समजून त्याच्या सोबत खेळण्यात जास्त वेळ घालवावा. त्या रात्री कर्स्टन काहीच बोलली नाही, तिने शांतपणे मी जे बोललो

ते केवळ मान्य केले. मला वाटले की आता हे प्रकरण संपले आहे, परंतु नंतर अनेक वेळा पोमेरेनियचा मुद्दा संभाषणामध्ये पुढे येतच राहिला. ती कधी तरी मधेच म्हणायची "पोमेरेनियन असणे चांगले नाही का?" किंवा "ते खूप केसाळ आणि चपळ असतात." आणि मग, कर्स्टन ऑनलाईन काही फोटो बघायची आणि हळूच त्या पैकी एखादा फोटो मला देखील दाखवत असे. तेंव्हा मी तिला सहजपणे म्हणायचो, "नाही." ह्या घरात मी अधिकारी आहे आणि आम्ही घरात दुसरा कुत्रा ठेवणार नाही.

मला वाटले की कुत्र्या विषयीचे प्रकरण आता पूर्णपणे संपले आहे, परंतु एके दिवशी आम्ही चर्चमधून घरी आलो तेव्हा, कर्स्टन मोठ्या आत्मविश्वासाने माझ्याकडे आली तिच्या चेहऱ्यावर आनंद होता ती म्हणाली, "डॅड, आज मला विश्वासाने एक पोमेरेनियन पिल्लू मिळाले आहे. तुम्ही विश्वासाबद्दल जे शिकविता अगदी त्या प्रमाणे." मी तिला आणखी एक कुत्रा न ठेवण्या बद्दल मी पूर्वी जे बोललो होतो त्याची पुन्हा आठवण करून दिली. तिच्या चेहऱ्यावरचे हसू आणि आनंद न घालवता ती म्हणाली, "पण डॅड, आई म्हणते की देव तर राजाचे देखील हृदय बदलू शकतो." ती जे हे बोलली ते बंडखोरपणाचे नव्हते. ती फक्त प्रार्थनेमध्ये तिच्या आईशी सहमत झाली होती आणि त्या प्रमाणे त्यांनी प्रार्थना केली की देव माझे हृदय बदलेल. मला आता कळले की तिची आई आणि ती ह्या बद्दल बोलल्या होत्या आणि तिच्या आईने तिला प्रोत्साहित करून सांगितले होते की देव खरोखरच माझा विचार बदलू शकतो.

त्या प्रोत्साहनाच्या आधारावर, तिने त्या दिवशी सकाळी चर्चमध्ये आपला विश्वास मुक्त केला होता, त्या साठी पेरणी केली आणि कबूल केले की तिला विश्वासाने तो कुत्रा मिळाला आहे. मी खंबीरपणे तिला माझ्या प्रेमाची खात्री दिली आणि मी कुत्र्या बद्दल पूर्वी जे म्हटले होते ते तिला बजावून सांगितले, "आपल्या घरात दुसरा कुत्रा येणार नाही." मी तिला म्हणालो की मला ह्या बद्दल वाईट वाटते पण तसे होणार नाही. मी जे हे बोललो त्या बद्दल ती अगदी निश्चिन्त होती; ती हसत निघून गेली. पुन्हा एकदा, मला वाटले की आता तर हा मुद्दा शेवटी पूर्णपणे संपुष्टात आला आहे.

पण सुमारे एक महिन्यानंतर, मला मिसिसिपीमधील एका छोट्या चर्चमध्ये शिक्षण देण्या साठी आमंत्रित करण्यात आले. हे एका लहानश्या गावातील छोटेसे चर्च होते आणि ह्या चर्च च्या चहूबाजूला अनेक किलोमीटर पर्यंत मोकळे मैदान होते. पहिल्या रात्रीचे शिक्षण संपल्या नंतर, पाळक साहेब माझ्याकडे आले आणि म्हणाले की सेवेदरम्यान प्रभु त्यांच्या सोबत बोलला आहे. ते म्हणाले, "मला माहित नाही कि तुम्हाला हे ठाऊक आहे किंवा नाही परंतु मी पॉमेरियन कुत्र्यांचा व्यवसाय देखील करतो, आणि देवाने मला सांगितले आहे कि माझ्याकडे जे सहा महिन्यांचे पिल्लू आहेत त्या पैकी एक तुम्हाला द्यावेत, कारण आता त्यांच्या वयाप्रमाणे त्यांना कुणाच्या तरी घरी पाठवणे आवश्यक आहे." मी आवाक होऊन त्यांच्या कडे पाहतच राहिलो. मी अजूनही ते कुत्रे घेण्यासाठी तयार नव्हतो, म्हणून मी म्हणालो, "मी ह्या बद्दल तुम्हाला नंतर सांगतो." हे पाळक साहेब कोणत्या प्रकारचे कुत्रे पाळतात ह्या बद्दल मला काहीही कल्पना नव्हती, आणि कर्स्टनला कुत्र्याचे पिल्लू हवे आहे याबद्दल मी त्यांना पूर्वी किंवा आता ह्या सभेच्या वेळी काही एक बोललो नव्हतो.

शेवटी माझे ह्रदय तुटून गेले आणि काय घडले ते मी ड्रेंडाला सांगितले आणि तिला मी हे देखील म्हणालो कि मला हे कुत्रे अजिबात घरी घेऊन जायचे नाही. तिने माझ्याकडे पाहिले आणि म्हणाली, "तुम्ही आपल्या मुलीचा विश्वास नाकारणार आहात का?" ड्रेन्डाला देखील खरंच घरात दुसरा कुत्रा नको होता, पण दुसऱ्या कुत्र्यामुळे घरात होणाऱ्या कोणत्याही गैरसोयी कडे पाहता तिला कर्स्टन वरील तिचे प्रेम जास्त महत्वपूर्ण वाटले. आणि आता कर्स्टनच्या विश्वासामुळे देवाने कुत्रा दिला होता, तर आम्ही तिला तो देणे कसे नाकारू शकतो? म्हणून मी पास्टर ला सांगितले की मी तो कुत्रा घेईन.

आम्ही कर्स्टनला काहीच सांगितले नाही पण तिच्या बहिणीला सांगितले की ती जेंव्हा एअरपोर्ट वर आम्हाला घ्यायला येईल तेंव्हा कर्स्टन ला सुद्धा नक्की सोबत घेऊन यावे. कर्स्टन विमानतळावर आली आणि आम्ही तिला भेटलो तेंव्हा कुत्र्यासाठी आम्ही विकत घेतलेली छोटी ट्रॅव्हल केस तिला दिली. जेव्हा कर्स्टनने लहान पोमेरेनियनला पाहिले तेव्हा तिला अश्रू अनावर झाले. भोवतालचं सर्व वातावरण थांबलं. आजूबाजूची प्रत्येक व्यक्ती थांबून त्यांच्यासमोरील हे दृश्य पाहत होती. काही वेळातच आमच्याभोवती गर्दी जमली होती

कारण कर्स्टन त्या लहान पिल्लाला धरून रडत होती. ड्रेन्डा सर्वांना सांगत होती की हा कुत्रा आम्हाला कसा मिळाला आणि कर्स्टनने त्या कुत्र्यासाठी देवावर कसा विश्वास ठेवला होता.

त्या वेळेस मला समजले की जर तुम्ही तुमच्या हातात पिल्लू धरले तर तुम्ही विमानतळावर देखील संजीवनाची सभा करू शकता. सर्व लोकांना त्या पिल्लाला पाहायचे होते आणि विमानतळावर आमच्या भोती जमा झालेले सर्व लोक कर्स्टन सोबत रडत होते, अगदी TSA अधिकारी देखील रडत होते. या वेळी, मला वाटले कि मी एक भयानक वडिल आहे. जेव्हा मी पहिले कि त्या पिल्लामुळे माझ्या मुलीला किती आनंद मिळाला आहे आणि तिच्या विश्वासामुळे देव तो कुत्रा तिच्या जीवनात कसा घेऊन आला आहे हे पाहिले तेव्हा मला वाटले की मी तिच्यासाठी इतकी मौल्यवान असलेल्या गोष्टीच्या विरोधात मी का होतो? तिने त्याचे नाव शेक्सपियर ठेवले, तो फारच मोहक होता. तो आमच्या कुटुंबाचा फार महत्वपूर्ण भाग बनला. तो जरी स्वतः आपल्या इच्छेप्रमाणे स्वतंत्र राहू शकणार लहान कुत्रा होता, तरीही तो रात्रंदिवस कर्स्टनच्या मागे, ती जिथे जिथे जाईल त्या प्रत्येक ठिकाणी जाऊ लागला.

जरी ही एक हृदयस्पर्शी कथा असली तरी, मला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे ज्याचे उत्तर देणे आवश्यक आहे आणि हाच खरोखरच या पुस्तकाचा उद्देश आहे. तो कुत्रा कसा प्राप्त झाला? याआधी मला कुणीही कधीच कुत्रा देऊ केला नव्हता. आणि ज्या कुत्र्यासाठी माझ्या मुलीने आपला विश्वास मुक्त केला होता तोच तो कुत्रा होता हे कसे शक्य झाले? हे अनपेक्षितपणे झाले होते का? नाही, अजिबात नाही. माझ्या कौटुंबिक जीवनात निर्माण होणाऱ्या राज्याचा आणि त्यावर नियमन करणाऱ्या कायद्यांचा तो थेट परिणाम होता. विश्वास ठेवणाऱ्या आणि पृथ्वीच्या क्षेत्रात राज्याचा अधिकार मुक्त करणाऱ्या प्रत्येकासाठी जे प्रत्येक वेळी घडेल तसेच ते आमच्या कुटुंबा साठी देखील झाले. देवाच्या राज्याने त्या कुत्र्याला उत्पन्न केले हे आपण मान्य करू शकतो. पण ते कसे केले? असे कोणते कायदे होते जे कार्यान्वित झाले ज्यामुळे हे सर्व अस्तित्वात आले? आशा आहे की, या पुस्तकातून आपल्याला काही स्पष्ट उत्तरे मिळतील जी आपल्याला देवाच्या राज्याचा आनंद कसा घ्यावा हे जाणून घेण्यास मदत करतील. शेवटी, तुम्ही त्या राज्याचे कायदेशीर अधिकार आणि फायदे प्राप्त करू शकणारे नागरिक आहात! पण प्रथम मी तुम्हाला आमच्या कौटुंबिक जीवनातील राज्याचे आणखी एक उदाहरण देऊ इच्छितो.

अध्याय 4

विशालकाय मासा

ड्रेंडा आणि मी देवाच्या राज्याबद्दल आणि पृथ्वीच्या क्षेत्रात आपल्याकडे असलेल्या अधिकाराविषयी शिकलो, तेव्हा आम्हाला या वस्तुस्थितीची अधिकाधिक जाणीव होत गेली की आपण कसे जगायचे हे आपण स्वतःच निश्चित करत असतो. देवाच्या राज्याने आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर प्रभाव पाडला, परंतु त्यासाठी आम्हाला आमच्या जीवनात आवश्यक असलेल्या किंवा हव्या असलेल्या तरतूद मुक्त करणे आवश्यक होते. हे आपल्या आपण घडले असे नाही. आमच्या मुलीच्या लहान कुत्र्याप्रमाणे, राज्याच्या अधिपत्याखाली आणण्यासाठी कोणतीही बाब लहान किंवा कमी महत्वपूर्ण नाही. जेव्हा आम्हाला हे समजले तेव्हा आमच्यासाठी अशक्य किंवा शक्यतेच्या बाहेर असे काहीही नव्हते. माझ्या आयुष्यातील अधिकतर काळात, मला हे खरोखरच समजले नव्हते की देवाने आपल्याला राज्य दिले आहे, त्याचे संपूर्ण राज्य आनंद घेण्यासाठी दिले आहे. त्यामुळे आमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रावर, अगदी लहान-लहान बाबी ज्या फार जास्त आवश्यक नाहीत त्यांवरही राज्याचा प्रभाव पाहणे आनंददायक होते. याचे उदाहरण पुढील कथेद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. मी याला विशालकाय मास्याची कथा असे म्हटले आहे.

आमचे कुटुंब अलास्कामध्ये सुट्टीवर असताना हे घडले. आम्ही त्या ठिकाणी सुट्टी साठी गेलो होतो हे माझ्यासाठी एक स्वप्नच होतं. आम्ही विमानाने अँकरेजमध्ये उतरलो आणि तीन आठवड्यांसाठी एक RV भाड्याने घेतली आणि पश्चिम किनारपट्टीच्या बराचश्या भागात फिरलो. हा भाग अगदीच सुंदर होता! एके दिवशी आम्ही केनाई द्वीपकल्पात फिरत असताना, एका चार्टर बोटीबाहेर रॅकवर एक मोठा मासा लटकलेला आम्हाला दिसला. बहुतेक चार्टर

बोटी नुकत्याच आल्या होत्या; आणि बंदराच्या वरच्या आणि खालच्या भागात, असे मोठे मासे आढळून येत होते. असे वाटत होते कि ते मासे धडपडत पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. मी यापूर्वी कधीही हलिबट मासे पाहिले नव्हते आणि ते कसे असतात किंवा असे मासे असतात हे देखील मला माहित नव्हते, परंतु ते मासे फारच मोठे होते. आम्हाला हे पाहून आश्चर्य वाटले कि प्रत्येक चार्टर कंपनी त्या दिवशी हलिबट मासे पकडण्याची जाहिरात करत होते. अचानक, माझी पत्नी माझ्याकडे वळली आणि म्हणाली, "मला देखील एक हलिबट पकडायचा आहे आणि मला त्या कॅप्टनसोबत तो पकडायचा आहे." तिने हलिबट फिशिंग चार्टरची जाहिरात करणाऱ्या चिन्हाकडे इशारा करुन म्हटले, आणि त्या चार्टर वर माशांचे ख्रिश्चन चिन्ह होते.

ते ऐकून तर सर्वात आधी तर मला धक्काच बसला! "तुला हलिबट पकडायचे आहे?" तिने यापूर्वी कधीच मासेमारीची इच्छा व्यक्त केली नव्हती. पण तिने हट्ट केला म्हणून आम्ही त्या ऑफिसमध्ये गेलो. ऑफिसचे कर्मचारी दुसऱ्या ग्राहका सोबत व्यस्त होते, म्हणून आम्ही बुलेटिन बोर्डवर लोकांनी लिहिलेल्या टिप्पणी वाचून वेळ घालविण्याचा प्रयत्न करत होतो. आम्हाला एक चिन्ह दिसले जे सध्या सुरु असलेल्या हलिबट डर्बीबद्दल होते, परंतु त्या मध्ये हा देखील संकेत होता कि ही डर्बी लवकरच बंद होणार आहे. ते काय आहे हे आम्हाला स्वतःला माहित नव्हते, आणि शक्यता आहे कि तुम्हाला देखील त्या बद्दल माहिती नसणार, म्हणून मी तुम्हाला स्पष्ट करुन सांगतो कि ते काय आहे. हलिबट डर्बी ही सर्व चार्टर कॅप्टन मध्ये महिनाभरात सर्वात मोठी हलिबट पकडण्याची स्पर्धा असते आणि आजतागायत आहे. विजेत्याला एका रकमेचा चेक मिळत असे आणि पेपरमध्ये त्याचे चित्र छापल्या जात असे. ड्रेन्डा आणि मी डर्बीत प्रवेश करण्याबद्दल एकमेकांशी बोललो कारण नाहीतरी आम्ही त्या ठिकाणी फिरायला आलो होतो. डर्बी मध्ये प्रवेश शुल्क फार थोडी रक्कम होती; आणि त्या नंतर जो पुढील वृत्तांत मी सांगणार आहे तो घडला.

ड्रेंडा, माझी प्रिय, अतिशय नाजूक पत्नी माझ्याकडे वळून म्हणाली की तिने निश्चय केला आहे की त्या डर्बी मध्ये भाग घेऊन ती जिंकायचीच आहे म्हणजे मग ह्या कॅप्टन चा व्यवसाय इतर कॅप्टन पेक्षा अधिक नावाजल्या जाईल आणि वाढू लागेल, कारण तो ख्रिश्चन आहे आणि

त्या मुळे देवाला गौरव मिळेल. म्हणून जेव्हा डेस्कवर साइन अप करण्याची आमची पाळी आली, तेव्हा ड्रेंडाने धैर्याने घोषित केले की ती हॅलिबट डर्बी जिंकणार आहे जेणेकरून देवाला गौरव मिळेल आणि त्या कॅप्टनच्या व्यवसायाला अधिक मान्यता मिळेल कारण तो ख्रिस्ती आहे. त्याला काय वाटले असेल याची आपण कल्पना करू शकता. आपल्याला माहित आहे कि, सर्वांनाच हलिबट डर्बी जिंकायला आवडते; आणि मला खात्री आहे की त्याने हे अनेक पर्यटकांकडून ऐकले असेल कि मी ही डर्बी जिंकणारच आहे, आणि सर्वांनीच जरी असे म्हटले नसेल तर त्याच्या कडे येणाऱ्या काही पर्यटकांनी तर नक्कीच असे म्हटले असेल. पण, मला खात्री आहे की त्यापैकी कुणीही असे म्हटले नसेल कि आम्ही ही डर्बी देवाचे गौरव व्हावे म्हणून जिंकणार आहोत.

डर्बीबद्दल ड्रेंडाने जी टिप्पणी केली त्याबद्दल तो जास्त काही बोलला नाही. आम्ही बाहेर जाऊन मासेमारीला सुरुवात केली, आम्ही हलिबट पकडू लागलो आणि ड्रेन्डा कॅप्टनला, जो मालक देखील होता, विचारत राहिली कि डर्बी जिंकण्यासाठी हलिबट किती मोठा असावा. आणि तो फक्त एवढेच म्हणायचा की तिने नुकतेच जो हलीबट पकडला आहे त्या पेक्षा तो मोठा असणे आवश्यक आहे, त्यामुळे प्रत्येक वेळी मासा पकडल्या नंतर ती हा प्रश्न विचारात राहिली. म्हणून जेव्हा तिने 40-पाऊंडचा मासा पकडला तेव्हा तो म्हणाला की तो जिंकण्या साठी पुरेसा मोठा नाही. जेव्हा तिने 70-पाऊंडचा मासा पकडला तेव्हा तो देखील स्पर्धा जिंकण्या साठी पुरेसा मोठा नव्हता. हलिबट खाण्यासाठी किती चांगले आणि चविष्ट असतात हे सर्वांनाच ठाऊक आहे, म्हणून आम्ही जे मासे पकडले होते ते घरी पाठवायचे ठरवले होते. एक व्यक्ती केवळ दोनच मासे ठेऊ शकत होता, ती नियमाप्रमाणे मर्यादा होती, म्हणून आम्ही 70-पाउंड चा मासा ठेवला.

दिवस उलटून संध्याकाळ झाली आणि आता अंधार देखील पडू लागला होता. माझा मुलगा टॉम, मुलगी पॉली, आणि मी, आम्हा सर्वांकडे मर्यादे प्रमाणे दोन दोन मासे होते. माझी इतर दोन मुले, एमी आणि टिमला एका परिषदेत सहभागी व्हावयाचे होते म्हणून ते लवकर घरी गेले त्यामुळे ते मासेमारीच्या ठिकाणी आमच्यासोबत नव्हते. ड्रेन्डाकडे देखील तिचा 70-पाऊंडचा मासा होता, परंतु आमच्याकडे जे मासे होते त्यापैकी एकही डर्बी जिंकण्या

साठी योग्य नव्हता. पण ड्रेन्डाला अजूनही आत्मविश्वास होता की ती सर्वात मोठा मासा नक्कीच पकडेल. संध्याकाळ होऊन प्रकाश अंधुक होऊ लागला तेंव्हा, कॅप्टनने आम्हा सर्वांना आमचे खांब पुन्हा आत घालण्यास सांगितले कारण गोदीकडे जाण्याची वेळ झाली होती. कॅप्टन आम्हा सर्वांना आमचे खांब काढून आत ठेवण्यास आणि इतर सर्व सामान आत ठेवण्यास मदत करत होता परंतु ड्रेंडाने त्याच्या ऑर्डरकडे दुर्लक्ष केले. तिने आणखी काही मिनिटांची तिला वेळ द्यावी म्हणून कॅप्टन ना आवर्जून विनंती केली कारण तिने पुन्हा घोषित केले की ती हलिबट डर्बी जिंकणारा मासा पकडणार आहे. कॅप्टनने काही मिनिटे वाट पाहिली आणि शेवटी तो ड्रेंडा च्या दिशेने जात असतांना म्हणू लागला, "मला माफ करा, पण आपल्याला आता खरोखर परत गेलेच पाहिजे."

तो तिच्या खांबापर्यंत पोहोचण्यापूर्वीच अचानक परिस्थिति बदलली. साहजिकच हा एक मोठा मासा होता कारण रॉड वाकला होता आणि रॉड च्या वाकण्या मधून आवाज येऊ लागला होता. कॅप्टनने मासा किती मोठा आहे हे जाणून घेण्यासाठी खांब वर केला आणि मान्य केले की तो खरोखरच मोठा मासा आहे पण तो म्हणाला कि तो शार्क आहे. तो म्हणाला की तो मास्याचा खिचाव कसा आहे ह्यावरूनच तो सांगू शकतो कि तो मासा कोणता आहे. ड्रेंडाला तो मासा वर ओढून काढायला बराच वेळ लागला. 300 फूट खाली असलेल्या त्या माशाला तळापासून वर काढण्यासाठी तिची सर्व शक्ती पणाला लागली. मासा बाहेर आल्यावर, सर्वांनीच पाहिले की तो खरोखरच खूप मोठा हलिबट होता, तो ड्रेंडापेक्षा ही मोठा होता.

मासा बोटीवर खेचण्याचा प्रयत्न सुरु होता, त्यावेळी कॅप्टन म्हणाला हा मासा तर खूपच मोठा आहे त्यामुळे त्याला साधारणपणे खेचून नावेत जिवंत ओढून घेणे शक्य होणार नाही, असे करतांना तो सुटण्यासाठी धडपड करणार; आणि तो इतका मोठा असल्यामुळे एखाद्या व्यक्तीला इजा होऊ शकते किंवा बोटीला नुकसान होऊ शकते. त्याच्याकडे एक खास यंत्र होते जे अशा मोठ्या मास्यांसाठी डिझाइन केलेले होते. या प्रॉडवर एक छोटासा स्फोटक बिंदू होता जो माशाच्या डोक्यावर दाबल्यावर त्याचा विस्फोट होऊन मासा मरत असे. कॅप्टनने त्या मोठ्या माशाच्या डोक्यावर प्रॉड ठेऊन दाबला विस्फोटक बाहेर आले, परंतु त्याच क्षणी मासा जोरात हालल्या मुळे नेम चुकला.

त्या आवाजाने मासा त्याच्या सर्व ताकदीने पुन्हा तळाशी गेला. रॉड 300 फूट खाली वाकला आणि त्या मधून वाकण्याचा आवाज आला. आम्हाला भीती वाटत होती की आता रॉड माशाला धरून ठेवणार नाही किंवा मासा इतक्या वेगाने तळाशी गेल्या मुळे रॉड चे हुक निसटून जाईल आणि मासा हाती लागणार नाही. त्यामुळे ड्रेंडाला तो मोठा मासा पुन्हा वर खेचावा लागला. तिने त्या माशाला एकदा फार मेहनत करून वर काढले होते म्हणून ती आता पुन्हा त्याला बाहेर काढण्या साठी आतुर होती; म्हणून मी माझे हात तिच्याभोवती ठेवले, तिच्याबरोबर रीलवर माझा हात ठेवला आणि आम्ही दोघांनी हळू हळू त्या माशाला पुन्हा पृष्ठभागावर घेऊन आलो. यावेळी कॅप्टनने देखील त्या मास्याला बोटीत व्यवस्थित घेतले, आणि आम्ही सर्वजण त्याचा आकार पाहून आश्चर्यचकित झालो.

आम्ही त्या विशाल हलिबट मास्याला शहराच्या चौकात नेले त्या ठिकाणी त्याचे वजन करण्याइतका मोठा वजनकाटा होता. या माशाचे वजन 123 पौंड होते आणि ते ड्रेन्डापेक्षा लांब होते. त्याचे वजन करणाऱ्या माणसाने सांगितले की, ह्या वर्षीचा स्पर्धेतील हा सर्वात मोठा मासा होता; पण स्पर्धेला अजून दोन आठवडे बाकी होते, त्यामुळे हा मासा स्पर्धा जिंकेल की नाही हे आम्हाला नक्की माहीत नव्हते. पण आश्चर्य म्हणजे, एके दिवशी ड्रेंडाच्या नावाचा चेक आला आणि पेपरमध्ये तिच्या चित्रासह वर्तमानपत्रातील लेखाची प्रत देखील आम्हाला मिळाली. ते सर्व पाहून आम्ही रोमांचित झालो.

देवाच्या राज्याने पुन्हा काम केले! आणि मला पुन्हा प्रश्न विचारायचा आहे, “तिने तो मासा कसा पकडला?” आमच्या वैवाहिक जीवनात मी तिला फक्त दोनदाच मासेमारी करतांना पाहिले आहे आणि मासेमारी करने खरे तर तिची आवड देखील नव्हती. मला अजूनही हा विचार करून आश्चर्य वाटते की ती हलिबट पकडण्या साठी तयार कशी झाली. पण तसे करण्या साठी तिच्या कडे तिची आपली कारणे होती; तिला त्या डर्बी विजेत्या मास्याला पकडणार ह्याची खात्री होती! आणि तिने तसे केले. आम्ही अलास्कामध्ये तेथील कॅप्टन सोबत बोलत असतांना, आम्हाला देवाच्या राज्याबद्दल आणि आम्ही तो मासा कसा पकडला याबद्दल त्याच्याशी शेअर करण्याची संधी मिळाली. आम्ही पकडलेला मासा जरी अजून अधिकृत विजेता नसला तरी, त्या दिवशी आम्ही कॅप्टन सोबत आपले संभाषण

संपवून निघालो तेंव्हा, त्या मास्याने त्याचे लक्ष वेधून घेतले कारण तो मासा होताच इतका मोठा. आणि अर्थातच, शेवटी तोच मासा विजेता झाला.

तुम्हाला वाटेल की आमची, किंवा खऱ्या अर्थाने ड्रेंडाची, मोठ्या माशाची कथा इथेच समाप्त झाली. मला माहित आहे की लोक म्हणतील की ती तो मासा पकडण्यात भाग्यवान होती, पण दोन वेळा असे होणे शक्य आहे काय? ठीक आहे तर मग, सुमारे पाच वर्षांनंतर, ड्रेन्डा आणि मी आमच्या एका पाद्री मित्राला अलास्कामध्ये सॅल्मन ची मासेमारी करण्यासाठी आमंत्रित केले होते. आम्ही मागील वेळेस सहकुटुंब RV सहलीला गेलो होतो तेव्हापासून आम्ही त्या ठिकाणी परत गेलो नव्हतो आणि खरेतर तेव्हापासूनच त्या ठिकाणी परत जाण्याचे निमित्त शोधण्याचा प्रयत्न करत होतो. आम्ही पुन्हा एक RV भाड्याने घेतली आणि त्या वेळी सॉकी (निळ्या पाठीचा सॅमन मासा) भरपूर प्रमाणात असल्याने सॅमन ची मासेमारी करण्याची योजना आखली. आणि आम्ही सॅमन पकडत असतांना, आमची चर्चा हलिबट मासेमारी आणि ड्रेंडा ने तो मासा कसा पकडला ह्या वर गेली. आमच्या मित्राने यापूर्वी कधीही हलिबट मासेमारी केली नव्हती, म्हणून आम्ही म्हणालो, “बरं, चला मग आपण त्या ठिकाणी जाऊया.” आम्ही ठरवले की ज्या ठिकाणी ड्रेंडा ने तो विशाल मासा पकडला होता त्याच ठिकाणी आणि जर तो अजूनही व्यवसायात असेल तर त्याच कॅप्टन कडे जायचे.

तो कॅप्टन ज्या ठिकाणी होता त्या ठिकाणी आम्ही गेलो तेव्हा तो आता तिथे नव्हता असे आम्हाला दिसले आणि आम्हाला वाटले की कदाचित आम्हाला दुसरा कैप्टन वापरावा लागेल. परंतु तसे करण्याआधी, आम्ही विचार केला की आपण त्याचे नाव इंटरनेट वर शोधून पाहण्याचा प्रयत्न करावा, कारण आम्हाला त्याच्या बोटीचे किंवा कंपनीचे नाव आठवत नव्हते. काही शोध घेतल्यानंतर, आम्हाला पाच वर्षांपूर्वीच्या ड्रेंडाच्या माशाच्या चित्रासह वर्तमानपत्रातील लेखाची प्रत सापडली. त्यात बोट आणि कंपनीच्या नावाचा उल्लेख होता, त्यामुळे आम्ही लगेच एक फोन कॉल केला, आणि सर्व काही एका क्षणात व्यवस्थित झाले. ती कंपनी खरंच अजूनही व्यवसायात होती परंतु त्यांनी आपला व्यवसाय त्या ठिकाणावरून हलवून सुमारे पाच मैल दूर पुढे सुरु केला होता.

त्या कॅप्टन चे ऑफिस ज्या ठिकाणी होते तिथे आम्ही पोहचलो, डेस्कवरील बाई, जी कॅप्टन आणि मालकाची पत्नी होती, तिने वर पाहिले आणि मोठ्या आनंदाने म्हणाली, "हलीबट विजेता!" मोठ्या हलिबटबद्दल आणि गेल्या पाच वर्षांपासून काय चालले आहे याबद्दल आम्ही काही मिनिटे बोलण्यात घालविली. हे आर्थिक मंदीच्या काळातील गोष्ट होती आणि व्यवसाय इतका चांगला होत नव्हता. ती म्हणाली की लोक आता जास्त प्रवास करत नाहीत आणि मासेमारीवर पैसे खर्च करत नाहीत, आणि त्यामुळे तिचा नवरा निराश झाला होता. आम्ही तिला देवाच्या राज्याची आठवण करून दिली आणि तिने सांगितले की तिच्या पतीला देवाची सेवा करण्यात मुळीच रस नाही.

आम्ही बोटीवर चढलो तेव्हा त्याला देखील ड्रेंडा आणि तो मोठा मासा आठवला. ड्रेन्डा त्याच्याकडे गेली आणि मासेमारी कशी सुरु आहे विचारले आणि त्याने सांगितले की डर्बीसाठी तिने पकडलेल्या मोठ्या माश्यांची मासेमारी ते आता करत नाहीत पण लहान मासे पकडत आहेत. पण तो म्हणाला की या भागात मोठे मासे राहत नाहीत कारण हा भाग फार उथळ आहे, त्याने पुढे सांगितले की ज्या ठिकाणी तो पूर्वी मासेमारी करत होता, ज्या ठिकाणी ड्रेंडा ने डर्बीचा विजेता मासा पकडला होता ती जागा फार खोल होती पण त्या ठिकाणी जास्त प्रमाणात शार्क मासे होते आणि त्यामुळेच त्याने आपला व्यवसाय आता ज्या ठिकाणी आहे तिथे हलवला होता. शार्क हे माश्यांना पकडण्या साठी टाकलेले आमिष तळापर्यंत पोहोचण्याआधीच गिळंकृत करतात आणि त्यामुळे मासे पकडण्याचे आमिष विकत घेण्यासाठी त्याला खूप पैसे खर्च करावे लागत होते आणि त्या मध्ये खूप वेळ देखील वाया जात होता.

म्हणून आम्ही त्याला विचारले की या नवीन भागात ते कोणत्या आकाराचे मासे पकडत आहेत, आणि त्याने सांगितले की त्याने एका महिन्यात 20 ते 30 पौंडांपेक्षा मोठा मासा पाहिला नाही. तेव्हा ड्रेंडाने त्याच्याकडे बघितले आणि म्हणाली, "ठीक आहे, मी आज एक मोठा मासा पकडणार आहे, जो तुम्ही बऱ्याच काळापासून पाहिला नाही, म्हणजे तुम्हाला कळेल की देव विश्वासू आहे." पण त्याने तिची चेष्टा केली. दिवसभर आम्ही कॅप्टनने म्हटल्याप्रमाणे

20-पाऊंडचेच मासे पकडत होतो आणि ते पाहून कॅप्टन दिवसभर ड्रेंडाला तिने जे म्हटले होते त्या "मोठ्या माशा" बद्दल टोमणे मारत राहिला. मागील ट्रिपची ही पुनरावृत्ती होती.

दिवस संपत आला तेंव्हा, कॅप्टनने आम्हांला सर्व खांब उखडून टाकण्यास सांगितले आणि ह्यावेळेस देखील ड्रेंडाने त्याच्या बोलण्या कडे लक्ष दिले नाही, तिने त्याला म्हटले की तिला मोठा मासा पकडण्यासाठी फक्त एक किंवा दोन मिनिटे लागतील. कॅप्टन एक मिनिट थांबला पण नंतर तिला म्हणाला की आता त्याला जायचे आहे. त्याच क्षणी तिचा फिशिंग रॉड खाली वाकला आणि खूप लांबलचक गोष्ट सांगण्यापेक्षा एवढेच सांगेन कि, तिने 70-पाऊंड वजनाचा मासा पकडला. ते पाहून कॅप्टनला पुन्हा आश्चर्य वाटले.

मासेमारी केल्यानंतर जेव्हा आम्ही एका रेस्टॉरंटमध्ये गेलो तेव्हा आम्ही एका चार्टर कॅप्टनशी बोललो तो तिथे जेवण करत होता. जेव्हा त्याने ऐकले की ड्रेंडाने 70-पाउंडच मासा पकडला आहे, तेव्हा त्याचा विश्वासच बसला नाही. तुम्ही कुठे मासेमारी करत होता; आत किती दूर गेला होता? तो मोठा मासा आम्ही कुठे पकडला हे त्याला जाणून घ्यायचे होते. आम्ही रेस्टॉरंटमधून बाहेर पडल्यानंतर, आम्हाला आणखी एकदा चार्टरवर जाऊन ड्रेंडा ने पकडलेला मासे घरी पाठवण्यासाठी कागदपत्रांवर सह्या करायच्या होत्या.

चार्टर कॅप्टन ला नमस्कार करून तिथून जाण्या पूर्वी पुन्हा एकदा त्याला देवाच्या राज्याबद्दल सांगण्याची संधी आम्हाला मिळाली. मी कॅप्टनकडे बघितले आणि म्हणालो, "तिने ते दोन मासे कसे पकडले ह्या बद्दल तुला खरोखर समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देवाच्या राज्याचे कायदे पैशासाठी देखील काम करतात." यावेळी तो आमच्या बोलण्याकडे लक्ष देत होता आणि त्याला त्यामध्ये रुची उत्पन्न होऊ लागली होती. आम्ही त्याला माझे पुस्तक, फिक्सिंग द मनी थिंग दिले आणि तिथून निघालो.

हे दोन मासेपकड़ने केवळ एक संयोग होता की ते देवाच्या राज्याच्या कायद्याचे परिणाम होते? हे तुम्हीच ठरवा, पण ड्रेंडाने आणि मी आधीच ठरवले आहे. मासेमारीच्या सहलींपासून, कर्जमुक्त होणे किंवा बरे होणे, ह्या विषयी देवाच्या राज्याबद्दलचा आमचा अनुभव रोमांचक आणि जीवन बदलणारा होता. इतरांना देखील आमच्या प्रमाणे राज्याचा अनुभव येत आहे. एका महिलेने ड्रेंडा च्या अनुभवाची कथा ऐकली आणि तिने हे पत्र लिहिले.

गॅरी आणि ड्रेन्डाला शुभेच्छा,

ड्रेंडाने स्पर्धे मधे हलिबट कसे पकडले त्या विषयी तुमच्या पुस्तकात वाचल्यानंतर, मी देखील माझी फिश स्टोरी तुमच्यासोबत शेअर करावी असे मला वाटले. आम्ही अलीकडेच कोको बीच/केप कॅनवेरल, फ्लोरिडा येथे सहकुटुंब सुट्टी घालविण्या साठी गेलो होतो. माझे पती, रॉबर्ट, ची इच्छा होती कि खोल समुद्रातील मासेमारी बोटीवर जायचे आणि काही मासे पकडून, कोलोरॅडोला आपल्या घरी परत घेऊन जायचे. आम्ही काही महिन्यांपासून सहलीचे नियोजन करत होतो, म्हणून जेव्हा त्याने मला सांगितले की त्याला मासेमारीला जायचे आहे, तेव्हा मला फारच आनंद झाला आणि मी म्हणाले, "चला आपण जाऊ या! आणि देवावर विश्वास ठेवूया कि तो आपल्याला खूप मोठा मासा पकडण्यास मदत करेल!" मी बॉबला विचारले की फ्लोरिडामध्ये आपण ज्या ठिकाणी मासेमारी करणार आहोत तेथे कोणत्या प्रकारचे मासे उपलब्ध आहेत. त्याने मला त्या ठिकाणी असणाऱ्या सर्वच माश्यांची नावे सांगितली त्यापैकी, मी विशाल लाल स्नॅपर पकडला जावा म्हणून प्रार्थना करणे आणि विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतला.

मासेमरीचा तो दिवस आला आणि आम्ही बोट कॅप्टन आणि क्रू कडून आमच्या सूचना मिळण्याची वाट पाहत होतो. मी निश्चितपाने दावा करत होते की मी एक विशाल रेड स्नॅपर पकडणार आहे, अणि जेंव्हा कैप्टन ने बोलायला सुरवात केली तेंव्हा माझा उत्साह वाढला. पण नंतर कॅप्टन ने जे म्हटले ते ऐकून मी निराश झाले, तो म्हणाला की सध्या आपण बास, फ्लाउंडर आणि रेड स्नॅपर हे मासे आपण ठेवू शकणार नाही! ओह, मला वाटलं; आता विश्वास ठेवण्यासाठी काय उरले आहे?

पण तरीही, माझा विश्वासाचे कार्य होण्याची ही संधी मी सोडणार नव्हते. मी म्हणाले, "प्रभु, मी विश्वास ठेवला आहे की मी एक विशाल लाल स्नॅपर पकडणार आहे, आणि तसेच होवो, मी तो रेड स्नॅपर तर पकडणारच आहे आणि त्या शिवाय इतरही काही मासे मी घरी घेऊन जाणार आहे!

म्हणून बोटीवर असताना, मी माझ्या 8 वर्षांच्या मुलीकडे, रेचलला म्हणाले, “लक्षात ठेव की तू देवाकडे प्रार्थना करून हा विश्वास ठेवू शकतेस की तू आज मासा पकडणार आहे. तुझा असा विश्वास आहे का?” तिने हसून मान हलवली. मी माझ्या २१ वर्षांच्या मुलीला, जॉर्डनला प्रोत्साहनाचे तेच शब्द सांगितले. तिने माझ्याकडे पहिले आणि तिच्या नजरेत आश्चर्य होते, पण नंतर तिने होकार दिला. मी बॉबकडे पाहिले आणि म्हणाले, “चला आपण एक मोठा मासा पकडणार आहोत यावर विश्वास ठेवूया!”

काही तास निघून गेले आणि आम्ही ज्या ठिकाणी होतो तिथे आम्हाला काहीही यश मिळाले नाही. मग अचानक, रेचेलच्या फिशिंग रॉड ला धक्का बसला आणि ती खूप उत्तेजित झाली. तिने वडिलांना मदतीसाठी हाक मारली. काही मिनिटांनंतर, त्यांनी अटलांटिक शार्कला नावेमधे ओढले! व्वा, रेचल ला विश्वासाचे प्रतिफळ मिळाले! म्हणून आम्ही तिचे कौतुक केले. उत्तम ट्रूपर आहेस तू!

मला आठवतंय की आता मला काही मिळणार नाही असं वाटायला लागलं होतं, पण मी तो नकारात्मक विचार थांबवला आणि विश्वास दृढ केला की मला मासा मिळालेलाच आहे. मी खाली बसले आणि शांत झाले आणि देव काय म्हणतो ते ऐकू लागले, “तू जर थोडी शांत झालीस आणि तुला जो मासा पकडायचा आहे तो मला तुझ्या पर्यंत आणू दिलास तर तो तुला लवकर मिळेल.” होय, मला माहित आहे की मला मासेमारी करणे अजिबात येत नाही, मी कोणत्याही प्रकारे मासेमारी करणारी व्यक्ती नाही, म्हणून मी माझ्या स्वतःच्या कौशल्यांवर अवलंबून राहूच शकत नव्हते. मी खाली बसले आणि देवावरील आत्मविश्वासाचा दीर्घ श्वास घेतला आणि वाट पाहू लागले. सुमारे 20-30 मिनिटांनंतर, मला माझ्या फिशिंग रॉड ला काहीतरी अडकल्याचा भास झाला; मला वाटले की ती काहीतरी वस्तू असावी, परंतु नंतर पहिले तर तो एक मासा असल्याचे दिसून आले.

माझे पती रील कसे ओढायचे ते मला शिकवू लागले आणि नंतर कॅप्टन देखील माझ्या मदतीला आला. मी फिशिंग रॉड रिलिंग करत असतांना तो मला म्हणाला की माझ्या रॉड ला कदाचित एक मोठा स्नॅपर अडकला आहे. मासा पाण्याच्या बाहेर

येऊन तो दृष्टीला दिसण्या आधीच त्याला तो कोणता मासा आहे हे माहित होते हे ऐकून मला फारच आश्चर्य वाटले! आणि मग, मी रील खेचत राहिले, थोड्या वेळातच माझा 20-पाऊंडचा मोठा रेड स्नॅपर बाहेर आला! मी खूप आनंदाने आणि उत्साहाने देवाचे आभार मानू लागले. मला आता खात्री झाली की विश्वास कसा ठेवायचा आणि त्या मध्ये स्थिर कसे राहायचे ह्याच्या प्रशिक्षणात मी एक प्रगती केली होती. मला फक्त ड्रेंडा ने कसा विश्वास ठेवला ते आठवत राहिले आणि मला वाटले की मी देखील तिच्या प्रमाणेच विश्वास आणि भरोसा ठेवण्यास सक्षम आहे. मी चिकाटीने प्रयत्न केले आणि मला त्याचे प्रतिफळ मिळाले.

तुमच्या सेवकाई बद्दल आणि द फेथ हंट सह इतर अनेक पुस्तके लिहिल्याबद्दल धन्यवाद. मी देवाची आणि तुमच्या सेवेची कृतज्ञ आणि आभारी आहे ज्याने मला मोठ्या आशीर्वादांमध्ये जाण्यास मदत केली आहे. मी आणखी विश्वास आणि उत्साहाने भविष्यात अद्भुत कार्य घडण्याची वाट पाहत आहे. या अनुभवाने आमच्या कुटुंबाला किती लाभ प्राप्त झाला आहे हे मला माहीत आहे!

तुमची विश्वासू,

एस.टी.

अध्याय 5

ती कोणाची निवड होती?

मागील कथांमध्ये, आम्ही देवाच्या राज्याचे उत्पादन पाहिले, त्यासोबतच येथे पृथ्वीच्या क्षेत्रात, एक कुत्रा, एक मासा, मुदतपूर्व कर्ज फेडण्यासाठी पैसे, आम्हाला जीवनात आवश्यक असलेल्या कार आणि घरांसाठी पैसे मिळणे, तीन मुलांचे जीवन वाचविणे आणि बरेच काही पाहिले. या सर्व कथा देवाच्या राज्याने तयार केल्या आहेत, किंवा मला ते अधिक व्यक्तिगत शब्दात मांडू द्या, आमच्या देवाचे राज्य! त्याचे राज्य मोजमापाच्या पलीकडे महान आहे या विषयी आपण आश्चर्यचकित होऊ नये.

दुसरे पेत्र 1:3a मधे म्हटले आहे:

> *त्याच्या दैवी शक्तीने आपल्याला जीवनासाठी आणि सुभक्तीस आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी दिल्या आहेत.*

आपण आता पर्यंत पाहिलेल्या सर्व कथांमध्ये, मला एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारायचा आहे, “ती कोणाची निवड होती?” मला जे म्हणायचे आहे ते हे कि: देवाने त्या कुत्र्याला कर्स्टनकडे आणण्याचा किंवा तो मासा माझ्या पत्नीकडे, ड्रेंडाकडे आणायचा अचानक निर्णय घेतला का? या फक्त घटना होत्या ज्या देवाने त्याच्या सार्वभौम अधिकाराने आपल्यासाठी करायचे ठरवले होते का? किंवा या गोष्टी घडण्याचे दुसरे काही कारण होते? मला वाटते की ह्याचे उत्तर ऐकून बहुतेक लोकांना धक्का बसेल. मला माहित आहे की मला देखील असाच धक्का बसला होता.

ह्या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी आपण लुककृत शुभवर्तमान अध्याय 8 मधील कहाणी कडे जाऊ या.

मग तो जात असता लोकसमुदाय त्याच्याभोवती गर्दी करत होता. तेव्हा बारा वर्षे रक्तस्राव होत असलेली (जिने आपली सर्व उपजीविका वैद्यांवर खर्च केली होती) व कोणालाही बरी करता न आलेली अशी कोणीएक स्त्री त्याच्या पाठीमागे येऊन त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला शिवली आणि लगेच तिचा रक्तस्राव थांबला.

पण येशू म्हणाला, "मला कोणी स्पर्श केला?" तेव्हा सर्व जण 'मी नाही' असे म्हणत असता पेत्र व त्याचे सोबती म्हणाले, "गुरूजी, लोकसमुदाय तुम्हांला दाटी करून चेंगरत आहेत! अन् तुम्ही म्हणता कोणी मला स्पर्श केला?" पण येशू म्हणाला, "कोणीतरी मला स्पर्श केलाच, कारण माझ्यातून शक्ती निघाली हे मला समजले आहे."

मग आपण गुप्त राहिलो नाही असे पाहून ती स्त्री कापत कापत पुढे आली व त्याच्या पाया पडून, आपण कोणत्या कारणाकरता त्याला शिवलो व कसे तत्काळ बरे झालो, हे तिने सर्व लोकांच्या समक्ष निवेदन केले.

तेव्हा तो तिला म्हणाला, "मुली, धीर धर, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे; शांतीने जा."

— लूक 8:42-48

बायबल मधे अगदी स्पष्टपाने म्हटले आहे की गर्दीमुळे येशूला सर्व बाजूंनी दाबले जात होते, आणि "मला कोणी स्पर्श केला?" ह्या येशूच्या प्रश्नाने पेत्र देखील आश्चर्यचकित झाला, एक अध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, मला हे जाणून घ्यायचे आहे, मला हे जाणून घेणे आवश्यक आहे की ही स्त्री का बरी झाली आणि इतर कोणीही का बारे झाले नाही. अभिषेकाचा प्रवाह फक्त तिच्याकडेच का वाहत होता आणि त्या क्षणी त्याला स्पर्श करणाऱ्या इतर प्रत्येकाकडे तो प्रवाह का वाहत नव्हता? ह्याच ठिकाणी आपले उत्तर आहे, परंतु मी त्या प्रश्नाचे उत्तर

देण्यापूर्वी, आपण दुसरा एक प्रश्न विचारू या. येशू जाणूनबुजून तिची मदत करत होता का? त्याने तिच्यावर हात ठेवला होता का? ह्याचे उत्तर 'नाही' असे आहे; किंबहुना, ती तिथे आहे हे येशूला माहीतही नव्हते. कारण त्याने विचारले की त्यांच्यामधून शक्ती कोणाकडे खेचली गेली होती कारण त्याने तिला पाहिले नव्हते. मग ती त्या दिवशी बरी झाली ती कोणाची निवड होती?

हे मी थोड्या दुसऱ्या पद्धतीने विचारतो. त्या क्षणी देवाने तिला बरे करणे निवडले किंवा देवाकडून मला प्राप्त करायचे आहे हा तिचा निर्णय होता? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे कारण बरेच लोक त्यांच्या जीवनात देवाने काहीतरी करावे ह्याची "वाट पाहत" असतात. माझा विश्वास आहे की येशूला ती तिथे होती हे देखील माहित नव्हते ह्या वरून हे सिद्ध होते की तिला बरे करण्याचा येशूचा निर्णय नव्हता तर आरोग्य स्वीकारण्याचा तिचा स्वतःचा निर्णय होता.

आता, ह्या मुळे एक अत्यंत महत्त्वाचे प्रकटीकरण उघडकीस येते, आणि ते असे आहे - देव अचानकपणे एखाद्या विशिष्ट व्यक्तीला बरे करणे आणि दुसऱ्या एखाद्याला बरे न करणे निवडत नाही. आपल्या कायदेशीर अधिकारा द्वारे त्याने आधीच सर्वांना आपल्या राज्यामध्ये बरे होण्याचे प्रावधान दिले आहे. म्हणून बरे होण्याची निवड वास्तविकरीत्या आपण स्वतःच करत असतो. पण मला हे जाणून घ्यायचे आहे की तिने त्या सामर्थ्याचा कसा उपयोग केला? तिने ते सामर्थ्य प्राप्त करण्याचा "निश्चय" कसा केला? तिने राज्याच्या अधिकाराचा आणि सामर्थ्याचा नेमका कसा उपयोग केला हे येशू आपल्याला सांगतो. तो म्हणाला, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. शांतीने जा." जे आपल्याला माहित असणे आवश्यक आहे ते ह्या वाक्यात आपल्याला पूर्णपणे सांगितल्या गेले आहे आणि त्या दिवशी इतर कुणाला ते सामर्थ्य का प्राप्त झाले नाही ह्या आपल्या प्रश्नाचे उत्तर देखील ह्या मधून आपल्याला प्राप्त होते. अध्यात्मिक शास्त्रज्ञ या नात्याने, आपण या कथेकडे बारकाईने लक्ष देऊ या आणि त्या स्त्रीलाच ते सामर्थ्य का मिळाले याबद्दल काही संकेत मिळू शकतात का ते पाहू या.

सर्वप्रथम, येशू तिला "मुलगी" म्हणतो याचा अर्थ ती इस्राएल राष्ट्राचा भाग होती. याचा अर्थ तिचा देवाशी करार होता. किंवा तुम्ही म्हणू शकता, देवाकडून प्राप्त करण्यासाठी इस्राएल राष्ट्राची नागरिक म्हणून तिला स्वर्गामध्ये कायदेशीर अधिकार होता. ही वस्तुस्थिती तिला सामर्थ्य प्राप्त होण्याचे एकमेव कारण असू शकत नाही कारण त्या दिवशी येशू भोवती जी गर्दी

होती आणि ते जे येशूला दाबून टाकत होते त्या प्रत्येकाला हा समान कायदेशीर अधिकार प्राप्त होता. सामर्थ्य प्रवाहित होण्यास कारणीभूत काहीतरी वेगळे असावे. मग तिला सामर्थ्य प्राप्त होण्याचे आणखी एक कारण येशू सांगतो. खरेतर, येशूने म्हणाला की हेच एक विशिष्ट कारण आहे कि ज्या मुळे तिला वैयक्तिकरित्या सामर्थ्य प्राप्त झाले. तो म्हणाला की तिच्या विश्वासाने तिला बरे केले आहे.

त्यामुळे आता तिला सामर्थ्य प्राप्त होण्याचे कारण आपल्याला कळले आहे. प्रथम, ती अब्राहमाची मुलगी असल्याने तिला ते सामर्थ्य मिळण्याचा कायदेशीर अधिकार होता; आणि दुसरे, तिचा विश्वास हा एका स्विच प्रमाणे कार्य करणारा होता ज्याने ते सामर्थ्य त्याच क्षणी तिच्या शरीरात वैयक्तिकरित्या वाहू दिले. ती अब्राहामाची मुलगी होती, याचा अर्थ देवाने अब्राहामासोबत केलेल्या करारानुसार ती स्वर्गासमोर उभी होती, याची तुलना वीज कंपनी ज्या ठिकाणी वीजप्रवाह सतत सुरु असतो आणि तुमच्या घरात येणाऱ्या तारांशी करता येईल. पण याचा अर्थ असा नाही की विजेच्या तारा तुमच्या घरात येतात म्हणून तुमच्या घरातील दिवे चालू राहतील. दिवे लागण्यासाठी तुम्हाला स्वीच देखील चालू करणे गरजेचे आहे. तर आता आपल्याला फक्त हे शोधण्याची गरज आहे कि स्विच कुठे आहे किंवा स्विच काय आहे. येशूने ह्या स्त्रीच्या बाबतीत ते स्विच म्हणजे तिचा विश्वास आहे असे म्हटले, परंतु विश्वास म्हणजे काय आणि मी तो कसा चालू करू शकतो? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे ज्याचे उत्तर मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

विश्वास म्हणजे काय?

विश्वास हा एक शब्द आहे ज्याचा उपयोग ख्रिस्ती लोक सैलपणे करतात. आणि मला खात्री आहे की सर्वांनाच नसला तरी अनेकांना, विश्वास म्हणजे काय, त्याची आवश्यकता का आहे, ते विश्वासात आहेत की नाही हे कसे जाणून घ्यावे आणि विश्वास कसा शोधायचा हे माहितच नाही. जर विश्वासानेच या महिलेला बरे केले असेल तर आपण विश्वासाकडे खूप बारकाईने पाहिले पाहिजे! रोमकरांस पत्र 4:18–21 मध्ये आपली विश्वासाची व्याख्या आपल्याला आढळते. मला माहित आहे तुम्ही काय विचार करत आहात, तुम्हाला म्हणायचे आहे कि, “नाही, गॅरी. इब्रीकरांस पत्र 11:1 ही आपली विश्वासाची व्याख्या आहे.”

विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.

— इब्रिकरांस पत्र 11:1

होय, ते पारंपारिक उत्तर आहे, परंतु जर तुम्ही ह्या शास्त्र भागाकडे पहिले तर, इब्री 11:1 मध्ये आपल्याला विश्वासाचे फायदे सांगण्यात आले आहेत, विश्वास म्हणजे काय हे ह्या ठिकाणी सांगितले नाही. माझा विश्वास आहे की रोमकरांस पत्रामधील शास्त्रवचन,मधून आपल्याला विश्वास म्हणजे काय याचे अगदी स्पष्ट चित्र दिसून येईल.

"तशी तुझी संतती होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला. तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली; परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचा गौरव केला; आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खातरी होती.

— रोमकरांस पत्र 4:18-21

या कथेची पार्श्वभूमी समजून घेऊ या. अब्राहम आणि सारा यांना मुले होऊ शकत नव्हती. मला असे म्हणायचे नाही की सारा ला गर्भधारणा होत नव्हती आणि म्हणून त्यांनी प्रयत्न करत राहायाला हवे होते. मला हे म्हणायचे आहे कि त्यांचे वय जवळपास 100 वर्षे झाले होते. त्यांचे शरीर आता मुले होण्याच्या योग्यतेचे नव्हते; ते अगदीच अशक्य होते! जरी नैसर्गिकरित्या मूल होणे पूर्णपणे अशक्य होते तरीही देवाने अब्राहामला मूल होईल असे वचन दिले. बायबल सांगते की अब्राहामाला पूर्णपणे खात्री होती की जरी नैसर्गिक

विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.

-इब्री 11:1

परिस्थिती कितीही अशक्य आहे असे वाटले तरीही देवाने जे सांगितले ते करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे. तर आता येथे आपल्याला आपली विश्वासाची व्याख्या आढळून येते: "देवाने जे वचन दिले होते ते पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे याची पूर्ण खात्री असणे." मी ती व्याख्या अशा प्रकारे विदित करतो: स्वर्गाशी सहमत होऊन, केवळ विचारांनीच नव्हे तर देवाने जे सांगितले आहे त्यावर आपले मन आणि अंतःकरण दृढ ठेऊन, नैसर्गिक क्षेत्र काहीतरी वेगळे दर्शवत असले तरी,ते होणारच असा दृढ विश्वास धरणे.

विश्वास म्हणजे काय याची आमची व्याख्या:

स्वर्गाशी सहमत होऊन, केवळ विचारांनीच नव्हे तर देवाने जे सांगितले आहे त्यावर आपले मन आणि अंतःकरण दृढ ठेऊन, नैसर्गिक क्षेत्र काहीतरी वेगळे दर्शवत असले तरी,ते होणारच असा दृढ विश्वास धरणे.

विश्वासाची गरज का आहे?

देवाला हवे तेव्हा हॉस्पिटलमधील प्रत्येकाला बरे का करता येत नाही? तो युद्ध का थांबवू शकत नाही? तो आपल्याला सुवार्ता सांगण्यासाठी देवदूत का पाठवू शकत नाही? मला खात्री आहे की तुम्ही हे सर्व प्रश्न आधी ऐकले असतील. ह्या प्रश्नांचे उत्तर असे आहे की तो असे करू शकत नाही. असे नाही की देवाकडे तसे करण्याची क्षमता नाही परंतु त्याला तसे करण्याचा अधिकार नाही किंवा त्याचे ते अधिकारक्षेत्र नाही. "गॅरी, देवाला हवे ते तो करू शकत नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे का?" मला माहित आहे की हे आत्ता तुम्हाला हे खरोखरच विचित्र वाटत आहे, परंतु या प्रश्नाचे उत्तर आपण बायबल मध्ये शोधू या.

तर एका ठिकाणी कोणी अशी साक्ष दिली आहे,

> *"मर्त्य मानव तो काय की तू त्याची आठवण करावीस? अथवा मानवपुत्र तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस? तू त्याला देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले आहेस; तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस; आणि तू आपल्या हातच्या कृत्यांवर त्याला नेमले आहेस; तू सर्वकाही त्याच्या अधीन — त्याच्या पायांखाली — ठेवले आहेस."*

'सर्वकाही त्याच्या अधीन ठेवले आहेस,' म्हणजे त्याच्या अधीन ठेवलेले नाही असे काही राहू दिले नाहीस; परंतु 'सर्वकाही त्याच्या अधीन ठेवले आहेस,' असे अजून आपल्या दृष्टीस पडत नाही खरे.

— इब्री 2:6-8

आपण या शास्त्र भागावरून पाहू शकतो की देवाने मनुष्याला जेव्हा येथे ह्या पृथ्वीच्या क्षेत्रात ठेवले तेव्हा त्याला संपूर्ण पृथ्वीवरील संपूर्ण कायदेशीर अधिकार दिले. त्याच्या अखत्यारीत नसलेली अशी कोणतीही गोष्ट नव्हती. त्यांनी या क्षेत्रावर त्याने पूर्ण अधिकाराने राज्य केले. अधिकाराने राज्य करण्याच्या त्याच्या क्षमतेला ज्याने त्याला येथे ठेवले होते त्या सरकारने पाठबळ दिले होते . थोडक्यात, त्याने देवाच्या राज्याद्वारे नियुक्त अधिकाराने राज्य केले. त्याने त्या सरकारचा मुकुट परिधान केला होता, जो देवाचे गौरव, अभिषेक आणि त्याला मिळालेल्या सन्मानाचे प्रतीक होते.

ही स्थिति नेमकी कशी आहे ह्याचे स्पष्ट चित्र मिळविण्यासाठी, ह्या जगातील राजाचा विचार करा. जरी तो एक नैसर्गिक माणूस आहे आणि त्याच्या नैसर्गिक अस्तित्वात त्याच्या जवळ कोणतीही वास्तविक शक्ती नसली तरी, तो एक मुकुट परिधान करतो जो सूचित करतो की तो केवळ स्वतःचेच नव्हे तर संपूर्ण राज्य आणि सरकारचे प्रतिनिधित्व करत आहे. त्याच्या शब्दांमध्ये केवळ ह्या मुळे अधिकार आहे कारण तो प्रतिनिधित्व करत असलेल्या सरकार आणि राज्याच्या सर्व शक्ती आणि नैसर्गिक संसाधनांचा त्याला पाठिंबा आहे.

रहदारीचे निर्देश देणाऱ्या एखाद्या शेरीफ बद्दल विचार करा, तो केवळ "कायद्या अनुसार थांबा" हाआदेश देऊन एका मोठ्या ट्रॅक्टर-ट्रेलर ट्रकला थांबवू शकतो. होय, ट्रक माणसापेक्षा खूप मोठा आहे, आणि माणूस, स्वतःची तुलना ट्रक सोबत करू शकत नाही, परंतु त्याच्या आदेशाने ट्रक थांबतो. तो ट्रक त्या व्यक्ती मुळे थांबतो असे नाही तर सरकारचे प्रतिनिधित्व करणारा जो बिल्ला त्याला दिला गेला आहे त्या मुळे थांबतो. या परिस्थिती मध्ये, बिल्ला घालणाऱ्या त्या व्यक्ती पेक्षा सरकार खूप मोठे आहे. ट्रक ड्रायव्हरला त्या व्यक्ती ची भीती नसते, पण तो व्यक्ती ज्या सरकारचे प्रतिनिधित्व करतो त्याची भीती असते, आणि त्यामुळे तो ट्रक

थांबतो. इथेही तेच आहे. पृथ्वीच्या क्षेत्रात निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीवर आदामाने राज्य केले. देवाचे सामर्थ्य आणि वर्चस्व ह्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गौरव आणि सन्मानाच्या मुकुटाद्वारे, मनुष्याला ही निश्चितता प्राप्त होते की त्याचे शब्द देवाच्या राज्याच्या वतीने राज्य करतात.

हे लक्षात घेणे फार महत्वाचे आहे की जेव्हा आदामाने देवाच्या सरकारविरुद्ध देशद्रोह करून पृथ्वीवर राज्य करण्याची क्षमता गमावली तेव्हा त्याने आपला मुकुट देखील गमावला. पृथ्वीचे क्षेत्र कलंकित झाले आणि बदलले. मृत्यूने पृथ्वीवर प्रवेश केला आणि सैतानाने आता मानवांच्या बाबतीत अधिकार आणि प्रभावाचा कायदेशीर दावा केला. तुम्हाला हे देखील समजून घेणे अत्यावश्यक आहे की मनुष्य अजूनही पृथ्वीच्या क्षेत्रावर कायदेशीर शासक आहे, जसे देवाने आरंभी त्याला ठेवले होते, परंतु आता त्याला पूर्वीप्रमाणे आध्यात्मिकरित्या राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याच्या पतित अवस्थेतही तो पृथ्वीचा कारभार सांभाळत आहे. होय, पण त्याला पाठिंबा देण्यासाठी देवाच्या सरकारचा मुकुट त्याच्याकडे नाही. त्याला देवाच्या सामर्थ्याने आणि गौरवाने राज्य करण्याचा अधिकार नाही; त्याने आपले मानाचे स्थान गमावले आहे. पण तरीही तो पृथ्वीवरचा एकमेव कायदेशीर दरवाजा आहे. म्हणूनच देवाला आत्म्याने भरलेल्या लोकांचा उपयोग मनुष्यांच्या जीवनात त्याच्या इच्छेनुसार कार्य करण्यासाठी करावा लागतो. अगदी ज्या प्रकारे, सैतान, दुष्ट आत्म्याने-प्रेरित लोकांचा उपयोग पृथ्वीच्या क्षेत्रावर मानवासाठीच्या त्याच्या योजना परिणामकारक करण्यासाठी करतो. पृथ्वीवरील मनुष्याच्या अधिकारक्षेत्राचे हे तत्त्व तुम्हाला राज्याच्या कायद्याच्या आकलनासाठी महत्त्वाचे आहे आणि एकदा तुम्ही ते समजून घेतले की, आध्यात्मिकरित्या काही गोष्टी का घडतात, किंवा काही गोष्टी का घडल्या किंवा का घडल्या नाहीत याविषयी भविष्यात तुमच्यासमोर उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील.

म्हणूनच देवाला आत्म्याने भरलेल्या लोकांचा उपयोग मनुष्यांच्या जीवनात त्याच्या इच्छेनुसार कार्य करण्वासाठी करावा लागतो.

तुम्ही म्हणाल, "पण मला वाटले की पृथ्वी आणि तिची परिपूर्णता देवाच्या मालकीची आहे?" अगदी बरोबर, ती त्याच्याच मालकीची आहे. मला आशा आहे की हे जे उदाहरण मी देणार आहे ते तुम्हाला मी काय म्हणत आहे हे समजण्यास मदत करेल. जर मी माझ्या मालकीचे घर तुम्हाला भाड्याने देतो, तेंव्हा ते घर जरी कायदेशीररित्या माझे असले तरी, आता मला हवे तेंव्हा त्या घरात प्रवेश करण्याचा कायदेशीर अधिकार आता माझ्याकडे राहिलेला नाही. घर भाड्याने देत असतांना बहुतेक करारामध्ये घर मालक कोणत्या परिस्थितीत आपल्या त्या घरात कायदेशीररित्या प्रवेश करू शकतात ह्या विषयी एक कलम असतो — उदाहरणार्थ, आणीबाणीची काही परिस्थिती असेल किंवा दुरुस्ती करण्यासाठी — आणि त्यासाठी आवश्यक सूचना आधीच देणे आवश्यक असते. जर मी या कराराच्या बाहेर जाऊन घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तर जरी ती माझ्या मालकीची मालमत्ता असली तरीही ते कायद्याचे उल्लंघन करणे आणि जबरदस्तीने प्रवेश करणे मानले जाईल. जर मी करारा मध्ये निर्दिष्ट केलेल्या कायद्याचे उल्लंघन केले असेल, तर माझ्या मालकीची जागा असली तरीही मला ती जागा रिकामी करण्यास कायदेशीररित्या भाग पाडले जाऊ शकते. पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी सैतानाला आदामाद्वारे का जावे लागले हे यावरून स्पष्ट होते. ह्या क्षेत्रात प्रवेश करण्याची किल्ली फक्त आदामा कडे होती! सैतानाला दारातूनच प्रवेश करावा लागला आणि ते दार आदाम होता. जर सैतानाने आदामा ला टाळून पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असता तर त्याला कायदेशीररित्या बाहेर काढले गेले असते.

> *मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखवली; आणि त्याला म्हटले, "ह्यांच्यावरचा सर्व अधिकार व ह्यांचे वैभव मी तुला देईन,कारण हे मला सोपवून दिले आहे व माझ्या मनास येईल त्याला मी हे देतो. म्हणून तू मला नमन करशील तर हे सर्व तुझे होईल.*
>
> — लूककृत शुभवर्तमान 4:5-7

आपण या वचनात पाहू शकता की सैतान दावा करतो की मनुष्यांच्या राज्यांचे अधिकार आणि वैभव (संपत्ती) त्याला देण्यात आले आहे. त्याला हा अधिकार कोणी दिला? ज्याच्याकडे हा अधिकार होता त्या आदामाने! अशाप्रकारे देव केवळ कायदेशीर प्रवेशा शिवाय माणसांच्या व्यवहारात प्रवेश करू शकत नाही. जर त्याने असे केले तर, सैतान बेकायदेशीर प्रवेश केल्याचा दावा करेल. नाही, देवाला त्याच दारातून जावे लागेल जे सैतानाने पृथ्वीवर त्याचे सरकार आणि अधिकार आणण्यासाठी वापरले होते आणि ते दार म्हणजे मनुष्य आहे. पण असा माणूस खरोखर होता का?

> *परमेश्वराने अब्रामाला सांगितले, "तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा; मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील; तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील."*
>
> — उत्पत्ती 12:1-3

अब्राहामला आपल्या विश्वासाचा पिता म्हटले जाते कारण तो असा मनुष्य आहे ज्याने पृथ्वीच्या क्षेत्राचे दार देवासाठी उघडले ज्याद्वारे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील. अर्थात, जेव्हा हे वचन राष्ट्रांना आशीर्वादित करण्याबद्दल बोलते, तेव्हा ते येशू ख्रिस्ताविषयी बोलत आहे, जो नंतर अब्राहमच्या विश्वासाद्वारे देवाच्या अनुशासनाला पुन्हा एकदा पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीर प्रवेश मिळवण्याचा मार्ग तयार करणार होता. अब्राहमच्या विश्वासाने स्वर्गासाठी एक कायदेशीर दरवाजा उघडला, जो देवाने अब्राहम आणि त्याच्या संतती किंवा वारसांशी कायदेशीर करार (वाचा) करून कायमचा मोकळा केला.

ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.

-रोमकरांस पत्र 10:17

मी जे म्हणायचे आहे ते मला स्पष्टपणे सांगू द्या. स्वर्गातील अनुशासन केवळ पृथ्वीवरील पुरुष किंवा स्त्रीद्वारे पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश मिळवू शकते कारण त्यांना तेथे कायदेशीर

अधिकार आहे. तो कायदेशीरपणा केवळ तेव्हाच साध्य होऊ शकतो जेव्हा एखाद्या पुरुष किंवा स्त्रीने त्यांच्या अंतःकरणात देव काय म्हणतो (विश्वास) पूर्णपणे दृढ केला तर.

हे सांगण्याची दूसरी पद्धत ही आहे की देवाच्या अधिपत्याखाली आणि अधिकाराखाली येण्याची इच्छा आणि निवड करणाऱ्या पृथ्वीच्या क्षेत्रातील पुरुष किंवा स्त्रीलाच स्वर्ग कायदेशीररित्या प्रभावित करू शकतो. आदामाचा वापर करून पृथ्वीवर प्रवेश मिळवण्यासाठी सैतानाने वापरलेले हेच तत्त्व आहे. त्याने आदामाला खात्री दिली की देवावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही आणि आदामाचे हृदय देवासोबतच्या करारातून बाहेर काढले. परिणामी, आदामाने सैतानावर विश्वास ठेवण्याचे निवडले आणि देवाचा अधिकार नाकारला.

हेच तत्त्व आहे जे देव आता अब्राहामाद्वारे त्याचे अनुशासन आणि अधिकार पृथ्वीवर परत आणण्यासाठी वापरणार आहे. अब्राहामने देवावर विश्वास ठेवला आणि त्याचा करार देवाने धार्मिकता म्हणून गणला, याचा अर्थ आवश्यक कायदेशीर करार तेथे होता. देव आणि अब्राहम या दोन्ही पक्षांच्या या करारामुळे, देवाला कायदेशीर करार (वाचा) ठेवण्याची परवानगी मिळाली ज्यामुळे पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्गाचा प्रवेश सुरक्षित झाला, परंतु हे लक्षात घेणे आवश्यक आहे की या कराराचा केवळ अब्राहम आणि त्याच्या वारसांवरच परिणाम झाला. या कराराचे चिन्ह अब्राहामच्या सर्व वारसांना देण्यात आले होते, अणि ते चिन्ह म्हणजे सुंता होते. सुंता म्हणजे पुरुषाच्या शिश्नापासून पुढची त्वचा कापून टाकणे. एका पुरुषाने आपले बीज एका स्त्रीमध्ये पेरल्यामुळे, त्याचे बीज त्या सुंता झालेल्या लिंगातून जावे लागले, ज्याने सैतान आणि स्वतः वडिलांना आणि आईला घोषित केले की हे मूल देव आणि अब्राहामने केलेल्या कायदेशीर कराराचा वारस म्हणून स्वर्गासमोर उभे आहे.

आपण आधी वाचल्याप्रमाणे, तथापि, प्रत्येक पुरुष किंवा स्त्रीला, तो कायदेशीर करार त्यांच्यासाठी उपलब्ध असला तरीही, तरीही देव अणि अब्राहम मधे झालेल्या कराराचे वैयक्तिक फायदे प्रत्यक्षात उपभोगण्यासाठी देवाने जे सांगितले त्यावर पूर्णपणे विश्वास ठेऊन ते कायदेशीररित्या दृढ़ करणे आवश्यक होते. थोडक्यात, कराराने त्यांच्या घरापर्यंत तारा वाहून नेल्या, परंतु तरीही त्यांना वैयक्तिकरित्या देवाच्या वचनावर विश्वास ठेवून आणि कार्य करून स्विच चालू करणे आवश्यक होते.

ठीक आहे, आता आम्हाला माहित आहे की विश्वास काय आहे आणि विश्वास कायदेशीररित्या का आवश्यक आहे. आता हे जाणून घेणे अत्यंत महत्वपूर्ण आहे कि विश्वास कसा मिळवावा आणि आपण विश्वासात आहोत की नाही हे कसे समजावे.

आपण विश्वास कसा मिळवू शकतो?

येथे एक संकेत आहे: तुम्ही विश्वासासाठी प्रार्थना करू शकत नाही. आश्चर्य वाटले? असे महित होते.

ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.

— रोमकरांस पत्र 10:17

देवाचे वचन ऐकून विश्वास कसा निर्माण होतो? विश्वास प्राप्त करण्यासाठी एवढेच पुरेसे आहे का? ह्या साठी नेमकी प्रक्रिया काय आहे? मानवी आत्म्यात विश्वास विकसित होण्यासाठी फक्त वचन ऐकणे एवढेच आवश्यक आहे का? विश्वास कसा येतो आणि रोमकरांस पत्र 10:17 कशाबद्दल बोलत आहे हे समजून घेण्यासाठी, आपण मार्ककृत शुभवर्तमान अध्याय 4 ह्या कडे पाहू शकतो. जर तुम्ही तुमचे बायबल हवेत फेकले तर ते खाली येऊन तुमच्यासमोर मार्क अध्याय 4 उघडला पाहिजे; ते इतके महत्वाचे आहे! येशूने मार्क 4:13 मध्ये म्हटले आहे की या अध्यायात तो काय शिकवत आहे हे जर तुम्हाला समजले नसेल तर तुम्हाला बायबलमधील दुसरी कोणतीही बोधकथा समजू शकणार नाही. मी म्हणेन की ते खूपच जास्त महत्वाचे आहे!

हा अध्याय इतका महत्त्वाचा का आहे? कारण त्या मध्ये आपल्याला हे सांगितले गेले आहे की स्वर्ग पृथ्वीच्या क्षेत्रात कसा प्रवेश करतो, त्याला ह्या संबंधीचा कायदेशीरपणा कसा मिळतो आणि ते कुठे घडते. हा संपूर्ण अध्याय कशाबद्दल बोलत आहे हे जाणून घेण्यापेक्षा तुमच्या जीवनात इतर काहीही महत्त्वाचे नाही. तुम्ही हा प्रश्न विचारू शकता कि “देवाचे राज्य कसे चालते?” . मार्क अध्याय 4 वाचा! या अध्यायात, येशू आपल्याला मानवी आत्म्यात विश्वास कसा निर्माण होतो यासंबंधी तीन बोधकथा सांगतो, आणि आता तुम्हाला माहीत आहे की, स्वर्गाला पृथ्वीवर कायदेशीररित्या प्रवेश करण्यासाठी ह्याची अत्यंत आवश्यकता आहे.

या अध्यायातील तीन दृष्टांत म्हणजे पेरणाऱ्याचा दाखला, बिया पसरविणाऱ्या चा दाखला आणि मोहरीच्या दाण्याचा दाखला .

मार्ककृत शुभवर्तमान च्या चौथ्या अध्यायात येशूने सांगितलेली दुसरी गोष्ट पाहण्यापासून सुरुवात करूया, बी पेरणाऱ्याचा दाखला.

> *आणखी तो म्हणाला, "परमेश्वराचे राज्य असे आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो, रात्री झोपी जातो, दिवसा उठतो, आणि ते बी रुजते व वाढते, पण हे कसे होते हे त्याला कळत नाही. जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा. पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*
>
> — मार्ककृत शुभवर्तमान 4:26-29

या शास्त्र भागात जाण्यापूर्वी, प्रथम आपण त्यामधील शब्दांची व्याख्या पाहू या. येशू कोणत्या बियाणा बद्दल बोलत आहे आणि जमीन काय आहे? ह्याच अध्यायात पेरणी करणाऱ्याच्या आधीच्या दाखल्यात येशूने ह्या शब्दांची व्याख्या केली आहे. बीज हे देवाचे वचन आहे आणि जमीन हे माणसाचे हृदय किंवा मनुष्याचा आत्मा आहे. म्हणून या दृष्टान्तात, त्या दोन शब्दांची येशूची स्वतःची व्याख्या वापरून, आपण असे म्हणू की येशू म्हणत आहे की एक मनुष्य देवाचे वचन त्याच्या स्वतःच्या हृदयात पसरवतो. मग माती स्वतःच किंवा माणसाचे हृदय पृथ्वीच्या क्षेत्रात विश्वास (स्वर्गाशी करार) उत्पन्न करू लागते.

मी पुढे जाण्यापूर्वी, आपण आपल्या विश्वासाची व्याख्या काय आहे हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे: एखाद्या पुरुषाचे किंवा स्त्रीचे हृदय स्वर्ग जे म्हणते यावर दृढपणे विश्वास ठेवते. हा उतारा सांगतो की ही प्रक्रिया कशी कार्य करते हे जरी मनुष्याला माहित नसले तरी, त्याच्या हृदयात पेरलेले वचन वाढू लागते आणि स्वतःच सहमती निर्माण करते. तो झोपला असेल किंवा जागा असेल तरी; काही फरक पडत नाही, ही प्रक्रिया चालू राहते. जेंव्हा मनुष्य आपल्या अंतःकरणात वचन ठेवतो, तेंव्हा हळूहळू त्याचे अंतःकरण स्वर्गातील गोष्टींशी सहमत होत जाते आणि विश्वास निर्माण होत राहतो.

मार्क अध्याय 4 मधील ह्या शास्त्रवचनाचा संदर्भ आपल्याला सांगते की हृदय एका प्रक्रियेद्वारे करार तयार करते. हा दाखला आपल्याला सांगतो की जेव्हा आपल्या हृदयाला वचन प्राप्त होते, तेव्हा विश्वास निर्माण होऊ लागतो. येशूने त्या टप्प्याची तुलना अंकुराशी केली. अंकुर वाढू लागतो आणि देठ बनतो. अखेरीस, देठावर रोप तयार होते, परंतु या शेवटच्या टप्प्यावर येईपर्यंत कोणतेही फळ नसते, कोणताही करार नसतो आणि नैसर्गिक क्षेत्रात कोणताही बदल घडत नाही. मग येशू म्हणतो की रोप आता परिपक्व होते आणि परिपक्व धान्य तयार करते आणि ही प्रक्रिया चालू राहते. जेव्हा प्रक्रिया त्या टप्प्यावर पोहोचते, जेव्हा प्रौढ बीज डोक्यात असते, तेव्हा त्या ठिकाणी सहमती असते आणि विश्वास असतो, आणि जे स्वर्गाने माणसाच्या हृदयात पेरले, त्यामुळे पुरुष किंवा स्त्रीला पृथ्वीच्या क्षेत्रात कापणी करण्याची संधी मिळते.

आता नीट लक्ष द्या. प्रत्यक्षात काय घडले याचा आढावा घेऊया. स्वर्ग देवाचे वचन पृथ्वीच्या क्षेत्रात, पुरुष किंवा स्त्रीच्या हृदयात पेरतो जेथे करार आवश्यक असतो. त्या वेळी, मनुष्याचे हृदय अद्याप स्वर्गाशी सहमत नसते, परंतु हृदयात एक प्रक्रिया सुरू होते जी पेरल्या गेलेल्या गोष्टींशी सहमत होणारे हृदय उत्पन्न करते. ही प्रक्रिया कशी होते हे दाखवण्यासाठी येशू एक उत्तम उदाहरण वापरतो. या प्रक्रियेची तुलना बियाणे पेरणाऱ्या शेतकऱ्या सोबत करतो आणि वनस्पती कशी परिपक्व होते हे दाखवतो, यावरून येशू आपल्याला विश्वास कसा दिसतो याचे चित्र दाखवतो. नैसर्गिक क्षेत्रात, जेव्हा डोक्यातील बी परिपक्व होते, तेव्हा ते अगदीच जमिनीत पेरलेल्या बियाणा सारखेच दिसेल. मी ते पुन्हा सांगतो.

जेव्हा डोक्यातील बी परिपक्व होते, तेव्हा ते अगदीच जमिनीत पेरलेल्या बियाणा सारखेच दिसेल.

मक्क्याचे रोप लावा आणि परिपक्व बियाणे तुम्ही लावलेल्या बियाण्याशी तंतोतंत जुळेल. ते एक सारखेच आहेत, दिसायला सारखेच आहेत आणि चवही सारखीच आहे. तुम्ही दोघांमधील फरक सांगू शकत नाही; ते एकसारखे आहेत.

येशू काय म्हणत आहे ते मी ह्या ठिकाणी स्पष्ट करुन सांगतो. जेव्हा आपण वचन ऐकतो (रोमकरांस पत्र 10:17), आपण खरोखर देवाचे वचन आपल्या आत्म्यामध्ये, आपल्या

अंतःकरणात विखुरत असतो. ते वचन आपण आपल्या हृदयात ठेवले तर ते परिपक्व होईल; आणि जेव्हा ते परिपक्व होते, तेव्हा आपल्या अंतःकरणातील चित्रे (पृथ्वी क्षेत्र) स्वर्गातल्या गोष्टींशी जुळू लागते. जर आपण ते वेगवेगळ्या शब्दांत मांडले तर आपण असे म्हणू शकतो की जेंव्हा आपण स्वर्गातून अभिवचन आपल्या अंतःकरणात पेरतो, तेंव्हा ते हळूहळू देवाने जे काही सांगितले त्याबद्दल आत्मविश्वास निर्माण करेल. अखेरीस, स्वर्ग जे सांगतो त्याबद्दल तुमचे हृदय पूर्णपणे सहमत होऊन जाईल आणि तेथे करार उत्पन्न होईल. उदाहरणार्थ, तुम्ही जर आजारपणाचा सामना करत असाल तर, तुमच्या शरीरातील परिस्थिती तुमच्याशी बोलते आणि तुम्हाला सांगते की तुम्ही आजारी आहात. जेंव्हा तुम्ही देवाचे वचन पेरता तेंव्हा ते म्हणते की देवाने तुमच्या बरे होण्याची किंमत येशूने क्रुसावर जे केले त्याद्वारे चुकती केली आहे, तुमच्या हृदयाला हळूहळू देव जे म्हणतो त्याची खात्री स्वतःहून पटू लागते.

जेव्हा ते वचन तुमच्या अंतःकरणात परिपक्व होते, तेव्हा तुम्ही बरे झाल्याचा आत्मविश्वास तुमचा विश्वास आणि तुम्ही जे म्हणता त्याप्रमाणे बनतो. आता तुम्ही फक्त स्वर्ग काय म्हणतो तेच बोलत नाही. तुमचे मनाला आता पूर्ण खात्री झाली आहे. जेव्हा तुम्ही म्हणता, “मी बरा झालो आहे,” तेव्हा तुम्ही केवळ एक सूत्र म्हणून ते बोलत नाही; उलट, तो तुमचा विश्वास आहे आणि तीच वस्तुस्थिती आहे हे तुम्हाला माहीत आहे. स्वर्ग जे म्हणतो ते आता वास्तविकतेत तुमची स्वतःची धारणा बनली आहे.

इब्रिकरांस पत्र 11:1 मध्ये म्हटले आहे:

> *विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.*

जेव्हा विश्वास असतो तेव्हा स्वर्ग जे म्हणतो याचे ते एक अलौकिक आश्वासन आहे, तरीही या प्रक्रियेत अजून एक टप्पा आहे.

ज्याची त्याला त्याच्या अंतःकरणात खात्री आहे त्याला त्याच्या वास्तविक अस्तित्वाच्या क्षेत्रात आणण्यासाठी, माणसाने आता कापणीसाठी त्याचा विळा लावला पाहिजे.

पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."

— मार्क 4:29

लक्षात घ्या की जरी हृदय स्वर्गाशी सहमत आहे, आणि स्वर्गाची वास्तविकता पुरुष किंवा स्त्रीची वास्तविकता बनली आहे, तरीही भौतिक क्षेत्रात अद्याप कोणताही वास्तविक बदल झालेला नाही. कारण मनुष्याला पृथ्वीवर नैसर्गिकरित्या अधिकार क्षेत्र आहे, त्यानेच स्वर्गाचा अधिकार पृथ्वीच्या या क्षेत्रात मुक्त केला पाहिजे. देव स्त्री किंवा पुरुषाशिवाय ते करू शकत नाही. हे मी तुम्हाला त्या अगदी परिचित शास्त्रवचनात दाखवू शकतो ज्याची आपण आधी चर्चा केली होती.

कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.

— रोमकरांस पत्र 10:10

अंतःकरणाने मनुष्य वचनावर विश्वास ठेवतो, विश्वास उत्पन्न होतो आणि तो न्याय्य ठरतो. जस्टिफाय हा एक कायदेशीर शब्द आहे ज्याचा अर्थ कायद्याचे प्रशासन आहे. म्हणून जेव्हा एखाद्या माणसाचे हृदय स्वर्गाशी सहमत असते आणि त्याच्या अंतःकरणात स्वर्ग जे म्हणतो त्याबद्दल पूर्ण खात्री असते, तेव्हा तो न्यायी ठरतो. त्याच्या जीवनात, पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्गाचा प्रवाह होणे आता कायदेशीर आहे. परंतु केवळ नीतिमान असण्याने देवाचे सामर्थ्य तुमच्या मध्ये मुक्त होऊ शकत नाही. पॉवर स्टेशनमधून ज्या घराकडे वीज पोहोचते त्या घराप्रमाणे, आणखी एक पायरी आहे - विजेचा प्रवाह होण्यासाठी स्विच चालू करणे आणि असे केल्यानेच दिवे प्रकाशमान होतात. का? कारण रोमकरांस पत्र 10:10 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, न्याय्य ठरल्यानंतर आणखी एक पाऊल उचलणे आवश्यक आहे.

स्वर्ग आणि पृथ्वीच्या समोर उभा असलेला एक पुरुष किंवा स्त्री न्याय्य आहे, त्यानंतर त्याने कबूल केले पाहिजे किंवा त्या करारावर कृती केली पाहिजे आणि पृथ्वीच्या क्षेत्रात

देवाचे सामर्थ्य आणि अभिषेक प्रत्यक्षात मुक्त केला पाहिजे. मी काय म्हणतोय ते तुम्हाला पूर्णपणे समजेपर्यंत कृपया ते वचन पुन्हा पुन्हा वाचा. हे असेच कार्य करते! अशा प्रकारे स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीरपणा प्राप्त होतो, हृदय हे पृथ्वीच्या क्षेत्रामध्ये स्वर्गाचे इंटरफेस आहे आणि नंतर आपले शब्द आणि कृती हे स्विच आहेत जे खरोखर स्वर्गाची शक्ती मुक्त करतात. कृपया त्या वचनाच्या दुसऱ्या भागाकडे नीट लक्ष द्या: ते आपणच आहोत ज्यांनी येथे स्वर्गाचा अधिकार मुक्त केला पाहिजे.

प्रथमतः, कायदेशीरपणा प्रदान करण्यासाठी पुरुष किंवा स्त्रीची स्वर्गाची संकल्पना, आणि दुसरे म्हणजे, पृथ्वीच्या क्षेत्रात अधिकार क्षेत्र, येशूने मत्तय 16 आणि मत्तय 18 मध्ये शिकवलेल्या गोष्टींद्वारे आपण हे पाहू शकतो

> *मी तुम्हांला खचीत सांगतो, जे काही तुम्ही पृथ्वीवर बांधाल ते स्वर्गात बांधले जाईल आणि जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल.*
>
> — मत्तय 18:18

येशू येथे सांगतो की तो मंडळीला पृथ्वीच्या राज्याच्या क्षेत्रात स्वर्गाच्या राज्याच्या चाव्या (अधिकार) देणार होता. तो म्हणाला की तुम्ही पृथ्वीवर जे बांधाल त्याला स्वर्ग पाठिंबा देईल आणि पृथ्वीवर तुम्ही जे काही मोकळे कराल त्याला स्वर्ग पाठिंबा देईल. पुन्हा एका पोलिस अधिकाऱ्याचा विचार करा; त्याला अधिकार आहे, परंतु सरकारकडे शक्ती आहे. पोलिस अधिकाऱ्याकडे सरकारची चावी किंवा अधिकार असतो, कारण तो त्या सरकारचा एजंट म्हणून शपथ घेतो. तो जे बोलतो, त्याला सरकार पाठिंबा देतो. लक्षात ठेवा, येथे फक्त पुरुष किंवा स्त्रीला कायदेशीर अधिकार आहे, आणि अशा प्रकारे केवळ स्त्री किंवा पुरुष स्वर्गाला कायदेशीर अधिकारक्षेत्र देऊ शकतात.

अशा प्रकारे स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीरपणा प्राप्त होतो, हृदय हे पृथ्वीच्या क्षेत्रामध्ये स्वर्गाचे इंटरफेस आहे आणि नंतर आपले शब्द आणि कृती हे स्विच आहेत जे खरोखर स्वर्गाची शक्ती मुक्त करतात.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे जो तुम्हाला विश्वासाबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे. मी मार्कच्या चौथ्या अध्यायातील आमच्या शास्त्रवचनाचा पुन्हा एकदा संदर्भ देतो

> *जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा.*
>
> — मार्क 4:28

लक्षात ठेवा, मी आधी सांगितल्याप्रमाणे, येशूने या दृष्टान्तात नमूद केलेली माती माणसाचे हृदय किंवा मनुष्याच्या आत्म्याचे प्रतिनिधित्व करते. विश्वास कोठे निर्माण होतो याकडे लक्ष द्या; ह्या मुळे तुम्हाला आश्चर्य वाटते का? बहुतेक लोक समजतात त्याप्रमाणे हे स्वर्गाचे उत्पादन नाही, परंतु ते येथे पृथ्वीच्या क्षेत्रात तयार केले गेले आहे आणि ते तुमच्या हृदयाचे उत्पादन आहे. तुम्ही त्यासाठी प्रार्थना करू शकत नाही किंवा देवाकडे मागू शकत नाही. स्वर्गात विश्वासाची गरज नाही. आम्हाला स्वर्गात कराराची गरज नाही. नाही, हे फक्त पृथ्वीच्या क्षेत्रात आवश्यक आहे आणि ते केवळ पृथ्वीवरील स्त्री आणि पुरुषांच्या हृदयातच येऊ शकते. मार्क 4 मधील दाखला शिकवतो त्याप्रमाणे, ते मिळवण्याचा एकच मार्ग आहे, देवाचे वचन तुमच्या हृदयात ठेवून कराराची प्रक्रिया होऊ द्या. मग जर मला विश्वासाची गरज असेल तर मी काय करू? मी माझ्या हृदयात देवाचे वचन विखुरून टाकीन आणि जोपर्यंत विश्वास आहे तोपर्यंत ते वाढू देईन. ह्याच एक मार्गाने विश्वास येतो.

मी मार्क 4 मधील चर्चा पूर्ण करण्या आधी, मला तेथे नमूद केलेल्या विळ्या बद्दल पुन्हा बोलायचे आहे.

> *पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*
>
> — मार्क 4:29

माझा विश्वास आहे की बहुतेक चर्चेस ने जगाला विळा कसा वापरायचा हे शिकवले नाही, म्हणजे त्यांना जे आवश्यक आहे त्याची कापणी कशी करायची हे त्यांना शिकवले गेले नाही.

सर्वसाधारणपणे चर्चला दान कसे द्यायचे हे शिकवले गेले आहे परंतु त्यांनी पेरलेल्या बीपासून लागवड आणि कापणी कशी करावी हे शिकवले जात नाही. या वचनात येशू अगदी स्पष्टपणे सांगतो की जेव्हा आपल्या विश्वासाची कापणी उपलब्ध असेल तेव्हा आपण विळा लावला पाहिजे. जरी आपण विश्वासाने आपले बीज मुक्त करण्याचे मोठे कार्य केले असले तरी, विळा कसा लावायचा हे आपल्याला कळत नाही तोपर्यंत कापणी होणार नाही. अगदी स्पष्टपणे सांगायचे तर, परमेश्वराने मला राज्य कसे चालते हे शिकवायला सुरुवात करेपर्यंत मला याबद्दल काहीही माहिती नव्हते. ते नेमके कसे आहे याची काही उदाहरणे मी तुम्हाला देतो.

मला अटलांटा येथील एका चर्चमध्ये बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. ही बुधवारी रात्रीची सेवा होती आणि चर्च फारसे मोठे नव्हते, परंतु माझ्यासाठी ते ठीक होते. मला फक्त लोकांना राज्याबद्दल शिकवायला आवडायचं. मी चर्चमध्ये पोहोचलो तेव्हा मला हे पाहून विचित्र वाटले की दरवाजे बंद होते आणि तेथे कोणीही नव्हते. सभा सुरू व्हायला दहा मिनिटे बाकी होती. मी माझ्या पाठीमागे ट्रक चा मोठा आवाज ऐकला; त्या ट्रक ला सायलेन्सर नसल्यासारखे वाटत होते. मी पाहिलं तेव्हा, चर्चच्या बाजूने एक जुना बीटअप, मोडकळीस आलेला पिकअप ट्रक आत येतांना मला दिसला. मला आश्चर्य वाटले नाही; कारण, मी अटलांटा शहराच्या मध्यभागी होतो. मी वाट पाहत असताना, एक माणूस इमारतीच्या मागच्या बाजूने चालत माझ्या कडे आला आणि त्याने स्वतःची ओळख पास्टर म्हणून करून दिली. त्यांनी उशीर झाल्याबद्दल खेद व्यक्त केला, पण ते म्हणाले कि त्यांचा तो जुना ट्रक सुरूच होत नव्हता. त्यांनी मला सांगितले की त्यांना तो ट्रक उतारावर जाऊन स्टार्ट करावा लागला, मग ट्रक सुरु झाल्यावर एकदाचा वेग वाढला, तर क्लच लावला लागला, कारण स्टार्टर काम करत नाही. ते म्हणाले कि बऱ्याच वेळा तर हा ट्रक सुरूच होत नाही आणि त्यांना चर्चपर्यंत पाच मैल पायी चालत यावे लागेल आहे.

त्यानंतर ते माला त्यांच्या चर्चबद्दल सांगू लागले, त्यांनी मला सांगितले की जरी ते चर्चचे पास्टर असले तरी, चर्चचे मुख्य कार्य शहरातील लोकांना खायला घालणे होते. त्यांनी त्या ठिकाणी महिन्याला 10,000 हून अधिक लोकांना जेवण दिले. पास्टर बोलत असतांना मी अस्वस्थ होत होतो. येथे एक देवाचा माणूस आहे जो महिन्याला 10,000 लोकांचे पोट भरतो

आणि त्याच्याकडे एक नीटपणे चालणारी कार देखील नाही? ज्या लोकांना तो खायला अन्न देतो त्यांना देव कसा आहे हे पाहण्या साठी तोच एक उदाहरणरूप आहे. 100-अंश तापमान असलेल्या उन्हाळ्याच्या दिवसात त्यांना चर्चला पाच मैल चालत जावे लागत होते, त्यांचा उदरनिर्वाह जेमतेम होत होता, हे सर्व पाहून ते लोक कसा विश्वास करतील कि देव त्यांची मदत करू शकतो? मी ह्या बाबतीत त्यांची मदत करण्याचा विचार केला. माझ्याकडे घरी 20,000 मैल चाललेली बऱ्यापैकी नवीन कार होती जी मी त्यांना देऊ शकत होतो. मी माझे हे विचार त्यांना सांगितले आणि मी म्हणालो कि माझ्या एका कर्मचाऱ्याला त्यांच्यासाठी ती गाडी घेऊन अटलांटा येथे पाठवीन. ते अर्थातच रोमांचित झाले. मी त्या रात्रीच्या सभेत त्यांना आणि त्याच्या छोट्या चर्चला देवाच्या राज्याबद्दल आणि पैशाच्या संदर्भात ते कसे कार्य करते याबद्दल शिक्षण दिले.

घरी गेल्यावर मी गाडी अटलांटापर्यंत नेण्याची व्यवस्था केली. जेव्हा माझा स्टाफ मेंबर गाडी घेण्यासाठी माझ्या घरी आला तेव्हा मला महित होते की मी स्वर्गात आत्मिक व्यवहार करत आहे. मला माहित होते की मी ती कार देवाच्या राज्या साठी मुक्त करत आहे तेव्हा मलाही आवश्यक असलेल्या वाहनासाठी मी देवावर विश्वास ठेवू शकतो. मी कार चे वेड असणारा व्यक्ती नाही, म्हणजे खूप साऱ्या कार असाव्यात आणि विशेष प्रकारची कार असावी अशी इच्छा बाळगणारा मी व्यक्ती नाही. अनेक लोक अशा प्रकारचे आहेत, पण मी तसा नाही. माझ्यासाठी कार फक्त एक साधन आहे. मला एक उत्तम कार घ्यायला आवडते, पण ती बदलण्याची गरज पडत नाही तोपर्यंत मी ती चालवतो.

जेव्हा माझा स्टाफ मेंबर माझ्या कडे गाडी घेण्यासाठी आला तेव्हा मी बाहेर माझ्या गॅरेजमध्ये गेलो आणि मी त्या गाडीवर हात ठेवला आणि म्हणालो, “हे पित्या, मी ही गाडी तुझ्या सेवेच्या कामासाठी देत आहे आणि मी ही गाडी मुक्त करताच मला गाडी परत मिळाले.....” मी संथोडा थांबलो. मला माहित आहे की देवाचे राज्य किती विशिष्ट प्रकारे कार्य करते आणि मला माहित आहे की फक्त “गाडी” या शब्दाने चालणार नाही. मला हे देखील माहित होते की मला देखील माझ्या मागण्यात निश्चित असणे आवश्यक आहे आणि जे आम्हाला प्राप्त करायचे आहे त्या बाबतीत ड्रेन्डा आणि मला देखील सहमत असणे आवश्यक आहे. मी वाक्य पूर्ण

न करता शांत राहिलो, तेव्हा मला हे देखील जाणवले की मला कोणत्या प्रकारची कार हवी आहे याची मला अजिबात कल्पना नाही. म्हणून मी पुन्हा सुरुवात केली, "प्रभु, आज मी ही कार तुझ्या सेवेसाठी मुक्त करत आहे, आणि मला विश्वास आहे की मी जे हे बी पेरले आहे त्या अनुसार मला खरोखर एक चांगली कार मिळाली आहे, परंतु मला नेमकी कोणती कार आणि कोणते मॉडेल हवे आहे हे निश्चित केल्या नंतर मी पुन्हा तुझ्याकडे येऊन ते तुला सांगेन." बस एवढेच, आणि ती कार माझ्या गराज मधून गेली. "होय, मला नेमकी ती कार हवी आहे."

असे काही महिने गेले. अर्थात, ड्रेंडा टी कार देण्याबाबत माझ्याशी सहमत होती आणि माझ्याप्रमाणेच तिलाही कोणत्या प्रकारची कार हवी आहे, याची कल्पना नव्हती. पुढचे दोन महिने आम्ही वेगवेगळ्या कार बद्दल बोललो आणि शेवटी एके दिवशी ती म्हणाली, "एक सांगू का, मला वाटते की मला कन्व्हर्टेबल कार चा आनंद घ्यायला खरोखर आवडेल." मी तिला म्हणालो की मी तिच्या सोबत सहमत आहे, आणि मला देखील ती कार घ्यायला आवडेल, पण नेमकी कोणत्या प्रकारची कार? आता, आम्हाला हे देखील माहित नव्हते कि कोणत्या प्रकारच्या कन्व्हर्टेबल कार मार्केट मध्ये उपलब्ध आहेत. पण एके दिवशी आम्ही जेवणासाठी बाहेर जात असताना, माझी पत्नी अचानक म्हणाली, "बस्स!" "बस्स म्हणजे काय?" मी बोललो. "तीच ती," आम्ही ज्या रेस्टॉरंटमध्ये जाणार होतो त्या पार्किंग मध्ये बोटाने इशारा करत ती म्हणाली. "हे काय आहे?" मी विचारले. "ती कार, तीच ती कार मला हवी!" पार्किंग च्या दुसऱ्या बाजूला मला एक फारच सुंदर कन्व्हर्टेबल कार दिसली. मी म्हणालो, "चला ती कोणती कार आहे ते पाहू या. म्हणून आम्ही गाडीकडे गेलो आणि त्या गाडीच्या अगदी मागे आम्ही आमची कार पार्क केली.

आम्हाला तर ती कार फारच आवडली यात शंकाच नाही. ती BMW 645Ci होती, खरोखर फार छान कन्व्हर्टेबल आणि खूप महाग देखील. तुम्हाला खरे सांगायचे तर, जेव्हा मी ती कार पाहिली तेव्हा मी विचार केला, "ठीक आहे, प्रभु, आम्ही आता काय करायचे ते आम्हाला दाखवा." मला माहित होते की मी नवीन BMW साठी $115,000 देऊ शकणार नाही, परंतु मला हे देखील माहित होते की देव आश्चर्यकारक गोष्टी करू शकतो. ड्रेन्डा आणि मी कोणालाही त्या कारबद्दल सांगितले नाही किंवा कोणाला हे देखील सांगितले नाही की आम्ही नवीन कार घेण्याचा विचार करत आहोत.

सुमारे दोन आठवड्यांनंतर, ड्रेंडाच्या भावाने आम्हाला कॉल केला आणि म्हणाला, “मला ड्रेंडाची कार मिळाली!” “तुला ड्रेंडाची कार सापडली म्हणजे काय?” मी विचारले. तो म्हणाला, “ही कार कुणीतरी विक्रीसाठी ठेवली आहे ते मी पाहिले, आणि अचानक, मला वाटले की ही कार ड्रेंडा साठीच ह्या ठिकाणी आहे; आणि मी तुम्हाला ही माहिती द्यावी असे मला वाटले.” “ती कोणत्या प्रकारची कार आहे?” मी विचारले. “हे BMW 645Ci आहे आणि कन्व्हर्टिबल आहे; अगदी उत्तम स्थितीत असलेली कार. ती दोन वर्ष जुनी आहे, कमी मायलेज आहेत आणि त्यावर ओरखड्याचे एकही निशाण नाही.ती अगदी उत्तम स्थितीत आहे. त्याशिवाय, तो विकणारा माणूस तुम्हाला माहीत आहे.” “मला माहित आहे?” मी विचारले. “हो, तो म्हणाला; ह्या कार बद्दल तुम्ही त्याला फोन करावा.” बरं, जेव्हा ड्रेंडा च्या भावाने मला कारची मेक आणि मॉडेल सांगितली, तेव्हा काही आठवड्यांपूर्वी ड्रेन्डा आणि मला, आम्हा दोघांनाही तीच कार आवडली होती आणि त्या मुळे मला आता कळून चुकले की देव काहीतरी कार्य करत आहे.

मी गाडीच्या मालकाला फोन केला. होय, मी त्यांना ओळखत होतो, आम्ही कारबद्दल थोडे बोललो, आणि त्यांनी मला सांगितले की कार किती छान आहे. आणि मग त्यांनी पुढे हे म्हटले, “तुम्हाला माहिती आहे, जेव्हापासून आपण या कारबद्दल फोनवर बोलत आहोत, तेव्हापासून मला खरोखर असे वाटते की ही ड्रेंडाची कार असावी.” मी त्यांच्या जवळ हा उल्लेख देखील केला नव्हता की आम्ही ड्रेंडा साठी गाडी पाहत आहोत. त्या व्यक्ती ने पुढे म्हटले, “मी तुम्हाला सांगतो, मी काय करणार आहे, मी ही कार तुम्हाला $28,000 ला विकणार आहे.” माझ्या कानावर जे शब्द पडले त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. गाडीची किंमत त्यापेक्षा कितीतरी जास्त होती. जेव्हा मी ड्रेन्डाला याबद्दल सांगितले, तेव्हा ती फारच रोमांचित झाली. आम्ही त्या कारसाठी रोख पैसे दिले आणि आजही ती कार आमच्या जवळ आहे. ते अजूनही उत्तम अवस्थेत आहे आणि छान दिसते. त्यावर अजून एक देखील ओरखडा पडलेला नाही, आणि आम्ही त्या कारमध्ये वरचे सनरुफ बाजूला करून, स्टिरिओ वर गाणे लावून आणि सूर्यप्रकाशाचा व थंड झुळकेचा आनंद घेत अनेक ड्राईव्ह घेतल्या आहेत.

आम्ही ट्रक मधे कैंपिंग साठी आवश्यक तो पुरवठा घातला, आणि आमच्या कन्व्हर्टिबल मधून कोलोरॅडो च्या पर्वतीय भागातून आनंद घेत गेलो ती आमची सर्वात आवडती सहल होती. त्या प्रवासात आमची मुलगी कर्स्टन आमच्यासोबत होती, आणि मला आठवते की मी कॅन्ससमधून I-70 वर रात्री गाडी चालवत होतो आणि गाडीचे सनरुफ बाजूला केलेले होतो. मी गाडी चालवत असतांना कर्स्टन मागे झोपलेली होती. आमच्या डोक्यावर खूप सारे तारे चमकत होते आणि अधूनमधून एक-दोन ट्रक वगळता रस्ता अगदी रिकामा होता. ही अप्रतिम रात्र होती, आल्हाददायक हवा वाहत होती आणि जगातील सर्व काही अद्भुत आहे असे वाटत होते. आम्ही पुढचे दोन आठवडे रॉकीज मधून गाडी चालवण्यात घालवले आणि मला दिसून आले कि ही कार खरोखर किती छान चालते. त्याचे वर्णन एकाच शब्दात केले जाऊ शकते—अप्रतिम!

पण इथे एक मिलियन डॉलरचा प्रश्न आहे. ती गाडी आमच्या कडे कशी आली? ड्रेंडाने म्हटले होते तीच नेमकी कार का होती, “अगदी तेच!”? देवाच्या राज्याने ती कार आमच्या जीवनात आणली हे मला माहीत होते. मला माहीत आहे की मी त्या गाडी साठी त्या पाळकाकडे त्यांना माझी कार देऊन बी पेरले तेव्हा मी आत्मिक नियम लागू करत होतो. मला आठवते त्या वेळेस मी म्हटले होते की, मला एक कार परत मिळाली आहे, मी त्या वेळेस एसयूव्ही, जीप, कार असे काही म्हटले नव्हतो; मी फक्त म्हटलो होतो छान कार मीळाली आहे. पण ड्रेन्डा आणि मला विळा लावावा लागला. जोपर्यंत आम्ही “तीच ती कार” असे म्हटले नसते तोपर्यंत ती कार आम्हाला दिसली नसती. मी माझी जुनी कार मुक्त केली तेव्हा आम्हाला दुसरी कार मिळणार असा माझा विश्वास असला तरी, ड्रेंडाने “बस्स, तीच ती कार” असे म्हणे पर्यंत आम्ही विळा लावला नव्हता.

आणखी एक घटना घडली ज्यामुळे हे तत्व आणखी मोठ्या प्रमाणात समोर आणले. तुम्हाला माहीत असेलच, मला शिकार करायला आवडते. मी एक चांगल्या शिकारी देशात राहतो अणि देवाने मला माझे स्वतःचे शिकार करण्याचे मैदान दिले आहे. माझ्या 60 एकर जागेवर, सुमारे 19 एकर झाडांचे जंगल आहे आणि सुमारे 10 एकर दलदलीचा प्रदेश आहे. मला दरवर्षी हरण आणि गिलहरींची शिकार करण्यात यश मिळते. आजूबाजूला बदके आणि

हंस नेहमी उडत असतात, परंतु काही कारणास्तव, मी त्यांची शिकार करण्याचा विचार केला नाही. हो, वर्षातून एकदा किंवा दोनदा, मी आणि मुलं खाली दलदलीत गेलो आणि रात्रीच्या जेवणासाठी काही हंसांची शिकार केली होती. पण आम्ही बदकाची शिकार कधीच केली नाही.

पण, काही वर्षांपूर्वी, मी खुपसारी बदके दलदलीत उडतांना पाहिली तेव्हा मला वाटलं की बदकांची शिकार करण्याचा प्रयत्न करावा. व्वा, ते खूप रोमांचक होते! मी ती शिकार करण्यात अगदी रममाण झालो होतो. त्या वसंत ऋतु मध्ये बदकांच्या शिकारीदरम्यान, मला कळले की मला बदकांची शिकार करण्याचा गंभीरपणे सराव करण्याची गरज आहे. मी थोडीफार शिकार केली आणि मला आढळले की ते देखील खायला खूप चांगले आहेत, चविष्ट आहेत. माझ्या लक्षात आले की बदके बऱ्याच वेळा टप्प्याबाहेर होती किंवा माझ्या शॉटगनच्या टप्प्याच्या अगदी जवळ होती,आणि ही माझ्या शिकार करण्यात होणाऱ्या चुकां मध्ये भर होती. रेमिंग्टन मॉडेल 11-87, सशांपासून ते हरणांपर्यंत सर्व शिकारीं साठी मी वापरत असलेली माझी नियमित शॉटगन वापरत होतो. गैरसमज करू नका, मला ती बंदूक आवडते आणि ती एक उत्तम बंदूक आहे. परंतु मी ऐकले की मार्केट मध्ये बंदूकीचे नवीन मॉडेल्स आहेत जी फक्त बदकांच्या शिकारीसाठी बनविली गेली होती. ते कॅमोफ्लॉज होते आणि साडेतीन इंच मॅग्नम शेल्ससाठी चेंबर केले गेले होते, आणि मला माहित होते की त्यामुळे त्या लांब पासिंग शॉट्समध्ये मदत होईल. बदकांच्या शिकारीचा पुढचा हंगाम सुरू होण्यापूर्वी मी ती बंदूक पाहण्याची आणि विकत घेण्याची योजना आखली.

तर आता, बदकाची शिकार करण्याचा सीझन संपला होता, आता जानेवारी महिना सुरु होता, आणि मी कॅबेला मधून जात होतो आणि मला वाटलं की त्या बंदुका कशा दिसतात हे पाहण्यासाठी मी शॉटगन विभागाकडे जावे. जेव्हा मी शॉटगन विभागात गेलो तेव्हा मी पाहिले की त्यांच्याकडे फक्त बदकांच्या शिकारीसाठी असलेल्या विशेष प्रकारच्या शॉटगनचा संपूर्ण विभाग होता. मी त्यापैकी काही बंदुका पहिल्या आणि मला आवडलेल्या विकत घेण्याचा विचार केला, परंतु त्यांची किंमत $2,000 होती आणि बदकांची शिकार करण्याचा सिझन यायला अजून काही महिने बाकी होते. “मी काही वेळ थांबेन,” मी स्वतःशी विचार केला. पण मी निघत असतांना काहीतरी विचित्र असे केले. ते करताना मी काय करत होतो हे मला

स्वतःलाच कळलं नाही. मी जे केलं ते अगदी विचार न करता केलं. मला हव्या असलेल्या शॉटगनकडे मी इशारा केला आणि मोठ्याने म्हणालो. "माझ्याकडे ती बंदूक येशूच्या नावाने असेल." पुन्हा, मी याबद्दल फारसा विचार केला नाही; मी फक्त एक घोषणा करत होतो की माझ्याकडे ती बंदूक आहे. मला हव्या असलेल्या डक गनचे स्पष्ट चित्र माझ्या हृदयात होते.

मला काही आठवड्यांनंतर एका बिझनेस कॉन्फरन्समध्ये बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आणि तिथे असे काहीतरी घडले ज्याने माझे लक्ष वेधून घेतले. माझे बोलण्याचे सत्र संपल्या नंतर, कंपनीचे मालक वर आले आणि म्हणाले की तुम्ही आमच्याकडे आलात म्हणून तुमचा आदर करण्यासाठी आम्ही तुम्हाला एक भेटवस्तु देऊ इच्छितो. तो म्हणाला, "तुम्हाला शिकार करायला आवडते हे आम्हाला माहीत आहे, म्हणून आम्ही तुमच्यासाठी ही बंदूक विकत घेतली." मला धक्का बसला कारण त्यांनी अगदी नवीन, बेनेली, सेमी-ऑटोमॅटिक डक गन विकत घेतली होती, अगदी तीच ती बंदूक होती जी मी त्या स्टोअरमध्ये पाहिली होती, आणि ज्या बंदुकी कडे मी इशारा करून म्हटले होते कि मला ती येशूच्या नावाने मिळणार आहे! तुम्हाला ह्या मध्ये विशेष असे काही दिसते का? नेमकी तीच बंदूक ह्या ठिकाणी कशी आली? गेल्या अनेक वर्षांत मी डझनभर बंदुका दान दिल्या होत्या पण मला जी बंदूक हवी त्या साठी विळा कधीच लावला नव्हता. दुसऱ्या शब्दांत, मी विश्वास आणि उदारतेने त्या बंदुकांची पेरणी केली होती पण मला जी हवी होती ती प्राप्त होण्या साठी विळा कधीच लावला नव्हता. मी कधीच म्हणालो नव्हतो, "प्रभु, तेच! मला तेच हवे आहे." पण ज्या वेळेस मी तसे केले त्या क्षणी कापणी झाली!

...देवाला मला दाखवायचे होते की त्याने माझ्यावर प्रेम केले आहे. जेव्हा त्याने माझ्यासाठी येशूला पाठवले आणि मला राज्य दिले तेव्हा त्याने मला दाखवले की त्याने माझ्यावर प्रेम केले आहे!

मी माझ्या एका सहकारी सेवक मित्राला शॉटगनची गोष्ट सांगत होतो. तो म्हणाला, "होय, देव कधी कधी असे करतो असे मला वाटते. तो तुमच्यावर प्रेम करतो हे सांगण्यासाठी तो तुम्हाला एक खास भेट देऊन आशीर्वाद देता." तो काय बोलला याचा विचार करत असतांना

मला जाणवले, “नाही, हे बरोबर नाही. होय, देव माझ्यावर प्रेम करतो, परंतु त्याला फक्त एक छोटीशी भेटवस्तु देऊन मला आश्चर्यचकित करायचे नव्हते.” कुत्रा, मासे, अचूक क्रमाने आलेले हरीण, गाड्या हे सगळे आले ते देवाचे माझ्यावर प्रेम आहे हे दाखविण्या साठी केवळ नव्हते. जेव्हा त्याने माझ्यासाठी येशूला पाठवले आणि मला राज्य दिले तेव्हाच त्याने मला दाखवले की त्याने माझ्यावर प्रेम केले आहे!

मला तुम्हाला कापणीची आणखी एक गोष्ट सांगायची आहे. मी तुम्हाला आधीच सांगितल्याप्रमाणे, मी गाड्यांचे वेड नाही. गाडी बदलण्याची अगदीच गरज होईपर्यंत आम्ही त्यां चालवत राहतो. आमची आठ वर्ष जुनी होंडा पायलट याचे उदाहरण आहे. आम्हाला ती कार आवडते, ती आमच्यासाठी फार उपयोगी आहे, ती चांगली चालते, नवीन दिसते आणि म्हणून आम्ही ती अजूनही वापरतो. पण प्रवासी आणि पाहुण्यांना घेऊन जाण्यासाठी आम्ही अनेकदा मोठी SUV खरेदी करण्याचा विचार केला. काही काळापूर्वी, नाऊ सेंटरमध्ये आयोजित केलेल्या एका कार्यक्रमासाठी आम्ही कॅडिलॅक एस्केलेड भाड्याने घेतली आणि ड्रेंडाने आणि मी ती चालविली. आम्हाला ती आवडली. आम्हाला तिचा मोत्याचा पांढरा रंग आवडला आणि एस्कालेडच्या लांब मॉडेल पेक्षा आम्ही चालवत असलेली छोटी गाडीआम्हाला आवडली. आम्ही म्हणालो, “हेच आम्हाला हवे आहे, कॅडिलॅक एस्केलेड, मोत्याचा पांढरा रंग, लहान गाडी. आम्हाला ही एक विकत घ्यायलाच पाहिजे.” त्या वेळी आम्ही फार व्यस्त होतो आणि शोरूम मध्ये जाऊन ती गाडी पाहणे, त्या बद्दल माहिती काढणे किंवा ती विकत घेण्याबद्दल विचार करण्या साठी वेळ नव्हता.

सुमारे एक महिन्यानंतर, मी सकाळी माझ्या घराचे दार उघडले, आणि अंगणात पडलेले वर्तमानपत्र घेण्यासाठी जाऊ लागलो इतक्यात माझा मोबाईल फोन वाजला. फोन करणारी व्यक्ती म्हणाली, “अहो, पास्टर, मला तुमच्यासाठी कॅडिलॅक एस्केलेड विकत घ्यायचे आहे; तुम्हाला कोणता रंग हवा आहे? मला आश्चर्याचा धक्काच बसला, मी म्हणालो, “व्वा, ही तर फारच चांगली गोष्ट आहे. ड्रेंडा आणि मला मोतिया पांढरा रंग आवडतो.” “ठीक आहे,” तो म्हणाला, “मी तो रंग शोधण्याचा प्रयत्न करतो, बघूया मला तो मिळतो का.” मी इतका उत्साहित होतो कि, मी त्याला हे सांगायला विसरलो की आम्हाला त्या गाडीचे लहान मॉडेल

जास्त आवडले आहे. तो अगदी उत्तम चालणारी, चांगल्या स्थितीत असलेली एक किंवा दोन वर्ष जुनी गाडी विकत घेण्याचा विचार करत होता.

पुढच्या एक महिना त्या व्यक्तीने काहीच म्हटले नाही, पण शेवटी एक महिन्यानंतर त्याने फोन केला आणि म्हणाला, "तुमची एस्केलेड माझ्याकडे आली आहे; तुम्ही मला अमुक वेळेस, अमुक ठिकाणी भेटा आणि आपली ही गाडी घरी घेऊन जा. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे आम्ही त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी भेटलो आणि आम्ही पहिले कि त्यांच्या कडे लहान मॉडेल मोतिया पांढरी एस्कलेड गाडी होती. ती फारच सुंदर होती! "मला माफ करा, तुम्हाला फोन करायला मला इतका वेळ लागला." तो म्हणाला. "मी ह्या गाडीचे मोठे मॉडेल शोधण्याचा प्रयत्न करत होतो, परंतु त्या मॉडेल ची इतकी मागणी आहे की त्यांच्या कडे ती उपलब्ध नव्हती. त्यामुळे मी ही लहान गाडीच घेऊ शकलो. मला आशा आहे की तुमच्यासाठी ही ठीक आहे आणि तुम्हाला ती आवडली आहे." ठीक आहे? आम्हाला तर अगदी हीच हवी होती, अगदी ज्या गाडी बद्दल आम्ही बोललो होतो ती हीच होती!

पुन्हा, मी तोच प्रश्न विचारतो: आम्हाला हवी असलेली नेमकी तीच एस्केलेड त्या ठिकाणी कशी आली? बरं, सर्वात आधी, मी आधी उल्लेख केलेल्या पास्टर ला दिलेल्या कारशिवाय मी आणखी आठ गाड्या वेगवेगळ्या लोकांना दिल्या आहेत. पण ड्रेंडा ने BMW पहिल्या नंतर जसे म्हटले होते कि "तीच ती कार, जी मला हवी आहे असे म्हटले तो पर्यंत मी कधीच म्हटले नव्हते कि मला नेमकी हीच कार हवी आहे. आता, पुन्हा, ह्या कार संबंधी देखील ड्रेन्डा आणि मी दोघेही सहमत झालो आणि मोठ्याने म्हणालो, "बस्स, हीच ती कार!" मी वर्षानुवर्षे म्हणत आलो आहे की चर्चने दान देण्याविषयी शिकवण्याचे खूप चांगले काम केले आहे परंतु लोकांना कापणी कशी करावी हे शिकवण्याचे देखील काम फार महत्वाचे आहे. तर आता पर्यंत आमच्या अनुभवाच्या ज्या गोष्टी आपण ऐकल्या आहेत त्या वरून विळा म्हणजे काय हे तुम्हाला सांगता येईल का? मला आशा आहे की आता हे स्पष्ट झाले आहे! मला परत मिळावे म्हणून मी विश्वासाने अनेक कार अनेक लोकांना देऊन बी रोपण केले होते, पण ड्रेन्डा आणि मी कधीही नवीन कारसाठी सहमत झालो नाही. पुन्हा काही वेळपर्यंत आम्ही आमच्या गाड्या चालवल्या. पण ज्या क्षणी आम्ही म्हणालो, "तीच ती कार आहे जी आम्हाला हवी आहे!" तेंव्हा ती कार आमच्या पर्यंत कशाही प्रकारे पोहचली. विळा म्हणजे आमचे शब्द!

जिव्हेच्या हाती मृत्यू व जीवन ही आहेत; तिची आवड धरणारे तिचे फळ भोगतात.

— नीतिसूत्रे 18:21

एक काळ असा होता की चर्च मध्ये कबुली करण्या बद्दल बरेच शिक्षण दिल्या जात होते. मी अशा लोकांसोबत राहिलो आहे, आणि तुम्हाला देखील कदाचित हा अनुभव आला असेल कि ते काहीतरी बोलले, आणि नंतर आपले तोंड हाताने बंद करून म्हणाले, "मी जे बोलतो ते समजून, लक्ष देऊन आणि काळजीपूर्वक बोलले पाहिजे." असे केल्या नंतर आपण काही तरी मोठी कामगीरी असे वाटते, आणि मला माहीत आहे कि असे केल्याने तुमचे शब्द तुमच्या ह्रदयातच ठेवण्यास मदत होते. परंतु, आपले शब्द किंवा आपण काय बोलतो ह्या कडे विशेष लक्ष देण्याचा खऱ्या अर्थाने विळ्याशी काहीही संबंध नाही. काय? पण मला वाटले की तुम्ही काही वेळेपूर्वीच म्हटले कि आपले शब्द विळा आहे. होय, मी नक्कीच असे म्हटले, परंतु योग्य शब्द बोलणे ह्या सूत्रावर प्रभुत्व मिळवणे हीच फक्त गुरुकिल्ली नाही.

मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला 'तू उपटून समुद्रात टाकला जा, 'असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.

— मार्ककृत शुभवर्तमान 11:23

पुन्हा, मार्क अध्याय 4 मधील विळा हे तुमचे शब्द आहेत! मार्कच्या चौथ्या अध्यायात विळ्याची चर्चा होईपर्यंत, विश्वासाची प्रक्रिया आणि ती कशी मिळवायची याबद्दल आपण आधीच चर्चा केली आहे. त्या ठिकाणी म्हटले आहे जेव्हा बी परिपक्व होते, तेव्हा तुम्ही विळा लावा कारण कापणीची वेळ आली आहे. कापणी आली आहे कारण तुम्ही विश्वासात आहात, तुमच्या अंत:करणात स्वर्गाशी सहमत आहात. मार्क 11 मधील वरील वचन हेच तत्त्व दर्शवते. तुमचे हृदय वचनावर विश्वास ठेवते, मग तुम्ही बोलता आणि स्वर्गाचा अधिकार मुक्त करता. पण "आपण जे म्हणतो ते घडेलच" या वाक्याकडे लक्ष द्या. विश्वासाची कसोटी ही आहे कि

तुम्ही जे बोलता ते घडेलच असा विश्वास असणे. केवळ देवाचे वचन म्हणणे किंवा कबूल करणे हा स्वतःचा विश्वास नाही. जोपर्यंत तुमचे हृदय स्वर्गाशी सहमत होत नाही तोपर्यंत तुम्ही चेहरा निळा होईपर्यंत देवाचे वचन बोललात आणि त्याची स्वीकृती दर्शविली तरी काहीही होणार नाही. मग आता आपण हे समजले पाहिजे कि आपण काय बोलतो किंवा कशाची स्वीकृती करतो यावर लक्ष दिले पाहिजे की आपल्या हृदयावर?

> *चांगला मनुष्य आपल्या अंत:करणातील चांगल्या भांडारातून चांगले ते काढतो, तसेच वाईट मनुष्य वाइटातून वाईट काढतो; कारण अंतःकरणात जे भरले आहे तेच मुखावाटे निघणार. लुककृत शुभवर्तमान*
>
> — लुककृत शुभवर्तमान 6:45

> *सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे. तू उद्दामपणाचे भाषण करण्याचे सोडून दे, कुटिल वाणीपासून फार दूर राहा.*
>
> — नीतिसूत्रे 4:23-24

आपण स्पष्टपणे पाहू शकतो की आपण जे बोलतो ते अणि ज्यावर आपल्या अंतःकरणाचा विश्वास आहे तेच आपल्या अंतःकरणातून बाहेर येते. मार्क अध्याय 4 मधील प्रक्रियेचे अनुसरण करून, आपल्या अंतःकरणाचा विश्वास कसा बदलायचा आणि ते स्वर्गात आणि विश्वासात कसे आणायचे हे आपल्याला माहित आहे. मग आपल्या पूर्ण मनाने आणि अंतःकरणाने विश्वास ठेवल्या नंतर आपण आपल्या शब्दाने आणि कृतीने विळा लावतो. समजले? छान, चला पुढे जाऊया.

आपण विश्वासावर आपली चर्चा सुरू ठेवत असताना, मला एक प्रश्न तुमच्या समोर ठेवायचा आहे ज्याचे उत्तर तुम्हाला देणे आवश्यक आहे.

मी खरोखर विश्वासात आहे हे मला कसे कळेल?

हा एक मोठा प्रश्न आहे आणि तुम्हाला माहित असणे आवश्यक आहे कारण प्रथम विश्वास ठेवल्याशिवाय विश्वासाची प्रार्थना करणे अशक्य आहे. तुम्ही विश्वासात आहात की नाही हे जाणून घेण्याचे अनेक मार्ग आहेत, हे समजून घेण्यासाठी आवश्यक अशी अनेक लक्षणे आहेत. तुम्ही विश्वासात नसतांना खूप वाईट आणि भीतीवर आधारित निर्णय घेऊ शकता. भीतीवर आधारित निर्णय तुम्हाला नेहमी पृथ्वीच्या शापाचे बंधक बनवतील आणि देवाची तुमच्या बाबतीत काय इच्छा आहे ते जाणून न घेता त्या पासून वंचित राहण्या साठी प्रवृत्त करेल. मग विश्वासात असण्याचा पुरावा काय आहे? पहिले चिन्ह सोपे आहे; तुम्ही आपल्या विश्वासाच्या व्याख्येकडे मागे वळून पाहू शकता आणि समजू शकता की तुमच्या अंतःकरणात पूर्ण विश्वास राखणे ही खरी गुरुकिल्ली आहे. परंतु बऱ्याच वेळा आपल्याला असे वाटते की आपण विश्वास ठेवला आहे परंतु आपण केवळ आपल्या मनाने वचनाशी सहमत असतो परंतु आपल्या अंतःकरणाने नाही. आपण या मधील फरक समजण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. जेव्हा तुमचा पूर्ण विश्वास असतो, तेव्हा वचन काय म्हणते याच्याशी तुमची एक मानसिक सहमती असते पण त्या मध्ये संपूर्ण खात्रीची जाणीव, शांतता आणि अपेक्षा आणणारा आत्मविश्वास असतो.

> *विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.*
>
> — इब्रिकरांस पत्र 11:1

तुमच्याकडे काहीतरी आहे आणि ते तुमच्याकडे असल्याचा पुरावा तुमच्याकडे असल्यास, तुमच्याकडे ते आहे याची तुम्हाला खात्री असण्याची गरज आहे का? नक्कीच नाही. पुन्हा, जेव्हा तुम्ही विश्वासात असता, तेव्हा एक ज्ञान, शांती आणि आत्मविश्वास असतो की तुम्हाला देवाचे वचन जे सांगते ते आहे, जरी तुम्हाला ते अद्याप दिसत नसले तरी. बरेच लोक असे म्हणतात: “मला माहित आहे की मला माहित आहे की मला माहित आहे की मला

माहित आहे की माझ्याकडे ते आहे." हे ज्ञान आतून आहे आणि परिस्थिती तुम्हाला ते सांगत नाही. ते तुमच्या आत्म्यामध्ये किंवा तुमच्या हृदयात आहे. भीती नाहीशी झाली आहे, चिंतेचे त्रासदायक विचार तुमच्या मनावर भडिमार करत नाहीत; तुम्हाला माहिती आहे की ते पूर्ण झाले आहे.

विश्वासात असण्याचा आणखी एक पैलू म्हणजे आनंद आणि अपेक्षा. तुमचे उत्तर येथे आहे. तुमच्याकडे ते आहे! विश्वास हा शांती किंवा आत्मविश्वासाच्या भावनांपेक्षा अधिक आहे, ह्या भावना देखील तुमच्या कडे असणारच. आपण आध्यात्मिकरित्या आपली स्थिती किंवा पोजिशन चे रक्षण करण्यास सक्षम असले पाहिजे. जेव्हा मी असे म्हणतो, तेव्हा आपल्या समोर कोर्टरूमचे दृश्य ठेवा आणि तुम्ही साक्षीदाराची उलटतपासणी करणारे वकील आहात असे समजा. तुम्ही ज्या परिस्थितीमध्ये आहात त्या परिस्थिती मध्ये तुम्ही आहात असा विश्वास तुम्ही का ठेवता? तुम्ही तुमच्या स्थितीचे रक्षण कसे कराल? फक्त एकच उत्तर आहे, देवाचे वचन.

उदाहरणार्थ, जर कोणी तुमच्या घरी आले आणि म्हणाले, "अरे, माझ्या घरातून निघून जा," तुम्ही म्हणाल, "मला माफ करा; आम्हाला एक दिवस द्या, आणि आम्ही इथून निघून जाऊ"? नाही, तुम्ही असे करणार नाही; तुम्ही कदाचित त्या व्यक्तीवर हसाल. जर तो माणूस म्हणाला, "नाही, हे माझे घर आहे; बाहेर जा नाहीतर मी तुम्हाला कोर्टात नेईन," तर तुम्ही त्याला उत्तर द्याल, "मी अवश्य आनंदाने तुम्हाला कोर्टात भेटेन!" सुनावणीच्या वेळी, तुम्ही शांतपणे न्यायाधीशांना तुमचे घराचे कागद पत्र दाखवाल. ते कागदपत्र पाहिल्या नंतर न्यायाधीश त्या दुसऱ्या व्यक्तीला विनाकारण त्रास दिल्या बद्दल अटक करेल आणि त्याला सर्व न्यायालयीन खर्च देखील भरायला लावेल. तुम्हाला काय वाटते किंवा तुमच्या भावना काय आहेत यावर तुमचा आत्मविश्वास निर्धारित होत नाही, तर कायद्यावर आणि तुमच्या घराची कायदेशीर मालकी यावर आधारित आहे.

विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.
— इब्रिकरांस पत्र 11:1

जेव्हा विश्वासाचा विचार केला जातो तेव्हा मला असे आढळून येते की अनेक वेळा ज्यांना विश्वास म्हणजे काय हे समजत नाही ते लोक त्यांच्या विश्वासाचा एकमेव स्त्रोत, जो देवाचे वचन आहे त्याऐवजी त्यांच्या कृतींवर विश्वास ठेवून सहजपणे गोंधळून जातात. देवाच्या राज्याचे वास्तविक सामर्थ्य जे पूर्णपणे विश्वास ठेवणाऱ्या ह्रदयातून बाहेर येते त्या ऐवजी आपण देवाच्या वचनावर आधारित कार्य करत आहोत किंवा त्या सुत्रा प्रमाणे चालत आहोत ह्या मध्ये गोंधळून जाणे फार सोपे आहे. उदाहरणार्थ जर तुम्ही देवाच्या राज्यात पैशांचे बी पेरले, आणि मी तुम्हाला विचारले कि तुम्ही असा विश्वास का धरता कि ती पेरणी केल्या मुळे तुम्हाला परत काहीतरी मिळेल, तर तुमचे उत्तर हे असायला नको, "कारण अमुक अमुक दिवशी मी दान म्हणून इतके पैसे दिले आहेत." ह्या उत्तरामध्ये तुम्ही केवळ तुमच्या कृती कडे, किंवा ह्या ठिकाणी वापरल्या गेलेल्या सूत्रा कडे पाहत आहात, पण ह्या ठिकाणी मजबूत आधार किंवा शाश्वती दिसत नाही. तुमची शाश्वती केवळ देवाच्या वाचनाद्वारेच येऊ शकते.

मी अशा किती लोकांसोबत प्रार्थना केली आहे ते मला आता आठवत नाही, ज्यांना मी विचारले कि त्यांना वापस काहीतरी मिळेल असा विश्वास ते का करतात तेंव्हा मी प्रार्थना करत असतांना ते उत्तर देऊ शकत नाहीत आणि अगदीच निरुत्तर होऊन माझ्या कडे बघत राहतात. जेव्हा मी त्यानं हा प्रश्न विचारतो, तेव्हा मला त्यांच्या मध्ये विश्वास, त्यांची स्वर्गाशी सहमती आहे हे बघायचे असते. त्यांनी असे म्हटलेले मला ऐकायचे असते, "मला निश्चितपणे माहित आहे की मला मिळणारच आहे कारण देवाने मला पवित्रशास्त्रातील अमुक पुस्तकात अमुक वचनात असे अभिवचन वचन दिले आहे की ते माझे आहे." शक्यता आहे की जर ते मला नेमके शास्त्रवचन सांगू शकत नाहीत, तर त्यांचा पाया मजबूत नाही आणि त्यांची नाव कोठे जात आहे याची त्यांना खरोखर कल्पना नाही.

लक्षात ठेवा, जेव्हा तुम्हाला देवाची इच्छा माहित असेल तेव्हाच विश्वास असू शकतो. का? कारण जेव्हा तुमचे हृदय देवाच्या इच्छेशी सहमत असेल तेव्हाच विश्वास असू शकतो. माला महित आहे की अनेक लोक विश्वासात नसताना त्यांना वाटते की ते विश्वासात आहेत. देवाचे वचन खरे आणि चांगले आहे ऐसे त्यांचे विचार असू शकतात, परन्तु ज्या वेळेस ते त्या

विचारावर पूर्णपणे विश्वास ठेवतात त्याच वेळेस खरा विश्वास असू शकतो. पुष्कळ लोकांची मने देवाच्या वचनाशी सहमत आहेत, परंतु त्यांची अंतःकरणे त्या वचनांवर स्थिर नाहीत.

मी ज्याबद्दल बोलत आहे त्याचे एक चांगले उदाहरण येथे आहे, ज्यामुळे हे स्पष्ट होईल की अनेक जण विश्वासात नसतांना देखील त्यांना असे वाटते कि ते विश्वासात आहेत. जर मी तुम्हाला असे म्हटले कि मला नुकतेच समजले आहे कि लोक म्हणतात त्याप्रमाणे आकाश हे खरोखर निळे नाही, पण ज्या रंगाला ते निळे म्हणतात तो खरे म्हणजे पिवळा आहे? दुसऱ्या शब्दांत, मी तुम्हाला सांगितले की रंगांबद्दल आम्हाला आयुष्यभर चुकीचे शिकवले गेले आहे आणि निळा हा खरोखर निळा नसून पिवळा आहे. तर तुम्ही काय कराल? तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल आणि तुम्ही पटकन तुमचा सेल फोन घ्याल आणि तुमच्या पहिल्या इयत्तेच्या शिक्षकांना कॉल करून त्यांच्यावर ओरडून तुमचे जीवन बिघडवल्याचा, तुम्हाला सर्व रंग चुकीचे शिकवल्याचा आरोप कराल का? मला नाही वाटत कि तुम्ही असे काही कराल. तुम्ही भीतीची भावनिक प्रतिक्रिया देणार नाही, आकाडतांडव करणार नाही. तुम्ही फक्त हेच म्हणाल की मी मूर्ख आहे, माझ्या बोलण्याला काही अर्थ नाही म्हणून त्या कडे दुर्लक्ष कराल आणि तुमच्या कामाला लागलं. का? कारण निळा रंग हा निळाच असतो हे तुम्हाला पूर्णपाने पटले आहे आणि तसा तुमचा विश्वास आहे!

आता, माझ्या उदाहरणाची आपल्या विश्वासाच्या चर्चेशी तुलना करूया. देवाने तुम्हाला सांगितले की तुम्ही कैंसर पासून पूर्णपणे बारे होणार अणि त्यावर तुमचा पूर्ण विश्वास आहे, पण जर डॉक्टरने तुम्हाला सांगितले की तुम्ही त्या कर्करोगाने मरणार आहात तर? तुम्ही त्या डॉक्टरकडे बघाल आणि विचार कराल की तो मूर्ख आहे कारण तुम्हाला माहित आहे की असे होऊ शकत नाही. का? कारण तुम्हाला आरोग्य मिळावे म्हणून येशूने जी किंमत मोजली त्यावर तुमचा पूर्ण विश्वास आहे. तुम्हाला हे दिसून येते का? पुष्कळ लोक प्रार्थना करतात, परंतु परीक्षण केल्यावर, मला आढळले की त्यांच्या प्रार्थना विश्वासाच्या प्रार्थना नसून आशेच्या प्रार्थना आहेत, त्यांना परिणामाची खात्री नसते. माझ्या मित्रांनो, म्हणूनच हे खूप महत्वाचे आहे की आपण स्वतःला देवाच्या वचनाने तयार केले पाहिजे. देवाची इच्छा काय आहे हे आपल्याला माहित असणे आवश्यक आहे जेणेकरून आपण त्याच्या म्हणण्यावर

विश्वास ठेवू शकू आणि जी त्याची इच्छा नाही ते नाकारू शकू. मी तुम्हाला माझ्या स्वतःच्या जीवनातील एक उदाहरण देतो हे स्पष्ट करण्या साठी कि देव जे म्हणतो त्यावर आपले स्वतःचे पोषण करणे किती महत्वाचे आहे.

मी थकलो होतो, कारण स्वतःच्या व्यवसायाचा मालक म्हणून मागील काही आठवडे माझ्या साठी कठीण गेले होते (हे मी चर्चमध्ये पाळक म्हणून काम सुरु करण्या आधीची गोष्ट आहे). मला सतत येणाऱ्या सेल्स कॉल्सला उत्तरं द्यावी लागत होती आणि अर्थातच कमिशनवर उदरनिर्वाह करावा लागत असल्या मुळे भयंकर आर्थिक दबाव होता. मी माझ्या डेंटिस्टकडे रुटीन फिलिंगसाठी जात होतो. डेंटिस्ट ने मला नोव्होकेन इंजेक्शन देईपर्यंत सर्व काही सामान्य होते. ते इंजेक्शन दिल्या नंतर जबडा हळू हळू बधिर व्हायला पाहिजे होता, परंतु त्या उलट मला एकदम धक्का बसला आणि माझा जबडा अचानक बधिर झाला. मला आश्चर्य वाटले आणि मी काय झाले म्हणून मी डेंटिस्ट ला विचारले. ते म्हणाले, “अरे, मला वाटते की मी हे इंजेक्शन तुमच्या मज्जातंतू मध्ये दिले आहे.” मी पटकन त्याला विचारले, “ते नॉर्मल आहे का?” त्यांनी अशा प्रकारे उत्तर दिले, “ठीक आहे, ते सहसा बरे होऊन जाते.” काय? ते जे बोलले ते मी नीट ऐकले का? “डॉक्टर, तुम्हाला काय म्हणायचे आहे की ते सहसा बरे होते?” ते म्हणाले, “सुमारे 80 टक्के ते 85 टक्के प्रमाणात ते बरे होते, काही परमनंट नेगेटिव्ह इफेक्ट न होता ते पूर्णपणे बरे होऊन जाते.”

काय? माझ्या मनात अचानक भीती निर्माण झाली. आता काय? हे बरे होणार आहे की नाही? माझ्या मनात भीतीदायक विचार येऊ लागले होते. डॉक्टर कडचे तपासणीचे काम संपल्या नंतर देखील, माझा चेहरा सुन्न राहिला, सामान्यपणे हा बधीरपणा हळूहळू कमी व्हायला पाहिजे. मी डेंटिस्टच्या उपचारानंतर तिथूनच सुमारे एक तासाच्या अंतरावर असलेल्या क्लायंटला भेटण्या साठी जात होतो, त्यामुळे माझ्यासोबत नुकतेच काय घडले याचा विचार करण्यासाठी माझ्याकडे भरपूर वेळ होता. पण त्या क्लायंट पर्यंत पोहचेपर्यंत मला कोणत्याही वेदना होत नव्हत्या, पण माझ्या मनात शांती नव्हती आणि मनात सतत भीतीचे विचार घोळत असल्यामुळे मला वेदना होत होत्या.

अपॉईंटमेंटवरून घरी परतताना, रस्त्यात मी एका मित्राच्या घरी थांबलो. माझा चेहरा अजूनही सुन्न होता आणि मी कोणाकडून तरी खात्री मिळविण्याचा प्रयत्न करत होतो की माझा जबडा बरा होईल. ह्या ठिकाणी मी जी चूक करत होतो त्या कडे लक्ष द्या: मी देवाच्या वचनाकडे न जाता एका व्यक्तीकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न करत होतो आणि तो व्यक्ती माझ्या मतानुसार दृढ विश्वासी देखील नव्हता. मी या व्यक्तीला काय घडले ते सांगितले आणि, "ही काही मोठी गोष्ट नाही, गॅरी; ते बरे होईल!" असे ते म्हणतील अशी अपेक्षा केली, पण त्याऐवजी, ते म्हणाले. "अरे, बापरे! माझ्या एका मित्राला देखील असेच झाले होते, आणि त्यांचा चेहरा कधीही बरा झाला नाही; तेव्हापासून त्यांचा चेहरा अर्धांगवायू झाला आहे." मी जे ऐकत होतो त्यावर माझा विश्वास बसत नव्हता! मला आता भीती वाटू लागली होती. आता पर्यंत हे बरे होईल असेच मला वाटत होते, आपला किमती वेळ माझ्यासाठी दिल्या बद्दल मी माझ्या मित्राचे आभार मानले आणि तिथून निघालो. हताशपणे, मी दुसऱ्या मित्राच्या घरी गेलो आणि त्याला देखील तोच प्रश्न विचारला, आणि त्या ठिकाणी देखील मला तेच उत्तर ऐकायला मिळाले आणि मला आश्चर्य वाटले, "अरे, नाही," तो म्हणाला, "माझा एक मित्र होता त्याला देखील असेच झाले होते आणि त्यांचा चेहरा कधीही बरा झाला नाही; त्यांचा चेहरा आजही अर्धांगवायू आहे."

ह्या क्षणाला मला कळून चुकले कि देवाचे वचन हीच केवळ माझी आशा आहे.

या भेटीनंतर, मी खचून गेलो. मला माहित आहे की देव बरे करतो (माझ्या मनात), परंतु माझ्या मनात उत्पन्न झालेल्या भीतीने मी ग्रासून गेलो होतो. मला माझ्या अंतःकरणात निश्चितपणे विश्वास नव्हता. त्या संपूर्ण रात्रभर, मी वेदनेत होतो! माझे मन भीतीने भरले होते, आणि माझा चेहरा अजूनही डेंटिस्ट कडे असतांना जसा होता तसाच सुन्न होता. मी झोपायचा प्रयत्न करू लागलो पण माझ्या उजव्या कानाच्या खाली थोडे दुखू लागले. हे तेच असेल का? माझ्या वडिलांना एक किंवा दोन वर्षापूर्वी बेल्स पाल्सी झाला होता त्या मुळे त्यांना बराच त्रास सहन करावा लागला होता आणि त्यांनी मला सांगितले होते की हा आजार त्यांच्या कानाखाली काही वेदना सुरू झाल्या आणि त्या नंतर वाढला. जेव्हा चेहऱ्याच्या स्नायूंवर नियंत्रण ठेवणारी मज्जातंतू, जी कानाच्या खाली असलेल्या हाडातील एका छोट्या

छिद्रातून जाते, तिला संसर्ग झाल्या मुळे किंवा जळजळ झाल्यामुळे दबून जाते तेव्हा बेल्स पाल्सी होतो.

मी झोपण्याचा प्रयत्न करत होतो तेव्हा, झोप तर येत नव्हती पण असे काही तरी मला सतत माझ्या कानात ऐकू येत होते, "तुलाही तुझ्या वडिलांप्रमाणेच बेल्स पाल्सी होणार आहे." जेव्हा मी सकाळी उठलो तेव्हा मला पूर्णपणे बेल्स पाल्सी झाली होती! आता माझा जबडाच केवळ नाही तर उजव्या बाजूचा संपूर्ण चेहरा सुन्न झाला होता आणि मी माझे डोळे आणि तोंड देखील बंद करू शकत नव्हतो. परिस्थिती अगदी बिघडून गेली होती.

माझ्या संशयाची पुष्टी करण्यासाठी मी स्थानिक डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी काही परीक्षण केले, त्यानंतर माझ्याकडे पाहिले आणि सांगितले की मला खरोखरच बेल्स पाल्सी झाली आहे. मग मी विचारले, "पुढे काय होईल?" ते म्हणाले, "ठीक आहे, सुमारे 80 ते 85 टक्के प्रकरणांमध्ये, तो कायमचा अर्धांगवायू न होता बरा होऊन जातो." "तो हेच म्हणणार आहे असा जो मी विचार करत होतो तेच त्याने सांगितले का?"

ह्या वेळेपर्यंत मला कळून चुकले होते कि माझी परिस्थिती गंभीर आहे. मला माहित होते की सैतान एवढेच करून थांबणार नाही आणि पुढे काय होणार ते पाहत मला थांबायचे नव्हते. मी चुकीच्या दिशेने जात आहे हे लक्षात येण्यासाठी मला आत्मिक युद्धाबद्दल पुरेशी माहिती होती. लक्षात ठेवा, मला या प्रकारच्या गोष्टींबद्दल खूप माहिती होण्याआधीची ही गोष्ट आहे. परंतु मला हे समजण्याइतपत माहिती होती की मला या परिस्थितीला हरवून काही यश मिळवायचे असेल तर मला या परिस्थितीला आत्मिकरित्या सामोरे जावे लागेल. मला हे देखील समजले की जेव्हा मी थकलो आहे आणि कोणत्याही त्रासाची अपेक्षा करत नाही तेव्हा मला बेसावध अवस्थेत कोंडीत पकडण्याचा जा सैतानाची युक्ती आहे.

त्या वेळी, मला माहित होते की माझी एकमेव आशा ही देवाचे वचन आहे. माझ्या मनात उत्पन्न झालेली भीती थांबवण्याची माझ्यात क्षमता नव्हती. म्हणून मी 3 x 5 कार्डे तयार करुन त्यावर आरोग्याचे अभिवाचन देणारी शास्त्रवचने लिहिली आणि ती माझ्या घरभर पोस्ट केली. मी परमेश्वरासमोर पश्चात्ताप केला आणि माझ्या हृदयात विश्वास विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली. मला माहित आहे की विश्वास वाढवण्यासाठी मला माझ्या हृदयात वचन पेरले पाहिजे, म्हणून मी दिवसभर देवाच्या वचनावर चिंतन करीत राहिलो.

सुरुवातीला काहीही बदलले नाही. माझा चेहरा सुन्न होता तसाच राहिला आणि मी सतत भीतीच्या भावनेशी लढत राहिलो. सुमारे एक आठवडा झाला, तरीही माझ्या चेहऱ्यावर काहीही बदल झाला नाही, आणि मग ते घडले! मार्क 4:26 मधील आपले शास्त्रवचन ज्या प्रक्रियेबद्दल शिकवते त्याप्रमाणे, जेंव्हा मी माझ्या हृदयात वचन पेरले, तेंव्हा विश्वास निर्माण होऊ लागला, प्रथम पाते, नंतर देठ, ओंबी आणि नंतर त्या ओंबीमध्ये परिपक्व धान्य.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान, अद्याप कोणतीही सहमती नव्हती आणि त्यामुळे विश्वास नव्हता. तथापि, जरी मला बदल दिसत नसला किंवा ही प्रक्रिया कशी कार्य करते हे माहित नसले तरी, मार्क 4 मधील आपल्या शास्त्र वचना नुसार, गोष्टी खरोखर बदलू लागल्या. मी ज्या बदलाबद्दल बोलत आहे तो अद्याप प्रकट झालेल्या नैसर्गिक क्षेत्रात नाही, परंतु तो बदल आपल्या अंतःकरणात होत आहे. जर आपण वचनाला धरून राहिलो, तर वचन हळूहळू आपल्या अंतःकरणाची विश्वास प्रणाली अविश्वासातून बदलून स्वतःहून स्वर्गाशी सहमती उत्पन्न करतो. तर या प्रकरणात, ते माझे एकमेव उत्तर आहे हे जाणून मी वचनाला धरून ठेवले.

अचानक, एके दिवशी, मी माझ्या घरातून फिरत होतो अणि ती 3X5 कार्डे जी सर्वत्र भिंतींवर लावलेली होती ज्यावर आरोग्य प्राप्त होण्याच्या अभिवचने लिहिलेली होती त्या कडे पाहत होतो, त्या वेळी मी ज्या एका शास्त्रवचनाकडे निदान शंभर वेळेस पाहिले आणि वाचले होते त्या कडे गेले. पण यावेळेस जेंव्हा मी त्या वचनाकडे बघितले तर धमाका झाला! अचानक, माझ्यावर अभिषेक झाला, भीती लगेचच निघून गेली आणि मला कळले की मी बरा झालो आहे. होय, माझा चेहरा अजूनही सुन्न झाला होता. कोणताही बदल झाला नाही, परंतु मला माहित होते की मी बरा झालो आहे. काही तासांतच, माझा चेहरा पूर्णपणे सामान्य झाला होता, सर्व सुन्नपणा निघून गेला होता. देवाची स्तुती असो! देवाचे वचन कार्य करते!

जरी मी दुर्लक्ष आणि व्यस्ततेमुळे माझे आध्यात्मिक जीवन कमकुवत होऊ दिले होते, तरीही मला माझ्या चुकीची जाणीव झाली आणि मला माझ्या मूर्खपणाचा पश्चात्ताप झाला. विश्वास खरोखर कसे कार्य करतो हे मी पहिल्यांदा शिकत होतो आणि मला या क्षेत्रात फारसा अनुभव नव्हता. मी जे काही केले त्याकडे मी मागे वळून पाहतो, त्या वेळी अडचणीत असतांना माझे पुढे काय होणार ह्या बद्दल देवाच्या वचनात उत्तर शोधण्या ऐवजी मी लोकांकडे

जाऊन त्यांना त्या बद्दल विचारत होतो. नेमके काय होत आहे हे मला समजल्यानंतर, मी पूर्ण विश्वासाने देवाच्या वचनाकडे वळलो. दुर्दैवाने, बहुतेक लोक या प्रक्रियेवर विश्वास ठेवत नाहीत कारण त्यांना विश्वास आणि तो कसा येतो याबद्दल कधीही शिकवले गेले नाही. त्यांना या प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे, जेव्हा ते तणाव दबावाखाली असतात तेव्हा वचन कार्य करत नाही असे समजून ते देवाच्या वचनाला सोडून देतात.

सैतानाचा प्रतिकारक हल्ला समजून घ्या

क्रिस्टीनला देवाबद्दल फारशी माहिती नव्हती तेंव्हा ती आमच्या चर्चमध्ये आली. आमच्या एका रविवारच्या सकाळच्या आराधनेच्या वेळी तिचा नवीन जन्म झाला आणि तिचे आयुष्य आमूलाग्र बदलले. आमच्या चर्चमध्ये देवाचे राज्य कसे कार्य करते हे शिकविण्या साठी वर्ग घेतले जातात. आपण ज्या क्षेत्रांबद्दल बोलतो आणि शिकवतो त्यापैकी एक म्हणजे आरोग्य प्राप्त करण्याचा कायदेशीर अधिकार. क्रिस्टीनला अनेक वर्षांपासून श्रवणशक्तीचा त्रास होत होता. खरं तर, ती 40 वर्षांपासून श्रवणयंत्राचा वापर करत होती, आणि तिची 50 टक्क्यांहून अधिक श्रवणशक्ती गमावली होती. तिची आई मूकबधिर होती आणि तिचा भाऊ देखील याच समस्येने त्रस्त होता आणि त्याला ऐकू देखील येत नव्हते. जेव्हा क्रिस्टीनने ऐकले की, विश्वासू असल्या मुळे, तिला बरे होण्याचा कायदेशीर अधिकार आहे, तेव्हा ती खूप उत्साहित झाली!

वर्गात, माझ्या पत्नीने तिच्यावर हात ठेवला आणि तिला ऐकू येण्यासाठी प्रार्थना केली, आणि लगेच, पॉप असे झाले, आणि तिला उत्तम प्रकारे ऐकू येऊ लागले. क्रिस्टीन ओरडायला आणि रडायला लागली आणि देवाची स्तुती करू लागली. माझी पत्नी, ड्रेन्डा आणि क्रिस्टीन यांनी येऊन मला आनंदाची बातमी सांगितली तेव्हा मला वाटले कि मी तिला सैतानाच्या प्रतिहल्ल्याबद्दल सावध केले पाहिजे. मी ड्रेन्डाला क्रिस्टीनला निर्देश देण्यास सांगितले की जर लक्षणे परत येऊ लागली तर तिने या समस्येवर धैर्याने बोलले पाहिजे आणि घोषित केले पाहिजे की ती बरी झाली आहे आणि सैतानाला मागे जाण्यास सांगितले पाहिजे. दुसऱ्या दिवशी सकाळी तिची परीक्षेची वेळ आली. तिला नीट ऐकू येत नव्हते आणि तिचा बहिरेपणा

परत आला होता. म्हणून तिने आम्ही सांगितले तेच केले, “नाही! सैताना, मी हा बहिरेपणा स्वीकारणार नाही. मला आरोग्य प्राप्त झाले आहे आणि येशूच्या नावाने माझा बहिरेपणा दूर झाला आहे!” पॉप! तिचे कान उघडले आणि तेव्हापासून ते उघडेच आहेत.

लक्षात ठेवा की सैतान पलटवार करेल आणि तुमच्या जीवनावर राज्य करण्याची संधी पुन्हा प्राप्त करण्याचा प्रयत्न करेल. त्याला ते करू देऊ नका. देवाच्या वचनावर दृढ रहा!

या प्रकरणात, मी तुम्हाला विश्वास म्हणजे काय, ते कसे कार्य करते, तुमचा विश्वास आहे की नाही हे कसे जाणून घ्यायचे, आणि विश्वास कोठे मिळवावा याबद्दल मूलभूत माहिती देण्यासाठी थोडा वेळ घेतला आहे. देवाचे राज्य तुमच्या जीवनात कार्य करण्यासाठी, तुम्हाला हे माहित असणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, येशूने त्या स्त्रीला सांगितले होते, “तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.” आणि तुमच्यासाठीही हेच सत्य आहे: तुमचा विश्वास, स्वर्ग जे म्हणते त्या सोबत तुमचे हृदय सहमत असल्याची पूर्ण खात्री असणे आणि तुम्हाला जीवनात येणाऱ्या कोणत्याही समस्या किंवा गरजांसाठी विळा लावणे हे तुमचे उत्तर आहे.

अध्याय 6

परमेश्वराचा आशीर्वाद

मी एका रेस्टॉरंटमध्ये माझी पत्नी आणि एका पाहुण्या वक्त्यासोबत बसलो होतो. संध्याकाळचे सुमारे 10:00 वाजले होते, आणि आम्ही नुकतीच संध्याकाळची एक अत्यंत सामर्थी आराधना सभा पूर्ण केली होती. आमची ऑर्डर घ्यायला वेटर आला आणि आम्ही गप्पा मारू लागलो. माझ्या पाहुण्या वक्त्याने त्याला आराधना किती छान झाली आणि आमच्या चर्चबद्दल सांगायला सुरुवात केली. मग ती म्हणाली, तुला शिकार करायला आवडते का? तो म्हणाला की त्याला शिकार करायला खुप आवडते. माझ्या पाहुण्या वक्त्याला नेहमी माझ्या शिकारीच्या कथांबद्दल उत्सुकता असायची आणि खरं तर, मी तिला त्या संध्याकाळी माझे एक फेथ हंट पुस्तक तिच्या मित्रासाठी घरी घेऊन जाण्यासाठी दिले होते. माझे एक पुस्तक माझ्या शेजारी जमिनीवर बसून हे त्या वेळी तिला घरी घेऊन जाण्या साठी देणार होतो.

वेटर आपली शिकारीची कहाणी सांगत राहिला कि कसे त्याने किती तरी वेळेस प्रयत्न केले पण त्याला एकही हरण मिळाले नाही. मी आणि माझे पाहुणे देवाचे राज्य कसे चालते आणि प्रत्येक वेळी जेव्हा तो शिकार करायला जातो तेव्हा त्याला त्याचे हरण मिळण्याची अपेक्षा कशी करावी हे समजावून सांगू लागलो. आमच्या बद्दल काय विचार करायचा हे त्याला कळत नव्हते. पण मला आठवले कि माझ्याकडे एक पुस्तक आहे आणि मी ते पुस्तक त्याला देऊ केले. मी माझ्या पाहुण्या वक्त्याला सांगितले की मी तिला दुसरी प्रत देईन आणि ती म्हणाली कि काही हरकत नाही. वेटरने माझे आभार मानले आणि मी हे पुस्तक नक्की वाचेन ते वचन मला दिले, परंतु मला वाटले की कदाचित हे आमचे शेवटचे संभाषण आहे, आमची पुन्हा कधी भेट होणार नाही. ते तसे झाले नाही.

मी सुमारे 25 पाळकांसाठी एक सभा आयोजित केली होती, देवाचे राज्य आणि ते कसे कार्य करते याचे स्पष्टीकरण मी त्या सभे मध्ये देत होतो. ती सभा खूपच उत्तम झाली होती. मी मीटिंग रूममधून बाहेर पडणार होतो आणि माझे कर्मचारी साफसफाई करत असताना, एक पास्टर परत आत आले. ते आणि त्यांची पत्नी माझ्या पत्नीकडे आले आणि आम्ही त्यांच्या सोबत थोडा वेळ बोलू शकतो का असे विचारले. पास्टर आम्हाला सांगू लागले कि जर त्यांनी $6,900 एवढी रक्कम भरली नाही तर त्यांचे घर बंद केले जाईल. त्यांनी हे देखील सांगितले कि त्यांच्या जवळ केवळ $100 शिवाय आणखी काहीही पैसे नाहीत, आणि ते त्यांनी आपल्या हातात धरून मला दाखविले. ते म्हणाले, "माझ्याकडे एवढेच आहे, पण आज रात्री तुम्ही शिकवल्याप्रमाणे मला ते पेरायचे आहेत, आणि ह्या मध्ये या आठवड्यात आम्हाला आवश्यक असलेल्या पैशासाठी तुम्ही आणि तुमची पत्नी आमच्याशी सहमत असावे अशी आमची इच्छा आहे." आम्ही सर्वांनी हात जोडून प्रार्थना केली आणि त्या पैशासाठी देवाचे आभार मानले.

सुमारे एक महिन्यानंतर, मी ह्याच पास्टर ला दुसऱ्या कार्यक्रमात पाहिले आणि ते उत्साहाने धावत माझ्याकडे आले. "काय घडले ते मला तुम्हाला सांगायचे आहे," ते म्हणाले. "आपण या पूर्वी जेंव्हा बोललो तेंव्हा मी तुम्हाला हे सांगितले नाही, परंतु माझी पत्नी आणि माझा एक लहानसा पार्ट-टाइम सिल्क स्क्रीन टी-शर्टचा व्यवसाय आहे आणि आम्ही आमच्या गॅरेजमधून कधी कधी तो चालवत असतो. आम्ही ह्या व्यवसायात फारसे काही काम करत नाही, परंतु अधून मधून आम्हाला काही ऑर्डर मिळत असतात. तुमच्यासोबत प्रार्थना केल्या नंतर दुसऱ्या दिवशी, आम्हाला एकूण $8,900 च्या अनेक ऑर्डर मिळाल्या. त्या आठवड्यात आम्हाला खूप कष्ट करावे लागले, पण त्या शुक्रवारपर्यंत, आमच्याकडे आमचे घर सोडविण्यासाठी आवश्यक असलेले $6,900 आम्हाला मिळाले. आम्ही तुमचे फार फार आभारी आहोत!"

मी नॉर्थ कॅरोलिना येथे पाळकांच्या परिषदेत सुमारे 500 इतर पाळकांसह होतो. मी सत्र चालवत नव्हतो, फक्त उपस्थित होतो. एक माणूस माझ्याकडे आला आणि म्हणाला, "मला तुमच्याशी बोलायचे आहे." तो जर्मनीचा पाळक होता, आणि म्हणाला की त्याच्याकडे एक मनोरंजक कथा आहे ती त्याला मला सांगायची आहे.

त्यांच्या मुलाला, जो किशोरवयीन होता, कुठून तरी माझ्या सीडीज मिळाल्या होत्या. त्या सीडीज वरील शिक्षण ऐकून, त्याने ठरवले की त्याला विश्वासाने प्लेस्टेशन 3 मिळणार आहे कारण त्याच्याकडे ते विकत घेण्यासाठी पैसे नव्हते. मला विश्वास आहे की प्रत्येकाला प्लेस्टेशन 3 काय आहे हे माहित आहे, परंतु जर तुम्हाला ते काय आहे हे माहित नसेल तर मी सांगतो, ते एक कम्पुटर वर गेम खेळण्याचे साधन आहे. पास्टर ने मला सांगितले की त्यांचा मुलगा एके दिवशी त्याच्या ऑफिसमध्ये गेला आणि त्याने त्यांना विचारले की ते प्लेस्टेशन 3 साठी त्याच्याशी सहमत आहे का. मुलाने त्याच्या वडिलांना सांगितले की तो माझ्या सीडीवर काय शिकत आहे आणि त्याला हे प्ले स्टेशन मिळण्या साठी बी पेरायचे आहे आणि याबद्दल त्याच्या वडिलांसोबत प्रार्थना करायची आहे. पास्टर ने मला सांगितले की त्यांनी याबद्दल फारसा विचार केला नाही, परंतु चर्चचा पास्टर म्हणून, त्यांना त्यांच्या मुलाकडून एक बी पेरण्याचा स्वरुपात दान मात्र मिळाले. त्यांनी आणि त्यांच्या मुलाने एकत्र प्रार्थना केली आणि मुलाला आता प्लेस्टेशन 3 मिळालेच आहे असे मान्य केले आणि त्यांनी हे देखील मान्य केले कि आता ही समस्या पूर्णपणे संपुष्टात आली आहे.

दुसऱ्या दिवशी, त्यांच्या चर्चमधील एका व्यक्तिने पास्टर ला बोलावले आणि विचारले की त्यांच्या मुलाला जर थोडे पैसे कमवण्याची संधी मिळाली तर काही हरकत तर नाही, कारण त्यांच्या कडे एक अल्पकालीन प्रकल्प होता ज्यासाठी त्यांना मदतीची आवश्यकता होती. मुलाला फार आनंद झाला आणि त्या प्रोजेक्टवर दोन दिवस काम करून त्याने प्लेस्टेशन 3 विकत घेण्यासाठी पुरेसे पैसे कमावले.

या घटनेने मुलाचे लक्ष वेधून घेतले आणि पाद्रीने सांगितले की, काही आठवड्यांनंतर, त्यांचा मुलगा त्याच्या कार्यालयात परत आला आणि त्याने विचारले की ते त्याच्याशी आणखी काहीतरी प्राप्त होण्यासाठी सहमत होतील का. पास्टर मला सांगितले कि त्यांनी मुलाला होकार देऊन म्हटले, “नक्कीच,” पण जेव्हा त्याच्या मुलाने त्यांना म्हटले कि देवाने मला मजबूत स्नायू द्यावेत ह्या साठी तुम्ही माझ्या सोबत सहमत व्हावे अशी माझी इच्छा आहे. तेंव्हा पास्टर मला म्हणाले की आपल्या मुलाला त्यावर काय उत्तर द्यावे हे त्यांना समजले नाही. पण अखेरीस, त्यांनी आपल्या मुलाला सांगितले की मजबूत स्नायू मागणे चांगले आहे

पण त्या सोबत त्याला त्याची आपली स्वतःची भूमिका देखील पार पाडावी लागेल आणि जोपर्यंत तो ही बाब समजून त्या प्रमाणे करेल तोपर्यंत ते त्याच्याशी सहमत असतील. त्यांच्या मुलाने होकार दिला. आणि मग पुन्हा एकदा मुलाने मजबूत स्नायू मिळण्या साठी पेरणी केली आणि दोघांनी मिळून यासाठी सहमतीने प्रार्थना केली.

दुसऱ्या दिवशी, पास्टर च्या घरासमोर एक कार येऊन थांबली. चर्चमधील एक कुटुंब त्या कार मधून आले होते. जेव्हा पास्टर त्यांच्याशी बोलण्यासाठी बाहेर गेले तेव्हा त्यांनी सांगितले की ते आपले गॅरेज साफ करत असतांना त्यांना एक बारबेल सेट मिळाला आणि त्यांना वाटले की पास्टर च्या मुलाला त्याची गरज असेल. आणि त्याला गरज नसेल तर चर्च मध्ये इतर कुणाला तरी गरज असेल तर ते त्या व्यक्तीला दिल्या जाऊ शकतात. पास्टर ने मला सांगितले की त्यांच्या मुलाला आपले मसल्स मजबूत बनवायचे होते या बद्दल त्यांनी कुणालाही काहीही सांगितले नव्हते आणि त्यांनी आदल्या रात्रीच याबद्दल प्रार्थना केली होती. पास्टर म्हणाले, हे सर्व पाहून आणि ऐकून त्यांना धक्काच बसला! ते घरात गेले आणि आपल्या मुलाला म्हणाले, "त्या सीडीज ज्या तू पाहतोस त्या कुठे आहेत?"

अशा प्रकारच्या कथा सामान्य आहेत. मी ते नेहमी ऐकतो आणि ते तुमच्या आयुष्यातही सामान्य असावेत अशी माझी इच्छा आहे. आत्तापर्यंत आम्ही देवाच्या राज्याचे कायदे कसे कार्य करतात याच्या अनेक मुख्य पैलूंचे अवलोकन केले आहे आणि चर्चा केली आहे, तसेच स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीरपणा किंवा अधिकार क्षेत्र प्राप्त करण्यासाठी करार किंवा विश्वास कसा आवश्यक आहे. आता, राज्याचे हे कायदे आपल्या आर्थिक गरजांसाठी नेमके कशा प्रकारे मदत करू शकतात याबद्दल थोडे खोलवर जाऊन पाहण्याचा प्रयत्न करू या.

परमेश्वराचा आशीर्वाद समृद्धी देतो, तिच्याबरोबर तो आणखी कष्ट देत नाही.
— नीतिसूत्रे 10:22

जेव्हा मी पहिल्यांदा हे शास्त्रवचन पाहिले तेव्हा मला वाटले, "निश्चितच, ह्या वचनात प्रत्यक्षात जे लिहिले आहे तोच त्याचा अर्थ नाही, नाही का?" पण मला समजले आहे कि त्याचा अर्थ नेमका तोच आहे जे त्या ठिकाणी लिहिले आहे! हा शास्त्रभाग कशाबद्दल बोलत

आहे हे समजून घेण्यासाठी, आपल्याला मागे वळून जेव्हा प्रथम मनुष्य निर्माण केला गेला त्या सुरुवातीच्या त्या भागाकडे पाहावे लागेल.

> *तर एका ठिकाणी कोणी अशी साक्ष दिली आहे, "मर्त्य मानव तो काय की तू त्याची आठवण करावीस? अथवा*
>
> *मानवपुत्र तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस? तू त्याला देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले आहेस; तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस; आणि तू आपल्या हातच्या कृत्यांवर त्याला नेमले आहेस; तू सर्वकाही त्याच्या अधीन — त्याच्यापायांखाली — ठेवले आहेस."*
>
> *'सर्वकाही त्याच्या अधीन ठेवले आहेस,' म्हणजे त्याच्या अधीन ठेवलेले नाही असे काही राहू दिले नाहीस;*
>
> — इब्री 2:6-8

आम्ही हा शस्त्रभाग आधी वाचला होता, परंतु आता आमच्या चर्चेसाठी तो गंभीर अणि महत्वाचा आहे. पुनरावलोकन करत असतांना, जेव्हा मनुष्याची निर्मिती झाली तेव्हा पृथ्वीवरील सर्व काही त्याच्या अधिपत्याखाली ठेवले गेले. अशी एकही गोष्ट नव्हती जी त्याच्या अधीन नव्हती. त्याने पृथ्वीच्या क्षेत्रावर नियुक्त अधिकाराच्या पदावरून राज्य केले आणि तो ज्या सरकारचे प्रतिनिधित्व करत होता त्याचा मुकुट त्याने परिधान केला. त्याचा अभिषेक करून त्याला त्याच्या अधिकाराचे पद देऊन सन्मानित करण्यात आले. देवाविरुद्ध बंड करणाऱ्या सैतानाला आदाम येण्यापूर्वीच पृथ्वीवर टाकण्यात आले होते. सैतानाने मनुष्याचा तिरस्कार केला कारण देवाच्या अधिकाराचा मुकुट परिधान केलेला हा मनुष्य आपल्यावर राज्य करत आहे असे त्याला दिसून

परमेश्वराचा आशीर्वाद समृद्धी देतो, तिच्याबरोबर तो आणखी कष्ट देत नाही.

— नीतिसूत्रे 10:22

आले. सैतानाला आता या मनुष्य प्राण्याच्या अधीन व्हावे लागले जो त्याच्या नैसर्गिक, भौतिक स्थितीत त्याच्यापेक्षा खूपच कमकुवत होता. परंतु, आत्मिकदृष्ट्या, आदाम जे काही बोलत होता त्या प्रत्येक शब्दात असा अधिकार होता जसे काही देव स्वतः बोलत आहे. आदाम, देवाचा पुत्र, याने अधिकार आणि भव्यतेच्या या अद्भुत स्थानावरून पृथ्वीवर राज्य केले.

त्यामुळे सैतानाने या मनुष्याचा द्वेष केला आणि पृथ्वीवर त्याच्याकडे असलेल्या अधिकाराची लालसा बाळगली. अणि त्या साठी त्याच्याकडे एकच मार्ग होता की कसे तरी तो मुकुट, माणसाने घेतलेले पद त्याच्यापासून दूर करणे. फक्त एक छोटीशी अडचण होती. सैतानाला आदामाकडून मुकुट घेण्याचे सामर्थ्य नव्हते; त्याची एकमात्र आशा होती की कसे तरी आदामाला फसवावे आणि तो स्वतः आपला तो मुकुट काढून टाकेल. हव्वेला ही खात्री पटवून द्यावी की देवावर भरवसा ठेवण्यात अर्थ नाही आणि देव जे काही देऊ करत आहे त्यापेक्षा जीवनात बरेच काही आहे, आदाम आणि हव्वेने देवाऐवजी सैतानावर विश्वास ठेवण्याचे निवडले आणि देवाविरुद्ध विद्रोह केला. सरतेशेवटी, आदाम आणि हव्वा यांनी देवाच्या राज्यात अधिकाराचे त्यांचे कायदेशीर स्थान गमावले आणि सैतान या जगाचा देव बनला, जसे की आपण 2 करिंथ मध्ये पाहतो कि पौल सैतानाला अशा प्रकारे संबोधित करतो.

> *त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये.*
>
> — करिंथकरांस दुसरे पत्र 4:4

आदामने बंड करण्यापूर्वी, त्याने पुत्र होण्याचे लाभ उपभोगले. देवाकडे जे काही होते ते सर्व त्याच्या साठी उपभोग घेण्यासाठी होते आणि त्याच्या आयुष्यातील एकही दिवस त्याला कमतरता किंवा भीतीच्या विचारात घालवावी लागली नाही. त्याला पृथ्वीवर राहण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट त्याच्या निर्मितीपूर्वीच येथे ठेवण्यात आली होती.

उत्पत्तीच्या पुस्तकातील सृष्टीच्या सहा दिवसांचा विचार केल्यास, आपल्याला असे आढळून येते की मनुष्याची निर्मिती सहाव्या दिवसाच्या शेवटी झाली, हा देवाच्या

सृष्टिरचनेच्या योजनेचा शेवटचा भाग होता. त्याच्या साठी सातव्या दिवसात जगणे हे निश्चित केले होते, ज्याला देवाने विश्रांतीचा दिवस म्हणून घोषित केले. हे देव थकला होता म्हणून त्याने असे केले असे नाही, तर त्याचे सर्व कार्य पूर्ण झाले होते. देवाने काय पूर्ण केले आणि त्याने मनुष्यासाठी केलेली गौरवशाली योजना काय होती याचा क्षणभर विचार करा. दुःखाची गोष्ट म्हणजे, आदामाने ते सर्व सोडून दिले आणि ह्या प्रक्रियेत, देवाच्या राज्यामधील आपले कायदेशीर स्थान गमावले.

आदामाने आज्ञा मोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर देव त्याच्याकडे आला आणि देव आदामाला म्हणाला:

> *तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील; ती तुला काटे व कुसळे देईल; तू शेतातले पीक खाशील; तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुन:मातीला जाऊन मिळशील, कारण तिच्यातून तुझी उत्पत्ती आहे; तू माती आहेस आणि मातीला परत जाऊन मिळशील."*
>
> — उत्पत्ती 3:17b-19

माझी इच्छा आहे की पहिली गोष्ट जी तुम्ही लक्षात घ्यावी ती ही कि, देवाने पृथ्वीला शाप दिला नाही, आदामाने दिला. त्यावर त्याचे पूर्ण वर्चस्व होते. तो पृथ्वीची देखभाल करणारा व्यक्ती होता. आदाम, ज्याला पृथ्वीवर पूर्ण स्वामित्व आणि पूर्ण वर्चस्व होते, त्याने देवाच्या सरकारविरुद्ध विद्रोह केला आणि अक्षरशः देवालाच बाहेर काढले. या निर्णयाचा केवळ आदामावरच नव्हे तर संपूर्ण पृथ्वीवर आणि त्या दिवसापासून पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक स्त्री किंवा पुरुषावर प्रचंड परिणाम झाला. देवाने त्याला दिलेले पृथ्वी क्षेत्रावरील त्याचे अधिकार क्षेत्र त्याने अजूनही कायम ठेवले असले तरी, तो एकेकाळी ज्या मुकुट आणि सरकारचे प्रतिनिधित्व करत होता आणि त्यामुळे त्याला त्या शासनाचा पाठींबा होता त्या मुकुट आणि सरकारच्या दृष्टीकोनातून शासन करण्यास तो आता शक्तीहीन असल्याचे त्याला दिसून आले. जीवनापासूनच विभक्त झाल्याने, मृत्यू, काय आहे हे आदामाला अजिबात माहित नव्हते, त्या मृत्यूने आता त्याचा ताबा घेतला.

देव आदामाची त्याने जे काही केले त्या बद्दल कटाक्षाने ताडना करतो आणि आदामाला सांगतो की आता, प्रथम, त्याच्या पापामुळे, त्याने देवाच्या सरकारमधील त्याचे कायदेशीर स्थान गमावले आहे. आणि आदाम हा पृथ्वीवरील सरकारचा प्रतिनिधी असल्या मुळे, स्वर्गाने आपले कायदेशीर प्रतिनिधित्व गमावले आहे ज्याद्वारे त्याला पृथ्वीच्या क्षेत्रात अधिकार क्षेत्र मिळाले होते. दुसरे म्हणजे, पृथ्वीवर ह्या सर्व बाबीचा आता परिणाम झाला आहे त्यामुळे एदेन बागेत पूर्वी जशी तरतूद होती ती आता ह्या ठिकाणी निर्माण होणार नाही. आता आदामाला जगण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते पृथ्वीवर उगविण्या साठी स्वतःचा घाम गाळणे आणि कष्ट करण्याची गरज पडणार आहे. भूमीवर आता जंगली आणि काटेरी झाडे उगतील आणि जीवन कठीण होऊन जाईल; कसेही करून जगायचे आहे हेच जीवनाचे उद्देश्य बनून जाईल.

मी ह्याला कठीण जीवनपद्धती आणि कसे तरी करून जगण्याची मानसिकता ते म्हणतो, जी भीती आणि मृत्यूच्या भावनेने कलंकित आहे, जो आदामा नंतर येणाऱ्या प्रत्येक मनुष्यासाठी लागू होतो, पृथ्वी शापाने ग्रस्त झाली आहे. इथेच तुम्ही आणि मी मोठे झालो आणि जगण्याची व्यवस्था काय आणि कशी आहे ती आपल्या सर्वांना चांगलीच माहीत आहे. दाविदाने 23 व्या स्तोत्रात याला मृत्यूछायेची दरी म्हटले आहे.

> *मृत्युच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी कसल्याही अरिष्टाला भिणार नाही,कारण तू माझ्याबरोबर आहेस.*
>
> — स्तोत्रसंहिता 23:4

हे असे क्षेत्र आहे जिथे मृत्यूची भीती सर्वत्र पसरलेली आहे. परंतु आणखी एक नकारात्मक परिणाम देखील आहे. मनुष्य देवासोबतचा त्याचा नातेसंबंध गमावून बसला आणि परिणामी, तो स्वतःची ओळख देखील विसरून गेला आहे - तो आपल्या निर्मितीचे अणि रचनेचे उद्देश आणि आपली ओळख गमावून बसला आहे. जेव्हा मनुष्याला निर्माण केले तेव्हा त्याला एक उद्देश, एक निश्चित कामगिरी देण्यात आली होती. तो देवाच्या वतीने पृथ्वीवर राज्य करणार होता. दुसऱ्या शब्दांत, देवाने त्याला निश्चित नेमणूक आणि जीवनाचा उद्देश दिला होता. पण आता माणसाची संपूर्ण मानसिकता केवळ कसेतरी जगण्याकडे वळली आहे. जगणे हा त्याचा

उद्देश झाला आहे आणि त्याचे नवीन अस्तित्व टिकवून ठेवणे हीच त्याची कामगीरी होऊन गेली आहे.

आता, माणूस जो प्रत्येक निर्णय घेतो तो जगण्याच्या या शापातून फिल्टर केला जातो, एकतर तरतूद शोधणे किंवा साठवून ठेवणे हीच त्याची चिंता आणि काळजी आहे. त्याला शांती मिळत नाही; प्रत्येक दिवस कष्टाने आणि घामाने भरलेला असतो. जिवंत राहण्याच्या ह्या धडपडीच्या जीवनातून सुटकेचा केवळ एकच मार्ग आहे, आज आपण ज्याला उंदरांची शर्यत म्हणतो, त्यात काही प्रमाणात पुरेशी तरतूद आहे जेणेकरून आपण धावणे थांबवू शकतो. पुरुषाच्या पतनापासून हे प्रत्येक स्त्री-पुरुषाचे स्वप्न आहे. धावणे थांबवणे हे त्यांचे प्रथम क्रमांकाचे ध्येय आहे.

पृथ्वीच्या जगण्वाच्या शाप प्रणालीमध्ये, प्रत्येकजण धावून थकला आहे.

अतिरिक्त तरतूद असण्याइतपत भाग्यवान कोणीही व्यक्ति आपल्याला प्राप्त तरतुद मोठ्या काळजीने आणि सुरक्षितपणे साठवून ठेवतो. ते गमावण्याच्या मोठ्या भीतीमुळे तो ते धरून ठेवतो, कारण त्यांनी तसे न केल्यास, त्यांना पुन्हा वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळावा लागेल आणि गुलामासारखे पुन्हा शर्यतीत धावत राहावे लागेल.

माणसाचे स्वप्न, त्याचे जगण्याचे ध्येय, मी आधीच म्हटल्याप्रमाणे, पुरेशी तरतूद शोधणे हे आहे जेणेकरून तो जगण्यासाठी गुलाम बनून धावणे थांबवू शकेल आणि विश्रांती मिळवू शकेल. तुम्हाला ही वस्तुस्थिती स्पष्टपणे समजली आहे ह्याची मला खात्री करून घ्यायची आहे : पृथ्वीच्या जगण्याच्या शाप प्रणालीमध्ये, प्रत्येकजण धावून थकला आहे.

मला आठवते की एक दिवस सकाळी मी पास्टर सोबत बसलो होतो. ते मला सांगत होते की त्याला दररोज सकाळी उठल्यावर त्यांना त्यांची आर्थिक स्थिती, कर्ज आणि पैशांची कमतरता ह्यांची जो पर्यन्त आठवण येत नाही, तो पर्यंत त्यांना त्यांची सेवकाई खूप आवडते. ते म्हणाले की त्याचे आर्थिक प्रश्न एखाद्या ओल्या ब्लँकेटसारखे आहेत जे त्यांचा जीव गुदमरवण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्यांनी जे काही कार्य केले आहे त्याचा आनंद त्यांच्या पासून हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. केवळ पास्टर च अशा प्रकारच्या बिघडलेल्या परिस्थितीचा सामना करत नाहीत. बहुसंख्य कुटुंबांसाठी हा जीवन जगण्याचा एक मार्ग आहे कारण ते कर्ज, आणि दर महिन्याला मिळणाऱ्या पगारावर उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करत असतात.

प्रत्येकजण ह्या परिस्थिती मधून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत आहे, आणि संपत्ती हाच एकमेव मार्ग आहे, अर्थात वाजवीपेक्षा जास्त असणे. पृथ्वी शाप प्रणाली अंतर्गत, तुमची ओळख आता तुमच्याकडे काय आहे आणि तुम्ही किती कमवू शकता यावरून परिभाषित केली जाते. माणूस, प्रथम आपली नग्नता, त्याला ज्या उद्देश्याने उत्पन्न केले होते आणि त्याने आपली जी ओळख गमावून टाकली आहे ते झाकण्याचा आटोकाट प्रयत्न करतो आणि बनावटी ओळख आपलीशी करण्याचा प्रयत्न करतो. देवाच्या ज्या वैभवी आणि गौरवशाली अभिषेकाने त्याला झाकून टाकले होते त्या अभिषेकाची जागा आता त्याने संपत्ती ला दिली. दुसरे म्हणजे, त्याला सन्मानाचा मुकुट घालून देवाच्या राज्यात राज्य करण्याचे जे स्थान दिले होते, त्याची जागा त्याने जीवनाविषयी गर्व आणि इतर मनुष्यावर राज्य करण्याला दिली. माणूस आता एका गोष्टीने ग्रासला आहे - संपत्ती शोधणे किंवा साठवणे. त्याची ओळख आता त्याच्याकडे किती संपत्ती आहे आणि तो इतर पुरुषांवर किती ताकद दाखवू शकतो यावरून केली जाते. पतित माणसाच्या स्वाभिमानासाठी आता समाजातील स्थिती आणि स्थान खूप महत्वाचे झाले आहे.

याचा विचार करा. एक माणूस दुसऱ्या माणसाला विचारेल असा पहिला प्रश्न सहसा कोणता असतो? “तुम्ही उदरनिर्वाहासाठी काय करता?” का? आपण त्याच्या उदरनिर्वाहा बद्दल खरोखरच चिंतित आहोत की आपल्याला त्याची परिस्थिती फक्त जाणून घेण्यात स्वारस्य आहे? खरंच नाही, पण ह्या प्रश्नाने त्या व्यक्तीबद्दलची आपली आदर पातळी निश्चित होते. दुसऱ्या शब्दांत, आपण स्वतःला विचारत आहोत, “हा दुसरा माणूस कोण आहे? पृथ्वीच्या क्षेत्रात त्याला कोणते स्थान किंवा उंची आहे? मी त्याचा किती आदर करू? स्त्रियांनो,आता मी इथे फक्त पुरुषाच्या दृष्टीकोनातून बोलत आहे. माझ्या लक्षात आले की तुम्ही स्त्रिया ओळख ठरविण्याच्या बाबतीत संपूर्णपणे वेगळ्या दृष्टिकोनातून काम करता.

ही ‘पृथ्वी शाप प्रणाली’ अजूनही लागू आहे! लोक त्यांचे सर्व निर्णय धन शोधणे किंवा ते जमा करणे या फिल्टरद्वारे फिल्टर करतात. लोक आपला उद्देश काय आहे याचा विचार न करता चांगल्या पगाराची नोकरी घेण्यासाठी आपल्या राज्यातून दुसऱ्या राज्यात जातात. प्रत्येकाला रॉकस्टार व्हायचे असते. का? हे आपली ओळख (पद) आणि संपत्ती टिकवून ठेवण्याच्या धडपडी मुळे आहे.

हजारो माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये ते मोठे झाल्यावर त्यांना कोणत्या व्यवसायात जायचे आहे याबाबत एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यांच्यापैकी 65 टक्के विद्यार्थी म्हणाले की त्यांचे व्यवसायाचे उद्दिष्ट्य प्रसिद्ध होण्याचे आहे. प्रसिद्ध? मी शेवटी ह्या बद्दल जेंव्हा अभ्यास केला तर हे दिसून आले कि, प्रसिद्ध होणे हा काही व्यवसाय नाही.

एका अभ्यासात असे आढळून आले की 30 टक्के कामगारांना त्यांच्या नोकऱ्या आवडत नाहीत आणि दुसऱ्या मध्ये आढळून आले कि 40 टक्के लोकांना त्यांच्या नोकऱ्या आवडत नाहीत. तर ह्या वरून असे दिसून येते कि यू.एस.ए. मधील 70 टक्के कामगारांना ते करत असलेले काम आवडत नाही! मग ते तिथे का आहेत? कारण ते जगण्यासाठीच्या धावपळीचे गुलाम आहेत, केवळ जगण्यासाठी कष्ट करत आहेत आणि घाम गाळून धावत आहेत. यापैकी बहुतेक कामगारांच्या जीवनात उद्देश आणि आवड हे समीकरण नाहीच; बिले भरणे हाच एकमेव प्रेरक घटक आहे. कसेतरी करून पैसे शोधण्याच्या गरजेच्या गुलामगिरीमुळे पर्यायांसाठी फारशी जागा उरत नाही. जो जास्त पैसे देतो तोच प्रत्येक वेळी जिंकतो. याला म्हणतात उंदरांची शर्यत! तुम्ही आणि मी ह्याच ठिकाणी राहतो. कल्पना करा कि एक पाळीव उंदीर गोल फिरणाऱ्या चाकावर खूप वेगाने धावतो पण तो शेवटपर्यंत कुठेच पोहचत नाही. त्या उंदराची ती धाव पाहून आपल्याला गंमत वाटते आणि आपण हसून म्हणतो किती गोंडस आहे ते. पण खऱ्या जगात ही परिस्थिती गोंडस नाही, अजिबात गोंडस नाही. लोक त्या चाकावर मरतात आणि जिथे पोहचण्याची त्यांना आशा होती तिथे ते कधीच पोहोचत नाहीत.

> *तसेच काय खावे किंवा काय प्यावे ह्याच्यामागे लागू नका अथवा मनात अस्वस्थ राहू नका.कारण जगातील राष्ट्रे ह्या सर्व गोष्टी मिळवण्याची धडपड करतात; परंतु तुम्हांला त्यांची गरज आहे हे तुमच्या पित्याला ठाऊक आहे;तर तुम्ही त्याचे राज्य मिळवण्यास झटा, म्हणजे त्याबरोबर ह्याही गोष्टी तुम्हांला मिळतील.*
>
> — लुककृत शुभवर्तमान 12:29-31

कष्टदायक परिश्रम आणि घाम गाळून धावणे ही आपल्याला माहित असलेली एकमेव प्रणाली आहे. जर मी तुम्हाला म्हणालो की तुम्हाला कर्जातून बाहेर पडले पाहिजे, म्हणजे

मला म्हणायचे आहे की तुम्हाला 12 महिन्यांत कर्जातून बाहेर पडलेच पाहिजे, नाहीतर तुमच्या संपूर्ण कुटुंबाला कायमचे उत्तर ध्रुवावर पाठवले जाईल (मी हा मुद्दा मांडण्यासाठी एक अत्यंत कठोर उदाहरण वापरत आहे.), तर तुम्ही काय कराल? तुम्ही काय कराल ते मी तुम्हाला सांगतो. त्या कर्जातून मुक्त होण्या साठी कष्ट करून घाम गाळण्यासाठी आणि वेगाने धावण्यासाठी तुम्ही ताबडतोब योजना तयार करण्यास सुरवात कराल. तुम्ही म्हणाल, "ठीक आहे, मी आणखी काही पार्टटाइम नोकरी करू शकतो. माझी पत्नी देखील आणखी काही पार्टटाइम नोकरी करू शकते आणि मुलेही मदत करू शकतात." तुम्ही बघा, ही एकमेव तरतूद प्रणाली आहे जी तुम्ही शिकला आहात, कष्टदायक परिश्रम आणि घाम गाळण्याची कार्यपद्धत. मी तुम्हाला या प्रणालीचे आणखी एक चित्र दाखवून देतो.

समजा मी तुमच्या घरासमोरील रस्त्यावरून पळत होतो आणि मला त्या रस्त्याच्या विरुद्ध बाजूला एक तपकिरी कागदाची पिशवी दिसली ज्यामध्ये दहा दशलक्ष डॉलर्स आहेत. मी खूप उत्साहित होतो, परंतु मला माहित आहे की मला त्याची माहिती पोलीस स्टेशन मध्ये द्यावी लागेल. म्हणून मी तुम्हाला ओळखत असल्याने तुमच्या घरी धावत आलो आणि तुमचा फोन वापरण्यासाठी मागितला. मी पोलीस स्टेशन ला कॉल केला आणि तुम्ही जवळ उभे राहून ऐकत होता. मी त्यांना काय घडले आणि मला काय सापडले ते सांगितले. थोड्यावेळ शांततेनंतर त्यांनी त्यांचे रेकॉर्ड तपासले तेव्हा त्यांनी मला सांगितले की ते पैसे गहाळ झाल्याची त्यांच्याकडे कोणतीही तक्रार नाही त्यामुळे मी ते पैसे स्वतःसाठी ठेवू शकतो. (ते असे म्हणतील असे मला वाटत नाही, परंतु मी फक्त माझ्या उदाहरणासाठी ह्याचा वापर करत आहे.) जेव्हा ते मला असे म्हणाले, तेव्हा मी आनंदाने उडी मारली आणि ओरडलो. मग त्यांनी जे सांगितले ते मी तुम्हाला सांगितले आणि आनंदाने तर माझा परावारच उरला नव्हता.

मी आनंदित होतो आणि जे झाले ते सर्व तुम्हाला समजावून सांगत होतो पण तुम्ही शांतपणे अणि नम्रपणे फ़क्त हसलात. पण जे घडले ते तुम्ही तुमच्या पत्नीला रात्री जेवणाच्या वेळी सांगाल तेंव्हा तुम्ही काय कराल असे तुम्हाला वाटते? केवळ स्मित कराल? नाही, मला नाही वाटत तुम्ही असे कराल. तुम्ही म्हणाल, "ते _____ नाही!" तुम्ही रिकामी जागा भरली, नाही का? "बरोबर" हा शब्द योग्य उत्तर आहे हे तुम्हाला कसे कळले?

मी तुम्हाला सांगतो तुम्हाला ते कसे कळले, कारण तुमचे पालनपोषण अशाच प्रकारे झाले आहे. ह्याच व्यवस्थेत तुम्ही वाढलात. वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळणे हेच केवळ तुम्हाला माहित आहे.

माझ्या ह्या उदाहरणात, मला कोणतेही श्रम न करता ते पैसे सापडले आणि ती सद्य परिस्थितीची फसवणूक आहे. हे बरोबर नाही. त्या पैशासाठी मी श्रम केले नाहीत म्हणून ते मला मिळणे योग्य नव्हते; मला ते फक्त सापडले. तुम्हाला कदाचित असे भाग्य कधीच मिळणार नाही हे जाणून, आणि तुम्हाला जगण्यासाठी सतत तीच बांधिलकी आणि कष्टदायक परिश्रम करत राहावे लागणार आहे हे जाणून तुम्ही मत्सर आणि कटुतेने ग्रासून जाता.

आता ह्याची तुलना दुसऱ्या परिस्थिती सोबत करू या, जर मी एक दिवस घाणेरडे आणि फाटलेले कपडे घालून चर्चमध्ये आलो आणि उठून लोकांना म्हणालो, "आम्ही ते करण्यात यशस्वी झालो! ड्रेन्डा आणि मी गेल्या दहा वर्षांत दिवसात 22 तास काम केले आणि शेवटी आम्ही आमच्या घराचे पूर्ण पैसे भरले," ते ठिकाणी जल्लोष आणि टाळ्यांच्या गजर सर्वत्र ऐकू येईल. का? कारण कोणीतरी ते काम केले आणि तुम्हाला ते उत्साहवर्धक वाटले. कोणीतरी ते केले; परिस्थिती मधून बाहेर निघण्याचा मार्ग आहे! कदाचित आपण दात ओठ खाऊ, मनातल्या मनात चिडत राहू, आणि जे पैसे भरायचे ते भरून मोकळे देखील होऊन जाऊ. पण जेव्हा मला रस्त्याच्या कडेला पडलेले पैसे मिळाले तेव्हा सर्वांनी आनंदाने ओरडून टाळ्या का वाजल्या नाहीत? आणि ती रिक्त जागा भरणे तुम्हाला इतके सोपे का होते? कारण तुम्ही असेच विचार करता; तेच करत राहण्याचे तुमचे स्वप्न आहे. वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळून कष्ट करणे हीच योग्य प्रणाली आहे हेच आपण सर्वजण शिकलो आहोत. श्रमाशिवाय मिळालेला पैसा योग्य नाही.

हू वॉन्टस टू बी अ मिलेनियर? हा शो अत्यंत लोकप्रिय आहे. तो अत्यंत आकर्षक आहे कारण प्रत्येकजण त्या स्वातंत्र्याचे स्वप्न पाहतो. ते शो पाहताना, त्या मध्ये भावनिकरित्या पूर्णपणे गुंतलेले असतात, स्पर्धकांना प्रोत्साहित करतात, या आशेने कि ते यशस्वी होतील.

मी ह्या ठिकाणी विषय थोडा बदलत आहे, चोरी करणे ह्याची सोपी व्याख्या ही आहे कि त्या मध्ये श्रम करावे लागत नाहीत. ह्याचा विकृत अर्थ पाहिला तर, त्या द्वारे पृथ्वी

शाप प्रणालीपासून मुक्तता देखील प्राप्त होते. चला तर मग ह्या एका बाबीवर सहमत होऊया की प्रत्येकाला धावणे थांबवायचे आहे! पण ह्या साठी काही मार्ग आहे का? सहजपणे पैसे कमविण्याच्या अनेक योजना उपलब्ध आहेत. मला परदेशातील लोकांकडून दिवसाला किमान दहा ईमेल येतात त्या मध्ये त्यांना 20 दशलक्ष डॉलर्स वारशाने कसे मिळाले याची दुःखद कहाणी सांगतात आणि त्यांना ते पैसे सुरक्षित ठिकाणी सुरक्षित ठेवण्या साठी कोणाची तरी मदत हवी आहे अशी इच्छा व्यक्त करतात. त्या इमेल मध्ये ते मला म्हणतात कि मी त्यांचे ते पैसे घेऊन सुरक्षित ठेवण्यामध्ये त्यांची मदत करेल तरच ते त्यातील अर्धा अर्धा पैसे मला देतील. अर्थात, नंतर त्यांना माझा ईमेल पत्ता हवा असतो, आणि प्रक्रिया शुल्क, शिपिंग शुल्क, विमा, आणि त्यांच्या त्या वारशाचे पैसे सोडविण्या साठी इतर अनेक प्रकारची फीस मी भरावी अशी त्यांची इच्छा असते. खरंच? हे सर्व करण्यासाठी मी मूर्ख दिसतो का?

माझ्या एका क्लायंटने मला कॉल केला आणि त्याला त्याचे पैसे गुंतवणुकी बद्दल सल्ला हवा होता. मी माझे नेहमीचे प्रश्न विचारले आणि मला समजले की त्याच्याकडे गुंतवणूक करण्यासाठी सुमारे पाच दशलक्ष डॉलर्स आहेत. त्याने मला सांगितले की त्या क्षणी त्याच्याकडे पैसे नव्हते, पण ते त्याच्याकडे लवकरच वारसा हक्काने येणार होते. मी त्याला विचारले की इस्टेट किती लवकर सेटल होईल, आणि तो म्हणाला सुमारे दोन आठवड्यांत. म्हणून मी त्याला सुमारे दोन आठवड्यांनी कॉल केला, आणि तो म्हणाला की थोडा वेळ लागेल. वारशाचे पैसे ज्या युरोपियन बँकेत अडकून पडले होते तिथून ते सोडण्यात त्याला त्रास होत होता. आणि, त्याकडे माझं लक्ष गेलं, म्हणून मी प्रश्न विचारायला सुरुवात केली. खरी परिस्थिती अशी होती की फ्रान्समध्ये त्याच्या एका काकाचा मृत्यू झाला होता. या काकांनी त्याला आपल्या मृत्यू नंतर मिळावेत म्हणून त्याच्या साठी पाच लाख डॉलर्स सोडले होते. परंतु, वारसाहक्कावर $50,000 कर देयता बाकी होती आणि ते पैसे मिळण्या साठी ते पैसे देणे आवश्यक होते. त्याने मला सांगितले की तो ते पैसे जुळवण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्याने होम इक्विटी कर्जासाठी अर्ज केला आहे.

मी त्याला विचारले की त्याच्याकडे वकील आहे का आणि तो म्हणाला, “होय, ज्या वकीलाने मला फ्रान्समधून फोन केला होता तेच ते हाताळत आहेत.” “पण, तुमच्याकडे यावर

काम करणारा अमेरिकन वकील नाही का?" तो म्हणाला, "नाही, माझ्याकडे फक्त एकच वकील आहे ज्याने मला फ्रान्समधून कॉल केला होता." त्याने मला सांगितले की त्याला $50,000 एकत्र करणे खूप कठीण जात असल्याने, फ्रान्समधील वकिलाने सांगितले की ते सध्या अर्धे पैसे देतील आणि एकदा बँकेतून पैसे मिळाल्या नंतर त्यांनी ते पैसे त्याला परत द्यावेत. "नाही," मी म्हणालो, "हा घोटाळा आहे!" या कथित काकाबद्दल त्याने यापूर्वी कधीही ऐकले नसले तरी, त्याचा विश्वास होता की हे खरे आहे. मी त्याला दोन आठवड्यांनंतर परत कॉल केला, आणि त्याने सांगितले की त्याच्याकडे टॅक्स साठी बँकेत जमा करण्या साठी पूर्ण पैसे तयार आहेत, मी त्याला म्हणालो, "त्यांच्याकडे आधीच पाच दशलक्ष डॉलर्स आहेत. जर त्यांना खरोखरच टॅक्सचे पैसे हवे असतील, तर ते तुम्हाला ईमेल करून एक फॉर्म पाठवू शकतात ज्यावर तुम्ही आपली स्वाक्षरी करून त्यांच्याकडे बँकेमध्ये जे पैसे आहेत त्या पैशांमधून $50,000 घेण्यास त्यांना अधिकृत करू शकता." पण तो माझ्यावर विश्वास ठेवायला अजिबात तयार नव्हता आणि ते लोक खरे बोलत आहेत याची त्याला खात्री पटली होती.

या गेल्या रविवारी चर्चमध्ये माझ्याकडे अशीच एक केस आली होती. तो तरुण मला परदेशातील वारसातून मिळणाऱ्या काही पैशांबाबत गुंतवणुकीचा सल्ला मागत होता. मी त्याला त्याचे वाक्य पूर्ण करू दिले नाही. मी म्हणालो, "मला माहीत आहे, मला माहीत आहे, तुम्ही त्यांना काही शुल्क पाठवावे, मगच ते पैसे तुम्हाला देतील, बरोबर?" "हो, अगदी असेच आहे, पण तुम्हाला हे कसं कळलं?" मी त्याला देखील तेच सांगितले, की हा घोटाळा आहे. तो त्या तथाकथित मरण पावलेल्या माणसाला ओळखत नव्हता आणि त्याच्याकडे यू एस ए मध्ये वकील देखील नव्हता तरीही तो ते पैसे खरोखर आहेत आणि मला ते मिळणार ह्या बद्दल वाद करत राहिला. हे लोक अशा प्रकारच्या पैशांच्या घोटाळ्याच्या आहारी का जातात? कारण त्यांना मुक्त व्हायचे आहे! ही संधी त्यांना सोडायची नसते कारण, कारण त्यांना वाटते कि ही गोष्ट खरी असण्याची लाखात एक अंश देखील शक्यता असेल तर ती त्यांना गमवायची नाही.

मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देतो. ड्रेंडा आणि माझा आर्थिक सेवा व्यवसाय (फाइनेंसियल सर्विसेस बिजनेस) संपूर्ण अमेरिके मध्ये पसरलेला आहे. हा फार उत्तम

व्यवसाय आहे! माझ्या कम्पनी मध्ये लोकांना मिळणारी संधी वास्तविक आहे; माझ्या ह्या बिसनेज मध्ये लोक वर्षाला लाखो डॉलर्स कमावत आहेत. पण माझ्या ह्या व्यवसायात शिकण्यासारखे देखील खूपकाही आहे. तुम्ही लोकांचे पैसे हाताळत आहात. असे कायदे आहेत जे तुम्हाला माहित असणे आणि इस्टेट नियोजन नियम जाणून घेणे आवश्यक आहे.

मी कोलंबस, ओहायो, परिसरात स्थानिय ख्रिश्चन रेडिओ स्टेशनवर जाहिराती चालवल्या होत्या, कारण मी काही चांगले संभाव्य उमेदवार माझ्या सोबत काम करण्या साठी शोधत होतो. आमच्याकडे जवळपास 50 जण आले. मुलाखती लगेच सेट करण्याऐवजी, मी अर्जदारांची तपासणी करण्यास मदत व्हावी म्हणून जवळच्या हॉटेलमध्ये एक ओरिएंटेशन सत्र आयोजित करण्याचे ठरवले. या सत्रा मध्ये मी आमच्या कंपनीच्या बाजारपेठेत असलेल्या प्रचंड क्षमते बद्दल माहिती देण्याचे ठरविले, त्या व्यतिरिक्त अर्थव्यवस्था कसे कार्य करते हेच केवळ समजावून सांगण्या पेक्षा हा सल्ला ख्रिश्चन जागतिक दृष्टिकोनाच्या दृष्टीकोनातून मांडण्याचा निश्चय केला. आम्ही प्रक्रिया, भरपाई, प्रशिक्षण आणि परवाना आवश्यकतांबाबत कंपनी कशी कार्य करते हे देखील चर्चे मध्ये समाविष्ट केले. माझ्या अनुभवावरून मला माहित होते की वर्षभरात $200,000 कमावण्यासाठी किती काम करावे लागते हे पाहिल्या नंतर माझे अनेक उम्मेदवार माघार घेतील.

मीटिंगनंतर, मी हॉटेलच्या हॉलमधून चालत होतो आणि मी पाहिले की मुख्य बॉलरूम 1,000 पेक्षा जास्त लोकांनी खचाखच भरलेला होता. सर्व एकाच कारणासाठी आले होते. एक लोकप्रिय मल्टी लेव्हल कंपनी त्यांच्या कंपनीत सामील होण्याबद्दल प्रेजेंटेशन देत होती. पण माझ्या खोलीत फ़क्त 50 लोक होते आणि त्या पेक्षा जास्त लोक त्या ठिकाणी का होते? उत्तर सोपे आहे - पैसा! दुर्दैवाने, आणि बहु-स्तरीय कंपनी असे म्हणत होती असे नाही, परंतु समज असा होता की “जर मला ह्या ठिकाणी प्रवेश मिळाला तर मी तीन लोकांना संदर्भ देऊ शकतो, आणि बुम, मी लक्षाधीश होईन.” आता मी ह्या क्षेत्रात इतक्या वेळापासून असल्यामुळे मला एवढे तर माहीतच आहे कि बहु-स्तरीय व्यवसायांमध्ये मोठा पैसा कमावणाऱ्या कोणीही व्यक्तीला कठोर परिश्रम करावे लागतात! होय, त्या ठिकाणी संधी तर आहेच, परंतु तरीही, समज हा आहे कि इथे पैसे कमावण्याचा मार्ग सोपा आहे आणि “जर मी ही संधी सोडली

तर ह्या ठिकाणी ती संधी घेणारे कितीतरी लोक आहेत, मी आयुष्यभराची संधी गमावणार आहे!" कृपया मला चुकीचे समजू नका. माझे अनेक चांगले मित्र आहेत ज्यांनी या प्रकारच्या कंपन्यांमधून लाखो कमावले आहेत आणि अशा बऱ्याच एमएलएम आहेत. पण मी फक्त सरासरी एमएलएम भरतीची मानसिकता दर्शवित आहे. पृथ्वी शाप प्रणालीमध्ये जगण्याच्या धडपडीत सहज पैसे विकणे हा मोठा पैसा आहे.

जर तुम्ही क्षणभर थांबाल आणि स्वतःला विचाराल की तुम्ही पैशाबद्दल किती विचार करता, एकतर ते मिळवणे किंवा तुमच्याकडे जे आहे त्याचे संरक्षण करणे, तर तुम्हाला तुमच्या विचारांबद्दल आश्चर्य वाटेल. मी हे पुन्हा सांगतो म्हणजे तुम्हाला मुद्दा समजेल: प्रत्येकाला धावणे थांबवायचे आहे, आणि ते फक्त जिवंत राहण्यासाठी जगणे ह्याला कंटाळले आहेत! वीक एन्ड ला आराम करायचा हे आमिष थांबवायचे आहे. सुट्टीचे आमिष हे आहे की आपण थोडा वेळ तरी थांबू शकतो. निवृत्तीचे आमिष हे आहे की आता आपण शेवटी थांबू शकतो आणि आपल्याला जे करायचे आहे ते करू शकतो. मला चुकीचे समजू नका. बहुतेक लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन फक्त बसून राहावे आणि काहीही करायचे नाही असा नाही. आणि मी असे म्हणत नाही की ही तुमच्यासाठी देवाची इच्छा आहे. नाही, आम्हाला आपल्या कामा मध्ये, ज्या विशिष्ट उद्देशासाठी आपल्याला उत्पन्न केले आहे ते पूर्ण करण्या साठी सक्रिय राहण्यासाठी तयार करण्यात आले आहे. दुर्दैवाने, बहुतेक लोक जगण्यासाठी धावण्यात इतके व्यस्त झाले आहेत की त्यांनी फार पूर्वीच आपली स्वप्ने सोडून दिली आहेत.

पैशाची गोष्ट निश्चित केल्याशिवाय, तुमचे आयुष्यभर पृथ्वी शाप प्रणालीच्या जगण्वाच्या मानसिकतेखाली धावत राहणे निश्चित होईल.

मला खात्री आहे की तुम्ही कुणाला तरी असे म्हणताना ऐकले असेल किंवा तुम्ही स्वतः असे म्हटले असेल: "मला आज कामावर जायचे आहे." अणि जेंव्हा ते "जावे लागेल" असे म्हणतात तेंव्हा तुम्हाला दिसून येत असेल की असे म्हणत असतांना त्यांची भावनात्मकता उत्तेजित नसते. परंतु, त्यांना हवे तेव्हा त्यांची भरभराट होते आणि ते जे काम करतात ते करण्या साठी उत्कटतेने आणि आवेशाने कामाला लागतात. सहसा, बहुसंख्य लोकांच्या

जीवनात असे घडत नाही. त्यामुळे, ते अजूनही म्हणतात, "मला आज कामावर जायचे आहे." फक्त पगार मिळविण्यासाठी, ऑफिसमध्ये आणखी एक दिवस घालवावा लागणार, फक्त जिवंत राहण्यासाठी आणखी एक दिवस. बहुतेकजण जीवनाची सुरुवात उत्साहाने आणि जोमाने करतात. पण सर्व गोष्टी कळायला लागतात तेंव्हा त्याच्या लक्षात येते कि, बिले भरण्यासाठी त्यांनी स्वीकारलेली नोकरी ही तात्पुरती गोष्ट होती. आणि मग त्यांना समजून येते की जीवन अंधुक झाले आहे आणि त्यांच्या चाळीशीत त्यांच्या लक्षात येते की यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही. त्याला मिड-लाइफ क्रायसिस म्हणतात, आणि ह्या ठिकाणी पहिल्यांदाच त्यांना कळते की आता ते अडकले आहेत.

माझ्या मित्रा, देवाने जगण्यासाठी जे जीवन निर्माण केले ते हे जीवन नाही. हे तुम्हाला आधीच माहीत आहे. पण या दयनीय भविष्यापासून दूर जाण्यासाठी ड्रेन्डा आणि मी वर्षानुवर्षे म्हणत आलो आहे की जर तुम्ही पैशाची गोष्ट निश्चित केली नाही, तर तुम्हाला तुमचा उद्देश, तुमच्या जीवनाचा विशिष्ट उद्देश कधीच सापडणार नाही. पैशाची गोष्ट निश्चित केल्याशिवाय, तुमचे आयुष्यभर पृथ्वी शाप प्रणालीच्या जगण्याच्या मानसिकतेखाली धावत राहणे निश्चित होईल.

जर तुम्ही तुमची पैशासंबंधीची बाब निश्चित केली नाही, तर तुम्हाला तुमच्या उत्पन्न होण्याचा उद्देश कधीच सापडणार नाही!

त्या तुलनेत, तुमचे जीवन कसे असू शकते याबद्दल बोलूया. चला तुमच्या छंदाचा विचार करूया. समजा तुमचा छंद गोल्फ आहे. "अरे, मला आज गोल्फ खेळायला जावे लागेल" असे कोणी म्हणताना तुम्ही कधी ऐकले आहे का? किंवा तुम्ही एखाद्याला असे म्हणताना ऐकले आहे, "ओ हो, आज ही शुक्रवारची रात्र आहे; मला शुक्रवारची रात्री आवडत नाहीत. ही सोमवारची सकाळ असती तर किती बरे झाले असते, मी कामावर जाऊ शकलो असतो." किंवा तुमचा छंद मासेमारी आहे असे म्हणूया. "ओ हो, आता मला आज मासेमारीला जावे लागेल" असे तुम्ही कधी म्हणाल का? नाही, मला नाही वाटत कि तुम्ही कधी असे म्हणाल कारण तुम्हाला त्याची आवड आहे. तुम्ही जे काही करत आहात ते अशाच प्रकारच्या

उत्कटतेने आणि आवेशाने केले आणि आपले जीवन जगले आणि तुम्ही तुम्हाला प्रेरणा देणाऱ्या बाबीवर लक्ष केंद्रित करू शकलात आणि जीवनात तुमच्या घाम गळण्याचे स्थान नाही, परंतु तुमचे आवडीचे स्थान शोधू शकलात तर काय होईल? तुमच्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी आणि आर्थिक तणावमुक्त जीवन जगण्यासाठी तुमच्याकडे पैसे असतील तर? असे करण्याचा खरोखर एक मार्ग आहे का? ड्रेन्डा आणि मला आढळले की असा मार्ग आहे!

परमेश्वराचा आशीर्वाद समृद्धी देतो, तिच्याबरोबर तो आणखी कष्ट देत नाही.

— नीतिसूत्रे 10:22

या शास्त्रभागा कडे थोडा जास्त वेळ आणि शांतपणे पहा. या ठिकाणी हिब्रू शब्दाचा अर्थ ज्या मध्ये कठोर परिश्रम नाही अशी संपत्ती. तुम्हाला हे दिसते का? आदामाने आपल्यासाठी जो वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळून काम करण्याची व्यवस्था निर्माण करून ठेवली आहे, देवाचे राज्य त्या पासून सुटण्याचा मार्ग प्रदान करते. या वचनाचा हाच खरोखर अर्थ असू शकतो काय? तुम्ही ह्या बाबीशी सहमत व्हाल की जर असे असेल तर तुम्ही खूप दिवसांपासून वाट पाहत आहात ती सर्वोत्तम चांगली बातमी वाचली आहे. अगदी निश्चितपणे! म्हणूनच यशया 61, भविष्यसूचकपणे येशूबद्दल आणि तो त्याच्या सेवेत काय करणार होता त्या बद्दल, असे म्हणतो:

प्रभू परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे; कारण दीनांना शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे.

— यशया 61:1

पृथ्वी शाप प्रणालीच्या जगण्याच्या जीवनशैलीत अडकलेल्या व्यक्तीसाठी चांगली बातमी काय आहे? आर्थिक स्वातंत्र्य, अर्थातच आहे! येशू अक्षरशः म्हणत आहे की पृथ्वीच्या शाप प्रणालीच्या वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळून धावत राहण्याच्या मर्यादे बाहेर देवाचे राज्य पुरवठा करते. ह्या बाबीला सामोरे जाऊ या. तुम्ही फक्त मर्यादित वेगाने धावू शकता आणि बरेच लोक भयानक वेगाने धावत आहेत परंतु स्वतंत्र होण्यासाठी त्यांचे ते धावणे पुरेसे

नाही. ड्रेन्डा आणि मी भयंकर कर्जात असतांना त्या नऊ वर्षात मी शक्य तितक्या वेगाने धावत होतो. आमच्या फर्म मध्ये गेल्या 27 वर्षांत आम्ही जे असंख्य शेकडो हजारो क्लायंट पाहिले आहेत ते देखील शक्य तितक्या वेगाने धावत होते. परंतु, इतके परिश्रम करूनही, ते अजूनही आर्थिक गुलामगिरीच्या जीवनात अडकले होते. त्या सर्वांनी आम्हाला फोन केले कारण त्यांना भीतीदायक जाणीव झाली होती की ते आर्थिकदृष्ट्या हताश आहेत, त्यांची आर्थिक स्वातंत्र्याची स्वप्ने साध्य करणे अधिक कठीण आणि कठीण दिसत आहे आणि जगण्याचा केवळ जगणे एवढाच राहिला आहे. क्षणभर माझ्याबरोबर तरतूद किंवा पुरवठा ह्या शब्दाचे परीक्षण करा.

तरतूद प्रो-व्हिजन आहे.

तरतुदीशिवाय दृष्टी असू शकत नाही कारण तरतूदीशिवाय, तरतूद मिळवणे ही तुमची दृष्टी बनते आणि आहे. मी पुन्हा म्हणेल कि, बहुतेक लोक अशाच प्रकारे जगतात - दृष्टी नसलेले जीवन. ही गुलामगिरी सर्वात फसव्या स्वरूपाची आहे.

अध्याय 7

द्वार

देवाच्या राज्याविषयी आपण काय शिकलो याचे क्षणभर पुनरावलोकन करूया. प्रथम, आपण हे शिकलो की मानवाला पृथ्वीवर राज्य करण्याच्या स्थितीत ठेवण्यात आले होते. आपण इब्रिकरांस पत्र 2:7-8 मध्ये पाहिले की पृथ्वीवर जेकाही होते ते सर्व मनुष्याच्या अधीन करण्यात आले होते. यामुळे, आपल्याला हे दिसून आले की मनुष्य हा पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेशासाठी किल्ली किंवा दरवाजा आहे. सैतानाला हे माहीत होते, म्हणूनच त्याने पृथ्वीवर अधिकार मिळवण्याच्या त्याच्या योजनेत आदाम आणि हव्वा यांना लक्ष्य बनविले. जेव्हा आदाम आणि हव्वा त्याच्या फसवणुकीच्या योजनेला बळी पडले तेव्हा त्यांनी पाप केले आणि त्यांच्या जीवनावरील देवाच्या कायदेशीर अधिकाराच्या अधिपत्त्याला तोडले. देवाच्या आत्म्याने, ज्याने त्यांना उत्पत्ती मध्ये आच्छादून टाकले होते, त्याला आता माघार घ्यावी लागली. ते केवळ शारीरिकच नव्हे तर आत्मिकदृष्ट्या देखील नग्न झाले. जेव्हा देवाचा आत्मा त्यांच्यापासून दूर गेला तेव्हा त्यांना किती धक्का बसला याची मी कल्पना करू शकतो. बायबल म्हणते की त्यांनी ताबडतोब स्वतःला झाकण्यासाठी अंजीराची पाने विणण्यास सुरुवात केली, कारण त्यांना कळले कि ते नग्न आहेत.

जरी मनुष्याला उत्पत्तीच्या वेळी देण्यात आलेला पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार अजूनही त्याच्या कडे होता, परंतु त्याने आता पृथ्वीवर आत्मिकरित्या राज्य करण्याचा अधिकार आणि सामर्थ्य गमावले होते. कारण त्याने देवाविरुद्ध बंड करण्याची निवड केली होती आणि देवा ऐवजी सैतानावर विश्वास ठेवण्याचे आणि स्वत:ला त्याच्या बरोबरीचे करण्याचे निवड केली, मनुष्य सैतानाच्या अधिकाराखाली आला आणि परिणामी, सैतानाला

(ल्युसिफर) स्वर्गातून टाकल्यावर जो न्याय देण्यात आला होता तोच न्याय मनुष्याला देण्यात आला. तो न्याय म्हणजे नरक नावाची जागा, यातना देणारी जागा आणि देवाच्या उपस्थितीतून कायमस्वरूपी दूर होणे. हे लक्षात घेतले पाहिजे की नरक कधीही मनुष्यासाठी बनविला गेला नव्हता. कोणीही तेथे जावे हा देवाचा हेतू कधीच नव्हता.

> *मग डावीकडच्यांनाही तो म्हणेल, 'अहो शापग्रस्तहो, माझ्यापुढून निघा आणि सैतान व त्याचे दूत ह्यांच्यासाठी जो सार्वकालिक अग्नी सिद्ध केला आहे त्यात जा.*
>
> — मत्तय 25:41

या न्यायापासून मानवाला सोडवण्यासाठी, देवाला पृथ्वीवर त्याच्या अधिपत्याचा अधिकार पुन्हा स्थापित करणे आवश्यक आहे. सैतानाने आता घेतलेला अधिकार परत घेण्याचा मार्ग त्याला शोधावा लागेल. अणि ऐसे घडून येण्याचा एकच मार्ग होता. ज्याने कधी पाप केले नाही, जो कशाही बद्दल दोषी नाही अशा व्यक्तीला आदामाच्या जागी मृत्यूची शिक्षा भोगण्यासाठी स्वेच्छेने तयार व्हावे लागेल. पण ही योजना पूर्ण होण्यामध्ये थोडीशी अडचण होती. सध्या पृथ्वीवर असलेला प्रत्येक मनुष्य, आदामाचा वंशज असल्याने, पापाने कलंकित झाला होता आणि त्यामुळे देवाचा आत्मा आणि त्याचा अधिकार वाहून नेण्यात अक्षम होता. पण या समस्येवर मात करण्यासाठी देवाकडे योजना होती. या योजनेसाठी त्याचे नीतिमत्व असलेल्या व्यक्तीची आवश्यकता होती, त्याचा कायदा, पृथ्वीच्या क्षेत्रात स्थापित होणे आणि लिहिला जाणे आवश्यक होता, आणि शक्य असेल तर त्या द्वारे पृथ्वीच्या क्षेत्रात राहणारा माणूस त्याच कायद्याद्वारे निर्दोष ठरवला जाऊ शकतो. मग आणि फक्त तेव्हाच तो माणूस आदामावर असलेला दंड आणि शिक्षा स्वतःवर घेऊन आदामाच्या जागी कायदेशीररित्या आणि स्वेच्छेने उभा राहू शकतो.

परंतु या संकल्पनेत एक वास्तविक समस्या होती कारण बलिदान होण्याची ही योजना राबवू शकणारा माणूस आदामाचा वंशज असू शकत नव्हता, कारण तो वंश कलंकित झाला होता आणि देवाच्या उपस्थितीपासून तोडला गेला होता. त्यामुळे बचावाची किंवा सुटकेची योजना कशी शक्य होईल? हे शक्य होण्यासाठी, देवाला पृथ्वीवर असा एक माणूस नेमणे किंवा

ठेवणे आवश्यक होते जो आदामाच्या वंशातील नाही आणि जो मनुष्याच्या वतीने स्वतःचा त्याग करण्यास बलिदान होण्यास तयार असेल. परंतु पृथ्वीचे क्षेत्र आदाम आणि त्याच्या वंशजांना देण्यात आले होते, म्हणून त्या कायदेशीर स्थितीनुसार, हे देखील बेकायदेशीर ठरणार होते. हे घडवून आणण्याचा एकच मार्ग होता, आणि केवळ एकच मार्ग. त्या मनुष्याला इथे पृथ्वीवर जन्माला यावे लागेल, पण तो आदामाच्या वंशातला नसावा.

पहिल्या दृष्टीक्षेपात, तुम्ही देखील सहमत व्हाल की हे होणे अशक्य होईल. पण तांत्रिकदृष्ट्या, एक मार्ग होता. देव पृथ्वीवर स्त्रीमध्ये कायदेशीररित्या एक पुरुष बीज ठेवू शकत होता, पण असे करण्यासाठी त्याच्यावर विश्वास ठेवणारा पुरुष मिळणे आवश्यक होते, जो त्याला तसे करण्याचे कायदेशीर अधिकार देऊ शकेल. लक्षात ठेवा, पृथ्वीच्या क्षेत्राची चावी माणसाकडे आहे. सैतानाने याच चावीचा उपयोग पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी आणि आदामाच्या अधिकाराचे आध्यात्मिक स्थान चोरण्यासाठी केला होता. देवाची योजना कार्य करण्यासाठी आणि पृथ्वीच्या क्षेत्रात त्या योजनेची कायदेशीरता सैतानाला सिद्ध करण्यासाठी, जो निश्चितपणे त्याला गैरकायदेशीर ठरविण्याचा प्रयत्न करेल, त्यामुळे देवाला अशा पुरुष आणि स्त्रीला शोधणे आवश्यक होते ज्यांना मूल होणे अशक्य होते आणि जे त्याच्या द्वारे त्यांना मूल प्राप्त होण्या साठी त्याच्यावर विश्वास ठेऊ शकतील. अशक्य ते शक्य होण्यासाठी त्यांना देवावर विश्वास ठेवावा लागेल.

त्या मुलाच्या जन्मासोबत भविष्यात त्या मुलाच्या संबंधात जे घडणार त्या विषयीचे अभिवचन देखील दिले गेले होते, आणि ते अभिवचन म्हणजे त्याच्या वंशाद्वारे सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील, ह्याचा अर्थ असा की त्याच्या वंशावळीद्वारे येशूला ह्या जगात आणण्याची कायदेशीरता आणि अधिकार क्षेत्र देवाला मिळू शकेल. देव असे करू शकतो असा विश्वास ठेवणारे दाम्पत्य जर असेल, ते हा विश्वास ठेऊ शकतील कि मृत गर्भाशयात एक बालक होऊ शकेल, त्या मुलाद्वारे सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील आणि त्या मुलाच्या जन्मामुळे त्यांना वाळूच्या कणाएवढी संतती प्राप्ती होईल, तर देवाला नंतर येशूची आई मारिया हिच्या उदरात आपले बीज घालण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त होईल. पण देवाला असा कोणी पुरुष मिळू शकणार होता का? त्याचे नाव अब्राहाम होते, आपल्या विश्वासाचा पिता.

"तशी तुझी संतती होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला. तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली; परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचा गौरव केला; आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खातरी होती.

— रोमकरांस पत्र 4:18-21

अब्राहाम आणि सारा यांनी देवावर विश्वास ठेवला आणि जेव्हा ते खूप म्हातारे होते आणि मुले होण्यास असमर्थ होते तेव्हा इसहाकला जन्म दिला. कारण अब्राहाम हा देवावर विश्वास ठेवणारा होता, अभिवचन फक्त अब्राहामने उघडलेल्या दारातून येऊ शकत होते. येशूला अब्राहमच्या वंशातून यावे लागणार होते. मला हे अगदी स्पष्ट करू द्या. देवाने येशूला जगात आणण्यासाठी, त्याला अब्राहमच्या वंशातून यावे लागणार होते. त्याला असेच करावे लागणार होते! अब्राहमच्या माध्यमातून येणे हाच कायदेशीर मार्ग होता. म्हणूनच जर तुम्ही मत्तय चा पहिला अध्याय पाहिला तर तुम्हाला अमुक व्यक्तीने अमुक ला जन्म दिला अशी कंटाळवाणी यादी दिसून येईल. हा अध्याय एका विशिष्ट कारणामुळे पहिला अध्याय आहे. ह्या द्वारे हे सत्य प्रस्थापित केल्या जात आहे की येथे पृथ्वीच्या क्षेत्रात येशू अब्राहमचा वंशज होता. सैतान पृथ्वीवर आपल्या कायदेशीर वर्चस्वाचा आणि अधिकाराचा दावा करतो म्हणून हे येथे पृथ्वीवर रेकॉर्ड केले जाणे आवश्यक आहे. जर ही यादी अचूक नसेल किंवा येशू खरोखरच अब्राहमच्या वंशातून आला नसेल, तर सैतान असा दावा करू शकतो की येशूचा जन्म आणि जीवन फसवणूक होते आणि तो आपल्या पापाची किंमत चुकवण्यास पात्र नव्हता.

ते आता फक्त जगण्वासाठी कष्टदायक परिश्रम आणि घाम गाळणे या शापाच्या वर चालू लागले.

तुम्हाला आठवत असेल कि, इस्रायलमध्ये त्यांच्या स्वत:च्या राष्ट्राबाहेर लग्न करण्यास मनाई करणारे अनेक कायदे होते. स्वत:च्या वंशाबाहेर लग्न करणे म्हणजे मृत्यूदंडाची शिक्षा होती. तो वंश शुद्ध का राहावा आणि त्यांनी त्यावर इतके बारकाईने लक्ष का ठेवले हे आता तुम्हाला समजले असेल. होय, तुम्हाला इस्राएल राष्ट्राच्या बाहेरच्या स्त्रियांनी इस्रायली पुरुषांशी विवाह केल्याचे अपवाद आढळतील, जसे कि राहाब, ती यरीहो शहरात राहात होती आणि तिने त्या देशाची हेरगिरी करण्यासाठी पाठवलेल्या हेरांना लपवून ठेवले होते. होय, मत्तय च्या पहिल्या अध्यायात तिची नोंद आहे कारण तिने एका इस्राएली पुरुषासोबत लग्न केले होते. परंतु तुम्हाला हे समजून घेणे आवश्यक आहे की यहुदी संस्कृतीत वंशाला पुढे नेणारा पुरुष होता.

आपण जी चर्चा करत आहोत त्यापासून थोडे वेगळे मी ह्या ठिकाणी बोलणार आहे. पृथ्वीवर माणूस किती काळापासून आहे याबद्दल बरीच चर्चा आहे. खरोखर उत्तर जाणून घेण्यासाठी काही मार्ग आहे का? होय! मी तुम्हाला या एका सत्याची खात्री देऊ शकतो. मत्तय च्या पहिल्या अध्यायातील ती यादी अचूक असावी. त्यामध्ये कुणाचेही नाव वगळल्या गेले नाही, अन्यथा तुम्ही आणि मी सध्या आनंद घेत असलेल्या तारणाचा आनंद घेऊ शकलो नसतो. सैतानाने हा दावा केला असता कि हे सर्व चुकीचे किंवा अयोग्य आहे. ती यादी परिपूर्ण असलीच पाहिजे! त्यामुळे त्यावर आधारित, तुम्ही मनुष्य पृथ्वीवर किती काळापासून आहे ह्याचा अंदाज लावू शकता. तुम्हाला ह्याची कल्पना द्यावी असे मला वाटले.

> *मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील;तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील."*
>
> — उत्पत्ती 12:2-3

तुम्ही या शास्त्रवचनात पाहू शकता की, अब्राहामने स्थापन केलेल्या पृथ्वीच्या क्षेत्रातील हा दरवाजा हा कायदेशीर दरवाजा आहे ज्याद्वारे येशू ख्रिस्त पुढे जाईल आणि पृथ्वीवरील

सर्व लोकांना आशीर्वाद देईल. अब्राहाम आणि त्याच्या वंशजांनी देवाला त्याच्या अधिपत्याचे सामर्थ्य आणि प्रभाव पृथ्वीवर परत आणण्यासाठी आवश्यक असलेली कायदेशीरता आणि अधिकार क्षेत्र दिले असले तरी, जोपर्यंत देवाने येशूला जगात आणले नाही तोपर्यंत मनुष्य पाप आणि आत्मिक मृत्यूच्या भाराखाली अडकून पडलेला होता, आणि तो आदामाच्या पापाची किंमत मोजत होता. परंतु, तरतुदीच्या संदर्भात, आपल्याला आता आढळून आले आहे की अब्राहाम आणि त्याचे वारस, ज्यांनी सुंतेची खूण धारण केली आहे, त्यांची प्रगती झाली. ते आता फक्त जगण्यासाठी कष्टदायक परिश्रम आणि घाम गाळणे या शापाच्या वर चालू लागले.

तो कळप, रुपे व सोने ह्यांनी संपन्न होता.

— उत्पत्ती 13:2.

या कराराने तरतुदीच्या संदर्भात एक मोठा बदल घडवून आणल्याचे आपल्याला या शास्त्रवचनात दिसते. उत्पत्ति 3:17 मध्ये त्याने आदामाला जे सांगितले त्या तुलनेत देव अब्राहामाला काय म्हणतो त्यामध्ये तुम्हाला काही वेगळे दिसते का? लक्षात ठेवा, आदामाने पाप केल्यानंतर, देवाने त्याला सांगितले की आता त्याच्या स्वत: च्या वेदनादायक परिश्रमाने आणि घामाने तो जगेल. पण आता अब्राहामाच्या बाबतीत आपल्याला फरक दिसतो. देव म्हणतो, “मी तुला उभारेल!” ह्या ठिकाणी असे दिसून येत नाही की अब्राहामला त्याच्या स्वत:च्या क्षमतेनुसार धावत राहणे आणि वेदनादायक परिश्रमाने घाम गाळत राहण्यासाठी सोडून देण्यात आले होते. आता देव त्यात शामिल झाला आहे. देव म्हणाला, “मी तुला उभारेल!” तर मग आपण अब्राहामला यानंतरच्या जीवनात केवळ थोड्या वेळापुरतेच धनाढ्य आणि यशस्वी होतांना पाहतो का? महत्प्रयासाने यशस्वी झाला का!

अब्राहम धनवान होता! त्याची मुले धनवान होती. अब्राहमाने पृथ्वी शाप प्रणाली बाहेर जीवन जगले. त्याच्याकडे पुरेसे होते! लोकांना फरक दिसायला वेळ लागला नाही. हा फरक त्याच्या संपूर्ण वंशात कायम राहिला. खरं तर, अब्राहमच्या काही पिढ्यांनंतर, त्याचा नातू याकोब याने आपला सासरा लाबानसाठी काम केले. लाबानाने याकोबा वर देवाचा आशीर्वाद

आहे हे पाहिले आणि त्याच्या समृद्धीतून स्वतःसाठी घ्यावे म्हणून त्याला फसवण्याचा प्रयत्न केला. परंतु देवाने त्याची आशीर्वाद चोरण्याची योजना त्याच्याच हानीसाठी बदलून टाकली आणि याकोबला मोठ्या संपत्तीने समृद्ध होण्याचा आशीर्वाद दिला. मी जे म्हणतो ते हे की लोकांनी हा आशीर्वाद थांबवण्याचा, रोखण्याचा प्रयत्न केला तरी ते शक्य झाले नाही. जोपर्यंत वारसांनी त्यांच्या करारावर विश्वास ठेवला आणि देवाची उपासना केली तोपर्यंत देवाने त्यांना समृद्ध केले.

तुझा देव परमेश्वर जो देश तुला देत आहे त्यात तो तुला बरकत देईल.
— अनुवाद 28:8

तुझ्या धान्याच्या कोठारांना व तू हात घालशील त्या प्रत्येक कामाला परमेश्वर बरकत देईल.

मी जे बोलतोय त्याच्या परिणामा विषयी विचार करा! मला लोकांकडून सर्व प्रकारची पत्रे आणि ईमेल येतात त्या द्वारे ते मला सांगतात की मी पैशाबद्दल खूप बोलतो. ते मला सांगतात की समृद्धी ही देवाची इच्छा नाही. ते यावर जोर देतात की देवाची सेवा करण्यासाठी आम्हा सर्वांना आयुष्यभर मोठी किंमत मोजावी लागते. मी त्यांच्या विधानाच्या काही भागाशी सहमत आहे. मार्क 10:30 मध्ये आपल्या समृद्धीमुळे आपल्याला छळ सहन करावा लागेल असे येशूने म्हटले आहे. दुर्दैवाने, पुष्कळ ख्रिस्ती लोकांचा असा विश्वास आहे की देव हा एक कठोर वेठीस धरणारा मालक आहे आणि आपल्याला केवळ जगण्यासाठी म्हणून जीवन जगायचे आहे, गरिबीत राहणे, आजार दुःख आणि पिडां मधेच जीवन जगण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही, तो पृथ्वी शाप आहे आणि वरदान नाही! देवाला तुमच्या आर्थिक जीवनाची स्थापना करायची आहे.

देव तुमची स्थापना करू इच्छितो!

तुमची आर्थिक व्यवस्था सुरक्षित आणि स्थापित झाल्याशिवाय, तुम्हाला तुमचे संपूर्ण आयुष्य जीवन जगायचे म्हणून जगण्याच्या स्थिति मध्ये चालवण्यास भाग पाडले जाते, तुम्ही तुमचे आत्मिक कार्य पूर्ण करण्यास असमर्थ होऊन जाता, आणि गुलामगिरीचे जीवन जगता. अनुवाद 28:8-13 मध्ये देवाने अब्राहामाच्या वंशजांना काय सांगितले ते पहा.

तुझ्या धान्याच्या कोठारांना व तू हात घालशील त्या प्रत्येक कामाला परमेश्वर बरकत देईल. तुझा देव परमेश्वर जो देश तुला देत आहे त्यात तो तुला बरकत देईल. तू आपला देव परमेश्वर ह्याच्या आज्ञा पाळून त्याच्या मार्गांनी चालशील तर तो आपल्या शपथेला जागून तुला आपली पवित्र प्रजा करून स्थिर ठेवील. परमेश्वराचे नाव तुला दिले आहे हे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे पाहतील तेव्हा त्यांना तुझा धाक वाटेल, आणि जी भूमी तुला देण्याची परमेश्वराने तुझ्या पूर्वजांशी शपथ वाहिली होती तिच्यात तुझ्या पोटचे फळ, तुझ्या गुराढोरांचे वत्स व तुझ्या भूमीचा उपज ह्यांची तुझ्या कल्याणासाठी तो अभिवृद्धी करील.

परमेश्वर तुझ्यासाठी आपले उत्तम भांडार म्हणजे आकाश खुले करून तुझ्या भूमीवर योग्य ऋतूत पाऊस पाडील, व तुझ्या हातच्या सर्व कामाला बरकत देईल; तू पुष्कळ राष्ट्रांना उसने देशील पण तुला कोणाकडूनही उसने घ्यावे लागणार नाही. तुझा देव परमेश्वर ह्याच्या ज्या ह्या आज्ञा मी आज तुला देत आहे त्या ऐकून तू काळजीपूर्वक पाळशील तर परमेश्वर तुला पुच्छ नव्हे तर मस्तक करील, तू खाली नव्हे तर वर राहशील.

—अनुवाद 28:8-13.

लक्षात घ्या की त्यांना वचन दिले असले तरी ते अद्याप या नवीन भूमीत स्थापित झाले नाहीत. पण मोशे त्यांना सांगतो की देव त्यांची स्थापना करेल! ते कसे असणार आहे आणि देव त्यांना काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे हे समजून घेण्यासाठी, ओकच्या झाडाचा विचार करा. जेव्हा ते बीपासून नुकतेच तयार झालेले असते तेव्हा ते स्थापित झालेले नसते. त्याला कोणीही हवे तेव्हा आणि कुठेही हलवू शकतो. पण जेव्हा ते ओकचे झाड मोठे होते आणि परिपक्व होते तेव्हा ते झाड कोणीही हलवू शकत नाही. आता ते आपल्या जागी स्थापित झालेले असते.

तुझ्या धान्याच्या कोठारांना व तू हात घालशील त्या प्रत्येक कामाला परमेश्वर बरकत देईल. तुझा देव परमेश्वर जो देश तुला देत आहे त्यात तो तुला बरकत देईल.

— अनुवाद 28:8

मग आर्थिकदृष्ट्या प्रस्थापित होणे म्हणजे नक्की काय आहे? देव आपल्याला ह्याविषयी 12b वचनात सांगतो:

तू पुष्कळ राष्ट्रांना उसने देशील पण तुला कोणाकडूनही उसने घ्यावे लागणार नाही.

देव म्हणत होता की तो त्यांना इतका आशीर्वाद देणार आहे की ते उधार देणारे होतील, आणि पुन्हा कधीही कर्ज घेणार नाहीत. ते मस्तक असतील आणि शेपूट नसतील. कुठे जायचे हा निर्णय शेपूट घेऊ शकत नाही; मस्तक नेईल तिथे ते निमूटपणे जाते.

धनिक मनुष्य निर्धनांवर सत्ता चालवतो, ऋणको धनकोचा दास होतो.

— नीतिसूत्रे 22:7

कर्जदाराला स्थापित केले गेलेले नाही. ते देणेदाराच्या दयेवर असतात, गुलाम म्हणून काम करतात आणि त्यांना स्वातंत्र्य नसते. पण देव म्हणतो, “नाही! मी तुझी स्थापना करणार आहे! कोणीही तुम्हाला तुमचे घर सोडण्यास सांगू शकत नाही कारण त्यासाठी पैसे दिले जातील. कोणीही तुमची कार उचलून घेऊन जाऊ शकत नाही, कारण त्यासाठी पैसे दिले जातील. तुमचे स्वयंपाकघर किराणा सामानाने भरलेले असेल, आणि तुम्ही स्वतः विकत घेतलेल्या जमिनीवर चालत जाल, तुमची देवाने तुम्हाला दिलेली जबाबदारी तुम्ही पूर्ण आर्थिक शांततेत पूर्ण कराल. तुमची स्थापना होईल!”

तुम्ही समृद्ध व्हावे अशी देवाची इच्छा आहे!

अध्याय 8

आधीनतेचे सामर्थ्य

तुम्ही आता जे वाचणार आहात ते एक सामर्थी राज्य तत्व आहे, इतके सामर्थी की मला वाटले की ते या पुस्तकाचे उपशीर्षक असावे. अब्राहमचा नातू योसेफ याच्या कथेत आणि जीवनात आपल्याला ते आढळून येते. तुम्हाला याची थोडी पार्श्वभूमी सांगतो, योसेफचे भाऊ त्याचा द्वेष करत होते, आणि त्याला नष्ट करण्याची त्यांची इच्छा होती. खरेतर, त्यांना त्याला मारायचे होते, पण एका भावाला वाटले कि आपण एवढा कठोर निर्णय घेऊ नये; म्हणून त्याला मारून टाकण्या ऐवजी, त्यांनी त्याला काही प्रवासी व्यापाऱ्यांना विकले आणि त्यांनी त्याला इजिप्तला नेले आणि तेथे त्याला फारोच्या रक्षकांचा कप्तान पोटीफरला विकले.

इकडे योसेफाला मिसरात नेले तेव्हा ज्या इश्माएली लोकांनी त्याला तेथे नेले होते त्यांच्यापासून त्याला पोटीफर नावाच्या एका मिसऱ्याने विकत घेतले; तो फारोचा एक अंमलदार असून गारद्यांचा सरदार होता. परमेश्वर योसेफाबरोबर असल्याकारणाने तो यशस्वी पुरुष झाला; तो आपल्या मिसरी धन्याच्या घरी असे. परमेश्वर त्याच्याबरोबर असल्याकारणाने जे काही तो हाती घेतो त्याला परमेश्वर यश देतो असे त्याच्या धन्याला दिसून आले. योसेफावर त्याची कृपादृष्टी झाली; योसेफ त्याची सेवा करू लागला; आणि त्याने त्याला आपल्या घरचा कारभारी नेमून आपले सर्वकाही त्याच्या ताब्यात दिले.

आणि त्याने त्याच्या स्वाधीन आपले घरदार व सर्वकाही केले; तेव्हापासून योसेफासाठी परमेश्वराने त्या मिसऱ्याच्या घरादाराचे कल्याण केले; त्याचे घरदार व

शेतीवाडी ह्या सर्वांस परमेश्वराने आशीर्वाद दिला. त्याने आपले सर्वकाही योसेफाच्या हवाली केले होते, म्हणून तो अन्न खाई त्यापलीकडे आपले काय आहे ह्याचे त्याला भान नसे.

— उत्पत्ती 39:1-7

वचन 2a कडे लक्ष द्या, "परमेश्वर योसेफाबरोबर असल्याकारणाने तो यशस्वी पुरुष झाला." याचा अर्थ काय? देव सर्वांसोबत नाही का? वंशासंबंधी मागील प्रकरणांमध्ये आपण जी चर्चा केली आहे त्या संदर्भात पाहिले तर ह्याचे उत्तर 'नाही' असे आहे. लक्षात ठेवा, अब्राहामचा विश्वास आणि त्यानंतर झालेल्या कराराने देवाला अब्राहाम आणि त्याच्या वारसांपर्यन्त—केवळ कायदेशीर प्रवेश दिला. म्हणून जेव्हा आपण देव सर्वांसोबत असल्याबद्दल बोलत असतो, तेव्हा देव सर्वांवर प्रेम करतो ही वेगळी बाब आहे हे लक्षात घेतले पाहिजे; तो सर्वांवरच प्रेम करतो. परंतु ज्यांना देवासमोर कायदेशीर भूमिका नाही त्यांच्यासाठी त्याचे हात बांधलेले आहेत.

ते तुम्ही त्या वेळेस ख्रिस्तविरहित, इस्राएलाच्या राष्ट्राबाहेरचे, वचनाच्या करारांना परके, आशाहीन व देवविरहित असे जगात होता.परंतु जे तुम्ही पूर्वी 'दूर' होता ते तुम्ही आता ख्रिस्त येशूच्या ठायी ख्रिस्ताच्या रक्ताच्या योगे 'जवळचे' झाला आहात.

— इफिसकरांस पत्र 2:12-13

लक्षात घ्या की हे शास्त्रवचन कराराशिवाय असण्याबद्दल बोलत आहे, याचा अर्थ असा आहे की देव आणि त्याचे सामर्थ्य एखाद्या व्यक्तीपासून कायदेशीररित्या तोडले जाते. का? कारण देवाला पृथ्वीवरील एखाद्या पुरुष किंवा स्त्रीशी कायदेशीर करार, वाचा न बांधता, पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीरपणा किंवा अधिकार क्षेत्र नाही. ह्या वचनाद्वारे ही बाब स्पष्ट केली गेली आहे कि, जेव्हा ते म्हणते की वचनाच्या करारांना परके, आशाहीन व देवविरहित असे जगात होता. लक्षात ठेवा की येशूने आपल्यासाठी नवीन करार केल्यामुळे, आपण आता

देवाच्या स्वतःच्या घराचे सदस्य आणि त्याच्या महान राज्याचे नागरिक आहोत. (इफिस 2:19.) म्हणून आता, उत्पत्ति 39 मधील आपल्या शास्त्रवचनाकडे मागे वळून पाहताना, आपल्याला समजते की "परमेश्वर योसेफाबरोबर होता" या वाक्याचा अर्थ असा होतो की, त्याचे आजोबा अब्राहाम यांनी केलेल्या कराराद्वारे योसेफाच्या जीवनावर देवाचा कायदेशीर प्रभाव होता. या कायदेशीर कराराने, देवाच्या आशीर्वाद आणि प्रभावास अनुमती देऊन, पृथ्वीच्या क्षेत्रातील वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळण्याची प्रणाली ओलांडली गेली. देवाने योसेफला आशीर्वाद देणे कायदेशीर होते.

देवाला पृथ्वीवरील एखाद्या पुरुष किंवा स्त्रीशी कायदेशीर करार, वाचा न बांधता, पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीरपणा किंवा अधिकार क्षेत्र नाही.

देवाने पूर्वी अब्राहामाला काय सांगितले होते ते लक्षात ठेवा, "मी तुला बनवीन." कारण देव योसेफच्या सोबत होता, त्याला जीवनात मदत करत होता, त्याने केलेल्या प्रत्येक गोष्टीत त्याला यश मिळाले होते, इतके की त्याचा मालक, पोटीफर, त्याने पाहिलेल्या इतर पुरुषांच्या तुलनेत योसेफच्या क्षमतेत त्याला खूप फरक दिसला. मी येथे नमूद केले पाहिजे की जेव्हा आपण देवाच्या मदतीने समृद्ध होतो, तेव्हा पृथ्वीवरील शाप प्रणालीखाली जगणाऱ्या लोकांना फरक जाणवतो! पोटीफर इतका प्रभावित झाला की त्याने योसेफाला त्याच्या संपूर्ण मालमत्तेची जबाबदारी दिली.

ह्या शास्त्रभागात राज्याची अनेक तत्त्वे प्रकट केली आहेत, परंतु प्रमुख किल्ली येथे प्रकट झाली आहे. मी त्याला "आधिनतेचे सामर्थ्य" असे म्हणतो किंवा तुम्ही त्याला "पोटीफर तत्त्व" म्हणू शकता. हे उत्पत्ति 39:5 मध्ये आढळते:

> *आणि त्याने त्याच्या स्वाधीन आपले घरदार व सर्वकाही केले; तेव्हापासून योसेफासाठी परमेश्वराने त्या मिसऱ्याच्या घरादाराचे कल्याण केले; त्याचे घरदार व शेतीवाडी ह्या सर्वांस परमेश्वराने आशीर्वाद दिला.*

येथे काय घडत आहे याचे स्पष्ट चित्र तुम्हाला मिळावे अशी माझी इच्छा आहे. एके दिवशी योसेफ प्रभारी नव्हता आणि दुसऱ्या दिवशी त्याला प्रभारी बनविण्यात आले. हा बदल घडण्याच्या घटनेची नोंद पवित्रशास्त्र करते. पोटीफरच्या सर्व वस्तूंवर, त्याच्या संपूर्ण मालमत्तेवर परमेश्वराचा आशीर्वाद आला! पण तो योसेफच्या देवाला ओळखत नव्हता आणि तो इस्राएल राष्ट्राचा भाग नव्हता. तर हे कसे होऊ शकते आणि याचा अर्थ काय आहे? ह्याचे उत्तर आहे, पोटीफरने आपली मालमत्ता योसेफच्या अधिकाराखाली ठेवली तेव्हा त्याच्या नकळत, त्याची मालमत्ता योसेफच्या देवाशी असलेल्या कराराअंतर्गत आली.

पोटीफरचे सामान, त्याची संपत्ती आणि मालमत्ता या सर्वांनी राज्ये बदलली!!

तुम्हाला दिसून येईल कि, पोटीफरची मालमत्ता योसेफच्या देखरेखीखाली येईपर्यंत पृथ्वी शाप प्रणालीशी कायदेशीररित्या जोडलेली होती. जेव्हा पोटीफरने आपली मालमत्ता योसेफच्या अधिकारक्षेत्रात ठेवली, तेव्हा त्याला हे समजले नाही की तो देवाच्या आशीर्वादाच्या प्रभावाखाली ती ठेवत आहे. बायबल पुढे म्हणते की योसेफ प्रभारी असताना, पोटीफरला स्वतःची काळजी करण्याची किंवा तो खात असलेल्या अन्नाशिवाय कशाचीही काळजी करण्याची गरज नव्हती. त्याला कसलीच चिंता नव्हती! कोणतीही काळजी न करता, पोटीफरला फक्त मिसर देशाच्या रक्षकांचा कर्णधार म्हणून आपले काम आणि उद्देश यावर लक्ष केंद्रित करायचे होते. येथे पाहण्यासारखे बरेच काही आहे, परंतु पोटीफरने नकळत जे अनुभवले, त्याला इब्रिकरांस पत्र 4 मध्ये शब्बाथ विश्रांती असे म्हटले आहे आणि होय, ते नवीन कराराच्या विश्वासणाऱ्यांसाठी उपलब्ध आहे.

याला शब्बाथ दिवस म्हटले जात असे, त्या दिवसाचे एक चित्र म्हणजे जेथे मनुष्याला यापुढे केवल जगत राहण्वासाठी स्वत:चे कष्ट आणि घाम गाळून धडपड करावी लागणार नाही.

तुम्ही जर शब्बाथाचा अभ्यास केलात, तर तुमच्या लक्षात येईल की देवाने इस्राएल लोकांना त्या दिवशी कोणतेही काम करू नये अशी आज्ञा दिली होती; त्या दिवशी घाम गळणे

किंवा वेदनादायक परिश्रम करावे लागत नव्हते. शब्बाथ, अर्थातच, आठवड्याचा सातवा दिवस होता आणि तो निर्मितीच्या सातव्या दिवसाशी संबंधित होता. तुम्हाला आठवत असेल की सृष्टीचा सातवा दिवस हा देवाने विश्रांतीचा दिवस म्हणून घोषित केला होता. देव थकला होता म्हणून नाही तर त्याचे काम संपले होते म्हणून. सर्व काही पूर्ण झाले होते. सातवा दिवस तो दिवस होता जो मुळात मनुष्याला दिवस चिंता न करता, त्याला आवश्यक असलेल्या सर्व वस्तू आधीपासूनच तरतूद केल्या जाऊन त्याला जगण्यासाठी बनविला गेला होता. पण आदामाने देवाविरुद्ध बंड केल्यावर ती विश्रांती गमावली हे आपल्याला माहीत आहे. देवाविरुद्ध बंड करून, आदामाने त्याची तरतूद करण्याची देवाची क्षमता कमी केली. अशाप्रकारे, देवाने पूर्वी पुरवलेल्या तरतूदीची जागा त्याने गमावली. आदामाला आता स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास भाग पडावे लागले, तो केवळ जगण्यासाठी सर्व वेळ स्वतः वेदनादायक परिश्रम करून आणि घाम गाळून काम करत होता.

पण देवाने माणसाला आशाहीन सोडले नाही. त्याने माणसाला विश्रांतीचे एक चित्र दिले जे तो एक दिवस पुनर्संचयित करेल. याला शब्बाथ दिवस म्हटले जात असे, त्या दिवसाचे एक चित्र म्हणजे जेथे मनुष्याला यापुढे केवल जगत राहण्यासाठी स्वतःचे कष्ट आणि घाम गाळून धडपड करावी लागणार नाही. जेव्हा पोटीफरने परमेश्वराच्या आशीर्वादाचा उपयोग केला जो योसेफाला त्या कराराद्वारे प्राप्त झाला होता, तेव्हा त्याने योसेफा द्वारे देवाच्या प्रदान करण्याच्या क्षमतेचा वापर केला आणि त्याला विश्रांती मिळाली. त्याच्या सर्व गोष्टींची काळजी घेतली गेली; त्याला कशाचीही चिंता नव्हती.

> *त्याने आपले सर्वकाही योसेफाच्या हवाली केले होते, म्हणून तो अन्न खाई त्यापलीकडे आपले काय आहे ह्याचे त्याला भान नसे.*
>
> — उत्पत्ती 39:6

शब्बाथ दिवसाचे महत्त्व आणि देव माणसाला काय दाखवत होता हे समजून घेण्यासाठी तुम्ही एक साधा प्रश्न विचारण्याची गरज आहे. शब्बाथ दिवस कसा शक्य होता? म्हणजे, पृथ्वी शाप प्रणाली अंतर्गत, माणूस दररोज फक्त जगण्यासाठी धावत होता. जर ते खरे असेल, तर

मनुष्याला शब्बाथ दिवशी धावण्याची गरज का नव्हती? जर तो शब्बाथ दिवशी काम करत नव्हता तर त्याच्या गरजा कशा पुरविल्या जात होत्या? हा एक चांगला प्रश्न आहे आणि ह्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले पाहिजे, आणि उत्तरामध्ये आपल्याला योसेफच्या "परमेश्वराच्या आशीर्वादाचे" संपूर्ण प्रकटीकरण दिसून येते.

मला वाटते की या तत्त्वाचे एक उत्तम उदाहरण लेवीय अध्याय 25 मध्ये आढळते ज्या ठिकाणी देव इस्राएल राष्ट्राला ज्युबिली वर्षाचे स्पष्टीकरण देत आहे. तुम्हाला थोडी पार्श्वभूमी सांगतो, जयंती वर्ष दर 50 वर्षांनी येते आणि त्या वर्षाचे खूप महत्त्व आहे पण त्या विषयी मी इथे बोलणार नाही. परंतु ह्या ठिकाणी तुम्ही जे समजून घ्यावे ते हे आहे कि, त्या वर्षी ते पेरणी करू शकत नव्हते. किंबहुना, शब्बाथ वर्ष असल्यामुळे ते 49 व्या वर्षी देखील ते पेरणी करू शकत नव्हते. त्यामुळे ह्या ठिकाणी काय घडत आहे ह्याचे स्पष्ट चित्र तुम्हाला मिळावे अशी माझी इच्छा आहे: इस्रायली लोकांना सांगण्यात आले होते की ते 49व्या आणि 50व्या वर्षांत त्यांची पिके पेरू नाहीत. त्या नंतर पिकांची लागवड केल्यानंतर,पीक कापणीसाठी परिपक्व होण्यासाठी त्यांना 51 व्या वर्षाच्या अखेरीपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार होती. ह्याचा अर्थ, देव त्यांना सांगत होता की त्यांना तीन वर्षांचा कालावधी कापणीशिवाय घालवावा लागणार आहे. जर मी तुम्हाला सांगितले की तुम्हाला तीन वर्षांपर्यंत पगार मिळू शकणार नाही, तर तुम्ही थोडी काळजी करू लागाल. त्याचप्रकारे, इस्रायली लोकांना देखील काळजी वाटत होती. स्वाभाविकरीत्या, हे शक्य नव्हते. पण देव त्यांना काहीतरी दाखवत होता.

> *तुम्ही कदाचित म्हणाल, 'सातव्या वर्षी आम्ही काही पेरायचे नाही व शेताचे उत्पन्न जमा करायचे नाही तर मग आम्ही त्या वर्षी काय खावे?'पण सहाव्या वर्षी मी तुम्हांला अशी बरकत देईन की जमीन तुम्हांला तीन वर्षांचे उत्पन्न देईल.मग आठव्या वर्षी तुम्ही पेराल आणि जुना साठा खात राहाल; नवव्या वर्षाचे पीक हाती येईपर्यंत तुम्ही जुना साठा खात राहाल.*
>
> — लेवीय 25:20-22

शब्बाथ केवळ ह्या मुळे शक्य झाला कारण देवाने सहाव्या दिवसाला दुप्पट किंवा दुप्पट आशीर्वाद दिला. हे वाक्य तुमच्या मनात थोडं फिरत राहू द्या. प्रत्येक स्त्री-पुरुषाला तेच हवे असते, जे पुरेसे आहे त्या पेक्षा अधिक असावे, नाही का? जेव्हा सहाव्या दिवशी देवाने मनुष्याला दुप्पट भाग दिला तेव्हा तो मनुष्याला आठवण करून देत होता की तो त्यांचा प्रदाता आहे आणि त्याने नेहमी आवश्यकते पेक्षा जास्त पुरवले आहे. चला प्रामाणिकपणे विचार करू या; आवश्यकते पेक्षा जास्त असेल तर आपल्याला धावपण करावे लागत नाही आणि त्या पासून मुक्ती मिळते. हे आपल्याला गुलामगिरीतून पर्यायांकडे घेऊन जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हे आपल्याला आपले उद्देश्य शोधण्यासाठी आणि त्या मध्ये समृद्ध होण्यास मुक्त करते. पोटीफरने ह्याच बाबीचा आनंद उपभोगला. कशाचीही काळजी किंवा चिंता नाही. त्याच्या प्रत्येक गरजेची काळजी घेतली जात होती. फक्त एका गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे हाच त्याचा उद्देश होता. आणि मग, ड्रेन्डा आणि मी म्हटल्याप्रमाणे पुन्हा एकदा तेच म्हणेन, "जोपर्यंत तुम्ही पैशा विषयीची बाब निश्चित करत नाही, तोपर्यंत तुम्हाला तुमचा उद्देश काय आहे ते समजू शकणार नाही." पण एक चांगली बातमी आहे! शब्बाथ विश्रांती आजही उपलब्ध आहे, आणि त्या विश्रांती मध्ये आपल्याला असे स्थान प्राप्त होते कि आपल्या गरजा पूर्ण केल्या जातात आणि आपण केवळ जगण्या साठी म्हणून नाही तर समृद्धीचे जीवन जगू शकतो.

> *तेव्हा, देवाच्या लोकांसाठी शब्बाथ-विश्रांती शिल्लक आहे; जो कोणी देवाच्या विश्रांतीमध्ये प्रवेश करतो तो देखील त्याच्या स्वतःच्या कामातून (वेदनादायक परिश्रम आणि केवळ जगण्यासाठी घाम गाळण्याची स्थिती) विश्रांती घेतो जसे देवाने आपल्या कामातून विश्रांती घेतली.*

देवाच्या राज्याने पोटीफरसाठी वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळणे या पृथ्वीच्या नियमाला मागे टाकले आणि ते तुमच्यासाठीही तेच करेल. देवाच्या राज्याला कसे आत्मसात करावे हे शिकत असतांना, आपण समृद्ध होऊ शकतो आणि आपल्याला आपला उद्देश मिळू शकतो. जीवन मजेदार, उत्कटतेने आणि आनंदाने भरलेले असू शकते, खरोखर!

परमेश्वराचा आशीर्वाद समृद्धी देतो, तिच्याबरोबर तो आणखी कष्ट देत नाही.
— नीतिसूत्रे 10:22

परमेश्वराचा आशीर्वाद संपत्ती आणतो, आणि देव त्यात कोणतेही कठोर परिश्रम जोडत नाही !!! उत्पत्ति 3:17 मधील वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळण्याच्या प्रणालीच्या वर आपण जगू शकतो. देवाचे राज्य कसे कार्य करते हे मला कळेपर्यंत मी अनेक वर्षे जगण्याच्या त्या जुन्या व्यवस्थेखाली जगलो. तुम्ही देखील हे शिकू शकता. देव तुमच्या बरोबर आहे! तो तुम्हाला मदत करू शकतो! तुमची भरभराट होऊ शकते. नाही, मला ते थोडं वेगळ्या प्रकारे सांगू द्या: तुम्हाला समृद्धी हवी आहे. जगातील पोटीफर, जे देवाला ओळखत नाहीत आणि हताश, कठोर परिश्रमाच्या शापाखाली वाकून गेलेले, जीवन जगायचे म्हणून जगण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते पहात आहेत. ते तुमचा धर्म, तुमच्या चर्चच्या इमारती किंवा तुमच्या धर्मग्रंथांनी प्रभावित होत नाहीत कारण ते तुमच्या उत्तरांची कमतरते पुढे काही पाहू शकत नाहीत. जेव्हा तुम्ही देव किती महान आहे हे सांगता तेव्हा लोक तुमचे ऐकतील अशी तुम्ही अपेक्षा करू शकत नाही, कारण त्यांना हे सांगत असतांना तुम्ही त्यांच्या प्रमाणेच अत्यंत आर्थिक तणाव, कमतरता आणि जीवन जगायचे म्हणून जगण्याच्या स्थितीत जगत आहात. नाही, तुम्हाला योसेफप्रमाणेच हे दाखवून द्यायचे आहे कि राज्य वास्तविकरीत्या कसे आहे. मला कठोरपणे बोलायचे नाही, परंतु लोक मूर्ख नाहीत. ते उत्तरे शोधत आहेत.

आपल्या सभोवतालच्या सर्व शंका आणि अविश्वासाचे अधिपत्य स्वत:वर होऊ देऊ नका. तुमची अधीनता बदला आणि देवाच्या राज्याचा आनंद घ्या!

अनेक वर्षे मी प्रभावीपणे बोलू शकत नव्हतो. मला कोणी टीव्हीवर येण्यास सांगितले नाही; मी हजारो चर्चचे नेतृत्व करत नव्हतो. का? कारण माझ्याकडे सांगण्यासारखे काहीही नव्हते, कोणतेही उपाय नव्हते, उत्तरे नव्हती, देव जिवंत आणि माझ्यासोबत असल्याचा पुरावा नव्हता. जगण्यासाठी मी माझ्या कुटुंबाकडून पैसे उधार घेत होतो. माझी कार कायम बिघडलेली असायची, माझे घर मोडकळीस आलेले होते आणि माझे जीवन विस्कळीत

झालेले होते. अशा परिस्थितीत माझा देव किती महान आहे हे कोणाला का ऐकावेसे वाटेल? होय, मी स्वर्गाच्या वाटेवर होतो आणि स्वर्ग ही सर्वात मोठी गोष्ट आहे, परंतु तुम्ही जोपर्यंत पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्ग दाखवत नाही तोपर्यंत लोक स्वर्ग किती महान आहे हे ऐकणार नाहीत. ऐका, मी एवढंच म्हणतोय की जर देव, देव असेल आणि त्याचे वचन खरे असेल तर त्याचे कार्य झाले पाहिजे. आपलं आयुष्य वेगळं असलं पाहिजे आणि वेगळं दिसलं पाहिजे! राज्याचे सत्य या पिढीपर्यंत पोहोचवायचे आहे. पोटीफर पहात आहेत.

तर मी या पुस्तकाचे उपशीर्षक 'आधीनतेचे सामर्थ्य' का ठेवले? कारण पोटीफरने देवाच्या राज्यात प्रवेश केला आणि शब्बाथच्या विश्रांतीचा आनंद उपभोगला जिथे घाम गाळणे आणि वेदनादायक परिश्रम करणे ही जीवनाची पद्धत नाही, जिथे भीती नाही आणि शांतता राज्य करते. जिथे केवल जगणे नाही परंतु उद्देश आणि जोमाचे जीवन आहे आणि तरतूद झाल्या मुळे गरीबी नष्ट झाली आहे. त्याने हे कसे केले? त्याने आपल्या समस्या आणि चिंता देवाच्या राज्याच्या अधिकारक्षेत्रात आणल्या. मुळात, आपण काय करत आहोत हे त्याला कळत नसले तरी त्याने स्वतःला देवाशी जोडले. तो देवाच्या राज्याशी सहमत झाला आणि त्याच्या अधिकारक्षेत्रात आला. पोटीफर आपला कारभार योसेफाच्या देखरेखीखाली ठेवण्यासाठी पुरेसा हुशार होता कारण त्याला उत्तरे मिळाली होती. तुम्ही देखील ते करू शकता; ड्रेन्डाने आणि मी तेच केले. असे केल्यामुळे आम्हाला हरण मिळाले, पैसे मिळाले, गाड्या आणि आम्हाला हवे होते ते घर मिळाले. तर मी तुम्हाला एक सल्ला देतो. देवाजवळ तुमच्यासाठी जे काही आहे त्याचा तुम्हाला आनंद घ्यायचा असेल तर तुमची अधीनता बदला.

अध्याय 9

तुम्ही त्यांना खायला द्या!

डॉन माझ्या ऑफिसमध्ये आला तेंव्हा खूप निराश आणि कर्जबाजारी झाला होता, ती माझी त्याच्या सोबत पहिली भेट होती. त्यावेळी त्याच्या आयुष्यात काहीच बरोबर चाललेलं दिसत नव्हतं. जेव्हा मी त्याच्यासोबत बसलो आणि बोललो तेव्हा मला कळले की त्याने आपल्या घराचे भाडे, आणि इतर बिलं तीन चार महिन्यांपासून भरले नव्हते. त्याच्या वैवाहिक समस्या होत्या-त्याची पत्नी त्यांच्या आर्थिक परिस्थितीला कंटाळली होती आणि तिच्या मनात डॉनचा आदर कमी होऊ लागला होता कारण तो तिचा आणि त्यांच्या पाच मुलांचा सांभाळ करू शकत नव्हता. खरं म्हणजे डॉनला देखील आता स्वतःबद्दल आदर वाटत नव्हता. आणि तो पूर्णपणे प्रश्नांनी ग्रासून गेला होता.

ओहायो राज्यात आरोग्य विमा विकणे हे त्याचे काम होते, परंतु त्याच्या कामात तो यशस्वी नव्हता त्यामुळे फार त्वरेने आर्थिक विनाशाच्या मार्गावर जाऊ लागला होता.

सर्व गोष्टी डॉनच्या जीवनात प्रतिकूल होत्या, तरीही मला त्याच्यामध्ये क्षमता दिसली. त्याच्या मध्ये शिकण्याची इच्छा होती आणि तो काम करण्यास तयार होता. त्याच्या मधील ह्या दोन महत्वपूर्ण आणि शक्तिशाली बाबी पाहून मला फार उत्सुकतेने वाटले कि मी त्याला कामावर घ्यावे आणि त्याच्या भविष्याच्या कल्याणासाठी काहीतरी करावे. सरतेशेवटी, त्याला कामावर घेणे ही एक गुंतवणूक होती ज्या मुळे आम्हा दोघांनाही मोठा लाभ प्राप्त झाला.

माझ्या नवीन कंपनीने आमच्या एका विक्रेत्याकडून नुकतीच हवाईची सहल जिंकली होती आणि मला वाटले की डॉनला देवाच्या राज्याबद्दल सांगण्याची ही एक उत्तम संधी आहे. डॉन ख्रिश्चन असला तरी त्याला माझ्यासारखी समज नव्हती. आणि जरी मी या क्षेत्रात देवाची

तत्त्वे त्याच्याबरोबर सामायिक करण्याचा अनेक वेळेस प्रयत्न केला असला तरी, मी जे बोलत होतो त्यावर त्याचा विश्वास बसला नाही.

मी डॉनचे लक्ष वेधून घेण्याचा मार्ग शोधत होतो,माझी इच्छा होती की देवाचे राज्य कसे कार्य करते हे त्याला समजावे अणि त्याबद्दल शिकून त्याने देखील यशस्वी होऊ शकेल. पण, डॉन इतका निराश झाला होता की त्याला स्वतःवर विश्वास ठेवणे आणि बदल खरोखरच घडू शकतो यावर विश्वास ठेवणे कठीण होते. मला माहित होते की ही हवाईची ही सहल माझ्या साठी संधी आहे.

ह्या ट्रीपवर निघण्याच्या काही आठवड्यांपूर्वी, डॉन आणि मी ह्या बद्दल बोलत होतो कि आपण त्या ठिकाणी काय पाहणार आहोत आणि काय करणार आहोत. डॉनचे लक्ष इतर कशानेही वेधल्या जात नव्हते पण एका विशेष गोष्टीने त्याचे लक्ष वेधल्या गेले. त्याला पॅसिफिक महासागराच्या सुंदर पाण्यात ब्लू मार्लिन मासा पकडायचा होता. “हवाई ही जगाची ब्लू मार्लिन ची राजधानी आहे,” डॉन मला उत्साहाने म्हणाला. “मला नेहमीच ब्लू मार्लिन पकडण्याची इच्छा होती; हे माझे एक स्वप्न आहे.” काही आठवड्यांनंतर प्रथमच, मी डॉनच्या डोळ्यात चमक पाहिली. कशाने का होईना पण त्याला प्रोत्साहित केले होते, आणि मला माहित होते की त्याचा उत्साह एका शक्तिशाली धडा शिकण्याचे दार उघडेल.

“डॉन,” मी म्हणालो, “तुम्हाला माहित आहे का की हे जाणून घेणे शक्य आहे, केवळ आशा आहे असे नाही, परंतु हे निश्चित आहे की तुम्ही देवाच्या राज्याला समजून घेऊन हवाईमध्ये ब्लू मार्लिनला पकडू शकणार आहात?” डॉन गोंधळून गेला, पण त्याला त्याबद्दल अधिक जाणून घेण्याविषयी कुतूहल होते, आणि मी देवाच्या राज्याबद्दल माझे स्पष्टीकरण पुढे चालू ठेवले. मी मार्क 11:24 बोलून दाखविले, त्या ठिकाणी म्हटले आहे, “म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल.” डॉनसाठी, हे इतके उत्तम होते कि ह्यावर विश्वास कसा ठेवावा हे त्याला कळत नव्हते. मी थोडा वेळ त्याला देवाचे राज्य कसे कार्य करते आणि आपला विश्वास कसा मुक्त करायचा हे समजण्यास मदत करण्यासाठी घालवला. आणि म्हणून, आम्ही आमच्या सहलीला निघण्यापूर्वी, त्याने आणि त्याच्या पत्नीने मी माझ्या हरणासाठी

जसे बीज पेरले होते तसे बीज पेरले, दोघांनी सहमतीने प्रार्थना केली आणि विश्वास ठेवला की त्यांना ब्लू मार्लिन मिळाला आहे.

यादरम्यान, डॉनने कापणीचा भाग टिकवून ठेवण्यासाठी त्याला जे माहीत होते ते सर्व केले. त्याने कोणत्या बोटी उपलब्ध आहेत आणि त्या भाड्याने घेण्यासाठी किमती काय आहेत यावर थोडे संशोधन केले आणि शेवटी त्याला जे योग्य वाटले त्या कॅप्टनकडे बोटीचे बुकिंग केले. सर्व काही निश्चित झाले होते, आणि आम्ही सर्व हवाईच्या निळ्या पाण्यात जाण्यासाठी खूप उत्सुक होतो.

समुद्रात जाण्याचा दिवस आला, आणि बोटीवर चढत असताना, आम्ही आनंदाने कॅप्टनला सांगितले की आज आम्ही ब्लू मार्लिन पकडणार आहोत. इतर माशांची मासेमारी करण्या साठी त्याने आम्हाला यश मिळावे म्हणून शुभचिंतन केले, पण त्या दिवशी ब्लू मार्लिन पकडण्याची शक्यता अजिबातच नाही अशी ग्वाही त्याने दिली. गेल्या चार महिन्यांपासून दररोज दोन बोटी नियमितपणे चार्टर्ड टूरवर जात होत्या, आणि त्या वर असलेले कर्मचारी चार महिन्यात फक्त एकच ब्लू मार्लिन पकडू शकले होते. मार्लिन हा स्थलांतरित मासा असल्याने हा अद्याप मार्लिनचा हंगाम नव्हता या वस्तुस्थितीमुळे असे होत होते. आम्ही निराश होणार नाही असा निश्चय केला, आम्ही त्याला आदरपूर्वक सांगितले की आज आम्हाला एक ब्लू मर्लिन मिळणारच आहे आणि आमचे गियर तयार करणे सुरू ठेवले.

"म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करुन जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल."

—मार्क 11:24

सहा तास ट्रोलिंग केल्या नंतर देखील, आमच्या हाती काहीच आले नाही, आणि मला जरा भीती वाटू लागली की जर आम्ही यशस्वी झालो नाही तर डॉनचा विश्वास कमकुवत होईल. माझ्या चिंतेत मी त्याला एक प्रश्न विचारला. "डॉन," मी त्याच्या वरच्या पुलावरील माझ्या पर्चमधून ओरडलो, "मला तुला एक प्रश्न विचारायचा आहे. तुला ती ब्लू मार्लिन कधी मिळाली, ती दिसेल तेंव्हा किंवा आपण ज्या वेळी प्रार्थना केली होती त्याच वेळी?" आत्मविश्वासाने, डॉनने जोरदार उत्तर दिले, "गॅरी, उत्तर सोपे आहे. जेव्हा मी प्रार्थना केली

तेव्हाच मला ती मिळाली आहे." त्याचे उत्तर ऐकून माझा उत्साह आणि आत्मविश्वास वाढला. तेव्हाच मला कळले की डॉनने माझे निर्देश गांभीर्याने घेतले आहेत आणि त्याने ती मार्लिन घेऊन जाण्याचा निर्धार केला होता.

काही मिनिटांनंतरच, डॉनची रील समुद्राच्या दिशेने वाकू लागली आणि वाकत असल्यामुळे त्यातून आवाज येऊ लागला, त्यावेळी त्याच्या सोबतचे लोक ओरडले, "मासा अडकला आहे!"

"जास्त चेकाळू नकोस," कॅप्टनने म्हटले. "हा एक मोठा मासा आहे, पण तो ब्लू मार्लिन नाही. मार्लिन्स थेट पृष्ठभागावर येतात आणि हवेतून जबरदस्त उड्या मारतात आणि हा मासा खोलवर आहे." डॉन माशाला वर ओढून आणण्या साठी संघर्ष करत होता, पण तो अद्याप पृष्ठभागाच्या जवळ सुद्धा आला नव्हता. डॉन जितका थकला होता त्यापेक्षा मासा जास्त थकला होता आणि लवकरच त्याने सुटका करून घेण्याची धडपड थांबवली. डॉन ने रील मध्ये अडकलेला तो मोठा ब्लू मर्लिन बाहेर ओढून घेतला तेंव्हा डॉन ला आणि मला आश्चर्य वाटले नाही, परंतु बोटीवरील इतर सर्वजण थक्क झाले.

डॉन आणि त्याच्या माशांचे चित्र इतरांसाठी साक्ष आणि देवाच्या राज्याच्या वास्तविकतेची मला सतत आठवण करून देण्यासाठी आजही माझ्या कार्यालयात आहे. बाह्यत्कारी दृष्टीने, तो फक्त एक मासा होता. पण डॉनसाठी मार्लिनचा अर्थ खूप जास्त होता. जर देवाच्या राज्याने मार्लिनसाठी कार्य केले, तर त्याला जीवनात आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टींसाठी ते नक्कीच कार्य करेल. डॉनसाठी, देवाच्या राज्याचा त्याच्या जीवनावर काय प्रभाव पडू शकतो हे समजून घेण्याची ही फक्त सुरुवात होती.

ज्याप्रमाणे वारा दिसू शकत नाही परंतु त्याचा नैसर्गिक क्षेत्रावर दृश्यमान प्रभाव पडतो, त्याचप्रमाणे देवाचे राज्य वास्तविक आहे आणि नैसर्गिक क्षेत्रात त्याचा प्रभाव आहे.

काही हजार वर्षे मागे जा आणि तुम्हाला निकदेम नावाच्या माणसाबद्दल शिकायला मिळेल, ज्याने येशूला विशेषतः देवाच्या राज्याबद्दल प्रश्न विचारला होता. योहानकृत शुभवर्तमान च्या 3 च्या अध्यायात प्रभू ने काय

प्रतिसाद दिला ह्याची नोंद आहे, “वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि त्याचा आवाज तुम्ही ऐकता, तरी तो कोठून येतो व कोठे जातो हे तुम्हांला कळत नाही; जो कोणी आत्म्यापासून जन्मलेला आहे त्याचे असेच आहे.” (वचन. 8). डॉन सोबत बोटीत घालवला तो सुंदर दिवस याचं उत्तम उदाहरण आहे.

डॉन किंवा मी दोघेही देवाचे राज्य प्रत्यक्ष पाहू शकत नसलो तरी, त्या दिवशी मोठा मार्लिन मिळाल्याने आम्ही त्याचा परिणाम नक्कीच पाहिला आणि अनुभवला. ज्याप्रमाणे वारा दिसू शकत नाही परंतु त्याचा नैसर्गिक क्षेत्रावर दृश्यमान प्रभाव पडतो, त्याचप्रमाणे देवाचे राज्य वास्तविक आहे आणि नैसर्गिक क्षेत्रात त्याचा प्रभाव आहे. देवाचे राज्य नियंत्रित करणारे कायदे शिकून, त्या दिवशी डॉन ने केले त्या प्रमाणेच आपण आपल्या जीवनात बदल घडवून आणतो.

ठीक आहे तर मग, येथे एक प्रश्न आहे. तो मार्लिन मासा त्या ठिकाणी कसा आला? या प्रश्नाचे निश्चितच उत्तर आहे. देवाने ते केले एवढेच केवळ तुम्ही म्हणू शकत नाही. नाही, तो मासा त्या ठिकाणी कसा आला हे आम्हाला माहित असणे आवश्यक आहे. तुम्हाला खरोखर हे माहित असणे आवश्यक आहे कारण एखाद्या दिवशी तुम्हाला ब्लू मार्लिन किंवा निळ्या कारची किंवा फक्त किराणा सामानाची आवश्यकता असेल. वस्तुस्थिती अशी आहे की कथेचा मुद्दा खरोखर मासेमारीचा नाही, ज्या प्रकारे माझ्या शिकारीच्या कथा मध्ये हरीण हा मुद्दा नाही. ह्या कथा आपल्याला राज्य आणि ते कसे कार्य करते याबद्दल अंतर्दृष्टी देते. मार्लिन मासा पकडल्या गेला त्याचे एक कारण होते! येशूने त्याच्या शिष्यांना राज्य कसे कार्य करते हे शिकवण्यात बराच वेळ घालवला, परंतु त्याबद्दल बोलण्याव्यतिरिक्त, त्याने ते दाखवून दिले.

कृपया लक्ष द्या. देवाचे राज्य हे पृथ्वीच्या क्षेत्राप्रमाणे कार्य करत नाही ज्यामध्ये तुम्ही वाढलात. तुम्ही खरोखर ते तुमच्या मनाने पूर्णपणे समजून घेऊ शकणार नाही. हे कायद्यांच्या आधारावर कार्य करते, परन्तु पृथ्वीच्या क्षेत्रात आपण ज्या कायद्यांचा उपयोग करतो त्या पेक्षा ते भिन्न कायदे आहेत. पण आपण ते कायदे शिकू शकतो. येशू जेथे गेला तेथे त्याने राज्याचे हे नियम प्रदर्शित करण्यात आणि शिकवण्यात बराच वेळ घालवला. माझ्या

आवडत्या कथांपैकी एक म्हणजे ज्या मध्ये येशूने देवाच्या राज्याचे प्रदर्शन केले ती मार्क 6 मध्ये आढळून येते. येशूने केवळ पाच भाकरी आणि दोन मासे या मधून 5,000 माणसांना भोजन दिले, ही प्रसिद्ध कथा आहे. मी चर्चमध्ये लहानपणा पासून ही कथा लाखो वेळा ऐकली असली तरी, येशूने ते कसे केले हे मला कोणीही कधीही सांगितले नाही.

> *दिवस बराच उतरल्यावर त्याचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले, "ही अरण्यातली जागा आहे व आता दिवस फार उतरला आहे; तेव्हा लोकांनी भोवतालच्या खेड्यापाड्यांत जाऊन स्वतःकरता खायला काही विकत घ्यावे म्हणून त्यांना निरोप द्या. [कारण त्यांच्याजवळ खायला काही नाही."] त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हीच त्यांना खायला द्या." ते त्याला म्हणाले, "काय, आम्ही जाऊन दोनशे रुपयांच्या भाकरी विकत घेऊन त्यांना खायला द्याव्यात?" तो त्यांना म्हणाला, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? जाऊन पाहा." पाहिल्यावर ते म्हणाले, "पाच, व दोन मासे."*
>
> *नंतर त्याने त्या सर्व लोकांना हिरवळीवर गटागटाने बसायला सांगितले. तेव्हा ते शंभरशंभर व पन्नासपन्नास असे पंक्तीपंक्तीने बसले. मग त्याने त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडल्या व त्या त्यांना वाढण्यास आपल्या शिष्यांजवळ दिल्या. ते दोन मासेही सर्वांना वाटून दिले. मग सर्व जण जेवून तृप्त झाले. आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या भरून घेतल्या आणि माशांचेही तुकडे नेले. भाकरी खाणारे [सुमारे] पाच हजार पुरुष होते.*
>
> — मार्क 6:35-44

"येशू, ह्या ठिकाणी एक समस्या आहे. लोक भुकेले आहेत आणि आपण त्यांना आता लगेच जाऊ दिले नाही तर, त्यांना घरी पोहचायला फार उशीर होणार आहे; आणि आम्हाला त्यांची काळजी वाटत आहे." मग येशू त्यांना काय म्हणतो? "ओ हो खरेच, तुमचे म्हणणे बरोबर आहे. मला तर वेळेचे भानच राहिले नाही; आपण लगेच ही सभा बंद करूया." नाही, तो फक्त म्हणतो, "तुम्ही त्यांना खायला द्या." काय? तेथे 5,000 पुरुष होते, पण स्त्रिया आणि लहान मुलांना देखील मोजले तर त्या ठिकाणी 20,000 लोक सहज असू शकतील

असे बायबलमध्ये नमूद केले आहे. लोकांच्या एवढ्या मोठ्या जमावाला खायला घालणे, जरी तुमच्याकडे आधीपासून तजवीज असली तरीही, एक मोठे काम होते, एक अशक्य काम झाले असते. मला खात्री आहे की येशू काय म्हणत होता त्यावर शिष्यांचा विश्वास बसला नाही. येशूने जो मार्ग सांगितला त्यावर शिष्यांची प्रतिक्रिया ही पृथ्वीच्या क्षेत्रातील विशिष्ट मानसिकतेची स्पष्ट अंतर्दृष्टी दर्शविते. "पण, येशू, हे करण्या साठी आपल्याला आठ महिन्यांच्या वेतना एवढे पैसे लागणार आहेत! आपण भाकरीवर एवढा खर्च करावा का?" सर्वप्रथम, ह्या कडे लक्ष द्या कि, तरतुदीच्या कमतरतेमुळे त्यांनी त्यांच्या समस्येचे रूपांतर पृथ्वी शाप प्रणाली मधील अर्थशास्त्र, वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळण्याची परिस्थिती मध्ये कशा प्रकारे केले, आठ महिन्यांचे वेतन लागेल हे त्यांचे म्हणणे अचूक होते.

एके दिवशी मी प्रार्थना करत होतो आणि देवाने मला सांगितले की माझी दैहिक किंवा जगिक मानसिकता आहे. हे ऐकून मी गोंधळून गेलो; याचा अर्थ काय होता? माझ्या मध्ये वासनेची समस्या होती का? नाही, तो माझ्या विचारसरणी बद्दल बोलत होता आणि मी किती मर्यादित आहे ह्या बद्दल बोलत होता कारण पृथ्वी शाप प्रणाली ची विचारसरणी मी माझे भविष्य किती वेगाने चालवू शकतो ह्या मानसिकते द्वारे फिल्टर करत होती. आपण सर्वजण हे करतो. आपल्याला नवीन घर हवे असेल तर त्याची किंमत किती आहे ते आपण शोधून काढतो, मग ते परवडेल का हे पाहण्याचा प्रयत्न करतो. आपण हा अंदाज कसा लावू शकतो? आपण किती वेगाने धावू शकतो ह्या पृथ्वी शाप प्रणालीच्या आपल्या समजुती अनुसार आपण हे करू शकतो. चला बघूया, मी एका तासाला 15 डॉलर कमवतो गुणिले दर आठवड्याला 40 तासांच्या बरोबरीने … "व्वा, ह्या परिस्थितीत मला ते घर परवडेल असे मला अजिबात वाटत नाही." त्यामुळे ते अशक्य आहे असे म्हणून तो विचार बाजूला टाकतो. मी किती वेगाने धावू शकतो या फिल्टर

द्वारे आपण प्रत्येक कल्पना फिल्टर केली, तर आपण कधीही देवाच्या राज्य पद्धतीने जीवन जगणे साध्य करू शकणार नाही कारण देव त्या प्रणालीशी जोडलेला नाही. देव मला सांगत होता की जर मला त्याच्या राज्याशी जोडून घ्यायचे असेल तर मला त्याच्या राज्याच्या अनुशंगाने विचार करावा लागेल—सर्व काही शक्य आहे!

"हे करण्यासाठी आठ महिन्यांच्या वेतना एवढे पैसे लागणार आहेत! ." मुळात, ते म्हणत होते की इतक्या लोकांना खायला घालणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे.

येशूने जेंव्हा म्हटले, "तुम्ही त्यांना खायला द्या" ते ऐकून त्यांना नक्की काय वाटले ह्याचे चित्रण मी तुम्हाला करून दाखवतो. कल्पना करा की मी तुमचा पास्टर आहे, आणि तुमच्यावर काही कठीण प्रसंग आला आणि तुम्ही आपल्या घरासाठी घेतलेल्या कर्जाची मासिक रक्कम देऊ शकले नाही. तुम्ही तीन महिन्यांपासून हे पैसे भरलेले नाहीत आणि त्या मुळे तुम्ही तुमचे घर गमावू शकता. म्हणून तुम्ही माझ्याकडे आलात आणि मला विचारले की चर्च तुम्हाला पेमेंट्स पूर्ण करण्यासाठी मदत करू शकते का? मग मी तुम्हाला खूप शांतपणे म्हणतो, "माझ्याकडे एक चांगली कल्पना आहे. तुम्ही ते पेमेंट करून का टाकत नाही, आणि मग तुमचे काहीही देणे बाकी राहणार नाही तुम्हाला?" त्यानंतर तुम्ही माझ्याकडे "मी काय म्हणतोय हे तुम्हाला समजेलच नाही" अशा नजरेने पहाल. "नाही, पास्टर, मला वाटते की मी जे म्हणालो ते तुम्हाला समजलेच नाही. आमच्याकडे पैसे नाहीत; म्हणूनच आम्ही तुमच्याकडे आलो आहोत. आमची इच्छा आहे कि चर्च ने आमची मदत करावी म्हणजे मग आम्ही ह्या समस्येत अडकून राहणार नाही." पुन्हा, मी तुमच्याकडे अतिशय शांतपणे पाहतो आणि म्हणतो, "नाही, तुम्ही काय म्हणत आहात ते मला समजले आहे आणि मी तुम्हाला एक उत्तम उपाय दिला आहे. तुम्ही फक्त घराची रक्कम द्यावी आणि तुमच्याकडे कोणतेही देयके बाकी राहणार नाहीत." तुम्हाला वाटेल की मी मूर्ख आहे.

शिष्यांना देखील असंच वाटलं असेल. "येशू, या सर्व 20,000 लोकांना आपण खायला घालायचे असे तू खरोखर म्हणत नाहीस, हो ना? ते फक्त शक्य नाही. ते करण्यासाठी आपल्या कडे काहीच नाही. आणि जर आम्ही जाऊन एवढे पैसे मिळविण्यासाठी काम करण्याची योजना आखली, एवढे जेवण इथपर्यंत पोहचविण्या साठी जर आम्ही समित्यांचे गठन करून गाड्यांची देखील तजवीज केली, तरी आम्ही त्या भाकरी घेऊन परत येईपर्यंत ह्या ठिकाणी प्रत्येकजण मेला असेल. आपल्याकडे पैसे असले तरी ते काढण्यासाठी आपल्याकडे पुरेसा वेळ नाही." नैसर्गिकरित्या अशक्य गोष्टींना आपण अशा प्रकारे प्रतिसाद देतो जेव्हा

आपल्याला त्या पूर्ण होण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही. जेव्हा आपल्याकडे तरतूद नसते तेव्हा आपली दृष्टी देखील नाहीशी होऊन जाते.

येशूने शिष्यांना कोणतेही उत्तर न देता सोडले नाही आणि जर तसे करण्याचा मार्ग नसता तर त्याने त्यांना लोकांना खायला देण्यास सांगितले नसते. तो प्रत्यक्षात त्यांना दुसरी व्यवस्था दाखवणार होता—देवाच्या राज्याचे कार्य. शिष्य गोंधळून गेलेले असतांना, येशूने जबाबदारी घेतली.

"तुमच्याकडे काय आहे? जा आणि पाहा," येशू म्हणाला. शिष्य परत आले आणि म्हणाले, "आम्हाला पाच भाकरी आणि दोन मासे मिळाले आहेत." एकदा पाच मासे आणि दोन भाकरी मिळाल्यानंतर, येशूने शिष्यांना त्या त्याच्याकडे आणण्यास सांगितले. तो भाकरी आणि मासे घेतो आणि त्यांना आशीर्वाद देतो आणि नंतर ते त्यांना परत देतो. नैसर्गिक डोळ्यांसाठी, काहीही बदलले नाही, परंतु आध्यात्मिक क्षेत्रात, काहीतरी खूप महत्त्वाचे घडले आहे, जे राज्याबद्दलच्या आपल्या आकलनाची गुरुकिल्ली आहे. येशूने शिष्यांना भाकरी आणि मासे बाहेर लोकांना देण्याची सूचना दिली आणि ते अन्न त्यांच्या डोळ्यांसमोर वाढत गेले अणि ते आश्चर्यचकित होऊन पाहत राहिले आणि सर्व 20,000 लोकांना खाण्यासाठी भरपूर अन्न होते. काय झालं? हे कसे घडले?

हे शोधण्यासाठी, आम्हाला या घटनेच्या तपशीलांचे बारकाईने निरीक्षण करणे आवश्यक आहे. "आशीर्वाद" या शब्दाचा अर्थ विलग करणे किंवा पवित्र करणे असा होतो. म्हणून आपण असे म्हणू शकतो की जेव्हा येशू अन्नाबद्दल बोलला आणि त्याला आशीर्वाद दिला तेव्हा भाकर आणि मासे एका राज्यातून वेगळे केले गेले. पृथ्वीच्या क्षेत्रात, 20,000 लोकांना पाच भाकरी आणि दोन मासे खाऊ घालणे शक्य नाही. पण देवाच्या राज्यामुळे सर्व गोष्टी शक्य आहेत. खरं तर कथा इथेच संपत नाही. ते संपण्यापूर्वी, शिष्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या 12 टोपल्या गोळा केल्या. पाच भाकरी आणि दोन मासे पुरेसे नसण्यापासून ते 20,000 लोकांना तृप्त करण्यापर्यंत गेले आणि मग शेवटी सुरुवात केली त्यापेक्षा ते जास्त जास्त झाले? ही देवाच्या राज्याची पद्धत आहे, वाजवी पेक्षा पुरेसे होणे!

अध्यात्मिक शास्त्रज्ञ या नात्याने मी ह्या घटनेकडे बारकाईने पाहिल्यावर देवाने मला हरणाच्या बाबतीत दिलेले सूत्र या ठिकाणी देखील दिसले. माझ्या हरणांच्या शिकारीद्वारे, देवाने मला जे काही मला हवे होते त्याचा एक भाग प्रथम देवाच्या राज्यात पेरण्यास शिकवले.

देवाने मला जे काही मला हवे होते त्याचा एक भाग प्रथम देवाच्या राज्यात पेरण्वास शिकवले.

या मुलाने त्याच्याकडे असलेली भाकरी आणि मासे ह्या बाबतीत हेच केले. त्याने ते देवाच्या राज्याच्या अधिकाराखाली ठेवले आणि ते वाढले, 20,000 लोकांनी भरपूर भोजन केल्यानंतर 12 टोपल्या उरल्या होत्या. लक्षात घ्या की भाकरीचा गुणाकार भाकरी मध्ये होतो आणि माशाचा गुणाकार माशा मध्ये होतो. हे असेच कार्य करते. मी राज्यामध्ये मासे पेरू शकतो आणि ते माशाच्या रूपात बहुगुणित होऊ शकतात. पण मला मासे हवे असतील आणि पेरायला मासे नसतील तर? उत्तर आहे - पैसा! लक्षात ठेवा, पैसा ही वस्तु विनिमय प्रणाली आहे. तुम्ही आणि मी रोज पैशाला "नाव" देत असतो. आम्ही त्याला दूध, घर, कपडे, भाकरी आणि इतर प्रत्येक गोष्टीची नावे देतो. पैसा आपल्याला हवा तसा बनतो. म्हणून जेव्हा आपण पेरणी करतो तेंव्हा; आपण पैशाला नाव देऊ शकतो. मास्यांची पेरणी करण्या साठी दुकानात जाऊन मासे विकत घेण्याऐवजी आपण फक्त पैशाला माशाचे नाव देऊ शकतो. हे तुमच्या देणगीने होऊ शकते, परंतु तुमच्यादशमांशाने नाही, कारण देवाने त्याला आधीच नाव दिले आहे. बहुगुणित होण्याचा हाच नियम आपण लूक 5 मध्ये पाहू शकतो.

नंतर असे झाले की, लोकसमुदाय त्याच्याभोवती गर्दी करून देवाचे वचन ऐकत असता तो गनेसरेत सरोवराच्या किनाऱ्याशी उभा होता. तेव्हा त्याने सरोवराच्या किनाऱ्याला लागलेले दोन मचवे पाहिले; त्यांवरील कोळी खाली उतरून जाळी धूत होते.त्या मचव्यांपैकी एक शिमोनाचा होता; त्यावर चढून तो किनाऱ्यापासून थोडासा लोटावा म्हणून त्याने त्याला सांगितले.मग तो मचव्यात बसून समुदायांना शिक्षण देऊ लागला.

आपले बोलणे संपवल्यावर त्याने शिमोनाला म्हटले,"खोल पाण्यात हाकार; मग मासे धरण्यासाठी तुम्ही आपली जाळी खाली सोडा."शिमोनाने त्याला उत्तर दिले, "गुरूजी, आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो."मग त्यांनी तसे केल्यावर माशांचा मोठा घोळका जाळ्यांत सापडला आणि त्यांची जाळी फाटू लागली.तेव्हा त्यांचे जे साथीदार दुसऱ्या मचव्यात होते त्यांनी येऊन आपल्याला साहाय्य करावे म्हणून त्यांनी त्यांना खुणावले. मग ते आल्यावर दोन्ही मचवे इतके भरले की ते बुडू लागले.

— लुककृत शुभवर्तमान 5:1-7

अध्यात्मिक शास्त्रज्ञ या नात्याने, ह्या घटनेकडे बारकाईने नजर टाकूया. त्या ठिकाणी ते मासे कसे आले? तुम्ही ते पाहू शकता का? येशू किनाऱ्यावर चालत आहे आणि त्याला एक बोट दिसली जी त्याला लोकसमुदायाला प्रचार करण्यासाठी वापरायची आहे. तो बोटीचा मालक असलेल्या पेत्राला विचारतो की तो त्याची ती बोट वापरू शकतो का आणि पेत्र म्हणाला, "नक्की." कारण त्यांचे बोटीवर करायचे त्या दिवशीचे काम संपले होते; त्यांनी रात्रभर मासेमारी केली होती आणि त्यांच्या हाती काहीही लागले नव्हते. येशूने बोट आपल्या कामासाठी वापरल्यानंतर, तो पेत्राला समुद्रात खोल पाण्यात मासे पकडण्यासाठी जाण्यास सांगतो. मला खात्री आहे की येशूने पेत्राला हे जे करायला सांगितले त्या मुळे तो अचंभित झाला होता, कारण त्याने उत्तर दिले, "येशू, आम्ही रात्रभर मासेमारी केली आणि काहीही पकडले नाही." पेत्र हा एक व्यावसायिक मच्छीमार होता आणि त्याला मासेमारी कशी करावी हे माहित होते. त्याच्या अनुभवानुसार, त्याठिकाणी मासे नव्हते. नैसर्गिकरित्या पहिले तर त्या ठिकाणी परत मासे पकडण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नव्हता. त्यांनी त्यांचे गियर आधीच काढून ठेवले होते आणि त्यांनी जाळी देखील स्वच्छ करून ठेऊन दिली होती.

तासभर चाललेले येशूचे प्रवचन ऐकल्या मुळे कदाचित पेत्राच्या हृदयाला स्पर्श झाला होता आणि अशा प्रकारचा स्पर्श त्याने यापूर्वी कधीही अनुभवला नव्हता, म्हणून कदाचित त्याने येशूच्या म्हणण्या प्रमाणे केले, अन्यथा मला नाही वाटत की पेत्राने ते केले असते.

म्हणून तो म्हणतो, “तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो.” पेत्राने जाळी सोडली आणि त्याने इतके मासे पकडले की त्याची जाळी तुटली आणि त्याची बोट बुडण्याच्या मार्गावर होती. त्याने किनाऱ्यावर असलेल्या आपल्या साथीदारांना हाक मारली आणि त्यांनी येऊन त्याची मदत केली आणि त्यांची देखील जाळी तुटण्याच्या आणि बोटही बुडण्याच्या मार्गावर होती. बायबलमध्ये पेत्राची प्रतिक्रिया नोंदवली आहे; तो विस्मित झाला!

हे कसे घडले? काही सुगावा आहेत का? आपल्याला कळू शकेल का? थोडक्यात, हे आधीनतेच्या तत्त्वाचे सामर्थ्य आहे ज्याबद्दल आपण आधी बोललो आहोत. जेव्हा पेत्राने येशूला मासेमारीची बोट वापरू दिली तेव्हा बोट आणि व्यवसायाने राज्ये बदलली. हा व्यवसाय पृथ्वी शाप प्रणालीच्या अधिकारक्षेत्रातून बाहेर आला आणि देवाच्या राज्याच्या अधिकारक्षेत्रात आला. देवाच्या अधिकारक्षेत्राच्या राज्याखाली असल्याने, देवाला ज्ञानाचा शब्द बोलण्याची आणि येशूला माशाचे अचूक स्थान दाखविण्याचा कायदेशीरता प्राप्त झाली; “तिकडे खोल पाण्यात.”

चला तर मग ही घटना अधिक स्पष्टपणे समजण्याचा प्रयत्न करूया. येशूने पेत्रा कडून मासेमारीची बोट उधार घेतली त्या बोटीमधून त्याने रात्रभर मासे पकडण्याचा प्रयत्न केला होता आणि त्याच्या हाती एकही मासा लागला नव्हता. या देवाणघेवाणीत, नौका देवाच्या राज्याच्या अधिकारक्षेत्रात येतात. येशूला आता पवित्र आत्म्याद्वारे मासे कोठे आहेत ते नेमके स्थान माहित आहे. त्यानंतर येशू पेत्राची बोट नेमक्या त्या ठिकाणी नेतो. त्यानंतर पेत्राची बोट माशांनी जवळजवळ भरून जाते. त्याच्या साथीदारांची बोट देखील माश्यांनी भरून गेल्या आहेत. मग मासे कसे पकडले गेले? सोप्या भाषेत, थेट स्वर्गातून प्राप्त झालेल्या निर्देशाच्या शब्दाद्वारे. चला यावर थोडा विचार करूया, मासे नेमके कोठे आहेत हे माहित असल्यास कोणीही ते पकडू शकतो. आपण आत्ताच काय बोललो याचा विचार करा. देव सर्व काही जाणतो; तो तुम्हाला मदत करू शकतो आणि काय करावे हे सांगू शकतो.

जेव्हा ड्रेन्डा आणि मी खचून गेलो होतो आणि देवाच्या राज्याबद्दल शिकू लागलो, तेव्हा देवाने रात्री स्वप्नाद्वारे मला एक व्यवसाय सुरू करण्या बद्दल सांगितले, हा व्यवसाय कसा सुरु करायचा हे मला खरोखर माहित नव्हते. पण आज 28 वर्षांनंतरही तो व्यवसाय चालू

आहे, त्या व्यवसायाद्वारे मला वर्षाला लाखो डॉलर्सचे निव्वळ उत्पन्न प्राप्त होते. त्या 28 वर्षांमध्ये, मी लाखो लोकांची मदत करू शकलो आणि सेवे साठी भरपूर प्रमाणात बी पेरू शकलो. कसे? मी स्वर्गातून ऐकले आणि तुम्हीही ऐकू शकता! मी तुम्हाला एक उदाहरण देतो.

मी काही वर्षांपूर्वी देवाचे राज्य ह्या विषयी पाच रात्रीचे सम्मेलन आयोजित केले होते. दुसऱ्या रात्रीनंतर, ख्रिस नावाचा व्यक्ती माझ्याकडे आला आणि त्याने मला त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले. मी त्याला विचारले की त्याला कशासाठी प्रार्थनेची गरज आहे. त्यानंतर त्याने मला त्याची कहाणी सांगितली. तो एका व्यक्तीसोबत व्यवसाय करत होता, त्या व्यक्तीने व्यवसायातील पैशांची उधळपट्टी केली, आणि त्या मुळे त्यांचा व्यवसाय खालावत गेला. त्याचे चौथे लग्न झाले होते, त्याला अनेक वैवाहिक समस्या होत्या, आणि तो फक्त 40 वर्षांचा होता. त्याने मला सांगितले की तो इतका निराश झाला होता की त्याने लोडेड पिस्तूल घेतले आणि थोडावेळ इकडे तिकडे फिरला आणि आत्महत्येच्या उद्देशाने एका बंद पेट्रोल पापं वर थांबला होता.

पहाटेचे ३:३० वाजले होते, आणि तो लोडेड पिस्तुल घेऊन तिथे बसला असता त्याचा मोबाईल वाजला. त्याने लगेच नंबर ओळखला. तो त्याच्या व्यवसायातील साथीदाराचा फोन होता. त्याला त्याच्याशी अगदीच बोलायचे नव्हते, म्हणून त्याने उत्तर दिले नाही. तो पुन्हा, आणि पुन्हा, आणि पुन्हा फोन करत राहिला. 11वेळेस फोन वाजला तेंव्हा क्रिस ने शेवटी तो उचलुन त्याच्याशी बोलण्याचे ठरविले. त्याच्या माजी जोडीदाराच्या तोंडून पहिले शब्द बाहेर पडले, “तू कुठे आहेस आणि तू काय करतोस?” जेव्हा ख्रिसने त्याला सांगितले, तेव्हा त्याचा माजी जोडीदार म्हणाला, “तिथून हलू नकोस; मी आत्ता येतोय!” खरे म्हणजे, त्याच्या जुन्या जोडीदाराने नुकतेच आपले जीवन देवाला समर्पित केले होते आणि त्याला हे ख्रिससोबत शेअर करायचे होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्याला सकाळी 3:00 वाजता ख्रिसला फोन करण्याची निकड वाटली आणि जेव्हा ख्रिसने फोन उचलला नाही आणि उत्तर दिले नाही तेव्हा तो सतत प्रयत्न करत राहिला.

जेव्हा ख्रिसचा साथीदार त्या ठिकाणी आला तेव्हा त्याने ख्रिस ला आपल्या परिवर्तित जीवनाबद्दल सर्वकाही सांगितले आणि क्रिस ला ख्रिस्ताचा स्वीकार करण्या साठी मदत केली,

आणि ख्रिसचे आयुष्य आमूलाग्र बदलले. सर्व काही चांगले होऊ लागले. त्याला आराधना करण्या साठी चांगली मंडळी मिळाली, त्याचे वैवाहिक जीवन सुधारू लागले. त्याच्या उत्पन्नाशिवाय सर्व काही चांगले चालले होते. ख्रिसकडे नोकरी नव्हती आणि त्याबद्दल त्याने मला प्रार्थना करण्यास सांगितले. या पुस्तकात मी तुम्हाला नेमके जे सांगत आहे, तेच मी त्या संमेलनामध्ये शिक्षण देत होतो, आणि ते म्हणजे हे कि देवाचे राज्य आपल्या स्वतःच्या क्षमतेच्या पुढे जाऊन आश्चर्यकारक गोष्टी कशा करू शकते.

पवित्र आत्मा आपल्याला कसे मार्गदर्शन करू शकतो आणि दिशा आणि कल्पना मिळण्यास कशी मदत करू शकतो यावर ख्रिसने विचार करत असतांना, त्याच्या मनात अचानक एक विचार आला. आर्थिकदृष्ट्या त्याच्याकडे फारसे पर्याय नव्हते. पण त्याला फार उत्तम चीजकेक बनवता येत होता. त्याची विशेषता स्वास्थ्य-आधारित चीज़केक बनविणे ही होती, आणि त्याला माहित होती की त्याच्याकडे असलेली ही सर्वात उत्तम कला आहे. खरं तर, ख्रिसला त्याचे सर्व मित्र सर्वात उत्तम चीज केक बनविणारा म्हणून ओळखत होते. तो बऱ्याच वेळा स्थानिय हेल्थ फूड स्टोअरमध्ये गेला होता आणि त्याने जे बेक केलेले पदार्थ ठेवले होते ते वापरून पाहिले होते परंतु त्याला त्या मध्ये कमतरता आढळून आली होती. ख्रिसकडे फारसे पर्याय नव्हते, पण त्याला वाटले की हा एक पर्याय आहे, तो म्हणजे चीजकेक्स विकणे. त्याला खात्री होती की जर त्याने त्याचा एक चीजकेक त्या स्थानिय हेल्थ फूड स्टोअरमध्ये नेला आणि त्यांनी तो चाखून पाहिला तर ते नक्कीच त्याचे केक त्या ठिकाणी विकण्यासाठी ठेवतील. आणि त्याचा केक इतर केक पेक्षा जास्त प्रमाणात विकल्या जाईल याची त्याला खात्री होती. त्यामुळे त्याने नेमके तेच केले. त्याने चीजकेक बनविला आणि हेल्थ फूड स्टोअरमध्ये त्यांना काहीही पूर्वसूचना न देता घेऊन गेला. नेमक्या ज्या वेळी क्रिस त्या ठिकाणी आपला केक घेऊन गेला तेंव्हा त्या फूड स्टोर च्या संपूर्ण चेन चा सी ई ओ त्या ठिकाणी त्या स्टोर मध्ये आलेला होता. सीईओने क्रिस ला आश्वासन दिले कि तो त्याचा चीजकेकचा चाखून बघेल आणि आपली प्रतिक्रिया त्याला कळवेल.

त्या रात्री मीटिंगनंतर ख्रिस माझ्याशी बोलण्यासाठी पुन्हा समोर आला. त्याने जे केले ते सर्व मला सांगितले आणि मला या स्वास्थ्य खाद्य स्टोअर सोबत करार व्हावा म्हणून

त्याच्या सोबत प्रार्थना करण्याची विनंती केली. दुसऱ्या दिवशी ख्रिस पुन्हा तिथे आला, तो फार उत्साही आणि आनंदी होता! त्याने मला सांगितले की सीईओ ची इच्छा आहे की त्याने फक्त त्या एका दुकानासाठीच नाही परंतु हेल्थ फूड स्टोर च्या सर्व दुकानांसाठी त्याने चीजकेक बनवावा. सीईओ त्याला विचारले कि त्याला आणखी काय बेक करता येते. ख्रिसला धक्काच बसला! आश्चर्याची गोष्ट म्हणजे, तो सीईओ संमेलनाच्या शेवटच्या रात्री संमेलनामध्ये आला, जिथे त्यांनी पुढे येऊन आपले हृदय प्रभूला अर्पण केले आणि त्याचा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झाला. दोन आठवड्यांनंतर मला त्याच्याकडून एक पत्र मिळाले ज्यामध्ये त्याने इच्छा प्रकट केली कि त्याला देवाच्या राज्यात पेरणी करायची आहे. त्याने कंपनीतील त्याच्या दहा टक्के स्टॉक आमच्या सेवकाईला, फेथ लाइफ नाऊला देऊ केले होते. अविश्वसनीय! देव एका कल्पनेचा उपयोग करून शून्यातून काहीतरी मोठे करू शकतो.

अध्याय 10

गोळा करा, पण घाम गाळू नका!

उन्हाळ्यात खूप दूरवर धावून आलेला घोडा तुम्ही पहिला आहे का? तो घामाने चिंब झालेला असतो; फेसयुक्त घामाने त्यांचे शरीर झाकून गेलेले आणि ओलेचिंब झालेले असते. त्यावरून तुम्ही म्हणू शकता की त्याने खूप मेहनत केली आहे. मला नेहमी हा प्रश्न विचारल्या जातो, "गॅरी, तुम्हाला असे म्हणायचे आहे का कि आपण कामच करायला नको?" नाही, मी असे म्हटले नाही आणि देवाचे वचनही असे सांगत नाही. पण तुम्ही काम कसे करता या मध्ये खूप फरक आहे. उदाहरणार्थ,पेत्र आणि त्याच्या साथीदारांनी पकडलेल्या माशांनी दोन बोटी भरगच्च होऊन तुटण्याच्या स्थितीत आल्या होत्या, त्या घटनेकडे लक्ष द्या. त्यांनी रात्रभर मासे पकडण्याचा प्रयत्न केला होता पण त्यांना यश मिळाले नव्हते. पण जेंव्हा, येशू त्या ठिकाणी त्यांच्या मदतीला आला आणि ज्ञानाच्या शब्दाने मासे कोठे आहेत ते दाखवले. त्या वेळी, त्यांनी श्रम देखील केले परंतु ते पूर्णपणे भिन्न प्रकारचे श्रम होते. त्यांनी त्या माशांनी भरलेले जाळे ओढून बोटीत घेण्यासाठी निश्चितच श्रम केले. पण ते मासेमारी करत होते का?

मला माहित आहे की मी इथे शब्दांशी खेळत आहे. मासेमारी हा शब्द आपण बऱ्याच गोष्टींसाठी वापरतो. एखादी स्त्री कौतुकासाठी मासेमारी करत असते. एका माणसाने आपल्या खिशात हात घातला, आणि आपल्या चाव्यासाठी मासेमारी करू लागला. जेव्हा आपण काहीतरी शोधत असतो तेव्हा आपण मासेमारी हा शब्द वापरतो. तर पेत्र मासेमारी करत होता का? जेव्हा मी शिकारीला जातो तेव्हा मी तुम्हाला सांगितले की मला माझे हरण सुमारे 40 मिनिटांत मिळते. मी शिकार करत असतो का? दुसऱ्या शब्दांत, मासे कुठे आहेत हे तुम्हाला माहीत असल्यास, तुम्ही मासेमारी करत आहात का? जर मला माहित असेल की

मला हरण मिळणार आहे, तर मी शिकार करत आहे का? तुम्हाला फरक कळावा म्हणून मी हे सांगत आहे. होय, मी श्रम करीत आहे, परंतु मी रात्रभर कष्ट करून मला काहीही मिळत नाही अशा प्रकारचे श्रम करत नाही. मुख्यतः, मला जीवनात आवश्यक असलेल्या गोष्टी मिळाल्यामुळे, मी माझ्या पित्याचा व्यवसाय आणि माझे उद्देश या साठी देवाच्या राज्यामध्ये काम करण्यास सक्षम आहे.

मी ह्याला गोळा करणे असे म्हणतो!

जेव्हा पेत्र येशूकडे आला तेव्हा मत्तय 17:27b मध्ये कर कसा भरावा असे विचारले, तेव्हा येशूने पुढील प्रमाणे सांगितले:

> *"तू जाऊन समुद्रात गळ टाक आणि आधी वर येईल तो मासा धरून त्याचे तोंड उघड म्हणजे तुला दोन रुपयांचे नाणे सापडेल. ते घेऊन माझ्याबद्दल व तुझ्याबद्दल त्यांना दे."*

लक्ष द्या, येशू ने असे म्हटले नाही, "ठीक आहे, पेत्रा, आपल्याला कर भरायचा आहे. म्हणून मी असे म्हणतो कि, तुम्ही जवळपास तीन महिन्यांसाठी शहरात जा, नोकरी मिळवा, पैसे कमवा आणि आमचा कर भरण्यासाठी पैसे कमावल्यानंतर परत या." नाही, येशूने असे म्हटले नाही. का? कारण जर पेत्र पृथ्वीच्या शाप व्यवस्थेकडे परत गेला असता तर त्याला पैशाच्या मागे धावायला लागलं असतं आणि ज्या कार्या साठी त्याला नियुक्त केले गेले होते ते त्याला सोडावे लागले असते. त्याऐवजी, येशू आपल्याला राज्य कसे कार्य करते आणि पृथ्वीच्या क्षेत्रात असताना आपण कसे कार्य केले पाहिजे हे दाखवतो. पेत्राला जे उत्तर मिळाले तेच तुमचे देखील उत्तर आहे. येशूने पेत्राला सोप्या पद्धतीने सांगितले की तरतूद कोठे आहे, आणि कापणीसाठी त्याला कोणती पद्धत वापरायची आहे आणि त्याने नेमके काय शोधायचे आहे. पेत्राला फक्त ते गोळा करायचे होते.

आपण येशूला त्याच्या शिष्यां सोबत पाहत पाहतो, तेंव्हा राज्य कसे चालते ते पाहून ते सहसा आश्चर्यचकित आणि धक्का होऊन जात होते. जेव्हा येशूने मार्क अध्याय 11 मध्ये

आपल्या शब्दांनी अंजिराच्या झाडाचा नष्ट केले तेव्हा बायबल मध्ये म्हटले आहे की पेत्र आश्चर्यचकित झाला. मृत्यू होऊन चार दिवस झाल्या नंतर लाजर कबरेतून बाहेर आला तेव्हा ते थक्क झाले. पेत्र, याकोब आणि योहान यांनी ते सर्व मासे पकडले तेव्हा ते थक्क झाले. राज्य कसे कार्य करते याबद्दल सतत अधिकाधिक शिकत असताना वर्षानुवर्षे सतत,ड्रेन्डा आणि मी आश्चर्यचकित झालो, अवाक होऊन म्हणालो, "तुम्ही ते पाहिले का?". आपण पवित्र आत्म्याच्या मदतीने गोळा करण्या बद्दल बोलत असताना, मला तुम्हाला मत्तय अध्याय 6 वर घेऊन जायचे आहे. माझ्या बायबलमध्ये या उताऱ्याच्या वर एक उपशीर्षक आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे, "काळजी करू नका!" आणि मला ते आवडते.

कोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही, कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीती करील; अथवा एकाशी निष्ठेने वागेल व दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची चाकरी करू शकत नाही.

ह्यास्तव मी तुम्हांला सांगतो की, आपल्या जिवाविषयी, म्हणजे आपण काय खावे व काय प्यावे; आणि आपल्या शरीराविषयी, म्हणजे आपण काय पांघरावे, ह्याची चिंता करत बसू नका. अन्नापेक्षा जीव आणि वस्त्रापेक्षा शरीर अधिक आहे की नाही?आकाशातील पाखरांकडे निरखून पाहा; ती पेरणी करत नाहीत, कापणी करत नाहीत की कोठारात साठवत नाहीत; तरी तुमचा स्वर्गीय पिता त्यांना खायला देतो; तुम्ही त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहात की नाही? चिंता करून आपल्या आयुष्याची दोरी हातभर वाढवण्यास तुमच्यापैकी कोण समर्थ आहे?

तसेच वस्त्राविषयी का चिंता करत बसता? रानातील फुले पाहा, ती कशी वाढतात? ती कष्ट करत नाहीत व सूत कातत नाहीत;तरी मी तुम्हांला सांगतो, शलमोनदेखील आपल्या सर्व वैभवात त्यांतल्या एकासारखाही सजला नव्हता.जे रानातले गवत आज आहे व उद्या भट्टीत पडते त्याला जर देव असा पोशाख घालतो, तर, अहो तुम्ही अल्पविश्वासी, तो विशेषेकरून तुम्हांला पोशाख घालणार नाही काय?

ह्यास्तव 'काय खावे? काय प्यावे? काय पांघरावे?' असे म्हणत चिंता करत बसू नका.(कारण ह्या सर्व गोष्टी मिळवण्याची धडपड परराष्ट्रीय लोक करत असतात.) तुम्हांला ह्या सर्वांची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणून आहे. तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील. ह्यास्तव उद्याची चिंता करू नका, कारण उद्याची चिंता उद्याला; ज्या दिवसाचे दुःख त्या दिवसाला पुरे.

— मत्तय 6:24-34

येशू म्हणतो की तुम्ही दोन मालकांची सेवा करू शकत नाही. तुम्हाला वाटेल की तुम्ही करू शकता पण तुम्ही करू शकत नाही. तुम्ही केवळ एकावरच प्रीती करू शकाल. आणि मी हे सांगू शकतो कि तुम्ही कुणावर प्रीती कराल. जो तुमच्या गरज पूर्ण करेल असा तुमचा विश्वास आहे त्यावर तुम्ही प्रीती कराल. जेव्हा परमेश्वर माझ्याशी त्या जुन्या फार्महाऊसमध्ये बोलला कि मी त्याचे राज्य कसे कार्य करते हे शिकण्यासाठी कधीही वेळ काढला नाही, तेव्हा तो खऱ्या अर्थाने हे म्हणत होता की तो खरोखर माझा स्वामी नाही. ज्यावर माझा पूर्ण विश्वास असावा, आणि ज्याची मी सेवा करत होतो आणि ज्यावर मी विश्वास ठेवत होतो तो खरे तर तो नव्हता. हो, नक्कीच, मी चर्चमध्ये जात होतो,

उदारतेने दान देत होतो, देवावर प्रेम करत होतो आणि मला माहित होते की मी स्वर्गात जाणार आहे. पण देवाची आर्थिक व्यवस्था आणि त्याचे राज्य कसे कार्य करते हे शिकण्यासाठी मी कधीच वेळ काढला नव्हता.

कारण जेथे तुमचे धन आहे तेथे तुमचे मनही लागेल.

— लूककृत शुभवर्तमान 12:34

ते हळू हळू वाचा, "कारण जेथे तुमचे धन आहे तेथे तुमचे मनही लागेल." पुष्कळांना हे वाक्य वळवून असे म्हणायला आवडते, "जेथे तुमचे मन आहे, तेथेच तुमचे धन आहे." पण ते अशा प्रकारे म्हटलेले नाही आणि ते अशा प्रकारे कार्य देखील करत नाही. लोकांना असे

वाटते की ते रविवारी सकाळी देवावर प्रेम करतील आणि त्याच ठिकाणी त्यांचे धन देखील प्राप्त होईल. चुकीचे! तुमची गरज पूर्ण करण्यासाठी तुमचा विश्वास ज्या प्रणालीवर असतो त्याच ठिकाणी तुमचे धन आहे.

येशू म्हणतो की आपण हे सर्व उलट दिशेने समजतो!

देवाला आपल्या आयुष्यात प्रथम प्रथम स्थान हवे आहे, पैशाला हे स्थान नसावे. जर पैसा हा आपला खजिना असेल, तर तोच सर्वात प्रथम आपला वेळ, आपले प्राधान्य आणि आपुलकीची मागणी करणारा असेल. यामुळेच पेत्राला कराचे बिल थकीत असताना पैसे कमावण्यासाठी त्याला नेमून दिलेले काम सोडू दिल्या गेले नाही. म्हणूनच देवाने आपल्याला गोळा करण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे आणि घाम गाळून कष्ट करण्याचे नाही. येशूने आपल्याला राज्याचा मार्ग शिकवायचा आहे, आपल्या तरतुदीसाठी देवावर कसा विश्वास ठेवावा, अशा प्रकारे आपली अंतःकरणे देवावर पूर्ण अंतःकरणाने प्रीती करण्यास मोकळे होतील! येशू म्हणाला, "जीवन अन्नापेक्षा आणि शरीर वस्त्रापेक्षा श्रेष्ठ नाही काय?" तो म्हणत होता की आपल्या जवळ वस्तू असल्याने जीवन होत नाही. जीवनाचा उद्देश हा आहे की त्या वस्तूंनी तुमची आणि पृथ्वीवर तुमच्या नेमणूकीची सेवा करावी.

तरीही आपण काय पाहतो? बहुतेक लोक त्या गोष्टींची सेवा करत सतत धावत असतात. गहाण ठेवण्यासाठी, गाडीचे पेमेंट देण्यासाठी, बिले भरण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे. येशू म्हणतो ते जीवन नाही! आता, माझ्यावर पलटवार करून मला असे म्हणू नका, "पाहा, येशू, स्वतः म्हणतो की आपल्याजवळ जगिक वस्तू असणे वाईट आहे." नाही तो तसे म्हणत नाही. त्याने 33 व्या वचनात म्हटले आहे की, जर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील. असे नाही की जिथे आपल्याला समस्या सापडते; ते हृदय आहे. जर देवाला वाटले असते कि आपल्या जवळ ह्या जगिक वस्तू नसाव्यात तर येशूने तसे म्हटले असते. त्याऐवजी, तो

जर पैसा हा आपला खजिना असेल, तर तोच सर्वात प्रथम आपला वेळ, आपले प्राधान्य आणि आपुलकीची मागणी करणारा असेल.

म्हणतो की आपण देवाच्या मार्गाने जगलो तर जग ज्या वस्तूंच्या मागे धावते त्या सर्व गोष्टी आपल्याला प्राप्त होतील.

दुसऱ्या शब्दांत, जीवन हे वस्तूंची सेवा करण्या साठी नाही, परंतु दुर्दैवाने, बहुतेक लोक तेच करत आहेत. त्यांना पर्याय नाही; ते गुलाम आहेत. दोन मालकांची सेवा करणे अशक्य आहे आणि वस्तूंची सेवा करणे म्हणजे जीवन नाही. येशू पुढे स्पष्ट करतो की आणखी एक व्यवस्था आहे, आर्थिक शांततेची जागा आणि तुम्हाला जगण्यासाठी मुक्त करणारी तरतूद. त्याला परमेश्वरचे राज्य म्हणतात.

मत्तय 6 मध्ये त्याच्या शिकवणुकीत राज्य कसे दिसते याची दोन उदाहरणे येशू आपल्याला देतो. तो म्हणतो, "आकाशातील पक्ष्यांकडे पहा; ते पेरत नाहीत, कापणी करत नाहीत किंवा कोठारात साठवून ठेवत नाहीत, आणि तरीही तुमचा स्वर्गीय पिता त्यांना खायला देतो" (वचन 26).

पक्ष्यांना किड्यांची शेतं नसतात!

आपल्या दैनंदिन गरजा पुरवण्याचे काम ते स्वत:वर घेत नाहीत. नाही, देव पिता त्यांना खायला देतो. त्यांना फक्त दररोज जे आवश्यक आहे ते गोळा करावे लागते. तुम्हाला हे कळते का? ते आयुष्यभर कष्ट करून घाम गाळत नाहीत. ते गोळा करतात!

फुले श्रम करत नाहीत किंवा सूत कातत नाहीत!

> *"तसेच वस्त्राविषयी का चिंता करत बसता? रानातील फुले पाहा, ती कशी वाढतात? ती कष्ट करत नाहीत व सूत कातत नाहीत. तरी मी तुम्हांला सांगतो, शलमोनदेखील आपल्या सर्व वैभवात त्यांतल्या एकासारखाही सजला नव्हता." (v. 28).*

फुले वेदनादायक परिश्रम आणि घाम गाळून ते घडवून आणत नाहीत. नाही, देव पिता त्यांना कपडे घालतो. येशू पुढे जाऊन तुम्हाला आणि मला आमचे उत्तर सांगतो. जगण्याचा

आणखी एक मार्ग आहे, राज्य मार्ग! येशू म्हणतो, “तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील.” (वचन 33). याचा काय अर्थ होतो? याचा अर्थ ते कसे कार्य करते ते शोधा! ते नियंत्रित करणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करा. देवाची व्यवस्था कशी कार्य करते ते जाणून घ्या!

जर मी तुम्हाला विमानातून अशा देशात सोडले की ज्या देशात तुम्ही याआधी कधीही गेला नाही, तर ते राज्य कसे चालते हे जाणून घेणे तुमचे पहिले कार्य असेल: ते कसे खातात, ते कसे खरेदी आणि विक्री करतात, त्यांच्या जमिनीवर नियंत्रण करणारे कायदे काय आहेत. देवाच्या राज्यातही असेच आहे. देवाच्या राज्याचा भाग होऊन त्याचे फायदे उपभोगण्यास सक्षम होण्यासाठी ते कसे कार्य करते हे तुम्हाला शिकावे लागेल. मला प्रत्यक्ष अनुभवावरून माहित आहे की ते कसे चालते हे मला माहीत नव्हते तेंव्हा मी खूप काही गमावले आहे. तुमचे उत्तर सोपे आहे. तुम्हाला आर्थिक क्रांतीची गरज आहे. क्रांतीमध्ये, लोक त्यांच्या प्रस्थापित सरकारविरुद्ध बंड करतात आणि नवीन सरकार स्थापन करतात. आपल्याला देखील अगदी असेच करणे आवश्यक आहे. तुम्हाला पृथ्वीवरील ती जुनी शाप प्रणाली तिच्यातील सर्व अभाव आणि निराशा काढून टाकण्याची आणि जगण्याच्या नवीन पद्धतीचा आनंद घेण्याची आवश्यकता आहे—देवाच्या राज्यात, नवीन कायद्यांसह, कोणत्याही कमतरते शिवाय आणि मोठ्या आनंदाने जगणे!

अध्याय 11

चालण्वापेक्षा उडणे सोपे आहे!

जर तुम्ही इतिहासात परत गेलात आणि न्यूयॉर्क शहरातून सॅन फ्रान्सिस्कोला जायचे असेल तर तुम्हाला बोटीने जावे लागेल. पनामा कालवा उघडण्याआधीच्या प्रवासाला दक्षिण अमेरिकेला वेढा घेऊन जाण्यास एक वर्ष लागू शकले असते. नंतर, जेव्हा ओरेगॉन ट्रेल चे निर्माण झाले, तेव्हा तुम्हाला हा प्रवास चार महिन्यांत करता आला असता. आज, तुम्ही चार तासात तिथे पोहोचू शकता. कसे? नवीन कायद्याचा वापर केल्या मुळे, उडण्याचा नियम. लिफ्टचा हा नियम येथे आधीपासूनच आहे - पक्षी दररोज त्याचा वापर करतात - परंतु लोकांना ते समजले नाही. उड्डाणाच्या नैसर्गिक नियमांप्रमाणे, बहुतेक ख्रिस्ती लोक देवाच्या राज्याच्या कायद्यांबद्दल जरी ते आपल्या जीवन कालावधीत वाचत असले तरीही त्यांना त्या बद्दल माहिती नाही. देवाचे राज्य येथे आहे, ते तुमच्यामध्ये आहे आणि तुम्हाला त्याचे फायदे उपभोगण्याचा कायदेशीर अधिकार आहे. नैसर्गिक क्षेत्रामध्ये, उड्डाणाचे नियम गुरुत्वाकर्षणाचा नियम रद्द करत नाहीत, ते त्याचे स्थान घेतात. दुसऱ्या शब्दांत, जोपर्यंत तुम्ही उड्डाण नियंत्रित करणाऱ्या कायद्यांनुसार कार्य करत आहात तोपर्यंत तुम्ही उड्डाण करत आहात, जरी गुरुत्वाकर्षण अजूनही प्रभावी आहे. एक वर्षभर जहाजावरुन प्रवास करण्या पेक्षा चार तास उड्डाण करणं खूप सोपं आहे हे तुम्हाला मान्यच करावं लागेल! ठीक आहे, मग गोष्टी जलद मार्गाने सुरू करा आणि तुमच्या जुन्या संथ पद्धती मागे ठेवा.

तुम्ही कधी मोनार्क फुलपाखरू पाहिले आहे का? येथे ओहायोमध्ये, शरद ऋतूमध्ये, तुम्हाला शेकडो मोनार्क फुलपाखरे हिवाळ्यासाठी दक्षिणेकडे उडताना दिसतील. सुमारे 2,000 मैलांचा प्रवास करून ते मेक्सिकोला जाणार असतात. पण येथे एक गोष्ट लक्षात

घेण्यासारखी आहे. ते यापूर्वी त्या ठिकाणी कधीच गेले नव्हते! त्यांना कसं समजलं कि कुठे जायचं आणि कधी जायचं? जर देवाने मोनार्क फुलपाखरासाठी जगण्याचा मार्ग तयार केला असेल तर त्याच्याकडे तुमच्यासाठीही एक मार्ग आहे. फुलपाखरं ते कसे करतात?

या शब्दाला मेटामॉर्फोसिस म्हणतात. मूळ शब्द "मॉर्फ" हा आहे, ज्याचा अर्थ बदल आहे. बऱ्याच लोकांना माहित आहे की मोनार्क फुलपाखरू सुरुवातीपासून फुलपाखरू ह्या स्वरूपातच नसते. परंतु सुरुवातीला ते सुरवंट असते. ज्या वेळेस ते सुरवंट असते, तेंव्हा ते मिल्कवीड प्लांट वर राहतात आणि आकाराने वाढतात, अखेरीस, ते मोठ्या बदलासाठी तयार होतात. विशिष्ट आकारात वाढल्यानंतर, ते क्रायसालिस तयार करतात, एक प्रकारचे कवच ज्यामध्ये सुरवंट 7 ते 15 दिवसांपर्यंत स्वतःला वेढून ठेवतात. नंतर, फुलपाखरू सुरवंटाच्या अवस्थेतून बाहेर पडते आणि अशी कृती करते किंवा व्यवहार करते जे त्याने क्रायसलिस मध्ये असतांना कधीही केले नव्हते. ते अस्तित्वाच्या पूर्णपणे नवीन स्तरावर जगायला सुरुवात करते आणि टिकून राहते. ते उडते! एका मिल्कवीडच्या रोपापुरते मर्यादित न राहता ते आता हवे तिथे उडून हवे त्या ठिकाणी जाऊ शकते. ते सुंदर आहे आणि त्यात एक अल्हाददायकपणा आणि सौंदर्य आहे जे निसर्गात अतुलनीय आहे.

परंतु सर्वात आश्चर्यकारक पराक्रम म्हणजे संकटापासून दूर उडण्याची क्षमता. तुम्ही पहा, उत्तरेकडील हवामानासाठी सामान्य असलेल्या गोठलेल्या हिवाळ्याच्या महिन्यांत मोनार्क जगू शकत नाही. ते मरणार. पण देवाने या प्राण्यासाठी संकटापासून दूर उडण्याचा एक मार्ग तयार केला, 2,000 मैल उड्डाण करून तो पूर्वी कधीही नव्हते आशा ठिकाणी जाते. तिथला रस्ताही त्यांना कसा कळतो? ते हे कसे करतात? मेटामॉर्फोसिस. आणि बायबल म्हणते की त्याच प्रक्रियेद्वारे तुम्ही देखील तुमच्या समस्यां पासून उडून दूर जाऊ शकता, अगदी मोनार्कप्रमाणेच, त्या ठिकाणची परिस्थिती कशी हाताळायची हे माहित नसले तरी देखील.

स्टीव्ह, माझा एक मित्र, एका रात्री आपल्या कारने घरी जात होता आणि त्याने एका हरणाला धडक दिली. यात त्याची कार पूर्णपणे क्षतिग्रस्त झाली. दुर्दैवाने, फॅमिली व्हॅन, त्यांचे एकमेव उरलेले वाहन, एका आठवड्यानंतर त्याचे इंजिन खराब झाले. स्टीव्हची विमा कंपनी स्टीव्हला त्याच्या कारच्या नुकसान भरपाई साठी दोन आठवड्यांचे मोफत भाडे देत

होती, परंतु ती बदलण्यासाठी व्हॅन कोणत्याही विमा संरक्षणाखाली येत नव्हती. स्टीव्ह आणि कॅरेनला काय करावे हे कळत नव्हते. स्टीव्हच्या व्यवसाया साठी त्याच्याकडे कार असणे फार गरजेचे होते कारण तो विक्री व्यवसायात होता आणि कॉल येईल त्या प्रमाणे त्याला दररोज रात्री गाडी घेऊन जाणे आवश्यक होते.

देव त्यांचे उत्तर आहे हे त्यांना माहित होते कारण देवाच्या राज्याविषयी चे शिक्षण ते बऱ्याच वेळ पासून घेत होते. त्या वेळी, त्यांच्याकडे दुसरी गाडी घेण्यासाठी अजिबात पैसे नव्हते. त्यामुळे त्यांना माहीत होते की देव आणि त्याचे राज्य हीच त्यांची एकमेव आशा आहे. मोफत भाड्याचे दोन आठवडे लवकरच संपणार होते आणि अद्याप कोणतेही उत्तर मिळाले नव्हते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्टीव्हने भाड्याने घेतलेली कार परत देण्याच्या आदल्या रात्री, स्टीव्हला एका माणसाचा फोन आला की त्याच्याकडे एक कार आहे जी त्याला कुणाला तरी द्यायची आहे, आणि स्टीव्ह माझ्या चर्चला जातो हे त्याला माहीत असल्याने, त्याने स्टीव्हला हे विचारण्या साठी फोन केला कि त्याला कुणी असे माहित आहे का ज्यांना कार ची गरज आहे. स्टीव्हने पटकन आपली संपूर्ण परिस्थिती त्याला समजावून सांगितली आणि म्हटले की त्याला ती कार जर त्याच्या स्वतःसाठी आणि त्याच्या कुटुंबासाठी मिळाली तर तो त्यांचा फार आभारी राहील. हे सर्व फार उत्तम होते, पण स्टीव्हला सहा मुलं होती आणि एक छोटी कार त्यांच्यासाठी पुरेशी नव्हती. पण, ही कार मिळणे त्यांच्यासाठी एक मोठे प्रोत्साहन होते.

सुमारे एक आठवड्यानंतर, माझ्या सचिवाने कॉल केला आणि म्हणाला, “पास्टर, आज आम्हाला एक आश्चर्यकारक कॉल आला.” एका व्यक्तीला चर्चला व्हॅन द्यायची आहे. आता, स्टीव्ह आणि कॅरेनने नवीन व्हॅनसाठी त्यांचा विश्वास कसा मुक्त केला किंवा त्यांना कोणत्या प्रकारची व्हॅन घेण्याची इच्छा होती हे त्या वेळी कोणालाही माहित नव्हते. म्हणून मी माझ्या सेक्रेटरीला म्हणालो, “ही कोणती व्हॅन आहे?” ती म्हणाली, “ती होंडा ओडिसी आहे.” “ती कोणत्या अवस्थेत आहे, काही तुटलेले, फुटलेले तर नाही ना?” ती म्हणाली की त्या व्यक्ती ने सांगितले गाडीवर एकदेखील खरचटले नाही आणि एकदम उत्तम अवस्थेत आहे आणि फक्त 70,000 मैल चाललेली आहे. मी तिला म्हणालो की ती व्हॅन कुणाला द्यायची हे मला

माहीत आहे. मी ड्रेन्डाला याबद्दल सांगितले आणि तिला कॅरेनला कॉल करण्यास सांगितले. जेव्हा ड्रेंडाने कॉल केला तेव्हा तिने कॅरेनला विचारले की सर्व काही कसे चालले आहे आणि त्यांच्या व्हॅनच्या गरजेबाबत काही हालचाल झाली आहे का. कॅरेनचे पहिले शब्द होते, "हो, ती गाडी मला मिळायलाआता फक्त एकच दिवस बाकी आहे!" ड्रेन्डा म्हणाली, "ठीक आहे, तुला वाटते त्या ही पेक्षा तुला तुझी गाडी जास्त लवकर मिळणार आहे. ये आणि आपली गाडी घेऊन जा."

मला अशा कथा आवडतात, तुम्हाला देखील आवडतात ना? स्टीव्ह आणि कॅरेनचा राज्य तरतूद करून देते याविषयी अधिक आत्मविश्वास वाढला म्हणून कथा पुढे चालू राहिली.

त्याच सुमारास स्टीव्ह आणि कॅरेन यांना घर हवे होते. त्यांनी काही वर्षांसाठी घर भाड्याने घेतले होते आणि त्यांना वाटले कि आता स्वतःचे घर घेण्याची वेळ आली आहे; तरीही पुन्हा, त्यांच्याकडे डाउन पेमेंटसाठी पुरेसे पैसे नव्हते. ते जमिनीच्या खरेदीची चौकशी करण्यासाठी असंख्य बँकांमध्ये गेले होते, आणि प्रत्येक ठिकाणी एकाच गोष्टीची आवश्यक होती, 50 टक्के अग्रीम भुगतान. त्या तरुण जोडप्या कडे ही अट पूर्ण करण्या साठी इतके पैसे नव्हते. कॅरन निराश झाली आणि मला याबद्दल विचारले. देव मार्ग काढेल ह्या वर आम्ही सर्वजण सहमत झालो. त्यामुळे त्यांनी वेगवेगळ्या जागा आणि घरे पाहण्यास सुरुवात केली.

अनेक वेळा, आपल्याला जे शक्य आहे असे वाटते त्यावरुन आपण आपले भविष्य मोजून स्वत:ला मर्यादित करतो. पण देवाच्या बाबतीत, जर आपण देवाच्या वचनाला आपली विचारसरणी बदलू दिली तर सर्व काही शक्य आहे.

त्यांनी पाहिलेल्या अनेक जागांपैकी एक जागा त्यांना आवडली. ज्या भागात त्यांना घर बांधायची इच्छा होती त्याच भागात ही जागा होती आणि 55 एकर जागेची किंमत फक्त 55,000 डॉलर्स होती. पण ह्या वेळेस देखील त्यांच्याकडे डाउन पेमेंट साठी पैसे नव्हते. मी एका छोट्या बँकेबद्दल ऐकले होते, जी जमिनीच्या डाउन पेमेंटचा भाग म्हणून इक्विटी स्वीकारेल, ती बँक त्या परिसरात नव्हती परंतु दोन तासांच्या अंतरावर होती. कच्च्या

जमिनीसाठी असे होणे फारच असामान्य होते. मी त्यांना त्याबद्दल सांगितले आणि त्यांनी बँकेशी ह्या बद्दल बोलण्याची वेळ निश्चित केली. जमिनीची किंमत $100,000 पेक्षा जास्त होती आणि बँकेने सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारे डाऊन पेमेंट ची गरज नाही. म्हणून त्यांनी ती जमीन विनापैसे विकत घेतली आणि शहराबाहेरच्या त्या सुंदर जमिनीवर एक सुंदर घर बांधले, सर्व काही विनापैसे. स्टीव्ह आणि कॅरेन आजही समृद्ध होत आहेत कारण ते, ड्रेंडा आणि माझ्या प्रमाणे, देवाच्या राज्याच्या पद्धतीने काम करतात.

माझ्याकडे माझ्या चर्चमध्ये अशाच कथा आहेत आणि मी तुमच्या आयुष्यात अशाच प्रकारच्या कथांची पूर्ण अपेक्षा करतो. देव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आश्चर्यकारक आणि कधीकधी विचित्र गोष्टी करू शकतो. अनेक वेळा, आपल्याला जे शक्य आहे असे वाटते त्यावरून आपण आपले भविष्य मोजून स्वतःला मर्यादित करतो. पण देवाच्या बाबतीत, जर आपण देवाच्या वचनाला आपली विचारसरणी बदलू दिली तर सर्व काही शक्य आहे.

> *देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.*
>
> — रोमकरांस पत्र 12:2

विश्वासणारे या नात्याने आपण या जगाच्या नमुन्याचे पालन करू नये. पौल पृथ्वी शाप प्रणाली आणि तिची जीवनशैली आणि विशेषतः आपण कसे विचार करतो याचा संदर्भ देत आहे. तुम्ही कधी ड्रेस बनवला आहे किंवा ब्लूप्रिंटवरून काही बांधकाम केले आहे का? तुम्ही असे केले असेल आणि जे बनविले ते तुम्हाला आवडले नसेल, आणि तुम्ही त्याच पॅटर्न चा उपयोग करून पुन्हा ते बनविण्याचा प्रयत्न केला तर काय होईल? तुम्हाला पुन्हा पूर्वीप्रमाणेच परिणाम दिसून येईल. म्हणून पौल म्हणत आहे की आपल्या मनाचे नूतनीकरण करून आपल्याला बदलले पाहिजे; आपण ज्या पद्धतीने जगतो ती पद्धत बदलण्याची गरज आहे. जग जे विचार करते त्यापेक्षा वेगळा विचार आपण करायला हवा.

हा शब्द "परिवर्तित" हा तोच शब्द आहे ज्याबद्दल आपण आत्ताच बोललो होतो, "मॉर्फ" आणि त्याचा अर्थ आहे बदलने. आम्हाला मेटामॉर्फोसिसची गरज आहे! आपण देवासारखा विचार करायला हवा. आपण राज्याच्या विचारांचा विचार केला पाहिजे. हिवाळ्यातील सुरवंटात अडकलेल्या, कुरूप, मारणे हेच नशिबात आहे अशा दृष्टीकोनातून विचार करण्याऐवजी, आपण संपूर्ण नवीन जीवनाच्या मार्गाने देवावर विश्वास ठेवला पाहिजे. आणि तरच आपण आपल्या समस्यांवर मात करू शकतो आणि प्रत्येक परिस्थितीत देवाची परिपूर्ण आणि प्रसन्न इच्छा काय आहे हे जाणून घेण्यासाठी सज्ज होऊ शकतो. जर आपण हा बदल स्वीकारला नाही तर आपली जुनी मानसिकता सतत म्हणत राहील, "नाही, नाही, मी ते करू शकत नाही. नाही, हे कसे शक्य आहे हे मला दिसत नाही."

कुरूप सुरवंट इतक्या कृपेने आणि परिपूर्णतेने उडू शकेल असा कोणी कधी विचार केला असेल का? सुरवंटाकडे बघून आणि त्याला 2,000 मैलांचा प्रवास करावा लागेल याचा विचार करून, आपण फक्त आपले डोके हलवून म्हणू, "अशक्य!" पण देवाच्या राज्यात सर्व गोष्टी शक्य आहेत. माझ्याकडे बघा. जेव्हा माझा टेलिव्हिजन कार्यक्रम सुरू होतो, तेव्हा त्याची सुरुवात मला आर्थिक तज्ञ म्हणून संबोधून होते. कधीकधी मला माझे सुरवंटाचे दिवस आठवतात आणि मी म्हणतो, "हे आश्चर्यकारक आहे!"

उड्डाणाबद्दल बोलताना, ड्रेन्डा आणि मी एकदा राज्य कसे कार्य करते हे शिकू लागलो, तेव्हा मी ठरवले की मला विमान हवे आहे. मी १९ वर्षांचा असल्यापासून पायलट होतो आणि नेहमी भाड्याने विमाने घेत असे, पण माझ्याकडे माझे स्वतःचे विमान कधीच नव्हते. अर्थात तुम्हाला ह्याचे कारण माहीत आहे; माझ्याकडे ते विकत घेण्यासाठी साठी पैसे नव्हते. म्हणून एके दिवशी मी म्हटले की हा वेडेपणा आहे; देवाच्या राज्यासाठी विमान विकत घेणे कठीण नाही. माझ्यासाठी जे शक्य आहे असे मला वाटले त्यावरून मी देवाच्या राज्याला मर्यादित का करत होतो? म्हणून मी एक चेक लिहिला, मेमो विभागात लिहिले, "माझ्या विमानासाठी" (आणि त्या चेकवर इतर जे काही लिहायचे होते ते लिहिले). मार्क 11:24 नुसारत्यावर हात ठेऊन विश्वासाने प्रार्थना केली कि मला ते विमान मिळाले आहे आणि तो चेक पोष्टात टाकला.

"म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल."

ह्या गोष्टीला एक महिना पण झाला नसेल अणि मी नियमित शारीरिक तपासणीसाठी डॉक्टरकडे गेलो होतो. मला आश्चर्य वाटले जेव्हा, काही संदर्भ नसतांना, डॉक्टर म्हणाले, "ज्याला विमान खरेदी करायचे आहे अशा एखाद्या व्यक्तीला तुम्ही ओळखता का?" मला ते विचित्र वाटले. "मी विचारले ते कोणत्या प्रकारचे विमान आहे?" आणि त्यांनी जे सांगितले ते ऐकून मी आश्चर्यचकित झालो आणि उत्साहित झालो कारण मी प्रार्थना करून जे विमान मला हवे होते त्या विषयी विश्वास ठेवला होता तेच ते विमान होते. म्हणून मी त्यांना विचारले की ते विमान मला कोणत्या ठिकाणी पाहायला मिळू शकते आणि त्यांनी मला सांगितले की ते माझ्या घराच्या शेजारी असलेल्या काउंटी विमानतळावर उभे आहे. मी हे समजावून सांगतो. माझे घर काउंटी विमानतळाच्या एका टोकाला आहे. जमिनीवर उतरणाऱ्या प्रत्येक विमानाला थेट माझ्या घरावरून उड्डाण करावे लागते. मला दिवसभर विमानांची ये-जा पाहायला मिळत होती आणि धावपट्टी माझ्या समोरच्या दरवाज्यापासून फक्त एक मैल दूर होती, याचा अर्थ आता माझ्याकडे फक्त विमान असायला हवे होते!

म्हणून मी हे विमान पाहण्यासाठी माझ्याबरोबर जाण्यासाठी एका मित्राला बोलावले ज्याने त्याच्या संपूर्ण आयुष्यभर उड्डाण केले होते आणि आमच्या सोबत फ्लाइट इन्स्ट्रक्टर देखील होता. जेंव्हा आम्ही विमान पाहिले, तेंव्हा मला कळून चुकले की हे माझे विमान आहे; ते अगदी उत्तम स्थितीत होते! मला नेमकं तेच हवं होतं. माझी फक्त एकच समस्या होती, विमान घेण्यासाठी मला वर्षानुवर्षे ज्या समस्येचा सामना करावा लागला होता - माझ्याकडे त्यासाठी पैसे नव्हते. तुमच्या पुढे कधी अशी समस्या आली आहे का? पण यावेळी मी घाबरून मागे हटणार नव्हतो. हे माझे विमान आहे हे मला माहीत होते; देव पैसे कसे पुरवणार हे मला अजून माहीत नव्हते.

काही महिन्यांपूर्वी, ड्रेंडा आणि मी आमच्या कंपनीसाठी ऑफिसची जागा शोधत होतो. आम्हाला माहित होते की आम्हाला आमचा व्यवसाय कुठे हवा आहे, परंतु त्या भागात

विक्रीसाठी कुठलीही जागा उपलब्ध नव्हती; म्हणून आम्ही इतर काही भागात जागा शोधू लागलो. आम्हाला दोन इमारती सापडल्या ज्या आम्ही जवळजवळ विकत घेतल्या होत्या, परंतु त्यापैकी एकही विकत घेण्याबद्दल आम्हाला आत्म्यामध्ये शांती वाटत नव्हती. आम्हाला ज्या भागात ऑफिस हवे होते त्या भागात एखादी इमारत उपलब्ध असेल अशा आशेने आम्ही पुन्हा पुन्हा त्या भागात जात राहिलो. आम्ही या निर्णयाबद्दल प्रार्थना करत असताना, एके दिवशी माझ्या वडिलांनी मला फोन केला आणि ते म्हणाले, "मला माहित आहे, तू म्हणशील कि हे देवाकडून आहे, पण तुझी आई आणि मी ह्या बद्दल बोललो आहोत आणि आम्हाला आमच्या मालकीची इमारत तुमच्या ऑफिस साठी द्यायची आहे." त्यांच्या मालकीची इमारत ज्या ठिकाणी होती अगदी त्याच भागात मला जागा मिळावी अशी माझी इच्छा होती. म्हणून त्यांनी ती इमारत देण्याबद्दल मला सांगितले तेंव्हा मला धक्काच बसला!

नुकतेच जे झाले ते समजून घेण्यासाठी तुम्हाला हे माहित असणे आवश्यक आहे की माझे वडील त्यावेळी विश्वासणारे नव्हते. तुम्ही कधीही त्यांच्यासमोर देवाचा उल्लेख केला तर त्यांना ते आवडत नव्हते आणि ते देवाच्या बाबतीत निंदक होते. खरं तर, ते इतक्या जास्त प्रमाणात निंदक होते की मी त्याच्याशी देवाबद्दल बोलूच शकत नव्हतो. मी अशी प्रार्थना करू लागलो की त्यांना ख्रिस्ताचा प्रचार करण्यासाठी देवाने त्याच्या कडे कुणाला तरी पाठवावे. मी त्यांच्या पर्यंत पोहोचू शकत नाही हे मला माहीत होते; मला हे देखील माहित होते कि ते माझे ऐकणार नाहीत. पण काही वर्षांनंतर वयाच्या ८० व्या वर्षी माझ्या वडिलांचे तारण झाले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आमचे टीव्ही प्रसारण पाहून आणि देव करत असलेल्या सर्व आश्चर्यकारक गोष्टी पाहून त्यांचे तारण झाले. आपल्या आयुष्यातील शेवटची साडेतीन वर्षे ते पूर्णपणे बदललेली व्यक्ती होते आणि दर आठवडी चर्च मध्ये जात असत.

माझे जीवन, जे केवळ जगण्वाची भावना आणि भीतीने मर्यादित होते, आता देवाच्या राज्याने बदलले होते. त्याच्या कायद्यांचा वापर करुन, मी अमर्याद शक्यतांचे जीवन शोधण्वात सक्षम झालो.

एके दिवशी चर्च नुकतेच संपले होते, मी बाहेर हॉलवेमध्ये गेलो. मी माझ्या वडिलांना माझ्या चर्चचे एक सदस्य ज्यांना ते अनेक वर्षांपासून ओळखत होते त्यांच्या सोबत बोलतांना पाहिले. मी त्यांच्या दिशेने जात असताना, मी या माणसाला माझ्या वडिलांना हे विचारताना ऐकले कि त्यांनी चर्चमध्ये यायला का सुरुवात केली . माझ्या वडिलांनी उत्तर दिले की त्यांनी बऱ्याच गोष्टी पाहिल्या आहेत ज्यांचे ते स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत. देवाची स्तुती असो! हे असच व्हायला पाहिजे असते.

पण माझ्या वडिलांचे तारण होण्या आधी आम्हाला त्या इमारतीविषयी त्यांनी केलेल्या फोन कॉल विषयी बोलणे गरजेचे आहे. ड्रेन्डा आणि मला फार आश्चर्य वाटले होते की त्यांनी आम्हाला ती इमारत दिली. आम्हाला माहित होते की ते देवाचे कार्य आहे, अगदी निश्चितपणे; आणि जेव्हा त्यांनी फोन केला तेव्हा आम्ही वडिलांना म्हणू शकलो असतो, “होय, डॅड, तुमचे म्हणणे बरोबर आहे; हे देवाचेच कार्य आहे!”

इमारतीला व्यावसायिक रूप देण्यासाठी आणि आमच्या कार्यालयीन गरजांसाठी उपयुक्त होण्या साठी त्या मध्ये बरेच काही काम करावे लागले. माझ्या वडिलांनी मला इमारत दिली तेव्हा डिसेंबर महिना होता आणि मी त्या इमारतीचे रीमॉडलचे काम सुरू करण्यासाठी वसंत ऋतूपर्यंत वाट पाहणार होतो. हिवाळ्यात इमारत कोणीही वापरत नसल्यामुळे बंद होती आणि माझ्या वडिलांनी सांगितले की त्यांनी इमारती मध्ये पाणी बंद केले आहे. मी विमान पाहण्या साठी जाण्या आधी हिवाळ्याच्या महिन्यांत एक आठवडा पर्यंत अशाच काही गोष्टी घडत राहिल्या. माझ्या भावाने फोन करून मला सांगितले की मी लगेच त्या इमारतीत गेले पाहिजे, कारण त्या इमारती मधून पाणी वाहून रस्त्यावर आले होते. हवामान गरम झाले होते आणि खरे तर माझ्या वडिलांची चूक झाली होती; त्यांनी हिवाळ्यात पाणी बंद केले नव्हते. मी इमारतीकडे जाण्या साठी निघालो आणि वरच्या मजल्यावरील स्नानगृहातील नळ काही दिवसांपासून किंवा आठवड्यां पासून चालू होते. खालच्या मजल्यावरील ड्रायवॉल भिंतीपासून वेगळी झाली होती.

मला माहिती आहे की ही एक वाईट कथा आहे, परंतु तुम्हाला आणि माझ्या भावाला जे माहित नव्हते ते हे की मी आधीच संपूर्ण इमारतीतील सर्व ड्रायवॉल काढून टाकण्याचा

करार केला होता, सर्व बाह्य साइडिंग काढल्या जातील, आणि इमारतीचे संपूर्ण पुनर्रचना दोन आठवड्यांत सुरू होईल. त्यामुळे या पाण्यामुळे होणारे नुकसान ही खरे तर समस्या नव्हती कारण जे काही नुकसान झाले ते तसेही काढूनच टाकायचे होते. पण हे लक्षात ठेवा - माझ्या विमा कंपनीने मला झालेल्या नुकसान भरपाई साठी एक चेक दिला, त्या मधील रक्कम माझे विमान खरेदी करण्यासाठी पुरेसे पैसे होते!

मी आताच जे पाहिले ते खरे होते का? मला नुकतेच माझे विमान आणि माझ्या ऑफिसची इमारत मिळाली होती, सर्व काही कर्जाशिवाय आणि सामान्य पणे ह्या सर्वांसाठी मला किती मेहनत आणि धावपळ करावी लागली असती? होय, ते सर्व माझ्याकडे होते! आता जेव्हा मी त्या विमानातून उड्डाण करतो, आणि मी शेतजमिनीवरून जात असतो, तेव्हा मला आठवण होते की ते विमान उडवणे हे देवाच्या राज्यासारखे आहे. त्याचे कार्य आणि कायदे आपल्याला जगण्याच्या वेगळ्या परिमाणात जीवन जगण्याची परवानगी देतात. सुरवंट आणि फुलपाखरांप्रमाणे, त्या सुरवंटाचे पाय कधीही मेक्सिकोपर्यंत पोहोचवण्याइतपत वेगाने धावू शकले नसते.

ह्या पुस्तकाच्या अंतिम भागात असतांना, मला तुम्हाला एक शास्त्रवचन द्यायचे आहे. मला खात्री आहे की हे शास्त्रवचन तुम्ही आयुष्यभर ऐकले असेल. पण मला वाटतं आता त्याचा तुमच्यासाठी पूर्णपणे नवीन अर्थ असेल.

> *अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांना विसावा मिळेल.'कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे."*
>
> — मत्तय 11:28

येशू आपले जू, वेदनादायक परिश्रम आणि पृथ्वी शाप प्रणालीचा घाम, आमच्या पासून घेण्यासाठी आला होता. आता आपल्याला त्याचे जू (ते पूर्ण झाले आहे) घ्यायचे आहे आणि आपल्या आत्म्यासाठी विश्रांती (सातवा दिवस, खरा शब्बाथ) प्राप्त करायची आहे.

तुम्ही तुमच्या स्वतःच्या जीवनात आश्चर्यकारक गोष्टी अनुभवू शकता कारण तुम्ही फक्त पोटीफरने जे केले तेच करता, राज्याच्या जीवनपद्धतीतून चालता. देवाच्या राज्याच्या नियमांचे अनुकरण करण्याचा निर्णय आजच घ्या आणि अधिनतेच्या सामर्थ्याचा आनंद घेण्यास सुरुवात करा. आजच तुमची आर्थिक क्रांती सुरू करा, जुनी जीवनशैली, जुने अधिपत्य, दारिद्र्य, आजारपण आणि निराशेची पृथ्वी शाप प्रणाली दूर करा. तुमचे जुने सुरवंटाची जीवन पद्धती सोडून द्या आणि येशूने तुम्हाला प्रवेश दिलेल्या राज्याच्या कायद्यांचा वापर करून उड्डाण करायला सुरुवात करा. तुम्ही त्या राज्याचे नागरिक आहात.

तुम्हाला कायदेशीर अधिकार आहेत!

जर तुम्हाला हे पुस्तक मनोरंजक वाटले असेल आणि तुम्ही देवाच्या राज्याचे विद्यार्थी बनण्याचा निर्धार केला असेल, तर माझी इच्छा आहे कि तुम्ही GaryKeesee.com वर अवश्य जावे. तेथे तुम्हाला अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी लायब्ररी मिळेल, त्या मधील पुस्तकें तुम्हाला सहायक ठरतील आणि त्याद्वारे तुम्हाला देवाच्या राज्यामध्ये मार्गदर्शन मिळेल. मी तुम्हाला टीम रिव्होल्यूशन पार्टनर बनण्यासाठी प्रोत्साहित करू इच्छितो या ठिकाणी तुम्हाला विशेष कार्यक्रम आणि कोचिंग सत्रांमध्ये प्रवेश मिळेल.

आर्थिक क्षेत्रात विजय मिळवण्यासाठी आध्यात्मिक ज्ञान आणि पृथ्वीवरील, नैसर्गिक ज्ञान दोन्ही आवश्यक आहे. माझ्या कंपनी फॉरवर्ड फायनान्शिअल ग्रुपने तुमच्यासाठी तयार केलेली कर्जमुक्त योजना, कर्जमुक्त होण्याविषयी माहितीसाठी 1-800-815-0818 वर कॉल करा.

तुमच्या कष्टाने कमावलेल्या सेवानिवृत्तीच्या पैशाचे संरक्षण करणे तितकेच महत्त्वाचे आहे जेवढे ते कसे कमवायचे हे जाणून घेणे, विशेषत: आर्थिक संकटाच्या या काळात. माझी कंपनी लोकांना सुरक्षितपणे गुंतवणूक करण्यात मदत करण्यावर लक्ष केंद्रित करते. आमच्या ग्राहकांसाठी 100 दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त पैसे गुंतवलेले असताना, आमच्या देशात गेल्या 15 वर्षांच्या आर्थिक अराजकतेमध्ये एकाही ग्राहकाचा एक पैसा देखील गमावला नाही. म्हणून पुन्हा सांगतो, कॉल विनामूल्य आहे आणि सल्ला विनामूल्य आहे. माहितीसाठी 1-800-815-0818 वर कॉल करा.

ड्रेंडा आणि मी व्यक्ती आणि कुटुंबांना जीवनात जिंकण्यासाठी मदत करण्यासाठी वचनबद्ध आहोत. म्हणूनच ड्रेंडा तिचे स्वतःचे टेलिव्हिजन प्रसारण तयार करते, जे ड्रेंडा ह्या नावाने प्रसारित होते. कौटुंबिक जीवन आणि सर्व वयोगटातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी हा एक कार्यक्रम आहे. अधिक माहितीसाठी कृपया Drenda.com वर जा.

शेवटी, ड्रेन्डा आणि माझी इच्छा आहे की तुम्ही जगभरातील चर्च आणि पाळक यांना पाठिंबा द्यावा. आमचा H-3 आउटरीच प्रकल्प लोकांना जीवनात व्यावहारिक बाबतीत मदत करण्यासाठी आमच्या हृदयातुन निघालेला प्रकल्प आहे. H-3 दरवर्षी जगभरातील हजारो पाळकांना शिक्षण साहित्य पुरवते. आम्ही भुकेल्यांना अन्न पुरविण्या द्वारे त्यांची मदत करतो,

ज्या संस्था अनेक देशांमध्ये लैंगिक तस्करी थांबवणे, अनाथाश्रमांना मदत करणे, अनेक देशांतील पाळकांना आर्थिक मदत करणे आणि ओहायोमध्ये महिलांसाठी आश्रयस्थान उपलब्ध करून देणे हे कार्य करतात त्यांना आम्ही मदत करतो. पृथ्वीवरील लोकांना देवाच्या राज्याबद्दल शिकण्यास मदत करणे आणि आपल्या सर्वांना स्वातंत्र्य आणि समाधान मिळावे अशी जी देवाची इच्छा आहे त्या बद्दल जाणून घेण्यास मदत करणे हे आमचे ध्येय आहे.

मला आमची अद्भुत कथा तुमच्यासोबत शेअर करण्याची परवानगी दिल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार. आता, बाहेर पडा आणि देवाच्या राज्यासह तुमची स्वतःची एक आश्चर्यकारक कथा बनवा.

मालिकेतील इतर पुस्तके:

अधीनतेचे सामर्थ्य

पॉवर ऑफ रेस्ट

पॉवर ऑफ जेनेरॉसिटी

पॉवर ऑफ स्ट्रॅटेजी

पॉवर ऑफ प्रोव्हिजन

तुमची आर्थिक क्रांती
अधीनते सामर्थ्य

हे पुस्तक वाचा जर तुम्हाला.....

तुमच्या आर्थिक परिस्थितीचा कंटाळा आला असेल

कर्जमुक्त व्हायचे आहे

कुठून सुरुवात करावी हे माहित नाही

निराशेने ग्रासले आहे

गॅरी किसी स्वतः या परिस्थितीतून गेले आहेत. अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना संपूर्ण नऊ वर्षे तीव्र भावनिक संघर्षाचा सामना करावा लागला. कर्जदारांचे फोन कॉल्स, आय आर एस रांगा, कोर्ट केसेस आणि अपमान आणि लाज जीवनाचा एक भाग बनला होता. पण एके दिवशी जेव्हा देव त्यांच्याशी त्यांच्या आर्थिक परिस्थितीबद्दल बोलला आणि एक रहस्य त्यांना सांगितले तेव्हा त्यांची परिस्थिती झपाट्याने बदलली! ते कर्जमुक्त झाले, कोट्यावधी–डॉलरच्या कंपन्या बनवल्या आणि आता "फिक्सिंग द मनी थिंग" या शोद्वारे ते टेलिव्हिजनवर त्या रहस्याबद्दल लोकांना सांगतात ज्याने त्यांचे जीवन बदलले, आणि हा कार्यक्रम संपूर्ण जगात प्रसारीत होत आहे. गॅरीने ही तत्त्वे परिषदांमध्ये आणि वैयक्तिकरित्या जगभरातील हजारो आणि लाखो लोकांना शिकवली आहेत. यशस्वी जीवन जगण्यासाठी अनेक सिद्धांत आणि दृष्टिकोन उपलब्ध आहेत हे त्यांना माहीत आहे आणि मान्य आहे. पण तुमच्याशी शेअर करण्यासाठी त्यांच्याकडे एकच तत्त्व असेल तर ते हेच तत्व असेल. गॅरी तुम्हाला या क्रांतीमध्ये सामील होण्यासाठी आणि आपली आर्थिक परिस्थिती अधिनतेच्या सामर्थ्याने ताबडतोब बदलण्यासाठी आमंत्रित करतात.

गॅरी किसी एक लेखक, वक्ता, उद्योजक, आर्थिक तज्ञ आणि पाळक आहेत, त्यांच्या अंतःकरणात लोकांना यशस्वी होण्यासाठी, विशेषतः विश्वास, कुटुंब आणि आर्थिक क्षेत्रात मदत करण्याची उत्कट इच्छा आहे. गॅरी आणि त्यांची पत्नी डँड्रा यांनी एकत्र मिळून अनेक यशस्वी व्यवसाय उभारले आणि आता ते फेथ लाइफचे संस्थापक आहेत, ही संस्था दोन टेलीव्हिजन कार्यक्रम प्रसारित करते – फिक्सिंग द मनी थिंग आणि डँड्रा, एक जागतिक परिषद आणि व्यावहारिक स्रोत. कोलंबस, ओहायो येथील फेथ लाइफ चर्चमध्ये हे जोडपे पाळकीय सेवा करत आहेत.

GKM GARY KEESEE MINISTRIES
garykeesee.com